# डॉक्टर मितवा



डॉ. शशांक व्यं. परुळेकर

# डॉक्टर मितवा

डॉ. शशांक व्यं. परुळेकर

Alaso available in

epub 3

ई साहित्य प्रतिष्ठान

© डॉ. शशांक व्यं. परुळेकर

सूचनाः

सर्व हक्क लेखकास्वाधीन. भारतीय आणि आंतरदेशीय कॉपीराईट कायद्यान्वये संरक्षित. या पुस्तकाचा कोणताही भाग लेखकाच्या पूर्वपरवानगीशिवाय पुनर्मुद्रित, फोटोकॉपी, इलेक्ट्रॉनिक, नाट्य अथवा चित्रपट या प्रकारे वापरण्यास मनाई आहे. या पुस्तकातील सर्व प्रसंग आणि परमेश्वर सोडून इतर सर्व पात्रे काल्पनिक आहेत. तरीही एखाद्या व्यक्तीशी कोणत्याही पात्राचे साधर्म्य आढळलं, तर तो निव्वळ योगायोग समजावा.

communicate.svp@gmail.com

PDF आवृत्ती : २०१८

epub आवृत्ती २०२०

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

# मनोगत

एम्.बी.बी.एस्.चं शिक्षण घेताना साडेचार वर्षं गेली. नंतर इंटर्नशिपचं एक वर्ष गेलं. पुढे एम्.डी. करताना तीन वर्षं गेली. तारुण्यातली ती साडेआठ वर्षं गंमतजंमत करत घालवणं शक्यच नव्हतं, कारण डॉक्टर झाल्यावर पुढे रुग्णांवर उपचार करताना त्या साडेआठ वर्षांत संचित केलेलं ज्ञानच उपयोगी पडणार होतं. त्या काळात गंमतजंमत करणारे, प्रेमात आकंठ बुडलेले असणारे विद्यार्थीही आमच्या बरोबर होते. गंमतजंमत, प्रेम वगैरे आणि अभ्यास यांची योग्य प्रमाणात सांगड घालून डॉक्टर होणारेही होते, नाही असं नाही. पण तसे विरळाच असायचे. बहुतेक वेळा गंमत आणि प्रेमवीर जेमतेम पास व्हायचे किंवा चक्क नापास व्हायचे. प्रॅक्टीस करायला लागल्यावर गरज पडेल ते ज्ञान ते सुद्धा मिळवायचे. त्यांच्यापैकी कोणाचे पेशंट दगावल्याचं ऐकलं नाही.

एम्.डी.ची परिक्षा उत्तीर्ण होऊन स्त्रीरोगतज्ज्ञ झालो तेव्हा जग जिंकल्याचा आनंद झाला होता. वैद्यकीय शिक्षणाचे मोरपंखी दिवस संपले होते आणि आता डॉक्टरकीत कारकीर्द करायची होती. एकीकडे गंमतजंमत करायचे दिवस सरले आणि आता ते परत येणार नाहीत याची हुरहुर होती, तर दुसरीकडे भविष्याचा वेध घ्यायचा उत्साह होता. पुढचं पहिलं पाऊल टाकलं त्याला आता चौतीस वर्षं झाली. कामाच्या नादात वेळ कसा गेला ते कळलंच नाही. कामात गुंतलो तरी कधी जुनी मित्रमंडळी भेटली की जुन्या आठवणी जाग्या व्हायच्या. वैद्यकीय शिक्षणासाठी इच्छुक असणाऱ्यांना आणि त्यांच्या पालकांना त्या विश्वाची ओळख व्हावी म्हणून मी आधी 'डॉक्टरबाबू!' हे माझं पहिलं पुस्तक लिहिलं. ते ग्रंथालीने प्रकाशित केलं त्याला सतरा वर्षं झाली. ते मी हलक्याफुलक्या भाषेत लिहिलं होतं. विद्यार्थीदशेतल्या गंमतीजमती त्यांत होत्या. ते वाचकांना भावलं. पदव्युत्तर शिक्षण आणि नंतर डॉक्टरकी करताना पुढे अनेक अनुभव आले. त्यांच्यावर बेतलेलं 'डॉक्टर चाणक्य' हे दुसरं पुस्तक मी दोन वर्षांपूर्वी लिहिलं. ते ई-साहित्य प्रतिष्ठानने प्रकाशित केलं. वाचकांना तेही आवडलं. या दोन्ही कादंबऱ्यांत गंमत होती, पण प्रेमाचे

गुलाबी रंग नव्हते. पहिल्या दोन कादंबऱ्या वाचून डॉक्टर मंडळी एकदम नीरस असतात असा वाचकांचा विनाकारण गैरसमज होईल असं मला वाटलं. म्हणून मी ही तिसरी कादंबरी लिहिली आहे. वाचकाला विनाकारण गंभीर करावं असं मला कधीच वाटलं नाही, म्हणून हलक्याफुलक्या भाषेत लिखाण केलं आहे. घटकाभराच्या मनोरंजनासाठी ही कादंबरी वाचायला हरकत नाही. पण त्या शब्दांआड दडलेल्या, कधी मनाला चटका लावणाऱ्या, कधी गळा दाटून आणणाऱ्या, कधी प्रक्षुब्ध करणाऱ्या भावना वाचकाला जाणवल्या तर मला जास्त आनंद होईल. जशी 'डॉक्टरबाबू!' आणि 'डॉक्टर चाणक्य' ही माझी आत्मचरित्रं नव्हती, तसंच हे पुस्तकसुद्धा नाही. त्या दोन कादंबऱ्यांत होती त्यातली काही पात्रं याही कादंबरीत आहेत. पण या कादंबरीचा आनंद घेण्यासाठी आधी ती पुस्तकं वाचलेली असण्याची अजिबात गरज नाही. या कादंबरीतल्या सर्व घटना आणि मध्ये मध्ये उल्लेख असलेला परमेश्वर सोडून सर्व पात्रं पूर्णपणे काल्पनिक आहेत. तरीही एखाद्या व्यक्तीशी कोणत्याही पात्राचं साधर्म्य आढळलं, तर तो निव्वळ योगायोग समजावा.

डॉ. शशांक व्यं. परुळेकर

# उपोद्घात

आमचं ऑपरेशन थिएटर होतं नेहमीचंच, पण वातावरण जरासं वेगळं दिसत होतं. हिरव्या स्क्रब सुटात कोणीतरी जमिनीवर पडलेलं दिसत होतं. डोक्यावर हिरवी कॅप आणि चेहऱ्यावर मास्क होतं. ओटीत काहीजणांची नाकं मास्कबाहेर असत तसं त्याचं नव्हतं, म्हणून तो कोण ते ओळखता येत नव्हतं. एक ॲनास्थेटिस्ट त्याची नाडी तपासत होती. मिता किंचाळत होती,

"मामा, मामा! त्याला टेबलावर घ्या."

मामा समोर दिसत नव्हता. थिएटरच्या चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्याला मामा म्हटलं तर तो जरा जास्त मन लावून काम करेल असं आमच्याकडच्या मुलींना बहुधा वाटत असावं. 'अरे ओ' किंवा 'भैय्या' असं म्हणण्याऐवजी 'मामा' अशी हाक मारणं बरं वाटायचं म्हणून मग आम्ही सगळेच त्या कर्मचाऱ्यांना 'मामा' अशीच हाक मारत असू.

"मामा, कार्डिॲक अरेस्ट आहे. त्याला टेबलावर घ्या " मिता परत जिवाच्या आकांताने ओरडली.

मामा काही उगवेना. तो कोण जमिनीवर पडला होता तो मरेल ना, असं माझ्या मनात आलं. बिचारा.

मिताने त्याच्या छातीच्या मध्यावर एक जोरदार मुक्का मारला. त्या दुसरीने मान हलवली.

"अरे उठ, उठ" असं म्हणत मिताने त्याचं चेस्ट कंप्रेशन सुरू केलं. काय पटपट काम करत होती ती. माझीच नजर लागेल असं माझ्या मनात आलं. "अठ्ठावीस, एकोणतीस, तीस" असं म्हणून ती थांबली. तीस वेळा कंप्रेशन करून झालं होतं. त्या दुसरीने त्याच्या तोंडावरचं मास्क खेचून काढलं, अंबू बॅगला व्हेंटिलेशन मास्क लावलं, ते मास्क त्याच्या नाकातोंडावर बसवलं आणि त्याला

कृत्रिम श्वासोच्छवास द्यायला सुरुवात केली. तिने दोनदा त्याच्या फुप्फुसांत हवा भरली, आणि मग ती बाजूला झाली. मिताने परत चेस्ट कंप्रेशन सुरू केलं. मुलगी नाजूक दिसत असली तरी ताकदीची आहे, असं माझ्या मनात आलं. काय बिशाद आहे त्याची मरायची, जोपर्यंत मिता त्याच्यावर सी.पी.आर. करतेय.

तेवढ्यात ओटीचे दोन मामा आले. एकदम दोन मामा आले म्हणजे तो कोण बिचारा कार्डिअॅक अरेस्टमध्ये होता, तो बऱ्यापैकी सिनिअर असणार. त्याचा चेहरा मला नीट दिसला नव्हता.

"कार्डिओस्कोप आणि डिफिब्रिलेटर आणा" मिता म्हणाली.

"इथे जमिनीवर?" एका मामाने आश्चर्याने विचारलं.

"हो. आणा पटकन" चेस्ट कंप्रेशन करताकरता मिता म्हणाली. त्या मामाने कार्डिअॅक अरेस्टचा पेशंट पूर्वी पाहिलेला नसावा. त्याने लगबग कार्डिओस्कोप आणि डिफिब्रिलेटर आणला. त्या पेशंटच्या बाजूला ठेवला. मिताची दुसऱ्यांदा तीस कंप्रेशनं करून झाली होती. तिच्या सहकारी अॅनास्थेटिस्टने दोनदा कृत्रिम श्वासोच्छवास देईपर्यंत मिताने त्या पेशंटचा स्क्रब सूट वर करून त्याच्या छातीवर कार्डिओस्कोपचे चेस्ट लीड्स लावले. कार्डिओस्कोप सुरू केला.

"व्हेंट्रिक्युलर फिब्रिलेशन आहे" ती म्हणाली. "डिफिब्रिलेट करायला हवं."

"मिता, तूच करतेस?" तिची जोडीदारीण म्हणाली. "कोणाला बोलावूया का?"

"दोनदा व्हेंटिलेट कर" मिता म्हणाली. "मग मी शॉक देते."

जोडीदारणीने दोनदा अंबू बॅगने व्हेंटिलेशन केलं. तेवढ्यात मिताने डिफिब्रिलेटर नीट आहे याची खात्री केली.

"शॉक देतेय" मिता मोठ्या आवाजात म्हणाली. "सगळयांनी लांब उभे रहा." सगळे जण दोन पावलं मागे सरकले. जोडीदारणीने अंबू बॅग आणि मास्क काढलं आणि तीसुद्धा मागे झाली. मिताने डिफिब्रिलेटरची पॅडल्स त्याच्या छातीवर स्थिर हातांनी टेकवली आणि बटण दाबलं. तो थरारला. का कोण जाणे, मी पण थरारलो. एरवी कार्डिॲक अरेस्टसारखं काही झालं तर नेहमी सी.पी.आर. द्यायला मी पुढे असायचो. तिथे ॲनास्थेटिस्ट असले तर सूत्रं त्यांच्या हातात सोपवली तरी मी मदतीला असायचो. या वेळी मी पुढे का होत नव्हतो?

कार्डिओग्राम पूर्वी होता तसाच होता. मिताने परत चेस्ट कंप्रेशन करायला सुरुवात केली. जोडीदारीण अंबू बॅग आणि मास्क घेऊन तयार राहिली.

"उठ रे, उठ रे" मिता चेस्ट कंप्रेशन करता करता पुटपुटली. तिच्या डोळयांतून दोन अश्रू ओघळले.

मिताच्या डोळयांत अश्रू? इतक्या वर्षांत असं कधी पाहिलं नव्हतं. तो पेशंट तिच्या ओळखीचा असावा.

मिताची तीस कंप्रेशनं देऊन झाली. ती मागे झाली. जोडीदारणीने दोनदा अंबू बॅगने व्हेंटिलेशन केलं. कार्डिओग्राम पूर्वी होता तसाच राहिला. मिताने परत कंप्रेशनं द्यायला सुरुवात केली. डोळयांतून अश्रू येतच होते. तीस कंप्रेशनं देऊन झाली. जोडीदारणीने दोनदा अंबू बॅगने व्हेंटिलेशन केलं.

"फिब्रिलेशन तसंच आहे, दुसरा शॉक देतेय" मिता म्हणाली. सगळे जण दोन पावलं मागे सरकले. जोडीदारणीने मिताच्या तोंडाकडे पाहिलं. मिताने तिच्याकडे दुर्लक्ष केलं आणि डिफिब्रिलेटरची पॅडल्स त्याच्या छातीवर स्थिर हातांनी टेकवली आणि बटण दाबलं. आशेनं कार्डिओस्कोपच्या स्क्रीनकडे पाहिलं. तिचं तोंड पडलं. चकार शब्द न बोलता तिने चेस्ट कंप्रेशन परत सुरू केलं. सगळा प्रकार परत दोनदा केला.

"मिता, सिनियरला बोलावूया."

"मॅडमना बोलवायला सांग" मिताने म्हटलं. "तिसरा शॉक देतेय."

एक स्टुडंट नर्स घाईघाईने बाहेर गेली. मिताच्या मॅडम येईपर्यंत तो कोण अनामिक होता तो एकतर परत ठीक होईल नाहीतर मरेल, असं माझ्या मनांत आलं. मिता करत होती ते सगळं एकदम बरोबर होतं. पण तिच्या डोळ्यांतले अश्रू? तिच्या मनांत त्याच्याबद्दल काही...? आणि मी काय करत होतो?

मिताने तिसरा शॉक दिला. लाल पट्टीवाली सिस्टर चिंतातूरपणे बघत होती. त्या अनामिकाचं काही खरं दिसत नाही असे भाव तिच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होते. मिताने पॅडल्स बाजूला ठेवली आणि चेस्ट कंप्रेशन करायला सुरुवात केली.

"मिता, तू दमली असशील. मी देते कंप्रेशन" तिच जोडीदारीण म्हणाली. तसं म्हणायला मीही तोंड उघडलं, पण माझ्या तोंडातून एक शब्दही बाहेर पडला नाही.

"नको" मिता निग्रहाने म्हणाली. "त्याला एक मिलिग्रॅम ॲड्रिनॅलीन दे."

जोडीदारणीने त्याच्या हातावरच्या नीलेत कॅन्यूला टाकला आणि ॲड्रिनॅलीन दिलं.

"तीनशे मिलिग्रॅम अमिओडॅरोन दे" मिता म्हणाली. जोडीदारणीने तेही दिलं.

'उठ रे, उठ रे!" मिताचे अश्रू थांबत नव्हते. "मी आता आणखी काय करू रे? उठ ना."

मी काही मदत करू का, असं मला विचारायचं होतं. पण तोंडातून शब्दही फुटला नाही. मिता अंगावर आली तर काय? तिचा पारा कधीकधी पटकन चढायचा. त्यातून त्या उंचावरच्या जागेकडून मला सगळं नेहमीपेक्षा वेगळंच दिसत होतं. पण उंचावरची जागा? ओटीमध्ये? मी शिडीवर चढलो होतो का काय? आणि समजा तसं असलं तरी येवढं सगळं होत असताना मी खाली का आलो नव्हतो?

"मिता, नाडी लागतेय" जोडीदारीण म्हणाली. मिता जिंकली तर, असं माझ्या मनांत आलं. मला तिचा चेहरा बघायचा होता, पण तेवढ्यात मी वर कोठे होतो तिथून खाली थेट त्या जमिनीवर पडलेल्याच्या छातीवर कोसळलो. मिताने आत्ताच त्याला मरणाच्या दारातून परत आणलंय, आता मी त्याच्यावर पडल्यामुळे त्याला काही झालं तर ती मला कच्चा चावून खाईल असं माझ्या मनात आलं. एरवी मला या विचाराने टेन्शन आलं असतं. पण मी त्याच्या अंगावर आपटलोच नाही. तरीही त्या क्षणी माझ्या बरगड्यांतून विलक्षण कळा यायला लागल्या, छातीत भयंकर जळायला लागलं, आणि अंग अगदी थंड पडलंय असं वाटायला लागलं.

'मिता, तू त्याला परत आणलंस" तिची जोडीदारीण आनंदाने चित्कारली. ओटीतली माणसं एकदम उत्तेजित आवाजात बोलायला लागली. ती काय म्हणतात ते मला ऐकायचं होतं. पण माझं चित्त विचलित झालं. माझ्या गालांवर दोन मृदू हात आले. माझ्या चेहऱ्यावर पाण्याचे थेंब पडायला लागले. ओटीच्या छतातून परत पाणी झिरपायला लागलं की काय असं सर्वांगात वेदना होत असतानाही माझ्या मनात आलं. कुठून पाणी गळतंय ते बघायला मी डोळे उघडले आणि बघतो तर काय, मी जमिनीवर पडलो होतो, मिताने माझा चेहरा हातांत धरला होता आणि तिच्या डोळयांतून अश्रू माझ्या चेहऱ्यावर सांडत होते. म्हणजे तो मीच होतो का...?

"मिता" मी म्हटलं. पण तोंडातून शब्द बाहेर पडला नाही. मी डोळे मिटले. माझं भान हरपताना चेहऱ्यावर पडणारे तिचे अश्रू ही माझी शेवटची जाणीव होती.

# १

वर्ष १, ऑगस्ट १०

सकाळचे साडेआठ वाजले होते. मी डिसेक्शन हॉलमध्ये मान आणि डोकं यांचं डिसेक्शन करायला बसलो होतो. एम्.बी.बी.एस्.च्या पहिल्या वर्षी आम्हाला शरीराच्या वेगवेगळया भागांचं डिसेक्शन शरीरशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी करावं लागत असे. खरं तर तेव्हा शहर आजच्यायेवढं बकाल झालं नव्हतं. रस्त्याने जातायेताना शुद्ध हवेत श्वासोच्छ्वास करता येत असे. फक्त कोपऱ्यावरच्या कचराकुंडीच्या बाजूने जाताना नाकावर रुमाल दाबून जावं लागत असे. अशा वातावरणात बालपण आणि शालेय शिक्षणाचा काळ गेलेला असल्यामुळे दुर्गंधांची विशेष ओळख नव्हती. शरीरशास्त्राच्या अभ्यासासाठी डिसेक्शन करणं अनिवार्य होतं असं आम्हाला तेव्हा वाटत असे. स्वतः नाही केलं तरी कमीतकमी इतरांनी केलेल्या डिसेक्शनमधले वेगवेगळे भाग बघावे लागत असत. निखिल माझ्या ग्रुपमध्ये असला तरी आमच्याबरोबर डिसेक्शन न करता तो त्याच्या मोठ्या बहिणीकडून मिळालेला एक मोठा फोर्सेप्स हातात धरून एका टेबलावरून दुसऱ्या टेबलावर असा फिरत असे आणि लोकांच्या डिसेक्शनमध्ये सापडलेले वेगवेगळे भाग उचलून बघत असे. डिसेक्शन हॉलमध्ये येणारी विलक्षण दुर्गंधी आमच्या नाकांना त्रास द्यायची तशीच त्याच्याही नाकाला त्रास देत असणार. पण तो फार थोडा काळ तिथे असायचा. त्यामुळे जर त्याचे काही दुष्परिणाम असले तर ते त्याच्यावर नक्कीच कमी प्रमाणात झाले असावे. साधारणपणे झुरळ, पाल, उंदीर यांना बघून 'शी:' असं म्हणून नाक मुरडणाऱ्या मुली आमच्याकडेही असायच्या. पण त्याही त्या दुर्गंधाला सरावलेल्या असायच्या. नाकाला रुमाल लावून फिरणारी एकही मुलगी मला पाहिलेली आठवत नाही. मी नाहीतरी नाकासमोर बघून चालणारा, मुलींकडे मान वर करून न बघणारा अशी माझी ओळख होती, त्यामुळे नाकाला

रुमाल लावलेल्या मुली मला दिसल्या नसाव्या असं हर्षदचं मत होतं. मी अगदी अरसिक असल्यामुळे मुलींकडे बघत नसे असं सुकुमार शहाला त्याच्या मित्रांना सांगताना मी ऐकलं होतं. कदाचित मी जवळपास आहे असं पाहून मला ऐकू येईल अशा आवाजात तो तसं मुद्दामच म्हणाला असावा. हा संशय यायला मला त्या घटनेनंतर काही महिने लागले. इतर काही नसलो तरी मी तेव्हा भाबडा, इतरांवर डोळे झाकून विश्वास टाकणारा, किंवा थोडक्यात बावळट होतो असं मानणाराही मुलांचा एक ग्रुप होता.

डॉक्टरकी शिकायला येणारी मुलं स्कॉलर असायची. अभ्यासात सदैव बुडून गेलेली ती मुलं स्वतःच्या दिसण्यावर फारसा वेळ खर्च करणारी नसायची. बहुतेक सगळया मुलीही त्याच प्रकारच्या असायच्या. डोळयांवर चष्मा नसला तरी चष्मा लावलाय असा भास त्यांच्यातल्या काही जणींकडे बघून व्हायचा. काहीजणी फॅशनेबल असायच्या, नाही असं नाही. पण त्यांचं प्रमाण कमीच असायचं. सगळया जणी डिसेक्शन हॉलमध्ये असणाऱ्या गर्दीत असायच्या. किती जणी स्वतः डिसेक्शन करायच्या हे मी बघायला पोचलो नाही, कारण साडेआठ वाजता डिसेक्शन हॉल उघडला की मी आत जायचो, तो जेवणाची वेळ झाली की जागेवरून उठायचो. सुरुवातीचा उत्साह ओसरल्यावर आमच्या ग्रुपमधल्या इतरांनी डिसेक्शन करण्याची जबाबदारी माझ्यावर टाकली होती. ते आपण बघ्याचं काम करत असत. त्यामुळे त्यांच्या फुप्फुसांत दुर्गंधीची हवा गेली तरी किमान हात स्वच्छ रहात असत.

"विजय, आम्हाला अन्सा सर्वायकॅलिस दाखव ना."

मिता, नेहा आणि त्यांच्या ग्रुपमधल्या इतर दोघीजणी माझ्या डिसेक्शनमधला अन्सा सर्वायकॅलिस बघायला आल्या होत्या असं दिसत होतं.

"तुमच्या डिसेक्शनच्या शवात अन्सा सर्वायकॅलिस नाहीये का?" मी विचारलं.

"ए, खडूसपणा करू नकोस" नेहा म्हणाली. "प्रत्येकाच्या मानेत दोन अन्से असतात, एक उजव्या आणि एक डाव्या बाजूला. दोन्ही कसे जन्मजातपणे नसतील? आम्ही डिसेक्शन करताना ते कधी तुटून गेले ते कळलंच नाही."

मानेत नर्व्हजचं जाळं असतं. त्यांत वर आणि खाली असणाऱ्या दोन पातळशा नर्व्हज एकमेकांना भिडतात तिथे जी कमान होते तिला अन्सा सर्वायकॅलिस असं म्हणतात. आसपासच्या स्नायूंना या अन्सातून मेंदूकडून येणाऱ्या आज्ञा मिळतात. हा अन्सा खरोखरच इतका बारीक असतो की तो न तोडता डिसेक्ट करणं खूप कठीण असतं. त्याची ऑपरेशनं सर्जन्स कशी करत असतील असा प्रश्न मला तेव्हाही पडत असे.

"ऑक्सिपिटल आर्टरी मिळाली का?" मी विचारलं.

"हो" मिता म्हणाली.

"हायपोग्लोसल नर्व्ह मिळाली?" मी विचारलं.

"हो."

"कॉमन कॅरॉटिड आर्टरी तर चांगली जाडजूड असते. ती दिसली असणारच" मी म्हटलं. "हायपोग्लोसल नर्व्ह आणि ऑक्सिपिटल आर्टरी यांना सोडून कॉमन कॅरॉटिड आर्टरीच्या समोरून खाली जाणारी बारीकशी नर्व्ह खाली दुसऱ्या नर्व्हबरोबर जुळते, तिथे जी कमान दिसते तीच अन्सा सर्वायकॅलिस."

"थिअरी माहितीय रे. आम्हाला अन्सा बघायचाय. अख्ख्या वर्गात तुला एकट्यालाच मिळालाय तो" मिता म्हणाली. "दाखव ना."

मी हातातली कात्री बाजूला ठेवली, बारीक फोर्सेप्स उचलला, आणि त्या शवाच्या मानेतला अन्सा अलगद उचलून त्या चौघींना दाखवला.

"अय्या, छान दिसतोय नाही?" त्यांच्यातली तिसरी उद्गारली. मुली कशाला छान म्हणतील याचा काही नेम नाही असं माझ्या मनात आलं.

"त्याच्या ब्रांचेस दाखव" मिता म्हणाली.

अन्सा बघून खुश होऊन बाकी सर्वजण निघून गेले असते. पण मिताला तेवढ्यावर समाधान नव्हतं. तिला त्या ब्रांचेससुद्धा बघायच्या होत्या. मी त्यांना अन्साच्या ब्रांचेस दाखवल्या.

"दुसऱ्या बाजूचा अन्सापण सापडला तुला?" नेहाने विचारलं.

"हो. बघायचाय?" मी विचारलं.

"नाही" नेहा म्हणाली.

"हो" मिता म्हणाली.

म्हणजे मला अन्सा सापडला ते केवळ माझं नशीब होतं की कौशल्य होतं हे नेहाला बघायचं होतं, तर मिताला ज्ञान मिळवायचं होतं. दोघी पूर्वमाध्यमिक शाळेतल्या माझ्याच वर्गातल्या मुली. एकमेकींच्या जिवश्चकंठश्च मैत्रिणी. पण दोघींमध्ये केवढा फरक होता. मी मिताकडे क्षणभर बघितलं आणि मग दुसऱ्या बाजूचा अन्सापण दाखवला. चौघीजणी खुश होऊन चिवचिव करत निघून गेल्या. मी माझ्या डिसेक्शनकडे परत वळलो.

"मुली पटवण्याची ही पद्धत चांगली आहे" माझ्या पाठून सुकुमार शहा म्हणाला. तो केव्हा आला ते मला समजलंच नव्हतं. ना मी सुकुमार शहाची मैत्रीण पळवली होती, ना त्याच्याबरोबर कसल्याही शर्यतीत होतो. माझ्या चेहऱ्यात त्याला न आवडण्यासारखं काहीतरी असावं असं मला वाटायचं.

"आता तू सुद्धा अभ्यासाला लागणार का मुलींना पटवता यावं म्हणून?" मी विचारलं.

सुकुमार वळला आणि उत्तर न देता निघून गेला. त्याला बहुधा जास्त अभ्यास करायचा नव्हता. किंवा माझ्या डोक्यात मुली पटवण्याची आयडिया टाकली आणि त्या नादाने मी अभ्यास करायचा थांबलो तर माझ्या पुढे जाता येईल असा त्याचा प्लान असावा.

# २

वर्ष १, ऑगस्ट ११

"काय रे, काय ऐकतोय काय आम्ही तुझ्याबद्दल?"

"अम्... माझ्याबद्दल?" मी म्हटलं. मी तसा फारसा कुणाच्या अध्यातमध्यात नसायचो. लो प्रोफाईल म्हणतात तसा मी असताना प्रतापला माझ्याबद्दल कोणी काहीतरी सांगावं आणि ते त्याने मला येऊन विचारावं असं काय असावं ते माझ्या लक्षात येईना. काहीतरी गैरसमज असावा.

"लेको, खाली मुंडी आणि पाताळ धुंडी! मांजराने डोळे मिटून दूध प्यायलं म्हणून ते लोकांना दिसत नाही असं वाटलं काय रे तुला?"

दोन वाक्यांत दोन म्हणी-वाक्प्रचार वापरणं हे प्रतापच्या भाषाप्रभुत्वात बसत नव्हतं. प्रतापची मैत्रीण नीना गुजराती होती. तेव्हा तिच्याकडून शिकून तो असं काही बोलला असेल असं असण्याचीही शक्यता नव्हती. बहुतेक माझ्यावर ग्रुप डिस्कशन झालं असावं.

"प्रताप, असं कोड्यात बोलू नकोस बाबा. मला वाटतं असं संदिग्ध बोललं की मी माझ्या सगळया गोष्टी एक एक करून उघड करेन आणि त्या तुला एरवी समजल्या नसत्या त्या सहज समजतील असा तुझा प्लान असावा. मी या ट्रिकला गंडणार नाही. काय ऐकलंस ते स्पष्ट विचार."

"तू एका वेळी चार-चार मुली पटवतोस असं ऐकलं. गोकुळातला कृष्ण झालायस हं? छान, छान. तू कधी सुधारणार की नाही अशी आम्हाला चिंता होती. ती आता दूर झाली."

सुकुमारने जाऊन माझ्या डिसेक्शन बघायला आलेल्या मुलींची गोष्ट षट्कर्णी केली असं दिसत होतं.

"अरे, ही नुसती सुरुवात आहे. पुढे बघ मी आणखी काय काय करतो ते" मी म्हटलं. "सुकुमार आपली गर्लफ्रेंड माझ्यापासून संभाळायला जिवाचा आटापिटा करतोय असं ऐकलं. तू पण ऐकलंस का ते?"

"सुकुमार..." प्रताप चाचरला. त्याला मी पहिल्याच बॉलवर क्लीन बोल्ड केलं होतं.

"प्रताप, त्या मुलींनी माझं डिसेक्शन बघितलं ते शिकण्यासाठी, मला पटल्या म्हणून नाही. नाहीतर आपल्या शरीरशास्त्राच्या डेमॉन्स्ट्रेटरला वर्गातल्या सगळ्याच मुली पटल्या नसत्या का? आणि फक्त आपल्याच वर्गातल्या नाहीत, तर प्रत्येक वर्षी ऐंशी-नव्वद अशा दर वर्षी पटल्या नसत्या का? तुला वाटतं तशा मुली बावळट नसतात रे."

प्रतापला नीना पटली तिच्यावरून सगळया मुलींची परिक्षा करायची नसते असं मी म्हटलं असतं तर माझ्या भावी वहिनीचा अपमान झाला असता, आणि माझा मित्र मला दुरावला असता. म्हणून मी मोठ्या संयमाने तोंड बंद ठेवलं.

"पण त्यांच्यातल्या दोघी तुझ्याकडे खास नजरेने बघत होत्या म्हणे."

"डेड बॉडीच्या फॉर्मॅलिनमुळे डोळे चुरचुरल्यामुळे त्या तशा बघत असाव्या. पुढच्या वेळी सुकुमारवर विश्वास ठेऊन माझ्याबद्दल काहीतरी चुकीचा ग्रह करून घेऊ नकोस."

"सॉरी. म्हणजे गैरसमज करून घेतल्याबद्दल नाही, तर तू मुलींना पटवलं नाहीस म्हणून सॉरी" असं म्हणून प्रताप गेला. मी त्याचं तोंड बंद केलं खरं, पण सत्य काही मला बदलता येत नव्हतं. मी तसा खरोखरच थोडासा बावळट होतो. बरोबर शिकणारे मुलगे तशाच मुली असा माझा दृष्टीकोन होता. त्यांच्याबरोबर कामाशिवाय बोलावं असं माझ्या मनात कधी यायचं नाही. त्यांच्याकडे कामही कधी निघायचं नाही. त्यामुळे वर्गातली काही मुलं मुलींबरोबर गप्पा मारताना दिसायची, ती काय बोलतात हा प्रश्न मला नेहमी पडायचा. त्यांच्यातली काहीजणं तर जोड्या जुळवून पार झाली होती. आयुष्याचा जोडीदार कॉलेजात अभ्यास करायला आलं

असताना शिक्षण पूर्ण होणं तर सोडाच, पण नुकतंच सुरू झालेलं असताना त्यांना कसा बरं निवडता आला असावा हा प्रश्नही मला मधून मधून सतावायचा.

"विजय, तू ना प्रयत्नच करत नाहीस. हा तुझा प्रॉब्लेम आहे" एकदा प्रतापने आमच्या मित्रांच्यासमोरच जाहीर केलं. आम्ही कॅंटीनबाहेर उभे होतो. सार्वजनिक स्थळी प्रतापने माझी अशी नालस्ती केलेली मला फारशी आवडली नाही.

"कोण म्हणतं मी प्रयत्न करत नाही?" मी विचारलं. "सकाळी साडेआठ वाजता कॉलेजात येतो तो साडेचार वाजेपर्यंत अभ्यास करत असतो. डिसेक्शन, फिजिऑलॉजीचे प्रयोग, सगळी लेक्चर्स वेळेवर पार पाडतो. कसला प्रयत्न करायचा आणखी?"

"काय नीरस माणूस आहे रे हा?" हर्षद म्हणाला. "अरे, या अभ्यासाच्या व्यतिरिक्त आयुष्यात आणखी बऱ्याच गोष्टी असतात."

"उदाहरणार्थ?"

"ते बघ उदाहरण" हर्षदने समोर बोट केलं. समोरून फिजिओथेरॅपीच्या मुलींचा घोळका येत होता. डॉक्टरकीच्या विद्यार्थिनींहून फिजिओथेरॅपीच्या विद्यार्थिनी दिसायला उजव्या, जास्त फॅशनेबल आणि चष्मा न लावणाऱ्या असायच्या. निदान त्यांना चष्मा असलाच, तर तो आहे असं त्यांच्याकडे बघून वाटायचं तरी नाही.

"आजूबाजूला येवढ्या मुलींना बघून तुला काहीच वाटत नाही? अरे, प्रयत्न कर, नाहीतर तू लग्नाचा विचार करशील तोपर्यंत सगळ्या सुंदर मुली एक-दोन मुलांच्या आया झालेल्या असतील. नंतर पश्चात्ताप करून फायदा नसतो."

मी प्रतापला पूर्वी एकदा पश्चात्ताप या शब्दात पश्चात् असतं आणि त्याचा अर्थ नंतर असा असतो, त्यामुळे नंतर हा शब्द पश्चात्ताप या शब्दापूर्वी वापरणं चुकीचं असतं हे नीट समजावून

सांगितलं होतं. पण आजूबाजूला अनेक रंगीबेरंगी गोष्टी असल्यामुळे प्रतापला माझ्या बोलण्याकडे नीट लक्ष देणं जमत नसे. परत एकदा निष्फळ प्रयत्न करण्यात अर्थ नाही असं मनाशी म्हणून मी त्याला त्याबद्दल काही बोललो नाही.

"अरे, प्रयत्न करायचा म्हणजे काय?" मी विचारलं. "आपणहून जाऊन एखाद्या मुलीबरोबर बोलायचं काय?"

"अलबत" तो म्हणाला.

"कोणत्या विषयावर?"

"काय बावळट आहे रे हा!" प्रताप म्हणाला. नीना पटल्यापासून आपण पुरुषोत्तम आहोत असं वाटायला लागल्यासारखं त्याचं वर्तन झालं होतं असं मला वाटायचं.

"अरे, मी उगाचच जाऊन एखाद्या मुलीबरोबर बोललो तर मी लाळघोटेपणा करतो असं तिला वाटणार नाही का?" मी विचारलं. असं कोणत्याही मुलीला वाटेल असं माझं ठाम मत होतं.

"अरे, जरा सफाईने बोलायचं असतं. आपल्या मनात काय आहे हे तिला समजू द्यायचं नसतं" निखिलने या संभाषणात प्रथमच तोंड उघडलं. एम्.बी.बी.एस्.ला अॅडमिशन घेण्यापूर्वी तो या विषयात मास्टर्स करून आला असावा.

"मनात एखाद्या मुलीबद्दल कुविचार घेऊन तिच्याबरोबर बोलायला मला जमणार नाही" मी सरळ सांगितलं.

"अरे, तसं नाही रे. लेक्चरचं टाइमटेबल विचारायचं, किंवा कसल्यातरी नोट्स मागायच्या."

"आणि नंतर?"

"नंतर तिला कॉफी प्यायला येतेस का असं विचारायचं."

"आणि असं विचारल्यावर ती येते म्हणेल?" मी आश्चर्याने विचारलं. घरी आलेल्या पाहुण्यांना कॉफी विचारणं माझ्या सभ्यतेच्या कल्पनेत बसायचं. पण थोडसं बोलून झाल्यावर एखाद्या मुलीला कॉफी प्यायला बोलवायचं?

"आलीच पाहिजे" निखिल आत्मविश्वासाने म्हणाला. त्याला खरंच तसं वाटत होतं की तो माझी चेन खेचत होता देव जाणे. बहुधा मला चढवायचं आणि त्या मुलीने मला चप्पल वगैरे मारली की खी खी करत सगळयांना ती सनसनाटी गोष्ट रंगवून सांगायची असा त्याचा प्लान असावा.

"निखिल, तू या बाबतीत माझा गुरू आहेस. ती बघ बोना समोरून येतेय. तू तिला हाक मार, नोट्स माग, आणि मग कॉफी प्यायला शेट्टीच्या कँटीनमध्ये घेऊन जा. एकदा मी प्रात्यक्षिक बघितलं की मी पण यशस्वीरित्या एखाद्या मुलीला कॉफी पाजू शकेन" मी म्हटलं.

निखिलने मागे वळून पाहिलं. फॉर्म फिटिंग टॉप आणि हिरवी लुंगी असा पेहराव करून आणि साडेचार-पाच इंच उंचीच्या टाचांचे सँडल्स घालून बोना एकदम सफाईदारपणे चालत आमच्या दिशेला येत होती. आफ्रिकेतल्या कुठल्याशा देशातून ती राजमाता हॉस्पिटल आणि मेडिकल कॉलेजात डॉक्टरकी शिकायला आली होती. तिच्या देशात एका ब्यूटी पेजंटमध्ये पूर्वी ती फायनॅलिस्ट होती असं निखिलने पूर्वी सगळया मित्रांना सांगितलं होतं. बोना हा निखिलचा अतिशय जिव्हाळयाचा विषय होता.

"अम्... मी आत्ताच कॉफी पिऊन आलोय. आत्ता परत कॉफी प्यायला मला जमणार नाही" असं म्हणून निखिल गुल झाला.

"प्रताप, तू प्रात्यक्षिक करून दाखवतोस का?" मी विचारल. "मी नीनाला सांगणार नाही की तू बोनाला घेऊन कॉफी प्यायला गेलास."

"छे, छे" प्रताप म्हणाला, "बोना माझ्यापेक्षा तीन इंच उंच आहे."

मी सर्द झालो. 'आपण नीनाशी एकनिष्ठ आहोत आणि परस्त्रीकडे बघतही नाही, तिला कॉफी प्यायला घेऊन जाणं तर केवळ अशक्य' असं काहीतरी तो म्हणेल असं मला वाटलं होतं. बोनाची उंची तीन इंच कमी असती तर केवळ मला शिक्षण देण्यासाठी तो तिला घेऊन कॉफी प्यायला गेला असता असं त्याला म्हणायचं असावं असं दिसत होतं.

आपल्या विद्यार्थ्याला वाऱ्यावर सोडून दोन्ही शिक्षक पसार झाले.

"ते माझ्याबद्दल काय म्हणत होते?" असं बोनाने मला विचारलं. ती बहुतेक त्यांना नीट ओळखत असावी.

"त्यांना तुला कॉफी प्यायला बोलवायचं होतं, पण त्यांना तुझ्या सँडल्स आवडल्या नाहीत" मी म्हटलं.

तिला मी काय म्हटलं ते नीटसं कळलं नसावं. नुसता हुंकार देऊन ती आपल्या मार्गाने गेली. मी माझं जर्नल पूर्ण करायला लायब्ररीत गेलो.

# ३

वर्ष १, ऑक्टोबर १०

शरीरशास्त्र शिकणं काहीजणांना खूप आवडायचं, शरीरविज्ञानशास्त्र शिकणं इतर काही जणांना आवडायचं, दोन्ही विषय शिकणं फार थोड्या जणांना आवडायचं, आणि दोन्ही विषय न शिकणं बहुतेक जणांना आवडायचं. पण पहिल्या वर्षांत लेक्चर्स आणि प्रॅक्टिकल्सना दांड्या मारणं हा प्रकार फारसा प्रचलित नव्हता. इच्छा असो किंवा नसो, बहुतेक जणं हजेरी लावायची. मारून मुटकून का होईना, अभ्यास करायची. दर एका किंवा दोन आठवड्यांनी परिक्षा असल्यामुळे कदाचित असेल, पण फायनल परिक्षा जवळ आली आहे आणि अजून पाठ्यपुस्तकं विकतच घेतली नाहीयेत किंवा घेतली असली तर ती उघडलीच नाहीयेत असं कोणाच्या बाबतीत झालेलं माझ्या ऐकिवात नव्हतं. सगळ्यांनाच छान मार्क्स मिळत नसले तरी कोणी नापास होत नसे. अर्थात वैद्यकीय अभ्यासाच्या प्रवेशपरिक्षेत सगळ्यात जास्त मार्क्स मिळवणारी मुलंच राजमातात पोहचू शकायची. त्यामुळे नापास होणं हा प्रकार नव्हता. पण विषय क्लिष्ट होते. ते एकदम बोअरिंग आहेत असं काही जणांनी खुलेपणाने म्हटलेलं मी ऐकलं होतं. परिक्षेत उत्तरं द्यायला जमेल की नाही या विचाराने चिंताग्रस्त होणारे खूप जण होते.

मी नशीबवान होतो असणार. बारावीनंतर काय शिकायचं हे मी स्वतः ठरवलं नव्हतं. विजय मदर्स बॉय आहे असं आमचे नातेवाईक माझ्या लहानपणापासून माझ्यासमोरही म्हणत असत. ते माझं कौतुक करतायत असं वाटून मी आनंदी होत असे. माझी आईही बहुधा आनंदी होत असावी. तर माझ्या आईने आणि दादांनी म्हणजे वडिलांनी 'आम्हाला वाटतं तू डॉक्टर व्हावंस' असं म्हटलं तेव्हा मी डोळे झाकून राजमातात प्रवेश घेतला होता. विषय कोणताही घेतला म्हणून

आयुष्यात काही फरक पडेल असं माझ्या मनात कधीही आलंच नाही. अभ्यास करायचा की झालं असा माझा समज होता. मला वाटतं आईवडिलांचं पुण्य आणि माझं थोर नशीब म्हणून डॉक्टरकीचे विषय अभ्यास करायला घेतल्यावर मला आवडले. तोंडी परिक्षेची सवय नसल्यामुळे सुरुवातीला खूप दडपण यायचं खरं. आपण खूप हुशार आणि ज्ञानी आहोत असा आव आणून परिक्षांना सामोरे जाणारे काही जण पाहिले की ते दडपण वाढायचं. पण मग माझ्या लक्षात आलं की त्या परिक्षा म्हणजे काही जीवनमरणाचा प्रश्न नव्हत्या. मोजक्या अभ्यासक्रमावर बेतलेल्या त्या परिक्षांसाठी तयारी करणं तसं सोपं होतं आणि बोलताना टेन्शन घेतलं नाही तर मार्क्स मिळवणंही सोपं होतं.

"तू अभ्यास कसा करतोस ते तरी सांग रे एकदा" प्रतापने मला एकदा विचारलं. "माझं तर अभ्यासात लक्षच लागत नाही."

"तुला खरं उत्तर हवंय?" मी विचारलं.

"अलबत" तो म्हणाला.

"मी दोन प्रश्न विचारतो. त्यांची उत्तरं दिलीस की तुला तुझ्या प्रश्नाचं उत्तर मिळेल."

"असं म्हणतोस? विचार तुझे प्रश्न" तो म्हणाला.

"नीनाच्या डोळयांचा रंग कोणता आहे?" मी विचारलं.

"डार्क ब्राऊन" तो पटकन उत्तरला.

"छान. पहिल्या प्रश्नात तुला पैकीच्या पैकी मार्क्स. आता मला सांग, माणसाच्या डोळयांचा रंग कशामुळे ठरतो?"

"....."

"दुसऱ्या प्रश्नाचं उत्तर देता आलं नाही तरी हरकत नाही" मी म्हटलं. "तुला तुझ्या प्रश्नाचं उत्तर मिळालं ना?"

"प्रश्न विचारून उत्तर मिळवायला तू काय सॉक्रेटिस आहेस काय?" प्रताप चिडून म्हणाला. "मित्र म्हणून मी तुझी मदत मागितली होती."

"ओके. चिडू नकोस. मी माझी अभ्यासाची पद्धत सांगतो. आवडली तर मला रॉयल्टी न देता खुशाल वापर."

"हं" तो सरसावून बसला.

"मी पुस्तक निवडताना उपलब्ध असणाऱ्या पुस्तकांतलं सर्वात पातळ पुस्तक निवडत नाही. त्या विषयाचं बायबल अशी ज्या पुस्तकाची ख्याती असते ते निवडतो. ते चांगलं जाडजूड असतं. उद्या पेशंटांवर उपचार करताना आपल्याला संपूर्ण ज्ञान असलं पाहिजे ना?"

"येवढी जाडी पुस्तकं वाचायला केवढा वेळ लागेल?" प्रताप तक्रारीच्या सुरात म्हणाला. त्याच्याकडे मी दुर्लक्ष केलं.

"मग मी ते पहिल्या पानापासून शेवटच्या पानापर्यंत वाचतो. आवडेल तो भाग परत वाचतो."

"अभ्यासाच्या पुस्तकातला कोणता भाग आवडण्यासारखा असत्तो?" प्रतापने त्याच्या दृष्टीने एकदम रास्त प्रश्न विचारला. त्याच्याकडे मी परत दुर्लक्ष केलं.

"जो भाग समजत नाही तो परतपरत वाचतो. तरीही समजला नाही तर दुसऱ्या दिवशी आपल्या सिनियर्सना विचारतो, आणि त्यांनाही ते सांगता आलं नाही तर आपल्या रागीट नसणाऱ्या प्रोफेसरांना विचारतो."

"तू असलं पुस्तकी उत्तर देशील असं वाटलं असतं तर मी तुला विचारलंच नसतं" असं म्हणून तो नाराजी लपवण्याचा जराही प्रयत्न न करता निघून गेला.

योगायोगाने या घटनेच्या दुसऱ्या दिवशी मला मिताने अभ्यास करण्यावरच प्रश्न विचारला.

"विजय, मी पूर्वी अभ्यास करायचे तसाच आत्ताही करते. पण हे सगळं ज्ञान येवढं अफाट आहे की सगळ्या गोष्टी लक्षातच रहात नाहीत रे. तू कसं लक्षात ठेवतोस ते सगळं? "

राजमातात येणारे सगळेच विद्यार्थी आपापल्या कॉलेजांतले स्कॉलर असत. त्यामुळे मी स्कॉलर म्हणून तिने मला तो प्रश्न विचारला असं मला वाटलं नाही. शाळेतला मित्र म्हणून तिने विश्वासाने तसं विचारलं असावं. प्रतापला दिलं ते उत्तर मी तिला दिलं नाही कारण तिचा प्रश्न वेगळा होता. मी वाचायचो तीच पुस्तकं तीही वाचत असे. माझ्या समजुतीप्रमाणे ती कोणाच्या तरी डोळयांच्या रंगासारख्या गोष्टींचा अभ्यास करण्यात वेळ घालवत नसे.

"मिता, एखादा विषय खूप आवडला तर बरंच काही आपोआप लक्षात रहातं. मला हे विषय खूप आवडतात. पण म्हणून मला सर्व काही सतत आठवत असतं असं नाही. शरीरशास्त्रातली माहिती लक्षात ठेवण्यासाठी तर्कशास्त्र उपयोगी पडत नाही हे तुला माहित आहे. ते केवळ संकलित केलेलं ज्ञान आहे. ते लक्षांत ठेवायचं तर एकतर खूप घोकंपट्टी करावी लागते. दुसरा एक मार्ग म्हणजे नेमोनिक्स वापरायची."

"नेमोनिक्स? ते काय असतं?"

"आपल्याला एखाद्या क्रमाने काही माहिती लक्षात ठेवायची असेल, तर त्यातल्या प्रत्येक शब्दाचं पहिलं अक्षर तेच असणारे दुसरे शब्द वापरून एखादं गमतीदार वाक्य करायचं. मग आपल्याला हवी ती माहिती आठवायची वेळ आली की ते वाक्य मनातल्या मनात म्हणायचं. कळलं?"

"हं. एखादं उदाहरण दे ना" ती म्हणाली.

"मनगटात आठ छोटी छोटी हाडं असतात. 'शी लूक्स टू प्रेटी, ट्राय टू कॅच हर' हे वाक्य 'स्कॅफॉइड, लुनेट, ट्रायक्वेट्रल, पिसिफॉर्म, ट्रॅपेझियम, ट्रॅपेझॉइड, कॅपिटेट, हॅमेट' ही हाडांची नावं लक्षात ठेवायला कसं वाटतं?"

"छानच आहे रे" ती आनंदून म्हणाली. "तू केलंस?"

"नाही गं. जुनंच आहे ते" राजा हरिश्चंद्रांचा आधुनिक अवतार म्हणाला. 'मूर्खा, असं सत्य बोलत राहिलास तर मुली कशा पटवता येतील तुला?' असं प्रतापने म्हटलं असा त्या अवताराला भासही झाला. नेहमीप्रमाणे त्याने प्रतापकडे दुर्लक्ष केलं.

"तुझ्याकडे आणखी अशी नेमोनिक्स आहेत?" मिताने विचारलं.

"आहेत ना" मी म्हटलं. मी नाही नाही त्या गोष्टी जमवत असे. हे नेमोनिक्सचं कलेक्शन तसलंच एक होतं.

"मला देतोस?"

"घरी आहेत. उद्या देतो."

"थॅंक्स. आणखी एक प्रश्न विचारू?"

"विचार" मी म्हटलं.

"ती टू प्रेटी दिसणारी कोण आहे रे?" तिचे डोळे खट्याळपणे चमकले.

"मिता!" मी म्हटलं. मी पुढे काही बोलण्यापूर्वी ती पळाली.

# ४

वर्ष १, ऑक्टोबर २८

डिसेक्शन करताना त्वचा आणि तिच्या खालचे टिश्यू स्कालपेलच्या धारदार ब्लेडने सहज कापले जायचे. रक्तवाहिन्या आणि नर्व्हज कापल्या जाणं हे डिसेक्शन करता न येण्याचं लक्षण समजलं जायचं. त्या सुद्धा स्कालपेलने चुकून का होईना, पण पटकन कापल्या जायच्या. त्यामुळे एकशे ऐंशी मुलांपैकी कोणीही पुढे कार्डिअॅक किंवा न्यूरोसर्जन होऊ शकेल असं कोणालाही वाटत नव्हतं. कापले जायचे नाहीत ते अस्थिबंध. हाडं कापणं तर अशक्य होतं. हाडं कापण्यासाठी मोठ्या करवती असायच्या. त्या वापरण्याचं काम बळीराम करायचा. मोठे धारदार चाकू वापरून तो अस्थिबंध कापायचा. मुख्य शरीरापासून हात आणि पाय अलग केले की मुलं वेगवेगळया टेबलांवर जाऊन डिसेक्शन करू शकत असत. दोन हातांवर आठ, दोन पायांवर आठ, छातीवर चार, पोटावर चार, मान आणि डोक्यावर चार असे अठ्ठावीस विद्यार्थी एका शवाच्या डिसेक्शनसाठी एकाच टेबलावर सुरुवातीला असत. हात आणि पाय यांचं सुरुवातीचं डिसेक्शन संपलं की बळीराम हातवाल्यांना हात आणि पायवाल्यांना पाय वेगळे करून द्यायचा. मग एका ठिकाणी केंद्रित झालेली मुलं पांगायची.

मुलं अशी पांगणं आम्हाला बरं वाटत असलं तरी निखिलला सगळी गर्दी एकत्र असणं जास्त पसंत होतं.

"काय रे, असं गर्दीत काम करायला तुला कसं आवडतं?" मी त्याला न राहवून एकदा विचारलं.

"असंच" असं संदिग्ध उत्तर देऊन तो निसटला.

"असंच नाही काही ते" तो गेल्यावर हर्षद म्हणाला. "तो एकदम पोचलेला आहे."

"म्हणजे काय ते मला कळलं नाही" मी म्हटलं.

"अरे, तो कसा उभा असतो ते तू पाहिलंस का?"

मी थोडा विचार केला. निखिलला अंत:चक्षूंसमोर आणलं. "तो विठोबारायांसारखा दोन्ही हात कमरेवर घेऊन उभा असतो" मी म्हटलं.

"देवाचं नाव त्याच्याबरोबर घेऊ नकोस" हर्षद म्हणाला. "निखिल एकदम चालू आहे."

"हात कमरेवर ठेवून उभं राहिल्यावर चालूपणा कसा करता येतो?" मी विचारलं.

"अरे, तो नेहमी मुलींच्या मध्ये उभा असतो, बरोबर?"

"बरोबर" मी म्हटलं.

"एका बाजूच्या मुलीने काहीतरी म्हटलं तर तो हात तसेच कमरेवर ठेवून वळतो. तो उजवीकडे वळला की डाव्या कोपराचा धक्का त्याच्या डावीकडच्या मुलीला लागतो. मग तो 'ऊप्स, सॉरी' असं म्हणून डावीकडच्या मुलीकडे आपला सॉरीपणा दाखवायसाठी वळतो. तेव्हा कमरेवर असलेला त्याच्या उजवा हात त्याच्या उजव्या बाजूच्या मुलीला लागतो."

"अच्छा. असं आहे तर!" मी म्हटलं. "पण अंगाला जरासा धक्का लागला तर त्यात त्याला काय गंमत वाटते?"

"जरासा धक्का असता तर ठीक होतं रे. तो आहे उंच. त्यामुळे कमरेवर हात ठेवले की त्याची कोपरं त्या कमी उंचीच्या मुलींच्या छातीच्या लेव्हलला येतात. त्यामुळे ..."

हे बोलताना हर्षद येवढा उत्तेजीत झाला की त्यामुळे काय होतं हे सांगायला त्याला शब्द सुचेनात. त्याला काय म्हणायचं होतं ते माझ्या लक्षात आल्यामुळे मी गोरामोरा झालो.

"आपल्या उंचीचा गैरफायदा घेतो तो" हर्षद सात्विक संतापाने म्हणाला.

अच्छा, म्हणजे हे खदखदत होतं तर, हे हर्षदच्या लहान चणीकडे बघून माझ्या मनात आलं.

"पण त्या मुलींना हे चालतं?" मी विचारलं. "असं कोणी काही केलं की मुली पायातलं सँडल काढून मारतात असं मी ऐकलंय."

"ती सगळी गँग ज्या कॉलेजातून आलीय तिथे असंच वातावरण असणार" हर्षद म्हणाला. मला ज्ञान देण्याच्या इच्छेऐवजी आपण स्वत: त्या कॉलेजात नव्हतो याचं दु:ख त्याच्या बोलण्यातून ध्वनित होत होतं असं मला वाटलं.

डोक्याच्या कवटीच्या आतला मेंदू बाहेर काढून जीजीभंकडून डिसेक्शन करून घेण्यासाठी पाठवला जायचा. मग ती कवटी आतून तपासायला विद्यार्थी मोकळे व्हायचे. जीजीभ म्हणजे डॉक्टर जी. जी. भडकमकर. मेंदूचं डिसेक्शन करण्यात त्यांच्यायेवढा पारंगत माणूस अख्ख्या महाराष्ट्रात नव्हता म्हणे. नाहीतरी येवढा नाजूक मेंदू आम्हा विद्यार्थ्यांच्या हातात दिला असता तर त्याचा अगदी लगदाच झाला असता. कवटीचं पातळ हाड आतल्या मेंदूच्या आवरणांनाही धक्का लागू न देता बळीराम ज्या सफाईने कापायचा, त्यालाही तोड नव्हती. विशेष म्हणजे त्याचे हात मद्यसेवनामुळे थरथर कापत तरीही तो कवटी अगदी व्यवस्थित कापायचा. त्याच्यासाठी तो विजेवर चालणारी करवत वापरायचा.

आमच्या ग्रुपचं मानेचं डिसेक्शन करून झाल्यावर आम्ही डोक्याचं डिसेक्शन सुरू केलं. चेहऱ्याचे स्नायू आणि नर्व्हज यांच्यात डिसेक्शन करण्यासारखं काही जास्त नव्हतं. त्यामुळे तो भाग पटकन झाला. आता डोक्याची कवटी उघडून आतलं डिसेक्शन करणं बाकी होतं. आम्ही बळीरामला पाचारण केलं.

"चला साहेब, आत्ता कवटी उघडूया" असं तो उत्साहाने म्हणाला. त्याच्या उत्साहाचं कारण त्याचं ते नेमून दिलेलं काम असलं तरीही तो विद्यार्थ्यांकडून कवटीमागे दहा रुपये तरी

उकळायचाच हे असावं.  ते एक वेळ ठीक होतं. पण 'कवटी उघडतो' असं न म्हणता 'कवटी उघडूया' असं तो म्हणाला त्यात जराशी धोक्याची घंटा वाजत होती. लहानपणी राजेंद्रकुमार आणि साधना यांचा आरजू हा चित्रपट मी पाहिला होता. त्यातलं प्रेम वगैरे समजायचं माझं तेव्हा वय नव्हतं. पण राजेंद्रकुमारला एक पाय नव्हता, त्याला आपण अनुरूप असावं म्हणून साधना लाकडाच्या फळया कापणाऱ्या विजेच्या करवतीने आपले दोन्ही कापून घ्यायला निघाली होती ते मला आठवत होतं. अगदी शेवटच्या क्षणी राजेंद्रकुमार तिथे पोहोचला नसता तर तिचे दोन्ही पाय कापले गेले असते हे दृश्य माझ्या बालमनावर अगदी कोरलं गेलं होतं. बळीरामची ती करवत अगदी त्याच प्रकारची होती. डिसेक्शनसाठी माझा हात कापला गेला तर, या कल्पनेने माझ्या पायांवर काटा आला.

"या साहेब" असं म्हणून मला घेऊन बळीराम करवतीकडे गेला. डिसेक्शनचं डोकं त्याने मशिनवर नीट बसवलं. "आता मी मशिन सुरू करण्यापूर्वी तुम्ही हा दांडा घट्ट धरून ठेवा. मी सोडा म्हणेपर्यंत सोडू नका."

मी त्या दांड्याकडे पाहिलं. गरगर फिरणाऱ्या त्या करवतीच्या उघड्या पात्याच्या अगदी जवळ तो दांडा होता. बहुतेक ती करवतीचं पातं स्थिर ठेवणारी तरफ असावी. खूप उंचावरून खाली पाहिलं की चक्कर येऊन माणसं पडतात तसं त्या पात्याजवळ उभं राहून त्याच्याकडे पहाताना माझा हात त्याला चिकटेल असं मला वाटायला लागलं. विजय बळीरामबरोबर कवटी कापायची करवत चालवणार आहे अशी बातमी कोणीतरी डिसेक्शन हॉलमध्ये पसरवली. गंमत बघायला गर्दी जमायला लागली. म्हणजे ही गोष्ट मेडिकल स्टुडंटकरवी पहिल्यांदाच होत होती की काय?

"बळीराम, एरवी तू कवटी कापतोस तेव्हा दांडा कोण पकडतो?" मी विचारलं.

"बोलावतो मी कोणालातरी. आज तुम्ही आहात ना? तुम्हाला मशिनं चालवता येतात असं ऐकलं. तुम्ही हे काम बरोबर कराल बघा."

"पण माझा हात कापला तर?"

"छे हो. मी आहे ना? काही काळजी करू नका."

"विजय, तो दांडा तू बिनधास्त धर. काही झालं तर आम्ही आहोत ना. काही कापलंबिपलं तर आपलं सर्जरी डिपार्टमेंट फर्स्टक्लास आहे. काही कमी पडायचं नाही." सुकुमार काहीतरी होणार अशा आशेवर दिसत होता.

माझा निर्णय होईना.

"बळीराम, मला मशिन सुरू करून दाखव, म्हणजे मला काय करायचं त्याची आयडीया येईल" मी म्हटलं.

बळीरामने करवत सुरू केली, आणि मला दांडा कसा पकडतात त्याचं प्रात्यक्षिक करून दाखवलं. काम तसं सोपं दिसत होतं. त्याने करवत बंद केली.

"फक्त दांडा गच्च पकडायचा. काही झालं तरी तो सोडायचा मात्र नाही" बळीराम म्हणाला.

दांडा सोडला तर काय होईल ते काही तो सांगत नव्हता. ते काही बरं चिन्ह दिसत नव्हतं.

"विजय, काय वेड लागलंय का तुला?"

येवढा डायरेक्ट प्रश्न? मी वळून पाहिलं. मिता कमरेवर हात ठेवून उभी होती.

"अं.... अम्...." एरवी बिनधास्त चालणारी माझी जीभ अडखळली.

"तुला असलं काम करायचा काहीही अनुभव नाहीये. तू चूक केलीस आणि बळीरामचा नाहीतर तुझा हात कापला गेला तर?" तिने विचारलं.

"बळीरामचा हात कापला जाणार नाही हे नक्की. नाहीतर त्याने मला बोलावलंच नसतं" मी म्हटलं.

"पण तुझ्या हाताचं काय?"

"मला सुद्धा करवतीचा दांडा पकडायचा नाहीये ग. पण त्याच्याबरोबर कोणी नाही. डिसेक्शन अडून राहिलंय."

"तुझ्या ग्रुपमधल्या इतरांना डिसेक्शन अडून राहिलंय त्याची काहीच चिंता नाहीये असं दिसतंय. तू एकट्यानेच सगळया कामांचा ठेका घेऊन ठेवलायस का?"

मी वळून पाहिलं. हर्षद आणि निखिल मागे सरकले. गंमत बघायला येणं  ओके होतं, पण ग्रुपच्या कामात सहभागी होणं वेगळं होतं. मी येडपट आहे अशी बळीरामापासून सगळयांचीच खात्री दिसत होती तर.

परमेश्वराने जीजीभंना काय प्रेरणा दिली कोण जाणे. "बळीराम, काय चाललंय इकडे?" जीजीभंचा दमदार आवाज आला आणि गंमत बघायला जमलेली मंडळी पटापट पांगली.

"साहेब, कवटी कापतोय" बळीराम म्हणाला.

"एकटाच? मदतनीस कुठे आहे?"

"त्याच्या गावाकडून कोणी पेशंट आलाय, त्याच्याबरोबर तो मेडिसिनच्या ओपीडीला गेलाय साहेब."

"मग तुझ्या मदतीला कोण आहे?"

"हे साहेब आहेत ना" माझ्याकडे अंगुलीनिर्देश करून बळीराम चाचरत म्हणाला.

"धोकादायक मशिन चालवताना विद्यार्थ्यांना बरोबर घ्यायचं नसतं, माहित आहे ना? त्यांच्यापैकी कोणाला काही झालं तर तुझी आणि माझी नोकरी जाईल. तुझा मदतनीस आला की मग त्याला बरोबर घेऊन कवटी काप. पुन्हा असं काही होता कामा नये, समजलं का?"

"होय साहेब" बळीराम म्हणाला.

"तुम्ही पण लक्षात ठेवा. इथली कामं करायला पालिकेने माणसं नियुक्त केलेली असतात. त्यांच्यावर लक्ष ठेवायला आम्ही मंडळी आहोत. कोणी काहीही सांगितलं तरी कुठच्याही कामात सहभागी व्हायचं नाही. काय?"

"होय सर" मी म्हटलं.

मी आपल्या जागेवर जाण्यासाठी वळलो, तर कमरेवर हात ठेवून मिता होती तिथेच उभी होती. मी थबकलो, कारण ती रस्ता अडवूनच उभी होती.

"विजय, देवाने तुला हुशारी दिलीय, पण डोकं अजिबातच दिलं नाहीये का रे?"

"...."

"काहीही सबबी सांगू नकोस" ती म्हणाली.

मी कुठे सबबी सांगत होतो? मी गप्प होतो. मिताने दमात घेतल्यावर तोंड उघडायचं नसतं हे समजण्यायेवढं तरी डोकं देवाने मला नक्की दिलं होतं.

"दर वेळी तुला कोण संभाळणार रे? एक दिवस माहित नसलेल्या गोष्टी करता करता काहीतरी बरंवाईट होईल, तेव्हा तुला खूप उशीर झालेला असेल बघ."

"यापुढे मी काळजी घेईन" मी म्हटलं.

# ५

वर्ष २, एप्रिल १२

"विजय, मी वॉलपेपर आणि मॅगेझिनची संपादक झालेय."

"अरे वा!" मिता कविता करायची. संपादक होणं म्हणजे साहित्यसेवेची पुढची पायरी असावी.

"तू काही मदत करणार का?"

"होSSS. काय करू सांग."

"खूप आर्टिकल्स येतील. ती सगळी माझ्या एकटीच्याने वाचून व्हायची नाहीत. तुला जमतील तेवढी तू वाच, उरलेली मी वाचते. मग आपण त्यांच्यातली कोणती चांगली ते एकत्र बसून ठरवू आणि प्रकाशित करू."

"येवढी आर्टिकल्स येतील असं वाटतं तुला?" मी विचारलं.

"नक्कीच."

"ठीक आहे. आपल्या हातात या क्षणी किती आर्टिकल्स आहेत?"

"एकच आहे. ते पण काही खास नाही. पण आता नवी एडिटोरियल टीम आली आहे, म्हटल्यावर सर्वजण उत्साहाने लिहितील बघ."

"मिता, परिक्षा जवळ येतेय त्याची आठवण आहे ना?" मी म्हटलं.

"पुरे रे. सतत आपलं अभ्यास-अभ्यास. आपला सर्वांगीण विकास नको का व्हायला? दिवसभर अभ्यास केल्यावर संध्याकाळी विरंगुळा म्हणून थोडसं लिहिलं आणि वाचलं तर मन प्रसन्न होईल, परत अभ्यास करायला नवा जोम येईल."

मी दिवसभर अभ्यास केल्यावर संध्याकाळीही अभ्यासच करत असे. मिता तसं करत नाही याचं मला कोण आश्चर्य वाटलं. कदाचित इतर मुलं पण तसंच करत असतील, आणि मी एकटाच जगावेगळा असेन, अशी शंका आल्यामुळे मी तोंड बंद ठेवलं. उगाच ही गोष्ट सगळ्यांना कशाला समजू द्यायची?

"तू संध्याकाळी सुद्धा अभ्यासच करतोस ते मला माहित आहे" ती म्हणाली. "पण मधून मधून थोडा वेळ काढशील ना?"

"हो तर" मी म्हटलं. कॉलेजात जाताना बसमध्ये आणि दुपारचा डबा खाताना वेळ काढता आला असता. मिताला खरोखरच मदतीची गरज होती की सतत अभ्यास करून मला बर्नआउट होऊ नये म्हणून ती मला मदतनीस करू इच्छित होती देव जाणे. मिता खरोखरच एक चांगली मैत्रीण होती हे नक्की. पण मी संध्याकाळीसुद्धा अभ्यासच करायचो हे तिला कसं कळलं ते मात्र मला समजलं नाही.

"पण तुला कसं कळलं की मी संध्याकाळीसुद्धा अभ्यासच करतो ते?" मी विचारलं.

"किती प्रश्न विचारतोस रे?" असं म्हणून ती निघून गेली.

मी एडिटोरियल असिस्टंट होऊन पंधरा दिवस झाले पण चीफ एडिटरकडून काही साहित्य आलं नाही. शेवटी काय झालं ते बघायला मीच एडिटरकडे पोचलो.

"एडिटरमॅडम, आपल्या वॉलपेपरसाठी काही साहित्य आलं की नाही? की तुम्हीच सगळ्या कामाचा फडशा पाडला?

"...."

एडिटर गप्प राहिल्या. त्या विचारात असतील म्हणून मी त्यांना एक दोन मिनिटं दिली. तरीही उत्तर येईना म्हणून परत विचारलं,

"काय गं, तू गप्प का? काही प्रॉब्लेम आलाय का? तू सहसा गप्प राहणारी नाहीस म्हणून विचारतो. "

"अरे, पंधरा दिवसांत एकही लेख किंवा कविता आली नाही" ती निराश सुरात म्हणाली.

"अगं परिक्षा जवळ आल्यात म्हणून असेल. परिक्षा झाल्या की बघ कसा साहित्याचा पाउस पडतो ते."

ती खिन्नपणे हसली. "परिक्षेनंतर साहित्याचा पाउस पडणार नाही हे आता मला कळलं आहे.  आत्ता लिहायला वेळ नाही असं म्हटलं तर त्यांना कँटीनबाहेर नाहीतर कट्ट्यावर उभं राहून गप्पागोष्टी करायला कसा वेळ मिळतो?"

"अग, चकाट्या पिटण्यासाठी प्रतिभा लागत नाही, पण साहित्यनिर्मितीसाठी लागते."

"अरे, पण मी कुठे म्हणतेय की पुलंच्या लेव्हलचं लिखाण करा? आपण छोटी माणसं, आपण कमी दर्जाचं लेखन केलं तर चालतं. लिहित राहिलं तर त्यांच्यातलाच एखादा पुढे प्रसिद्ध लेखक किंवा कवी होईलही."

"मिता, इथे तुझं चुकलं बघ थोडसं" मी म्हटलं. खरं तर खूपच चुकत होतं, पण इतरांच्या चुका कसलाही आडपडदा न ठेवता उघड करणारा मी त्या मनस्वी मुलीला तसं बोलू शकलो नाही खरं.  बहुतेक आमच्या बालपणीच्या मैत्रीमुळे असेल.

"कथा किंवा कविता कमी दर्जाच्या लिहायच्या झाल्या, तर कमी प्रतिभा असली तरी चालतं, पण प्रतिभा असावीच लागते बघ. आपण प्रतिभा असणं किंवा नसणं याबद्दल बोलतोय, प्रतिभेच्या उत्तुंगतेबद्दल बोलत नाही आहोत."

"...."

"का? काय झालं?" मिता परत गप्प झाल्यावर आपण काही भलतंच बोलून बसलो का असं माझ्या मनात आलं.

"तू नाडीवर अचूक बोट ठेवलंयस, जे मी ठेवायला हवं होतं. मला वाटतं, तुलाच संपादक करायला हवं होतं."

"छे ग! त्या पदासाठी तूच एकदम योग्य आहेस. मला फक्त इतरांच्या चुका दाखवता येतात. तर आपण संपादक कोण असावं याबद्दल न बोलता आता काय करायचं याबद्दल बोलूया का?"

"काय करणार आता?"

"मला सांग, पंधरा दिवसांत तू काही लिखाण केलंस का?"

"एक कविता लिहिली आहे" ती म्हणाली.

"ठीक आहे. आता तू एक संपादकीय लिही. म्हणजे दोन आर्टिकल्स झाली. मी दोन कविता मिळवून देतो. पहिल्या वॉलपेपरच्या इश्यूसाठी येवढं साहित्य पुरे झालं."

"तू कुठून आणणार दोन कविता?"

"तू एकेकदा खूपच प्रश्न विचारतेस बघ. जरा हाताखालच्यांवर विश्वास टाकायला शीक. त्याला मॅनेजमेंटवाले डेलगेशन असं म्हणतात" मी म्हटलं.

"डेलगेशन? म्हणजे काय?" तिने विचारलं.

"आत्ताच मी म्हटलं ना की तू एकेकदा खूपच प्रश्न विचारतेस? परत तेच."

मिताचा पारा चढायला लागला हे तिचं तोंड बघून माझ्या लक्षात आलं. "चल पळतो मी. साहित्याची व्यवस्था करायचीय ना" असं म्हणून मी काढता पाय घेतला.

दोन कविता मिळवणं तसं सोपं होतं. पहिला कवी मला लायब्ररीत सापडला. समीरण शहा अभ्यास करायचा प्रयत्न करत होता. मला बघताच तो आनंदित होऊन उठला.

"अरे विजय, काय म्हणतोस? नवीन काही लिहिलंस की नाही?"

"छे रे, परिक्षेचा अभ्यास करतोय. तू लिहिलंच असणार. तू जातिवंत कवी आहेस" मी म्हटलं.

समीरण खरंच छान कविता करायचा. भले मला त्या बंपर जावोत, त्या मासिकांमध्ये छापून यायच्या. आईवडिलांनी जबरदस्ती केली म्हणून तो डॉक्टरकी करायला आला होता. नाहीतर त्याला पूर्णवेळ कवीच व्हायचं होतं.

"हो तर" तो म्हणाला. "काल संध्याकाळीच लिहिलीय. ऐकायचीय?"

"मग? ती ऐकल्याशिवाय तुला सोडतो की काय?" मी म्हटलं.

समीरणची कळी खुलली. त्याने बॅगेतून कवितांची वही बाहेर काढली. ती उघडून तो वाचायला सुरुवात करत होता तेव्हा मी त्याला थांबवलं.

"अरे थांब. आपण लायब्ररीबाहेर जाऊया. इथे कविता वाचताना मागच्या वेळी बंडूने आपल्याला दम दिला होता, आठवतंय?" बंडू आमच्या कॉलेजचा श्री होता. तो दररोज व्यायामशाळेत घाम गाळायचा. देवाने भले त्याच्या मेंदूवर फारशा सुरकुत्या दिल्या नव्हत्या पण दंडात बेटकुळया आणि सिक्स पॅक ॲब्स मात्र भरभरून दिले होते. लायब्ररीत भले तो अभ्यास न करो, तो चुकून तिथे असलाच आणि कोणी बोललं तर तो त्याला दमात घ्यायचाच. तसं केलं की आपण अभ्यास करतोय असं लोकांना वाटेल असं त्याला वाटत असावं.

बंडूबरोबर मारामारी करायला समीरणला काही वेड लागलं नव्हतं. बंडू त्या वेळी तिथे नसला तरीही त्याच्या मागच्या वेळच्या सल्ल्याचा मान ठेवून आम्ही लायब्ररीतून बाहेर आलो आणि समोरच्या कट्ट्यावर बसलो. म्हणजे मी बसलो आणि समीरण काव्यवाचनाच्या पोजमध्ये उभा राहिला. त्याने त्याची नवी कविता स्टाईलमध्ये वाचून दाखवली. ती मला नेहमीप्रमाणे

बंपर गेली, कारण एक तर ती गुजरातीत होती आणि दुसरं म्हणजे कविता वाचून झाल्यावर मी 'क्या बात है' असं म्हणून त्याला जोरदार दाद दिली होती, त्यामुळे त्याने नेहमीप्रमाणे कवितेचं इंग्रजीत भाषांतर केलं नव्हतं. मी नेहमी भाषांतर ऐकल्यावर दाद देत असे, पण तेव्हा माझ्याकडे तेवढा वेळ नव्हता.

"समीरण, कविता येवढी छान आहे, की ती आपल्या सगळ्या स्टुडंट्सनी वाचलीच पाहिजे. तू असं कर, मला तिची एक कॉपी दे. मी ती आपल्या वॉलपेपरवर येत्या अंकात प्रसिद्ध करून घेतो."

"खरं?"

"मग काय? मी चीफ एडिटरचा असिस्टंट आहे. तुझी कविता वॉलपेपरवर आलीच असं समज. नंतर तू ती चित्रलेखा किंवा दुसऱ्या एखाद्या मासिकातही छापून घे. पण तिच्यावर पहिला हक्क आपल्या कॉलेजच्या वॉलपेपरचा."

समीरणने तिथल्या तिथे कवितेची एक कॉपी लिहून काढली आणि माझ्या हातात दिली.

"तू माझा फ्रेंड आहेस म्हणून तू माझी कविता वॉलपेपरवर प्रसिद्ध करतोयस ना?" त्याने विचारलं.

"चल रे. काहीतरीच काय? आपल्या फ्रेंडशिपसाठी वॉलपेपरवर तुझी कविता प्रसिद्ध करायला लागलो तर आपली रेप्युटेशन काय राहील? तुझ्या-माझ्या फ्रेंडशिपचा आणि तुझी कविता प्रसिद्ध करण्याचा काडीचाही संबंध नाहीये" मी म्हटलं. त्याचं समाधान झालं. तो अभ्यासाचा प्रयत्न करण्यासाठी लायब्ररीत परत गेला. आपण जराही खोटं बोललो नाही या आनंदात मी दुसऱ्या कवितेच्या शोधात निघालो. ती कविता मिताच्या आणि माझ्या फ्रेंडशिपसाठी प्रसिद्ध होणार होती, समीरणच्या आणि माझ्या फ्रेंडशिपसाठी नाही. मला वाटतं महाभारतातल्या युधिष्ठिरानंतर येवढ्या सफाईने 'नरो वा कुंजर वा' करणारा मीच असावा.

माझी दुसरी कविता मुलांच्या हॉस्टेलमध्ये प्रतापच्या खोलीत होती. मी तडक त्याच्या खोलीवर पोचलो. माझं नशीब जोरावर होतं.

"अरे प्रताप, आज तू नीनाबरोबर फिरायला गेला नाहीस?"

"नाही रे, ती परिक्षेसाठी अभ्यास करतेय."

प्रतापच्या टेबलवर एकही पुस्तक किंवा वही उघडी दिसत नव्हती.

"तू नाही परिक्षेचा अभ्यास करत?" मी विचारलं.

"नाही रे, मूडच नाही" तो म्हणाला. "आता रात्री जेवल्यावर जागून करणार आहे."

"मग आत्ता काय करतोयस?"

"काही नाही."

"अरे, काही करत नाहीस, तर नीनाच्या विरहाबद्दल एखादी कविता का लिहित नाहीस?"

त्याने माझ्याकडे चमकून पाहिलं. माझ्या मते माझा चेहरा तीन पानी खेळणाऱ्या पट्टीच्या खेळाडूसारखा निर्विकार होता, पण त्याला तसं वाटलं नसावं.

"माझी चेन खेचतोयस काय?" त्याने विचारलं.

"अरे नाही, खरंच. मी आपल्या वॉलपेपरच्या एडिटरचा असिस्टंट झालोय. मला एक कविता पाहिजे आहे. अशा कविता विरही प्रेमिकच छान लिहू शकतो."

"मला नाही कविता-बिविता करता येत" त्याने निक्षून सांगितलं.

"बरं मागे माझी एक कविता तू नीनासाठी म्हणून मागून घेतली होतीस, ती अजून आहे तुझ्याकडे?"

"आहे तर" तो म्हणाला.

"तिला वाचून दाखवलीयेस का कधी?"

"नाही. राहिलंच."

"मग एक काम कर. मला तिची एक कॉपी काढून दे. खाली तुझं नाव लिही. मी ती एडिटरला देतो. वॉलपेपरच्या पुढच्या अंकात येईल ती."

"अरे, पण मला ती नीनासाठी हवी आहे" तो म्हणाला.

"अरे, तिला सांग, तिचा विरह असह्य झाला तेव्हा तू लिहिलीस असं. वॉलपेपरवर सर्वांच्या साक्षीने तू आपल्या प्रेमाचं डेक्लरेशन केलयस म्हणावं. काय खुश होईल बघ."

"असं म्हणतोस?" प्रतापला ती कल्पना आवडली असं दिसत होतं. त्याने ड्रॉवर धुंडाळून त्या कवितेचा कागद बाहेर काढला आणि माझ्या स्वाधीन केला.

"हरवू नकोस हं" त्याने बजावलं. "तिची दुसरी प्रत नाहीये."

मी सर्द झालो. माझीच कविता हरवू नकोस असं तो मलाच सांगत होता. पण मी ती त्याला एकदा दिली म्हटल्यावर ती माझी म्हणणं योग्य झालं नसतं. माझ्या घरी तिची एक प्रत होती खरी, पण मी त्याला तसं सांगितलं नाही.

"काही काळजी करू नकोस" मी म्हटलं.

मी त्या दोन कविता मिताच्या हातात ठेवल्या, तेव्हा तिने माझ्याकडे थोड्याशा आश्चर्याने बघितलं.

"येवढ्या पटकन तू दोन कविता आणशील असं मला वाटलं नव्हतं" ती म्हणाली.

"तुला एकदा शब्द दिला म्हणजे दिला" मी अवघडून म्हटलं.

तिने समीरणची कविता वाचायचा प्रयत्न केला. गुजराती येत नसल्यामुळे तिला ती कविता माझ्यासारखीच बंपर गेली असावी. पण भिकाऱ्यांना चॉईस नसतो. आम्हाला दोन्ही कविता होत्या तशा छापायलाच लागणार होत्या, कारण आमच्याकडे छापायला आणखी काही साहित्यच नव्हतं. मग तिने प्रतापची कविता वाचली. मग माझ्याकडे रोखून पाहिलं.

"काय झालं?" मी विचारलं. "अक्षर लागत नाहीये का? मी वाचून दाखवू का?"

"अक्षर ओळखीचं आहे. वाचायला काही अडचण येत नाहीये" ती म्हणाली. रोखून बघायचं कारण काय ते मात्र तिच्या बोलण्यातून समजलं नाही. अक्षर ओळखीचं होतं? प्रतापचं अक्षर तिने कधी पाहिलं? माझ्या पोटात गोळा यायला लागला.

"मग काय झालं?" मी विचारलं.

"अक्षर तर ओळखीचं आहेच, पण लिहिण्याची स्टाईलसुद्धा ओळखीची आहे" ती म्हणाली. "कविता नक्की प्रतापचीच आहे ना?"

"त्याच्याच ड्रॉवरमध्ये होती. कागद कसा मळलाय बघ ना" मी म्हटलं.

"तू नेहमी खरं बोलतोस विजय. आज काय झालंय तुला? ही कविता तुझी आहे, प्रतापची नाही. तुझं अक्षर मी ओळखते. लिहिण्याची शैलीसुद्धा तुझीच आहे."

प्रतापने मी दिलेला कवितेचा कागद मला जसाच्या तसा परत दिला होता. स्वतःच्या हस्ताक्षरात लिहून द्यायची तसदीही घेतली नव्हती. मी सुद्धा मिता माझं अक्षर ओळखेल असा विचार केला नव्हता. मला वाटायचं तेवढा मी स्मार्ट नव्हतो.

"मिता, कविता मी लिहिली होती. प्रतापने ती नीनासाठी म्हणून माझ्याकडून मागून घेतली होती. मी ती त्याला दिली म्हणजे ती त्याची झाली ना?"

"त्याने मागितली आणि तू दिलीस?"

"मित्राने मागितलेली गोष्ट देता येत असेल तर द्यायची असते मिता" मी म्हटलं. "त्याच्या आणि नीनाच्या प्रेमात त्या कवितेमुळे भर पडेल असं वाटलं म्हणून मी ती देऊन टाकली. आता ती माझी आहे असं मी कसा म्हणू?"

ती आता कपाळाला हात लावणार असं तिचं तोंड बघून मला वाटलं. जरी तिने तसं केलं नाही तरी मी काय समजायचं ते समजलो.

"विजय, एक प्रश्न विचारू?"

"विचार" ती काय विचारणार हे मला समजलं होतं तरीही मी म्हटलं. नाही कसं म्हणणार होतो?

"तू ती कविता ..."

मी स्तब्ध झालो. मी ती कविता कोणावर लिहिली होती असं मी सांगणार होतो?

"अं...काही नाही" ती म्हणाली.

मिताने विचारायला घेतलेला प्रश्न असा कधी सोडून दिला नव्हता. काय विचारत होतीस असं म्हणायचं धाडस मला झालं नाही.

# ६

वर्ष २, एप्रिल २१

वॉलपेपरचा नवा अंक वेळेवर प्रसिद्ध झाला. अंक हे तसं गोंडस नाव. अंक म्हणजे कॉलेजने आम्हाला एक नोटीसबोर्ड दिला होता, त्याच्यावर हे साहित्य सुवाच्य अक्षरात सगळ्यांना वाचण्यासाठी ठेवण्यात येत असे येवढंच. समीरणची कविता तर एकदम प्रोफेशनल होती. गुजराती वाचकवर्ग त्या कवितेकडे नजर टाकून गेला. मिताच्या मैत्रिणी तिची कविता आणि संपादकीय वाचून गेल्या. प्रतापने कविता लिहिलीय हे ऐकल्यावर खात्री करून घेण्यासाठी बॉईज होस्टेलची सगळी गर्दी लोटली. प्रताप आणि नीना एकत्र फिरत ते सर्वांना दिसत असे आणि त्याबद्दल कोणी काही चर्चा वगैरे करताना दिसत नसत. पण कविता? ती सुद्धा प्रतापची? नीनाच्या मैत्रिणींनी तिला चिडवून चिडवून अगदी बेजार करून टाकलं म्हणे. तिचा नेहमीचा सावळा रंग आता जवळजवळ कायमस्वरूपी सावळा आणि लज्जेचा गुलाबी अशा मिश्र रंगाचा दिसायला लागला. कधीतरी वेळ मिळाला की शाळेतल्या चित्रकलेच्या सरांना भेटून त्या रंगाचं नाव विचारायचं असं मी ठरवलं होतं, पण ते राहूनच गेलं. इकडे प्रताप डोक्यावर दोन तुरे असलेल्या कोंबड्यासारखा इकडेतिकडे फिरायला लागला.

इतरांचं सगळं ठीक होतं. पण मिता मात्र माझ्याबरोबर जराशी तुटकपणे वागायला लागली असं मला वाटायला लागलं.

"मिता, तू हल्ली माझ्याबरोबर जरा तुटकपणे वागायला लागलीयस असं मला वाटतंय" मी तिला सरळच सांगून टाकलं.

"कशावरून?"

'मी तुला इतकी वर्षं ओळखतोय. तू तुटकपणे वागलीस तर मला कळणार नाही का?' असं मला म्हणायचं होतं. पण त्यामुळे गुंता सुटेल की वाढेल याचा मला अंदाज येत नव्हता. शेवटी मी धीर करून तसं म्हणूनच टाकलं.

"तसं काही नाहीये" असं तिने तुटकपणे म्हटलं.

"मिता, आत्तापण तू तुटकपणेच बोललीस. माझं काही चुकलं का? तुला काय वाटतंय ते स्पष्ट सांग. फ्रेंडशिपमध्ये असं मनात काही लपवून ठेवायचं नसतं."

"मी लपवून ठेवतेय की तू?" ती उसळली.

"म...मी?"

"हो, तूच."

मी काय लपवलं ते माझ्या काही लक्षात येईना.

"असं कोड्यात बोलू नकोस गं" मी म्हटलं. आपल्या मनात काय आहे आणि आपण काय सुचवतो ते पुरुषांना अगदी स्पष्टपणे आणि लगेच कळलं पाहिजे असं स्त्रियांचं लॉजिक असतं असं मी वाचून होतो. हा माझा पहिलाच प्रत्यक्ष अनुभव होता. "मी खूप गोष्टी लपवल्या असल्या आणि त्या मी तुझ्या मनातली गोष्ट बोलेपर्यंत तुला एक एक करून सांगितल्या तर तुला सगळयाच कळून जातील ना. त्यापेक्षा मी काय लपवलंय असं तुला वाटतंय ते सांगून टाक ना."

"म्हणजे अशा बऱ्याच गोष्टी तू लपवल्यायस माझ्यापासून?"

"तसं नाही गं. मी आपलं जनरल उदाहरण दिलं. प्रश्न कसा स्पष्ट असावा येवढंच मला म्हणायचं होतं. आता सांग मी काय लपवलंय असं तुला वाटतंय?"

"मला तसं वाटत नाहीये. ते तसंच आहे."

"बरं, तसं म्हणूया आपण. पण ते काय ते तर सांगशील. आपल्या पुढच्या लेक्चरची वेळ जवळ येतेय. नाहीतर मुद्द्याचं बोलायचं राहून जाईल."

"तू ती कविता लिहिलीस, ती मला कधी दाखवली नाहीस. पूर्वी सगळ्या दाखवायचास. तुला ती लपवून ठेवायची होती. कोणत्या मुलीवर लिहिलीयस तू ती कविता?"

मिता क्रिमिनल लॉयर झाली नाही ते बरं झालं, असं माझ्या मनात आलं. नाहीतर तिने किती जणांना अगदी फाडून खाल्लं असतं.

"अगं, तसं काही माझ्या मनातही आलं नाही. मी ती लिहिली, प्रतापने ती वाचली, मागितली आणि मी देऊन टाकली. एकदा त्याला ती दिल्यावर तुला कशी दाखवणार होतो?"

"पण लिहिलीस कोणावर?"

"अरे, काय जुलूम आहे! अगं, कवीला कल्पनास्वातंत्र्य असतं ना. मी कल्पनेनेच लिहिलं. तुझ्या पहाण्यात आहे का त्या कवितेत आहे तशी कोणी मुलगी?"

"नक्की सांगता येत नाहीये. तशी कोणीतरी आहे असं मला सारखं वाटतंय."

"मिता, मी तुला प्रॉमिस करतो, माझ्या मनात कोणी मुलगी असली तर इतर कोणालाही सांगायच्या आधी मी तुला सांगेन. आता खुश?"

मिता हसली, पण कुठेतरी तिच्या डोक्यात ती मुलगी ओळखीची का वाटते याचा विचार चालू असावा, कारण तिचे डोळे विचारमग्न दिसत होते.

वर्ष २, सप्टेंबर १४

एम.बी.बी.एस.च्या पहिल्या वर्षी ॲडमिशन्स विद्यार्थ्यांच्या मेरिटप्रमाणे होत असत. जसे विद्यार्थी कॉलेजात जाऊन फी भरत त्याप्रमाणे त्यांना रोल नंबर देत असत. त्यामुळे अल्फाबेटप्रमाणे त्यांची आडनावं एकापुढे एक येत नसत. मग लागोपाठच्या चार-चार विद्यार्थ्यांचे शरीरशास्त्राच्या डिसेक्शनसाठी ग्रुप बनवले जात. जेव्हा ते पहिल्या वर्षी उत्तीर्ण होऊन दुसऱ्या वर्षात पोचत, तेव्हा त्यांना त्यांच्या आडनावांप्रमाणे अल्फाबेटिकली रोल नंबर देत असत. त्यामुळे पहिल्या वर्षाचे चार-चार जणांचे ग्रुप मोडत. अर्थात मैत्रीमुळे झालेले ग्रुप टिकून रहात असत. पण वेगवेगळया विद्यार्थ्यांना वेगवेगळया विषयांचं वॉर्ड पोस्टिंग मिळत असे. त्यामुळे मित्रमैत्रिणींना एकमेकांना भेटायला फारच कमी वेळ मिळायचा.

आमचा ग्रुप मोडला. मला त्यामुळे फारसं दु:ख झालं नाही खरं, कारण हर्षद आणि निखिल यांच्याबरोबर मैत्री जुळणं जरा कठीणच होतं. जुन्या मित्रमैत्रिणींपैकी प्रताप, मिता आणि मी यांना एकत्र पोस्टिंग मिळालं. नीनासुद्धा आमच्या ग्रुपमध्ये आली, त्यामुळे प्रताप आमच्यासाठी असून नसल्यासारखा झाला. दहा जणांपैकी उरलेल्या सहा जणांपैकी किती मित्र होतात हे हळूहळू समजलंच असतं.

रुग्णांच्या आजारांचं निदान आणि उपचार करायला सुरुवात झाली, आणि माझी पुढे शरीरशास्त्रात एम.एस. करायची इच्छा मागे पडली. शरीरशास्त्रावरचं प्रेम कमी झालं असं नव्हतं. पण आजारी रुग्णांना बरं करून त्यांच्या पूर्वीच्या आयुष्यात परत पाठवण्यात एक आनंद होता जो मृत देहांचं डिसेक्शन करण्यात नव्हता. आपल्या पुढे कोणीही जाऊ नये म्हणून प्रयत्न करणारे

महाभागही होते, नाही असं नाही. पण त्यांच्याकडे दुर्लक्ष केलं की मनाला फारसा त्रास होत नसे. आयुष्य बऱ्यापैकी मजेत चाललं होतं.

"विजय, फर्स्ट इयरमध्ये आयुष्य कसं सरळ होतं ना. आता खूप कंगोरे जाणवायला लागलेयत."

"म्हणजे नक्की काय म्हणायचंय तुला?" मिता अशी फिलॉसॉफिकल झाली की तिला काय म्हणायचंय ते नीट समजून घेतल्याशिवाय आपला अभिप्राय द्यायचा नसतो हे मला एव्हाना नीट समजलं होतं.

"या सर्जन्सचं काही समजतच नाही. पेशंटांना ट्रीटमेंट देऊन बरं करतात खरे, पण आपल्या कामाकडे बघण्याचा त्यांचा दृष्टीकोन कसा विचित्र वाटतो. आरेमो आणि लेक्चरर मंडळी ऑपरेशनला कटिंग म्हणतात."

"म्हणायला सोपं पडतं म्हणून असेल. तीन अक्षरी शब्द आहे. जिभेला त्रास देऊन पाच अक्षरी ऑपरेशन हा शब्द कशाला म्हणायचा?"

"विजय, शब्दाला माझा आक्षेप नाहीये. माझा आक्षेप त्या शब्दातून ध्वनित होणाऱ्या अर्थाला आहे. ते ऑपरेशन म्हणजे रुग्णाच्या शरीरातला खराब झालेला भाग काढून टाकायचा अनिवार्य उपाय आहे म्हणून ते त्याच्याकडे बघत नाहीत. ती एक आनंदासाठी करण्याची गोष्ट आहे असं त्यांना वाटतं असं दिसतं. एखादं ऑपरेशन आव्हानात्मक असलं की ते त्या केसला ज्यूसी केस असं म्हणतात. हा शब्द खाण्यापिण्याच्या गोष्टींसाठी वापरायचा असतो. आजाराने त्रस्त झालेल्या मनुष्यप्राण्यासाठी नाही रे. एखाद्या दिवशी ऑपरेशन करायला मिळालं नाही तर ते आज मी उपाशीपोटी आहे असं म्हणतात. बरं नाही रे वाटत."

मिता वैद्यकशास्त्राच्या नैतिकतेबद्दल आणि रुग्णांबद्दल माणूस म्हणून आवश्यक असलेल्या आदराबद्दल बोलत होती. जीजीभंनी मृत देहांबद्दल आदर बाळगायला शिकवलं होतं ते ती

विसरली नव्हती असं दिसत होतं. जर मृत देहाबद्दल आदर असला पाहिजे, तर जिवंत हाडामासाच्या मानवांबद्दल केवळ ते गरीब असल्यामुळे पालिकेच्या रुग्णालयात नाईलाजाने आलेत म्हणून अनादर असण्याचं काही कारण नव्हतं. ज्यांच्याबरोबर आमचा रोज संपर्क यायचा त्या आरेमो आणि लेक्चरर अशा कनिष्ठ डॉक्टरांमध्ये रुग्णांकडे आपल्या शिक्षणाचं एक साधन आणि आपलं शल्यकौशल्य अजमावून पहाण्याचं एक गिनी पिग म्हणून पहाण्याची जी वृत्ती दिसून यायची तिच्यामुळे ती अस्वस्थ झाली होती. आम्ही द्वितीय वर्षाचे विद्यार्थी होतो, पण डॉक्टरने कसं असावं आणि कसं असू नये याबद्दल मिताचे विचार अगदी स्पष्ट आणि आदर्श दिसत होते. मला इतके दिवस माहित असलेल्या मिताला देवाने दिलेला हा गुण मला पूर्वी जाणवलाच नव्हता. तिला मानवतेची इतकी जाण होती हे समजल्यावर मला जरासं भरून आलं.

"मिता, तू एकदम सॉलिड बोललीस. कुठून शिकलीस हे सगळं?"

ती हबकलीच. "मनात आलं ते मी सहज म्हणून बोलले रे. मला काहीतरी सॉलिड बोलायचं नव्हतं."

"तू सहज म्हणून बरंच काहीतरी बोललीस बघ. तू म्हणतेस ते एकदम बरोबर आहे. पण एक कर. आपल्या या सिनियर्सना असं कधी बोलू नकोस. डूख धरतील तर परिक्षेत उत्तीर्ण होणं कठीण करून टाकतील. अगदी खात्रीचे असतील अशा मित्रमैत्रिणींसमोरही बोलू नकोस. कोण जाऊन चुगली करेल सांगता येत नाही. आपण शिक्षण घेत नाही तर रॅट रेसमध्ये आहोत असं आपल्या बरोबरच्या काही जणांना वाटतं. इतरांना खाली ओढल्याशिवाय आपण वर जाऊच शकणार अशी कोळणीच्या टोपलीतल्या खेकड्यांसारखी त्यांची मानसिकता असते. तू उद्या सिनियर झालीस, राजमातात नाहीतर इतर कुठे शिक्षक झालीस तर तुझ्या विद्यार्थ्यांना हे जरूर शिकव."

"विजय, तुझा शरीरशास्त्रात पदव्युत्तर शिक्षण घ्यायचा विचार बदलला ना रे?".

“अं?” तिने अकस्मात विषयांतर केलं ते का ते मला समजलं नाही.

"तू सर्जन होणार ना?"

“असं का वाटतंय तुला?” विचारलेल्या प्रश्नाला उत्तर द्यायचं नसेल तर प्रतिप्रश्न विचारायचा असतो.

“तुझी ऑपरेशनं करण्याची ओढ बघून मला तसं वाटायला लागलंय. डॉक्टर दोन प्रकारचे असतात. विचार करणारे आणि हाताने उपचार करणारे, होय ना?”

“मिता, माझीच थेअरी मलाच सांगतेस?”

“शरीरशास्त्राच्या अभ्यासाच्या वेळी इतर लोक पुस्तकं वाचायचे तेव्हा तू जीव ओतून डिसेक्शन करायचास. तू पुढे रुग्णांना काय आजार झालाय याचा विचार कर करून शेवटी औषधांचं प्रिस्क्रिप्शन फाडायचा नाहीस. एकदा डायग्नोसिस झालं की ऑपरेशन करणाऱ्या प्रकारचा डॉक्टर होशील असं मला वाटतं.”

माझ्या स्वत:बद्दल जी गोष्ट माझ्या स्वतःच्या लक्षात आली नव्हती, ती मिताला समजली होती? ती जे म्हणाली ते ऐकल्याबरोबर मला पटलं. पण येवढा विचार ती का करत होती?

“बघू या काय जमतं ते" मी मोघम म्हटलं.

“नक्की जमेल ते तुला. तुझी बोटं लांबसडक आहेत. सर्जन्सची बोटं अशीच असतात असं मी वाचलंय.”

यावर बोलण्यासारखं मला काही सुचलं नाही. मी अवघडून गप्पच राहिलो.

"तू चांगला सर्जन होशील हे नक्की. पण या सर्जन्सच्या वृत्तीचा होणार नाहीस ना रे कधी?"

'तू लक्ष ठेवून राहिलीस तर काय बिशाद आहे माझी तसं काही करायची?' असं मला म्हणायचं होतं. पण जमलं नाही.

"नाही" मी म्हटलं.

# ८

वर्ष २, नोव्हेंबर ८

"विजय, प्रताप खोलीचं दार उघडत नाहीये."

माझ्या मनात चर्र झालं. गेल्या वर्षी बॉईज हॉस्टेलमध्ये रहाणाऱ्या दोघांनी आत्महत्या केल्या होत्या. परिक्षेत चांगले गुण न मिळणं, मैत्रिणीने डम्प करून दुसऱ्या मुलाबरोबर हूक अप करणं, पदव्युत्तर शिक्षणासाठी हवा तो विषय न मिळणं अशी अनेक कारणं असायची. घरापासून दूर हॉस्टेलमध्ये रहाणाऱ्या मुलांना घरच्यांचा भावनिक आधार मिळणं कठीण जायचं. आजच्यासारखं इंटरनेट, स्काईप, मोबाईल फोन अशा एकमेकांमधलं अंतर कमी करणाऱ्या गोष्टी नव्हत्या. डिप्रेशन आलं आणि कोणी मानसिक आधार दिला नाही तर कधीकधी मुलं आत्महत्या करायची. आम्हाला तेव्हा अशी मानसिक अवस्था झालेली कशी ओळखायची हे कोणी शिकवलेलं नव्हतं. एखाद्याने वॉर्डातून खूपशा झोपेच्या गोळ्या पळवल्या आणि घेतल्या, किंवा छतावरच्या पंख्याला टांगून घेतलं तर ते दुसऱ्या दिवशीच तो दार का उघडत नाही याचा तपास केल्यावरच समजायचं. प्रतापला नीनाने टांग तर मारली नाही ना, असंही माझ्या मनात आलं.

मी हातातलं पूर्ण करायला घेतलेलं पॅथॉलॉजीचं जर्नल तसंच टाकलं आणि हॉस्टेलच्या दिशेने धावत सुटलो. मला ती बातमी देणारा 'अरे, थांब' असं काहीतरी म्हणत होता, ते माझ्या लक्षातही आलं नाही. मी बॉईज होस्टेलवर पोचलो. एका वेळी दोन दोन पायऱ्या उड्या मारत चढलो आणि दुसऱ्या मजल्यावर पोचलो. धापा टाकत टाकत प्रतापच्या आतून बंद असलेल्या दाराची कडी

ठोकली. आतून काही उत्तर आलं नाही. मी परत दार ठोकलं. उत्तर येत नाही म्हणून कडी वाजवण्याऐवजी थेट दारावर धडाधडा हात आपटला.

"प्रताप, दार उघड" त्याला दार ठोकण्याचा आवाज ऐकू येत नसेल तर मित्राचा आवाज तरी ऐकू येईल असं वाटून मी बेंबीच्या देठापासून ओरडलो. आतमधून हूं की चूं ऐकू येईना. झोपेच्या गोळ्या खाऊन तो बेशुद्ध पडला असेल, आणि वेळेवर त्याला हॉस्पिटलात नेलं तर तो वाचेल असं माझ्या मनात आलं. स्टमक ट्यूब टाकून जठर आतून धुवून काढलं आणि रक्तातलं औषध काढून टाकायसाठी इंजेक्शन दिलं किंवा गरज पडली तर डायलिसिस केलं तर विषबाधेचे रुग्ण वाचू शकतात असं मी वाचलेलं मला आठवलं. पण त्याला हॉस्पिटलात नेण्यासाठी आधी दार तर उघडायला हवं होतं ना!

"काय झालं रे" हा सगळा कोलाहल ऐकून शेजारच्या खोलीतला अनिल दुबे बाहेर आला.

"अरे, प्रताप दार उघडत नाहीये. काही उत्तरपण देत नाहीये."

"कधीपासून?"

"काय माहित? आत्ता मी ते ऐकलं म्हणून धावत पळत आलो. काल रात्री तो कसा होता?"

"बरा होता. आम्ही मेसमध्ये आठ वाजता जेवलो. मग मी रूमवर आलो. तो नीनाबरोबर बाहेर गेला."

म्हणजे तिच्याबरोबर त्याचं भांडण झालं असणार. मग रूमवर येऊन त्याने जिवाचं काही बरंवाईट...?

"प्रताप, दार उघड" मी परत बेंबीच्या देठापासून ओरडलो. आतमध्ये शांतच होतं.

"आपण दारावरच्या व्हेंटिलेटरमधून डोकावून बघूया का?" अनिल म्हणाला.

"हां, ही आयडिया बरी आहे. तुझ्याकडे उंचसं स्टूल आहे?" मी विचारलं.

"थांब" असं म्हणून अनिल आपल्या रूममध्ये गेला आणि बसायचं लाकडाचं स्टूल घेऊन आला. त्याने ते प्रतापच्या दाराच्या बाहेर ठेवलं. मी त्याच्यावर चढलो. पण ती जुन्या काळातली इमारत होती. खोल्यांची उंची हल्लीच्या इमारतींसारखी सात-आठ फुटांची नव्हती. माझा हातही त्या व्हेंटिलेटरपर्यंत पोचेना.

"आता काय करायचं?" अनिल म्हणाला.

"आपण खुर्चीवर स्टूल ठेवून त्याच्यावर उभे राहिलो तर व्हेंटिलेटरपर्यंत पोचू शकू" मी म्हटलं.

अनिलने त्याची बसायची लाकडी खुर्ची आणली. मी तिच्यावर ते स्टूल ठेवलं आणि त्याच्यावर उभा राहिलो. आता माझे हात व्हेंटिलेटरपर्यंत पोचले.

"अरे, व्हेंटिलेटर उघडता येत नाहीये. आतून बंद आहे असं वाटतं" मी म्हटलं. कोणी आत बघू नये म्हणून प्रतापने बहुतेक व्हेंटिलेटर आतून बंद केलं असणार असं माझ्या मनात आलं. प्रताप येवढं प्लानिंग करू शकेल असं मला कधीही खरं वाटलं नसतं. पण आता समोर पुरावा दिसत होता. "व्हेंटिलेटरची काच फोडली तर आतमध्ये बघता येईल".

"मला वाटतं वॉर्डनला बोलवायला पाहिजे" अनिल म्हणाला. "काच फोडली तर वॉर्डन पिसाटतो."

मित्राचा आवाज ऐकून प्रताप जागा झाला नव्हता, पण वॉर्डनला बोलवण्याचं त्याच्या कानांवर पडल्यावर तो भानावर आला.

"वॉर्डनला बोलवू नकोस रे" आतून आवाज आला.

"प्रताप, तू बरा आहेस ना?" मी विचारलं.

"हो, बरा आहे" आतून आवाज आला.

"अरे, मग आम्ही इतका वेळ दार ठोकतोय आणि हाका मारतोय तर दार का उघडत नाहीयेस?" मी चिडून विचारलं.

"...."

"मी काय विचारतोय ते ऐकू येतंय का?" मी ओरडून विचारलं.

"हो" आतून आवाज आला.

"मग दार का उघडत नाहीयेस?"

"मी जरा कामात आहे" आतून आवाज आला.

प्रताप आणि कामात? आणि दारही न उघडण्यासारखं कोणतं काम करत होता तो?

"प्रताप, तू झोपेच्या गोळ्या किंवा उंदीर मारायचं औषध घेतलंयस का?"

"नाही रे. तसं काही नाही."

"नीनाबरोबर भांडण झालंय का?"

"नाही रे, तसं काही नाही" आतून उत्तर आलं.

"मग दार उघड" मी म्हटलं.

"अरे, दार न उघडायचं तसंच काही कारण आहे" तो म्हणाला.

"तसंच म्हणजे कसं?" एक तर माझं जर्नल पूर्ण करायचं राहून गेलं होतं. धावत पळत आल्यामुळे मी विनाकारण घामाघूम झालो होतो. ज्याची काळजी वाटली म्हणून हे सगळं केलं

तो काहीतरी विचित्र बडबड करत होता. त्याला त्याच्याचसारखं काहीतरी म्हटल्याशिवाय तो शहाणा होणार नाही असं माझ्या मनात आलं.

"प्रताप, दार उघड, तुला नीनाच्या प्रेमाची शपथ आहे" मी म्हटलं.

"नको रे, तिला बिचारीला यात आणू नकोस" तो म्हणाला.

"ठीक आहे. दार उघड, नाहीतर जाऊन वॉर्डनला सगळं सांगतो. तू बहुतेक पॉयझन घेतलंयस असं वाटतं म्हणून सांगतो."

दाराच्या कडीचा आवाज आला. दार दोन इंच उघडलं. त्यातून त्याचे डोळे आणि नाक दिसलं.

"बघ, मी ठीक दिसतोय ना?" त्याने विचारलं.

प्रताप पूर्ण शुद्धीत दिसत होता. म्हणजे झोपेचं औषध घेतलेलं दिसत नव्हतं. त्याचे डोळे ठीक दिसत होते. लाल असते तर रडला वगैरे असण्याची शक्यता वाटली असती. डोळयांच्या बाहुल्या मोठ्या झालेल्या दिसल्या असत्या तर धतुरा पॉयझनिंग असण्याची शक्यता होती. बाहुल्या आकुंचित पावलेल्या असत्या तर ऑरगॅनोफॉस्फरस पॉयझनिंग असण्याची शक्यता वाटली असती. पण त्याच्या डोळयांच्या बाहुल्या नेहमीसारख्याच होत्या. उंदीर किंवा झुरळं मारायच्या औषधाचा वास काही येत नव्हता. म्हणजे ते पॉयझनिंग नसावं.

"दिसायला ठीक आहेस, पण तुझ्या वागण्यावरून तू ठीक आहेस असं वाटत नाही" मी म्हटलं.

"तसं तू नेहमीच म्हणत असतोस" तो दरवाज्याच्या दोन इंचांच्या फटीतून म्हणाला.

"मग तुझं काय चाललंय ते सांग" मी म्हटलं.

"उद्या सांगतो" असं म्हणून त्याने दार बंद केलं आणि दाराला आतून कडी लावली.

अनिलने खांदे उडवले आणि त्याचं स्टूल घेऊन तो रूममध्ये गेला. त्याच्यामागून मी त्याची खुर्ची घेऊन गेलो. प्रतापमुळे अनिलच्या अभ्यासाचं खोबरं झालं म्हणून मलाच अपराधी वाटायला लागलं होतं. बघितलं तर त्याचं जर्नल त्याच्या टेबलावर उघडं पडलेलं होतं. बाजूला रंगीत पेन्सिली होत्या. मला माझ्या अपूर्ण जर्नलची आठवण आली. मनातल्या मनात प्रतापला शिव्या मोजत मी लायब्ररीकडे धावलो. दुपारच्या प्रॅक्टिकलच्या वेळी पूर्ण केलेलं जर्नल बरोबर नेणं आवश्यक होतं.

प्रताप त्या प्रॅक्टिकलला आलाच नाही. नीना आली होती. प्रताप नाही म्हणून ती काही चिंतेत दिसत नव्हती. म्हणजे प्रतापने तिला त्याच्या अनुपस्थितीचं खरं किंवा खरं वाटण्यासारखं एखादं कारण सांगितलेलं असावं. मी तिला काही विचारलं नाही. मनात ती आपली वहिनी आहे असं असलं तरी मी तिच्याबरोबर कधीच बोललो नव्हतो.

दुसऱ्या दिवशी प्रताप भेटला. नेहमीसारखाच दिसत होता. तो आपण होऊन काही सांगतो का याची मी वाट बघितली. तो मात्र काही झालंच नाही अशा थाटात वागत होता. शेवटी मला राहवेना.

"प्रताप, काल तू दार बंद ठेवून काय काम करत होतास?"

प्रतापने इकडे तिकडे जरा अवघडून पाहिलं. आपलं बोलणं ऐकू जाण्यायेवढं कोणी जवळपास नाही अशी खात्री करून घेतल्यावर तो म्हणाला,

"अरे, त्याचं काय झालं, मी पोहोण्याच्या तलावाची एक महिन्याची मेंबरशिप घेतली. दोन दिवस पोहून आलो. तिसऱ्या दिवशी सगळया अंगाला खाज यायला लागली. त्वचारोगतज्ज्ञाला दाखवलं. त्याने स्केबीजचं निदान केलं." स्केबीज म्हणजे खरूज. पाण्यात पोहून खरूज होत नाही हे मला माहित होतं. पण मी त्याला तसं म्हटलं नाही. मला त्याची गोष्ट शेवटपर्यंत ऐकायची होती.

"मग काय झालं" मी विचारलं.

"त्याने मला सगळ्या अंगाला लावायला बेंझाइल बेंझोएट दिलं. मी ते लावलं होतं. म्हणून दार उघडत नव्हतो."

"त्याला विशेष वास नसतो. दार उघडलं असतंस तर काय होणार होतं?"

"वास नाही रे. सगळ्या अंगाला ते लावून तसाच उघडा बसलेला असताना दार कसा उघडणार होतो?"

अच्छा. म्हणजे स्वारी तशीच उघडी बसली होती तर.

"पण प्रताप, स्केबीज झालं तर घरातल्या सगळ्यांना संसर्ग झाला असणार असं गृहित धरून सगळ्यांना ट्रीटमेंट द्यायची असते ना? मग त्याबद्दल तू काय केलंस?"

"काय रे? वेडा आहेस का? माझे आई बाबा आहेत गावाला. मला स्केबीज झालं म्हणून त्यांना इतक्या लांब कसा संसर्ग होईल?"

"त्यांच्याबद्दल मी बोलत नाहीये रे" मी म्हटलं. "जवळचा स्पर्श असणाऱ्यांना संसर्ग होतो ना? तर तू नीनाला सुद्धा ट्रीटमेंट घ्यायला सांगितलयस ना? नाहीतर ती बरी व्हायची नाही आणि तुला पुन्हा पुन्हा संसर्ग होत राहील."

प्रतापला येवढं पिसाटलेलं मी कधी पाहिलं नव्हतं.

"रागावू नकोस रे. तुझ्या भल्यासाठीच मी सांगत होतो. तुला आवडलं नसेल तर राहू दे" असं म्हणून मी सटकलो.

# ९

वर्ष ३, फेब्रुवारी १६

"काय ग नेहा, तुला विजयने रोज डेचं फूल दिलं की काय?"

मी उडालोच. आवाज मिताचा होता. ती नेहाबरोबर बोलत होती म्हणजे दोघीही हजर होत्या. मला त्यांचं बोलणं ऐकू येत होतं म्हणजे त्या जवळपासच होत्या. मी त्यांना दिसलो नसलो तरी लवकरच दिसण्याची शक्यता होती. मी लायब्ररीमध्ये बसलो होतो. मुलांनी एकमेकांबरोबर गप्पा मारू नये म्हणून समोरासमोर बसलेल्या मुलांच्या मध्ये टेबलाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत उभं पार्टिशन लावलेलं होतं. एकमेकांच्या बाजूला बसलेली मुलं-मुली गप्पा मारू शकत असत, पण किमान पक्षी एकमेकांकडे तोंड करून बसलेली मुलं अशा गप्पा मारू शकत नसत. त्या दोघी त्या पार्टिशनच्या पलिकडच्या बाजूला बसलेल्या असाव्या.

"र...रोज डेचं फूल?" नेहा चाचरली.

रोज डेच्या दिवशी मुलं-मुली एकमेकांना लाल किंवा सफेद गुलाबाचं फूल देऊ शकत असत. लाल गुलाब प्रेमाचा संदेश तर सफेद गुलाब मैत्रीचा संदेश असे. शेट्टीच्या कँटीनमध्ये पाकिटात गुलाब देणाऱ्याचं नाव आणि पाकिटावर ज्याला गुलाब दिलाय त्याचं नाव घातलं आणि फुलाचा रंग सांगून त्याचे पैसे दिले, की शेट्टी रोज डेच्या दिवशी ओळखपत्र पाहून पाकिटं आणि फुलं यांचं वितरण करत असे. ही ॲक्टिव्हिटी कॉलेजने चालवलेली होती की शेट्टीची होती हे मला माहित

नव्हतं. ती शेट्टीने स्पॉन्सर केलेली असण्याची दाट शक्यता होती. रोज डेच्या दिवशी शेट्टीचा गल्ला नेहमीच्या दीडपट ते दुप्पट भरत असे असं आम्ही ऐकून होतो.

"हो. तू लपवलंस तरी आम्हाला कळलं बरं."

"हो, नाही, म्हणजे मी सांगणारच होते तुम्हाला" नेहा म्हणाली.

"हरकत नाही. आता सांग" मिताने तिला उत्तेजन दिलं.

"...."

"हं, हं?" मिता नेहाला सोडायला तयार नव्हती. मी लायब्ररियन मेननबाईंच्या केबिनकडे पाहिलं. बाई तिथे दिसत नव्हत्या. मुलं गप्पा मारताना दिसली की मेननबाईंना चेव यायचा. त्या मोठ्या आवाजात पकडल्या गेलेल्यांना दमात घ्यायच्या.

"...."

"गुलाब लाल होता की सफेद?" उत्तर येत नाही म्हटल्यावर समंजस परिक्षक विद्यार्थ्यांना छोटे छोटे प्रश्न विचारून संपूर्ण उत्तर मिळवायचा प्रयत्न करत असत तीच पद्धत मिता वापरत होती.

"लाल... नाही म्हणजे सफेद होता" नेहा म्हणाली.

"लाल की सफेद?"

"सफेद.. सफेद!"

"तुझ्या केसांत सफेद गुलाब आम्ही पाहिला, पण मिळालेला लाल गुलाब बदलून तिथे तू सफेद ठेवला असावास असं सगळयांचं मत पडलं."

"काहीतरी काय?" नेहा म्हणाली.

"कोणी दिला होता? विजयने?"

मिता माझ्यावर संशय का घेत होती? तिने मला आणि नेहाला रोज डेच्या दिवशी कँटीनमध्ये पाहिलं होतं की काय?

"नाही ग. तो नीरस मुलगा आहे, तुला माहितीय ना? तो आयुष्यात कोणालाही गुलाब द्यायचा नाही. घरच्या लग्नसमारंभात हॉलच्या प्रवेशद्वाराशी उभा राहून अभ्यागतांना फुलं वाटण्यापलिकडे तो जायचा नाही."

पार्टिशनच्या या बाजूला मला ठसका लागला. त्यांना ऐकू जाईल म्हणून मी प्रयत्नपूर्वक त्याचा आवाज घशातच गिळला.

"पण आम्हाला कटवून तू कँटीनमध्ये परत गेलीस. तुम्ही दोघं नंतर तिथे बसून हास्यविनोद करत होता. ते सगळं काय होतं?"

मुली अशा गोष्टी अशा उघड्यावर मनमोकळेपणाने बोलतात? मला वाटायचं आम्ही मुलंच तसं बोलायचो.

"मिता, मी सांगते, पण इतर कोणाला सांगू नकोस. नाही ना सांगणार?"

"छे ग! आपल्या ग्रुपबाहेर ही गोष्ट जाणार नाही."

"मला ना, कोणीतरी लाल गुलाब दिला होता. तो घ्यायची मला भिती वाटत होती. भलत्याच कोणीतरी दिलेला असता तर? मग मी विजयला विनंती केली की धीराला म्हणून माझ्याबरोबर ये."

"विजयच का? आम्हाला बोलवायचं" मिता म्हणाली. तिच्या आवाजात मिश्किलपणा होता.

"हो! संध्याकाळपर्यंत तुम्ही ते विविधभारतीवर पोचवलं असतं. "

"चल ग. असं कसं केलं असतं आम्ही?"

आपल्या मैत्रिणी तसं काहीतरी करतील याची काळजी होती म्हणून तर नेहाने त्यांना टाळलं होतं.

"तर आम्ही गुलाब घेतला. तो लाल निघाला. पाकिट उघडून बघण्यापूर्वी तुम्ही सगळया तिथे पोचलात, म्हणून मी तुम्हाला .."

"कटवलंस. पण तेव्हा तुझ्या हातात गुलाब किंवा पाकिट दिसत नव्हतं."

या मुली डॉक्टरकी शिकत होत्या की डिटेक्टिव्हगिरी?

"ते विजयकडेच ठेवलं होतं. तुम्हाला दिसलं असतं तर तुम्ही पाकिट उघडून बघितल्याशिवाय मला सोडलं असतं का?"

"ते बरोबर" मिताने कबूल केलं. "मग पुढे? विजयने पाकिट उघडून बघितलं असतं तर?"

"नाही ग. तो तसा साधा आहे. उघडू नको असं सांगितलं तर तो पाकिट उघडायचा नाही. तर मग आम्ही पाकिट उघडलं."

"कोणी पाठवलं होतं?"

"अग, ती एक गंमतच झाली. आतमधल्या कागदावर नाव नव्हतं, पण एक माकडाचं चित्र काढलेलं होतं."

तीन चार सेकंद शांततेत गेले. मी पाकिट उघडून आतमध्ये असलेला बंडूचा प्रेमाचा संदेश काढून घेऊन तिथे एक माकडाचं चित्र पटकन काढून टाकलं होतं. एखादा रानरेडा किंवा तसाच कोणीतरी आपल्याला लाल गुलाब देईल अशी भिती नेहाला वाटत होती म्हणून तर तिने मला धीराला बोलावलं होतं. जिममध्ये रोज दोन तास घाम गाळणारा बंडू रानरेड्यासारखा होता खरा. नेहाला त्याचं नाव बघून शॉक बसला असता. नंतर त्याला टाळताना ती बरीच कॉन्शस

झाली असती. तिचा मित्र म्हणून मी ती हातचलाखी केली होती. नेहा गंडली होती, पण मिता गंडली नाही असं दिसत होतं.

"मग?" थोड्या वेळाने मिताने विचारलं.

"मग विजयने सुचवलं तसा मी पर्समध्ये घालून आणलेला सफेद गुलाब केसात घातला."

"आणि तो लाल गुलाब?"

"मी तो जमिनीवर टाकून देत होते. पण विजयने तो खाऊन टाकला. मागे पुरावा ठेवायचा नसतो असं म्हणाला."

"शी!" मिता म्हणाली. मला परत ठसका लागला. नेहाने सुद्धा तेव्हा 'शी रे' असंच म्हटलं होतं. मुली कशालाही 'शी' असं म्हणतात असं माझ्या मनात आलं.

"मी पण त्याला तसंच म्हटलं" नेहा म्हणाली. "पण त्याने फुलाचे केसर आणि देठ मात्र टाकून दिले हं."

मी कपाळाला हात लावला. स्टोरी सांगताना काय महत्वाचं आणि काय नाही याचा पोच नेहाला अजिबात नव्हता. तिथे मिताने कपाळाला हात लावला की नाही ते काही कळलं नाही. ज्या अर्थी नेहा त्याबद्दल काही म्हणाली नाही त्या अर्थी मिताने बहुतेक कपाळाला हात लावला नसावा. बहुधा मैत्रिणीसमोर तिला तसं करायला जमलं नसावं.

"बरं चल, मी निघते" मिताचा आवाज आला.

मिता निघून गेली. पण हे प्रकरण तेवढ्यावर थांबेल असं मला वाटत नव्हतं. तसं ते थांबलं नाही. दुपारी मिताने मला गाठलं.

"काय रे, तू ऐकलंस का? गुलाबाचं फूल खाल्लं की बुद्धी कुशाग्र होते असं सगळे जण म्हणताहेत."

"सगळे म्हणजे कोण?" मी प्रतिप्रश्न केला.

"सगळे म्हणजे सगळेच." हे उत्तर मी दिलं असतं तर तिला चाललं असतं?

"सगळे म्हणजे तू. हो ना?" मी विचारलं.

"तू गुलाबाच्या पाकळया कधीपासून खायला लागलास?" तिने माझ्याकडे दुर्लक्ष करून विचारलं.

"मी फक्त एकदाच गुलाबाच्या पाकळया खाल्ल्यायेत. त्या सुद्धा परोपकार म्हणून" मी म्हटलं.

"नेहाचं पाकिट उघडून तू आतल्या कागदाच्या जागी माकडाचं चित्र असलेला कागद टाकलास, होय ना?"

गुलाबाच्या पाकळया न खाताच मिताची  बुद्धी कुशाग्र झाली असं दिसत होतं. तसं म्हटलं असतं तर स्फोट झाला असता म्हणून मी मोठ्या निग्रहाने त्या मोहावर मात केली.

"माकडाचं चित्रच का काढलंस असं विचारू नकोस" मी म्हटलं.

"माकडाचं चित्रच का काढलंस?" तिने विचारलं.

"मला ते इतर चित्रांपेक्षा चांगलं जमतं" मी म्हटलं.

"काय गरज होती हे सगळं करायची?"

"आतमध्ये बंडूचं नाव होतं. नेहा ते बघून कोसळली असती ना. नाहीतरी बंडूचा चेहरा थोडासा माकडासारखा आहे. माकडाचं चित्र काढण्याचं ते पण एक कारण होतं."

"येवढी सगळी मॅनिप्युलेशन्स करत रहातोस. स्वतःच्या आयुष्याचा विचार कधी करणारेस रे तू? तुला कोणाला गुलाबाचं फूल द्यावं असं वाटत नाही का रे?"

"मिता, तुला माहित आहे ना की मी एक नीरस मुलगा आहे. मी फार तर नात्यातल्या कोणाच्या तरी लग्नात दरवाजावर उभा राहून अभ्यागतांना गुलाबाची फुलं देऊ शकेन" मी म्हटलं.

मिता एकदम स्तब्ध झाली. मी गप्पच राहिलो.

"आम्ही लायब्ररीत बोलत होतो ते तू ऐकलंस?" तिने थोड्या वेळाने विचारलं. मी गप्पच राहिलो.

"सॉरी" ती म्हणाली.

"मिता, मी मध्यम वर्गातला मुलगा आहे. डॉक्टर झाल्यावर नर्सिंग होम वगैरे टाकून रग्गड पैसा मिळवेन असं मला वाटत नाही. त्याला खूप पैसे लागतात. एखाद्या पॉलीक्लिनिकमध्ये कन्सल्टिंग करता येईल, पण पेशंट पाठवण्यासाठी जनरल प्रॅक्टिशनरांना कट वगैरे देणं मला जमायचं नाही, कारण ते माझ्या स्वभावात नाही. एखाद्या मुलीला गुलाब देणं सोपं असतं बघ, पण ते पुढे निभावावं लागतं. माझ्या प्रिन्सिपल्सप्रमाणे मी आयुष्य जगणार तसं तू पण जग असं मी कोणत्या मुलीला सांगू?"

"तू फूल देऊन तर बघ एकदा" ती म्हणाली.

"अशी मुलगी तुझ्या पहाण्यात असली तर सांग. तू सांगशील त्या मुलीला मी देतो फूल" मी म्हटलं.

"बघ हं, वेळ आल्यावर माघार घेशील" ती म्हणाली.

"तू अशा मुलीचं नाव सुचवून तर बघ एकदा" मी म्हटलं.

"वेळ आली की सांगते" असं म्हणून ती निघून गेली.

# १०

वर्ष ३, एप्रिल ७

वॉर्डमधलं आमचं शिक्षण पेशंटांच्या सभोवती होत असे. एका बाकड्यावर पेशंटला आडवं पडायला सांगत असत. त्याच्या एका बाजूला आमचे शिक्षक एक खुर्ची घेउन बसत असत. सभोवती आम्ही विद्यार्थी कोंडाळं करून उभे रहात असू. त्या पेशंटमध्ये आजाराची जी चिन्हं दिसत असत ती एक एक करून ते शिक्षक आम्हाला दाखवत असत आणि मग त्याबद्दल शिकवत असत. त्यातनं जे महत्वाचं वाटायचं ते आम्ही अवघडल्या अवस्थेत उभे असताना वह्या एका हातात धरून लिहून घेत असू. वॉर्डाच्या एका कोपऱ्यात किंवा बाजूच्या एका छोट्याशा खोलीत हे शिक्षण चालत असे. वॉर्ड पेशंटना ठेवायसाठी बांधलेले असत, मुलांच्या शिक्षणासाठी नाही. त्यामुळे शिक्षणाची ही जागा अपुरी असायची. दाटीवाटीने उभे राहिलो तरीही पेशंटच्या भोवती एका रांगेच्या कोंडाळयात आम्ही मावत नसू. मग उंचीला कमी मुलं आणि मुली पुढच्या रांगेत उभी रहायची आणि उंच मुलं मागच्या रांगेत उभी रहायची. साधारणपणे या मांडणीमुळे काही अडचणी येत नसत.

वॉर्डमधलं वातावरण आजाराने त्रस्त असलेले रुग्ण, मल-मूत्र आणि जखमांतून येणाऱ्या पसचा दर्प, सोबत जंतूनाशकांचा गंध, चिंतातूर नातेवाईक आणि कधी कधी शेवटच्या घटका मोजणारे अत्यवस्थ रुग्ण यामुळे गंभीर आणि नैराश्यमय असायचं. त्या वातावरणात कोणाच्या मनात प्रेमभावना जागृत होतील, किंवा कोणाला फ्लर्टिंग करावसं वाटेल याची शक्यता जवळजवळ शून्य असावी असं कोणालाही वाटलं असतं. पण ते तेवढंसं खरं नव्हतं. प्रताप आणि

नीनाचं प्रेम त्या वातावरणातही बहरलंच होतं ना. बरं ती एकटीच प्रेमळ जोडी असती तर गोष्ट वेगळी होती. पण आमच्या वर्गात अशा बऱ्याच जोड्या जमल्या होत्या. त्यातल्या काही टिकल्या, काही मोडल्या, आणि काहींची आपापसात अदलाबदलही झाली. वॉर्डात कंटाळा आला की मंडळी कँटीन किंवा कट्टा इथे मुक्काम हलवत असत. एक जोडी तर थोडा एकांत मिळावा म्हणून आमच्या लायब्ररीच्या इमारतीचं बांधकाम सुरू होतं तेव्हा त्या खांब आणि विटांच्या सांगाड्यात जात असे आणि सावकाशीने कपड्यांना चिकटलेलं सिमेंट, खडी वगैरे झाडून पुन्हा आम्हा सामान्य मुलांमध्ये परत येत असे.

आमच्या बॅचमध्ये तरी कुठच्या मुलाने मुलीची वॉर्डमध्ये छेड काढली असं दिसलं किंवा ऐकू आलं नव्हतं. निखिल बरोबरच्या मुलींना शरीरशास्त्राच्या डिसेक्शन हॉलमध्ये हलकेसे धक्के मारत असे खरा, पण त्याने ते पुढे वॉर्डांमध्ये सुरू ठेवलं असं काही ऐकायला आलं नव्हतं. आमच्या बॅचच्या मुली तर एकदम बाळबोध वळणाच्या आणि अभ्यासू किंवा घासू होत्या असं निखिलचं मत होतं. त्या आपणहून या नाजूक प्रकारात सहभागी होण्यासारख्या नव्हत्या. निदान सिमिन सोडून इतर मुलीतरी आपण बरं आणि आपला अभ्यास बरा या प्रकारच्या होत्या. सिमिन जरा अघळपघळ होती. मुलांना बोलायला लाज वाटेल अशा गोष्टी ती मुलांसमोर आणि काही विशिष्ट मुलांबरोबर अगदी बिनधास्त बोलत असे.

"'ब्रा'ची व्याख्या काय आहे?" एक दिवस तिने वॉर्ड क्लिनिकच्या तयारीत आम्ही उभे असताना आम्हा मुलांसमोर प्रश्न टाकला.

गायनॅकमध्ये एमडी करायचं असं माझं तोवर जवळ जवळ पक्कं झालं होतं. गर्भाच्या कपाळाच्या भागाला ब्राउ असं म्हणायचे. जर तो भाग मातेच्या कटिरात प्रथम प्रवेश करता झाला आणि तसाच राहिला तर नैसर्गिक प्रसूती होऊ शकत नसे. सिमिनला ब्राउ मध्ये एकदम इंटरेस्ट वाटायला लागला याचं मला जरासं आश्चर्य वाटलं. कोणीच तिच्या प्रश्नाला उत्तर देत नाही असं दिसलं म्हणून मी सुरुवात केली, "गर्भाच्या कपाळाच्या भागाला ब्राउ ...."

"मी 'ब्राउ'बद्दल विचारत नाहीये. मी 'ब्रा'बद्दल विचारतेय."

मी गार पडलो. एक तरुण मुलगी भरलेल्या वॉर्डात मुलांना ब्रा म्हणजे काय ते विचारते? तिला ब्रा म्हणजे काय ते नक्कीच माहित असणार. तंग टी शर्ट आणि जीन्स घालणारी मुलगी ब्रा वापरत नसेल हे शक्यच नव्हतं. म्हणजे मुलांना ब्रा म्हणजे काय ते माहित आहे की नाही याची ती परिक्षा घेत होती की काय? बरं वयात आलेल्या, चित्रपट आणि टीव्ही बघणाऱ्या मुलांना ब्रा माहित नसेल हे शक्यच नव्हतं. शेवटी हा सामूहिक फ्लर्टिंगचा प्रकार असणार हे माझ्या लक्षात आलं. मी तोंड बंद केलं. सुकुमारने स्मित केलं आणि ब्राची व्याख्या सांगायला सुरुवात केली. मी ती ऐकली नाही कारण त्याच वेळी आमच्या शिक्षकांचं आगमन झालं आणि चांगली जागा पटकावण्यासाठी मुलांची धावपळ सुरू झाली.

ते क्लिनिक संपल्यावर सुकुमार सिमिनच्या कानात काहीतरी पुटपुटत असताना मी पाहिलं. दोघं माझ्याकडेच बघत होते. 'विजय जरासा बावळट आहे' असं काहीतरी सुकुमार तिला सांगत असावा असं मला त्यांच्या चेहऱ्यांवरच्या भावावरून वाटलं. मला त्यामुळे काही वाईट वाटलं नाही, कारण त्या दोघांयेवढं स्मार्ट असण्याऐवजी मी होतो तसा असणंच मला पसंत होतं.

थोडे दिवस गेले. दैनंदिन गोष्टी नेहमीप्रमाणे चालू होत्या. एक दिवस आमचं वॉर्डमधलं क्लिनिक चालू होतं. आम्ही पेशंटच्या भोवती दोन रांगांचं कोंडाळं करून उभे होतो. सिमिन माझ्या पुढे उभी होती. ती तिथे कधी आणि कशी पोचली ते काही मला सांगता येणार नाही. मिता समोरच्या बाजूला उभी होती. आमचे शिक्षक शिकवत होते, आम्ही जमेल तशा नोट्स काढून घेत होतो. मध्येच मला सिमिनचा पार्श्वभाग लागला. उभं राहून अवघडल्यासारखं झालं म्हणून ती जराशी हलली असेल आणि चुकून मला तिचा स्पर्श झाला असेल असं समजून मी उजवीकडे सरकलो. क्षणाचीही उसंत न घेता तिचा पार्श्वभाग उजवीकडे सरकला आणि मला परत तिथेच स्पर्श झाला जिथे पहिल्या वेळी झाला होता. मला चेतवण्यासाठी ती असा खोडसाळपणा

करत असावी हे माझ्या लक्षात आलं. हे तिसऱ्यांदा व्हायला नको म्हणून मी माझी जागा बदलली आणि प्रतापच्या पलिकडे जाऊन उभा राहिलो. समोरून निखिल हे सगळं बघत होता.

"विजय, निखिल पैज हरला" दुसऱ्या दिवशी प्रतापने मला सांगितलं.

"कसली पैज? कोणाबरोबर हरला?"

"काय यार, तुझ्यामुळे तो पैज हरला आणि तुला पत्ताच नाही?"

"खरंच मला काही माहित नाही रे. सांग काय झालं ते" मी म्हटलं.

"निखिल, सुकुमार आणि सिमिनची पैज लागली होती. सिमिनने तुला पटवून दाखवायची पैज होती. सुकुमार म्हणत होता की तिला ते जमणार नाही, तर निखिल आणि सिमिन म्हणत होते की तिला ते जमेल. निखिल आणि सिमिन हरले."

"मला पटवायचं?" माझं डोकं जरासं गरगरायला लागलं होतं. "म्हणजे मुलं मुलींना पटवतात तसं?"

"अगदी तसंच नाही, पण साधारण तसं" तो म्हणाला. "काल वॉर्डातल्या क्लिनिकच्या वेळी ते व्हायचं होतं. आता मला सांग की नक्की काय घडलं?"

आता काय घडलं ते सांगायला मी तिच्यासारखं कमरेचं सोडून डोक्याला गुंडाळलं नव्हतं.

"काही नाही रे" मी म्हटलं.

"काही नाही कसं? तुझं तोंड गोरंमोरं झालंय ते काय उगाच? चल, सांग."

मी काय घडलं ते त्याला सांगितलं. तो माझ्या तोंडाकडे बघतच राहिला.

"काय यार, तू काय संन्यासी वगैरे झालायस का? येवढी हॉट पोरगी तुला बॉटम चिकटवते आणि तू कोरडाच राहतोस? छी छी!"

"प्रताप, तिने तुला असं केलं असतं तर तू काय केलं असतंस?"

"मी तुझ्यासारखा तिथून पळून गेलो नसतो रे" तो म्हणाला.

"तुझी काय प्रतिक्रिया झाली ते तिने नीनाला सांगितलं असतं तर?"

यावर तो विचारमग्न झाला. "आपण काय चावटपणा केला ते ती नीनाला कशी सांगेल?" थोडा वेळ विचार करून झाल्यावर त्याने प्रतिप्रश्न केला.

"म्हणजे नीनाला समजलं नाही तर तसं करायला तुझी हरकत नव्हती?" मी विचारलं. मला क्षणभर नीनाच्या भविष्याची काळजी वाटली.

"तू काहीही प्रश्न विचारतोस हां" असं म्हणून तो निघून गेला.

त्या तिघांनी माझ्याबरोबर असा खेळ केला ते मला आवडलं नव्हतं. निखिल आणि सुकुमार यांना माझा थोडा दुस्वास वाटायचा म्हणून त्यांनी हा उपद्व्याप केला असेल असं मी समजू शकत होतो. पण सिमिनचं तर मी काही घोडं मारलं नव्हतं. तिला हे असं करायची काही गरज दिसत नव्हती.

त्या दिवशीचं वॉर्डमधलं क्लिनिक संपल्यावर सगळे जण जायला निघाले, तेव्हा मी सिमिनला गाठलं.

"सिमिन."

तिने माझ्याकडे वळून पाहिलं.

"तुमची काय पैज लागली ते सुकुमारने मला आधीच सांगितलं होतं."

आ वासलेल्या सिमिनला तिथेच सोडून मी निघून गेलो.

# ११

वर्ष ३, नोव्हेंबर २७

लहानपणापासून मला अभ्यासात जेवढी गती होती, तेवढी इतर गोष्टी एकत्रितपणे मोजल्या असत्या तरी नव्हती. मी चेहरा लालबुंद होईपर्यंत खेळायचो, पण ते आपले पळापळी, लंगडी, लपाछपी असे खेळ. क्रिकेट, फूटबॉल, बॅडमिंटन वगैरे खेळ मला नीटसे कधी जमले नाहीत. पोहणे, धावणे, जिम्नॅस्टिक्स वगैरे गोष्टी मी कधी करून पाहिल्याच नाहीत, त्यांत बक्षिसं मिळवणं राहिलं दूरच. गाणी ऐकायला मला आवडायची, पण गाता काही येत नसत. एकदा आमच्या शाळेतल्या गणिताच्या सरांनी फ्री पिरियडला मला गाणं म्हण असं सुचवलं होतं. मी नम्रपणे नाही असं म्हटलं होतं. त्यांच्यावर सूड घ्यायला म्हणून कोणीतरी त्यांना मी फार छान गातो असं सांगितलं असावं. माझा नकार हा माझा आढेवेढे घेण्याचा प्रकार आहे असं समजून त्यांनी आपला आग्रह कायम ठेवला होता. शेवटी मी रफीसाहेबांचं एक गाणं म्हटलं होतं. ज्यांनी ते गाणं पूर्वी ऐकलेलं नसेल त्यांनाही ते ऐकवलं नसतं. मी ते ऐकलेलं होतं, आणि मलाही माझं गाणं ऐकवत नव्हतं. मी एकच कडवं म्हटलं होतं. गाणं सुरू असताना वर्गात स्मशानशांतता होती. मी स्कॉलर म्हणून असेल, किंवा माझी अजिबात इच्छा नसताना सरांनी जबरदस्तीने मला गायला लावलं म्हणून मला इतर मुलांची सहानुभूती होती म्हणून असेल, मला कोणीही काहीही बोललं नाही. सरांनी स्वतःच्याच चुकीमुळे आपल्याला ते ऐकावं लागलं म्हणून पडलेल्या तोंडाने ते ऐकलं होतं, आणि नंतर कधीही मला गाणं म्हण असं चुकूनही म्हटलं नव्हतं. मी एखादं वाद्य वाजवायला तरी शिकावं असं माझ्या

मनानं घेतलं. बँजो आणि बुलबुलतरंग अशा दोन वाद्यांवर मी खूप प्रयत्न केले. अभ्यासाइतकं ते सोपं नाही हे लक्षात आल्यावर मी वाद्य वाजवण्याचा नाद सोडला. तेव्हा मला वाटतं घरच्यांनी आणि शेजारच्यांनी सुटकेचा निश्वास सोडला असावा. अभ्यास, खेळ, छंद अशा सगळयाच बाबतीत पुढे असायला मी काय हिंदी सिनेमाचा हिरो होतो?

कॉलेजाच्या वार्षिक संमेलनात कॉलेजच्या मुलांचा ऑर्केस्ट्रा असायचा. मुलं खरंच टॅलंटेड होती. गायची सुरेख, आणि वाद्यंही वाजवायची अप्रतिम. इतर कार्यक्रमांना गेलो नाही तरी मी ऑर्केस्ट्राला आवर्जून जायचो.

"विजय, ऑर्केस्ट्राला जाणार आहेस ना?"

"असं म्हणतोय. तू जाणारेस?"

"हो तर."

"आमच्याबरोबर की नीनाबरोबर?"

पूर्वी हा प्रश्न विचारावा लागत नसे. नीनाबरोबर जमल्यानंतर प्रताप अशा फंक्शनना सहकुटुंब जावं तसा नीनाबरोबर जायला लागला होता. नीना जाणार नसली तरच तो मित्रमंडळींच्या वाट्याला यायचा. त्याने आपणहून हा प्रश्न विचारला त्या अर्थी नीनाला त्याच्याबरोबर जायला वेळ नसावा असं माझ्या मनात आलं.

"नीना घरी जाणार आहे. आपण एकत्रच जाऊया" तो म्हणाला. "मिता गाणार आहे असं ऐकलं."

मी त्याच्याकडे चमकून पाहिलं.

"तुला माहित नव्हतं?"

"ती छान गाते ते मला माहित होतं" मी म्हटलं. "गेल्या वर्षी तिला त्यांनी बोलावलं तेव्हा तिने नाही म्हटलं होतं. आता परिक्षेच्या तयारीत असल्यामुळे ती बरेच दिवस भेटली नाही. नाहीतर मला म्हणाली असती."

मिता मला कशी काही म्हणाली नाही? एरवी सगळं सांगायची. मला चैन पडेना. मी तिला गाठलं.

"काय मिता? तू आपल्या ऑर्केस्ट्रात गातेयस असं ऐकलं."

"हो. तुला कोण म्हणालं?"

"ते महत्वाचं नाही. कोणती गाणी म्हणणारेस?"

"एकच म्हणणार आहे. मराठी गाणं आहे. वेळेवर ये आणि ऐक. आवडतं का सांग."

"तुझी सगळीच गाणी छान असतात" मी म्हटलं. खरं तर 'मला तुझी सगळीच गाणी आवडतात' असं मला म्हणायचं होतं. पण जमलं नाही.

"चल, चल. उगाच ताणू नकोस" असं म्हणून ती हसली. मी ताणत नव्हतो ते तिला माहित होतं का?

आम्ही ऑर्केस्ट्राला वेळेवर पोचलो. जमेल तेवढी पुढची जागा पकडून बसलो. कार्यक्रम सुरू झाला. सिनियर स्टार मंडळी आधी गायली. गाणी नेहमीप्रमाणे छानच होती. पण माझं त्यांच्याकडे नेहमीयेवढं लक्ष नव्हतं. माझ्या डोक्यात विचार घोंघावत होते. मिता आली होती ना? आधी न सांगण्यासारखं असं कोणतं गाणं ती म्हणणार होती?

"आता सादर आहे आपल्या ऑर्केस्ट्रातली नवी गायिका मिता" अनाउन्सरने जाहीर केलं.

सस्मित मुद्रेने मिताने स्टेजवर एंट्री घेतली.  तिने बहुतेक आईची साडी परिधान केली होती. नेहमी ड्रेसमध्ये असणाऱ्या मुली साडीमध्ये ओळखायला येत नाहीत. अनाउन्सरने आधी जाहीर केलं नसतं तर मी मिताला ओळखलं नसतं. मुलगी नक्षत्रासारखी दिसत होती. म्हणजे एरवी नक्षत्रासारखी दिसत नसे असं मला म्हणायचं नव्हतं. पण त्या दिवशी खासच दिसत होती. तिने माइक हातात घेतला. वाद्यं वाजायला लागली. तिने एका पायाने हलकासा ठेका धरला.

"अरे, ती मुम्बई-पुणे-मुम्बईचं ...." तिने गायला सुरुवात केली आणि प्रताप काय म्हणत होता ते मला पुढे ऐकूच आलं नाही. अर्थात ते न ऐकताही मला गाणं सुरू होण्यापूर्वी ओळखू आलं होतं.

"का कळेना कोणत्या क्षणी हरवते मन कसे" मिता गात होती, मी ऐकत होतो, बाकी कसलीही जाणीव नव्हती. "उमलती कशा धुंद भावना अल्लद वाटे कसे?...." ती गात राहिली. गाणं संपेपर्यंत माझी नजर तिच्यावरून हटली नाही. गर्दीत तिला मी दिसलो की नाही कोण जाणे. गाणं कधी संपलं तेही समजलं नाही. टाळ्यांचा कडकडाट झाला.

"विजय..." प्रताप म्हणाला. मी भानावर आलो. तो माझ्याकडे निरखून पहात होता. मी टाळ्या वाजवल्या. कोणीतरी तिला वन्स मोर देईल अशी मला आशा वाटली, पण कोणी तसं केलं नाही. माइक स्टँडला अडकवून मिता विंगमध्ये परत गेली. मला तिला भेटायचं होतं. पण बॅकस्टेज जाऊन भेटणं बरं दिसलं नसतं. शेवटी मी ते दुसऱ्या दिवसापर्यंत पुढे ढकलायचं ठरवलं. पुढची गाणी सुद्धा छान होती, पण माझं लक्षच लागेना.

"प्रताप, मी घरी जातो. थोडं काम आहे" असं म्हणून मी उठलो.

"बरा आहेस ना?" प्रताप म्हणाला.

"हो रे. मला काय होतंय? तू बस आणि उरलेला प्रोग्राम बघ."

मी मागच्या गेटमधून कँपसबाहेर पडलो. मुलींच्या हॉस्टेलसमोर माझा घरी जायचा बसस्टॉप होता. बसची वाट बघत उभा राहिलो. सहसा मी येवढा डिस्टर्ब होत नसे. त्या दिवशी काहीतरी झालं होतं आणि ते मला शब्दांत पकडायची भिती वाटत होती.

"विजय" मागून आवाज आला. मिता! मी वळलो.

"प्रोग्राम अर्धा सोडून घरी जायला निघालास?"

"प्रोग्राममध्ये लक्ष लागेना. म्हटलं घरी जावं" मी बोलून गेलो. नशीब माझं 'लक्ष का लागेना' असं तिने विचारलं नाही.

"आवडलं माझं गाणं?"

"एकदम! तुला वन्स मोर द्यायला हवा होता."

"मग का नाही दिलास?"

'जमलं नाही' असं मला म्हणायचं होतं. पण ते म्हणायलाही मला जमलं नाही.

"माझा फेव्हरेट चित्रपट" मी म्हटलं. "हे गाणं तर सगळयात जास्त फेव्हरेट."

ती हसली.

"हेच गाणं का निवडलंस? तू इतर खूप गाणी सुद्धा छान म्हणतेस."

"असंच. कोणतंतरी एक गाणं म्हणायचं होतं. मग मी हे निवडलं."

"सहजच ना? की तसं काही आहे?" मी खूप प्रयत्न करून धीर केला आणि विचारलं.

"तसं? म्हणजे?"

"म्हणजे मन हरवलंय का?" मी तो प्रश्न कसा विचारू शकलो कोण जाणे. त्या क्षणापर्यंत मी असं काही तिला विचारू शकेन असं कोणी मला म्हटलं असतं तर मी त्याला वेड्यात काढलं असतं.

"असं काय विचारतोस रे?"

"अम..."

"ही गोष्ट इतर कोणाच्याही आधी तुला सांगेन. ओके?"

ती वळली आणि हॉस्टेलच्या पायऱ्या पटपट चढून गेली.

'अगं हळू, साडीच्या निऱ्यांत पाय अडकून पडशील' असं मी पुटपुटलो.

# १२

वर्ष ४, डिसेंबर २७

फायनल इयरची परिक्षा झाली. हॉस्टेलमध्ये रहाणारी मुलं घरी गेली. मितासुद्धा गेली. रिझल्ट लागल्यानंतरच पुढची वाटचाल करायची होती. इंटर्नशिपसाठी खास तयारी काही करण्यासारखी नव्हती. शेवटी वाचायच्या राहिलेल्या कादंबऱ्या लायबरीतून आणून मी एकामागून एक वाचून काढल्या. पूर्वी वाचलेल्या आणि अतिशय आवडलेल्या कादंबऱ्या परत एकदा वाचल्या. पण त्यात मन काही लागेना. कविता लिहायला घेतल्या आणि एक-दोन ओळी लिहून तशाच सोडल्या.

"काय रे, तुझं काही बिघडलंय का?" मुलाचं जरासं काही बिनसलं तर आईला पटकन कळतं.

"नाही गं" मी म्हटलं.

"रिझल्टचं टेन्शन आलंय का?"

"नाही ग. रिझल्ट चांगलाच येणार. पेपर छान गेलेत."

" बाहेर कुठे तरी फिरून ये जरा. सगळा दिवस घरात बसून कंटाळा येत असेल."

मिताची आठवण येतेय असं तिला कसं सांगणार होतो? समजा धीर करून मिताला मी कधी विचारू शकलो असतो आणि ती नाही म्हणाली असती तर? हो म्हणाली असती तरी अजून पदव्युत्तर शिक्षण व्हायचं होतं. तोपर्यंत प्रेमात गुंतून आणि तिला गुंतवून दोघांच्याही अभ्यासाचं

खोबरं करून घ्यायचं नव्हतं मला. समजा प्रताप आणि नीनासारखं जमवून ठेवलं असतं आणि त्यांच्यासारखा वेळ प्रेमात न घालवता दोघांनीही अभ्यास चालू ठेवला असता तर जमलं असतं. पण ती नाही म्हणाली असती तर एकाच हॉस्पिटलात एकत्र काम करणं निदान मला तरी खूप अवघड झालं असतं. ज्याच्याकडे काही नसतं तो माणूस आशेवर जगतो. होत्या त्या परिस्थितीत मला आशा होती. आशा नसताना ती रोज नजरेला पडत राहिली असती तर मी कदाचित जिवाचं बरंवाईट....

"मित्रमंडळींची आठवण येत असेल तर फोन कर त्यांना. बरं वाटेल" माझ्याकडून काही प्रतिसाद न आल्यामुळे आईने दुसरा उपाय सुचवला.

"बघतो" मी म्हटलं. मिताला फोन करावा असं माझ्या मनात येऊन गेलं होतं. पण तिच्याऐवजी तिच्या आई किंवा बाबांनी फोन उचलला असता तर? काय काम आहे असं विचारलं तर उत्तर देणं कठिण झालं असतं. मिताने काही विचारलं आणि उत्तर द्यायचं नसलं तर मी प्रतिप्रश्न करून वेळ मारून नेऊ शकत असे. तिच्या आई-बाबांवर ती ट्रिक वापरता आली नसती. आणि समजा तिच्या आई-बाबांनी तिचं लग्न ठरवलेलं असतं तर?

विचार करकरून डोक्याला मुंग्या आल्या. शेवटी मी उठलो आणि मिताला फोन लावला. पोटात गोळा आला होता त्याच्याकडे दुर्लक्ष करून वाजणारी रिंग ऐकत राहिलो. कोणी फोन उचलला नाही. सोळा वेळा रिंग वाजल्यावर मी तो बंद केला. एकीकडे ती भेटली नाही म्हणून मी निराश झालो होतो. दुसरीकडे पोटातला गोळा गेला म्हणून हुश्श झालो होतो. काय वेडेपणा करत होतो. परमेश्वराची कृपा म्हणून तो वेडेपणा तिथेच थांबला असं माझ्या मनात आलं. मी आईच्या सल्ल्याप्रमाने मोकळया हवेत फिरून यावं म्हणून घराबाहेर पडलो. कुठे जायचं ते काही ठरवलं नव्हतं. आयुष्यभर प्रत्येक गोष्ट ठरवून करायची सवय झाली होती. पाय नेतील तिथे जायचं असं कधी केलं नव्हतं. आज तेही करून बघावं म्हटलं. पाय माझेच, त्यांना असं काही करायची सवय नव्हती. ते सिद्धिविनायकाच्या देवळाकडे वळले. मी लहान होतो तेव्हा मंदिर छोटं होतं.

समोर मातीचं प्रांगण होतं. तिथे शेजारच्या आजी आणि मी मातीत बसून दुर्वा निवडत असू. मग त्या देवाला वाहून घरी परत येत असू. आता मंदिर अवाढव्य झालं होतं. गाड्यांमधून आलेली माणसं रांगा लावून दर्शनासाठी उभी होती. एरवी मी बुजून परत गेलो असतो. पण त्या दिवशी गेलो नाही. परमेश्वराकडे आज काहीतरी मागायचं असं माझ्या मनाने घेतलं. तसा दैवी संकेत असणार, नाहीतर माझे पाय मला तिथे घेऊन गेलेच नसते अशी मी सोयीस्करपणे स्वतःची समजूत करून घेतली. रांग पुढे सरकत राहिली. माझा नंबर आला. मी गाभाऱ्यात गेलो. हात जोडले. देवाचं दर्शन घेतलं. देवाकडे मिताला मागून घ्यायचं असं रांगेत उभा असताना मी ठरवलं होतं. पण त्या क्षणी धीर होईना. समजा तिच्या मनात नसलं तर? तिच्या मनाविरुद्ध देवाने माझी प्रार्थना मंजूर केली नसतीच, पण समजा केली असतीच तर तिला उगाचच माझ्या बरोबर आयुष्य घालवावं लागलं असतं.

'मूर्खा, असला बावळटपणा करत राहिलास तर सगळ्या सुंदर मुली लग्न होऊन निघून जातील आणि तू तसाच राहशील. काय तुझ्या मनात आहे ते माग देवाकडे' असं प्रताप बोलल्याचा मला भास झाला. बहुतेक मी बावळट असल्यामुळे असेल, मी त्याच्याकडे दुर्लक्ष केलं.

"देवा, मिताच्या मनात असेल ते होऊ दे" असं म्हणून मी निघालो. बाहेर तीर्थप्रसाद घेतला. कपाळाला देवाचा अंगारा लावला. पाय घराच्या दिशेला वळले. घराबाहेर पडलो तेव्हा मनात विचारांचा कल्लोळ चालू होता. आता परत जाताना सगळ्या शंका दूर झाल्या होत्या. खूप शांत वाटत होतं.

# १३

वर्ष ४, डिसेंबर २८

दुसऱ्या दिवशी आमचा रिझल्ट लागला ते मला वर्तमानपत्र वाचल्यावर समजलं. मी धावत पळत कॉलेजात पोचलो. शहरात रहाणारी मंडळी सकाळीच कॉलेजात पोचली. बाहेरगावची मंडळी उशीरा पोचतील असं मला वाटत होतं. पण रिझल्ट लागणार हे शहरात असूनही मला माहित नसलं तरी त्यांना माहित होतं. त्यामुळे त्यांच्यापैकी बहुतेक सर्वजण अगदी सकाळी नाही तरी साडेदहा-अकरापर्यंत कॉलेजात पोचले. माझे मार्क्स चांगले होते. मला सर्जरी, मेडिसिन, गायनॅकॉलॉजी किंवा पाहिजे तो इतर कोणताही विषय पोस्टग्रॅज्युएशनसाठी मिळेल असे मार्क्स होते. हॉस्टेलची गँग अपेक्षेमाणे मार्क्स मिळवून पास झाली. प्रताप आणि नीना इतकं प्रेम करूनही पास झाले. अकरा वाजता मिता आली. बरोबर मैत्रिणी होत्या. तिने माझ्याकडे बघून हात हलवला आणि सगळया जणी कॉलेजच्या ऑफिसात गेल्या. त्या आपापले मार्क्स बघणार आणि त्यावर चर्चा करणार म्हणजे अर्ध्या तासाची तरी निश्चिंती होती. जर आणखी काही विषय अजेंडावर असते तर किती वेळ लागला असता ते सांगता आलं नसतं. मी कट्ट्यावर जाऊन बैठक मारली.

थोडा वेळ गेला आणि ऑफिसातून प्रताप आणि नीना बाहेर आले. तो तिला काहीतरी म्हणाला, तिने मान हलवली, आणि ती मुलींच्या हॉस्टेलच्या दिशेने गेली. त्याने माझ्याकडे मोर्चा वळवला.

"प्रताप, कॉन्ग्रॅट्स. तुम्ही दोघंही पास झालात."

"थँक्स" तो म्हणाला.

"इंटर्नशिप उद्यापासून सुरू होतेय. सकाळी शपथ घेणं वगैरे फंक्शन आहे" मी माहिती पुरवली.

"माहित आहे. आत्ता नीनाला मी तेच सांगत होतो" तो म्हणाला. "तू कधी नव्हे तो आज कट्ट्यावर बसून काय करतोयस?"

"वेळ जात नाहीये. म्हटलं इथं बसलो तर ओळखीची चार माणसं भेटतील." मी म्हटलं.

"चार माणसं की कोणी एक विशिष्ट माणूस?"

"विशिष्ट माणूस?" मी विचारलं.

"विशिष्ट माणूस म्हणजे आपलं माणूस रे" तो म्हणाला.

"...."

"का कळेना हे गाणं म्हणणारं माणूस रे" त्याने स्पष्ट केलं.

"प्रताप, तसं काहीही नाहीये. उगाच काहीतरी बोलू नकोस" मी म्हटलं.

"मांजराने डोळे मिटून दूध प्यायलं म्हणून जगाला दिसल्याशिवाय रहातं का रे?"

"खरंच सांगतो, आमची फक्त मैत्री आहे" मी म्हटलं.

"ते माहितीय रे मला" तो म्हणाला. नशीब माझं 'सगळेजणं नेहमी असंच सांगतात' असा पेज थ्रीवरचा डायलॉग त्याने मारला नाही. "मैत्रीपलिकडे काही असतं तर मला समजलंच असतं. माझे हेर सर्वत्र असतात."

सर्वत्र असणारे त्याचे हेर म्हणजे वर्गातल्या इतर मुलींबरोबर संपर्क असणारी नीना हे मला ठाउक होतं.

"पण फक्त मैत्री असली तरी तुझ्या मनात काही फक्त मैत्रीची भावना नाहीये, खरं ना?" त्याने विचारलं.

"आता दुसऱ्यांच्या मनातलं वाचायला सुद्धा शिकलास काय?"

"सगळयांच्या मनांचं काही सांगता येत नाही, पण तुझ्या मनाचं मात्र नक्की सांगतो."

"...." माझा हजरजबाबीपणा मिताविषयी बोलताना कमी पडायचा खरा.

"ऑर्केस्ट्राच्या वेळी तू तंद्री लावून बसला होतास तेव्हाच मी ओळखलं" तो म्हणाला.

"...." तो म्हणाला ते खरं होतं. पण ते त्याला समजलं असेल असं मला वाटलं नव्हतं.

"नंतर तुम्हाला दोघांना मुलींच्या हॉस्टेलच्या बस स्टॉपवर बोलताना बघितलं तेव्हा माझी खात्री झाली."

"तू काय करत होतास तिथे? तुला प्रोग्राम बघत बस असं सांगून मी निघालो होतो ना?" मी विचारलं.

"मी एरवी बसलो असतो रे. पण तुझं कार्यक्रमात लक्ष लागत नव्हतं. तुला अस्वस्थ वाटत होतं, पण तसं न सांगता थोडं काम आहे असं सांगून तू निघालास. मला जराशी काळजी वाटायला लागली. तू धडपणे घरी जातोस की नाही ते बघायला मी तुझ्या पाठून बाहेर पडलो."

प्रताप मित्र असला तरी येवढा संवेदनशील असेल असं मला वाटलं नव्हतं.

"थँक्स" मी म्हटलं.

"तुमचं बोलणं संपल्यावर ती हॉस्टेलमध्ये गेली. ती गेली तरी त्याच दिशेला तू किती तरी वेळ बघत राहिला होतास. मग बस आली, तू धडपणे बसमध्ये चढलास. आता तुला काही होणार नाही असं वाटलं म्हणून मी परत गेलो."

"प्रताप, माझ्या मनात ढीग असो, तिच्या मनात काही आहे की नाही ते मला माहित नाही."

"अरे, माहित नाही तर विचारायचं. विचारल्याशिवाय कसं समजणार? मुलं मुलींना प्रपोज करतात, मुली मुलांना नाही. ती आपणहून तुला विचारेल असं वाटतंय का तुला?"

"नाही रे. पण मला विचारायचं धाडसच होत नाहीये."

"मी नीनाला सांगू का तिला विचारायला?" प्रतापने ऑफर दिली.

"नको, नको" मी म्हटलं. नीनाच्या मार्फत मी मिताला विचारलं असतं तर मिताने मला काय केलं असतं त्याची मला कल्पना होती.

"बघ, मिताला विचारायचं नसेल, तर तुला दोन प्रपोजल्स आहेत."

"दोन प्रपोजल्स?" मी चक्रावलो.

"नीनाची मैत्रीण कल्पा. तू खूप आवडलायस तिला."

कल्पा सुंदर होती खरी. गोरी, नाकी-डोळी रेखीव, सडपातळ बांधा, बाजूने गेली तर चार लोकं मागे वळून बघतील अशी होती.

"नको" मी म्हटलं.

"बरं तिची दुसरी मैत्रीण शिप्रा कशी वाटते? तिला सुद्धा तू आवडतोस."

"नको" मी म्हटलं.

"ज्या मुलींना तू आवडतोस त्या तुला नकोत. जी तुला आवडते तिला विचारायला तू भितोस. कसं होणार रे तुझं?"

"मी देवावर भरवसा ठेऊन आहे" मी म्हटलं. काल मी सिद्धीविनायकाच्या दर्शनाला जाऊन आलो आणि मिताबद्दल योग्य ते कर असं सांगून आलोय हे मी त्याला सांगितलं नाही. मी पूर्वी त्याला हसायचो तसा तो मला हसेल अशी मला भिती वाटली.

"बघ बाबा. तू हातावर हात ठेवून बसून रहाशील आणि सगळ्या सुंदर मुली लग्न करून निघून जातील."

"तू म्हणतोयस ते पटतंय रे मला. पण मन मानत नाहीये."

"ठीक आहे. माझी काही गरज लागली तर सांग" असं म्हणून तो निघून गेला.

# १४

वर्ष ४, डिसेंबर २९

त्या दिवशी मिताची आणि माझी भेट झाली नाही. ती मैत्रिणींबरोबर कॉलेजच्या ऑफिसातून बाहेर आली, पण त्या सगळ्या आपापल्या दिशेला काही गेल्या नाहीत. मिता एकटी सापडायचं काही चिन्ह दिसत नाही म्हटल्यावर मी लायब्ररीत गेलो. जेवायच्या वेळेपर्यंत मिता तिथेही आली नाही म्हटल्यावर मी घरी गेलो. दुसऱ्या दिवशी डॉक्टरकीची शपथ घेण्याच्या फंक्शनच्या वेळीही ती मैत्रिणींच्या गराड्यातच होती. नेहा समारंभ सुरू व्हायच्या वेळेला जेमतेम आली, त्यामुळे आपल्या ग्रुपमध्ये न जाता मी पाठी बसलो होतो तिकडेच बसली. मी तिच्या प्रश्नांना नेहमीप्रमाणे चटपटीत उत्तरं दिली खरी, पण माझं तिकडे फारसं लक्ष नव्हतं. समारंभ संपला, सगळीजणं पांगली, तेव्हा कुठे मिता मला एकटी सापडली.

“मिता, कॉन्ग्रॅट्स. छान मार्क्स पडलेत तुला.”

“थँक्स. तुलासुद्धा कॉन्ग्रॅट्स. तुला तर सर्वच विषयांत छान मार्क्स पडलेत" ती म्हणाली. "पुढे काय करायचं ठरवलयस? गायनॅक?"

"हो."

"नक्की ना? आधी शरीरशास्त्र म्हणत होतास. वॉर्डस सुरू झाले तेव्हा सर्जरीकडे तुझा कल होता. ऑर्थोचं पोस्टिंग सुरू झाल्यावर तुला ऑर्थोपण आवडायला लागलं होतं. मग गायनॅक. आता परिक्षेनंतरच्या सुट्टीत नवा पर्याय मिळाला नाही ना?"

"गायनॅक फायनल" मी म्हटलं. "मला एक एक करून ते सगळे विषय आवडले खरे, पण शेवटी गायनॅकच सगळयात जास्त आवडलं. तुझं काय ठरलं?"

"मी अॅनास्थेशिया करणार आहे" ती म्हणाली.

"ठीक आहे. म्हणजे मधून मधून तरी आमच्या ओटीत भेटशील" मी म्हटलं.

तिने काहीतरी म्हणायला तोंड उघडलं, पण मग विचार बदलून गप्प झाली.

"काय म्हणत होतीस? बोलता बोलता विचार बदललास?"

"काही नाही, असंच."

मी असं काही म्हटलं तर ती खनपटीला बसून काय म्हणत होतो ते सांगायला लावायची. मला ते जमायचं नाही. मी विषय बदलला.

"काय केलंस सुट्टीत?"

"घरच्यांबरोबर वेळ घालवला" ती म्हणाली. "हॉस्टेलमध्ये राहिलं की आई-बाबा रोज भेटत नाहीत. पुढे रेसिडेन्सीतही भेटायचे नाहीत. नंतर प्रॅक्टीस कुठे करेन काही माहित नाही."

मी हळूच तिचा हातांकडे पाहिलं.

तिची नाजूक लांबसडक बोटं - कुठे अंगठी दिसत नव्हती. मेंदी लावलेली नव्हती.

"काय बघतोयस?" तिने हात वर करून मागून पुढून न्याहाळले.

"काही नाही, असंच" मी म्हटलं.

"असंच?" तिने माझ्याकडे रोखून बघितलं. "तू अख्ख्या आयुष्यात असंच म्हणून काहीतरी केलंयस का?"

'तुझं लग्न वगैरे जमलं का ते बघत होतो. कदाचित आई-बाबांनी एंगेजमेंट करून तुला परत पाठवलं असेल अशी मला चिंता वाटत होती' असं मला म्हणायचं होतं. पण धीर झाला नाही. आता प्रतापचा दम देणारा आवाज ऐकू येईल असंही माझ्या मनात आलं.

"परवा फोन कशासाठी केला होतास?" तिने विचारलं.

"अम्...." तिला फोन लावल्यावर आला होता आणि तो कोणीच उचलला नाही तेव्हा गेला होता तो पोटातला गोळा परत उसळून वर आला.

"हं..हं?" ती म्हणाली.

"तुला कसं कळलं मी फोन केला होता ते?" मी प्रतिप्रश्न केला.

"कॉलर आय.डी. वर आला होता तुझा नंबर" ती म्हणाली.

"फोन कोणीच उचलला नाही. कुठे गेला होता सगळेजण?"

"देवळात गेलो होतो. आई म्हणाली मी कॉलेजात परत जायच्या आधी एकदा देवदर्शन करून यावं."

मी इथे सिद्धीविनायकाच्या दर्शनासाठी गेलो होतो आणि ती तिथे. शुभशकुन असणार असं इंटर्नशिप सुरू करणाऱ्या त्या बुद्धीवादी मुलाच्या म्हणजे माझ्या मनात आलं.

"पण फोन कशासाठी केला होतास ते नाही सांगितलंस" ती म्हणाली.

'तुझी खूप आठवण येत होती ग. दिसत नाहीस तर निदान आवाज तरी ऐकावा म्हणून फोन केला' असं मला म्हणायचं होतं. ते एडिट करून मी म्हटलं, "खूप दिवसात काही खबरबात नव्हती, म्हटलं फोन करूया." पोटातला गोळा खाली बसायला लागला होता. "माझा नंबर दिसला तर तू का नाही फोन केलास?"

"अरे, दुसऱ्या दिवशी सकाळी रिझल्टसाठी नाहीतरी कॉलेजात यायचंच होतं. म्हटलं प्रत्यक्ष भेटीतच बोलू."

"मग बोल ना" मी म्हटलं.

"माझ्या हाताकडे का बघत होतास ते नाही सांगितलस अजून" ती म्हणाली.

"तुझी बोटंसुद्धा सर्जनच्या बोटांसारखी आहेत. तू ॲनास्थेशियात एम.डी. करणार म्हटल्यावर त्या सर्जिकल बोटांचा व्हावा तेवढा उपयोग व्हायचा नाही असं माझ्या मनात आलं. म्हणून तुझ्या बोटांकडे बघत होतो." मी येवढ्या सराइतपणे खोटं बोलू शकतो हे मला स्वतःलाच माहित नव्हतं. पुन्हा कधी गरज पडली तर आपण खोटं बोलू शकतो आणि मिताच्या प्रश्नांना द्यायची नसतील ती उत्तरं द्यायचं टाळू शकतो हे लक्षात आल्यावर मला जरा कॉन्फिडन्स वाटायला लागला.

"विजय, तुला माहितीय, तू खोटं बोलतोस तेव्हा खूपच क्यूट दिसतोस?" असं म्हणून मिता हसली आणि निघून गेली. मी आपला बावळटासारखा ती गेली त्या दिशेला बघत तिथेच उभा राहिलो.

# १५

वर्ष ५, फेब्रुवारी ८

वैद्यकीय शिक्षण आणि प्रॅक्टिस यांच्यात खूपच फरक होता. आम्हाला वेगवेगळे आजार शिकवायचे, ते पुस्तकांत दिल्यासारखे शिकवायचे. आजार कोणता ते धड्याच्या शीर्शकासारखं सुरुवातीला सांगून नंतर त्याची कारणं, लक्षणं, चिन्हं, तपासण्यांचे अहवाल, उपचार आणि गुंतागुंती एकामागून एक शिकवत असत. या पद्धतीमुळे आजाराची संपूर्ण माहिती मिळायची खरी, पण प्रॅक्टिसच्या दृष्टीने त्याचा हवा तेवढा उपयोग होत नसे असं मला वाटायला लागलं होतं. कारण रुग्ण आमच्याकडे यायचे ते काही स्वतःच्या आजाराचं निदान घेऊन येत नसत. ते फक्त त्यांची लक्षणं सांगायचे. त्यावरून विचार करून चिन्हं बघावी लागायची, उचित तपासण्या कराव्या लागायच्या आणि त्याप्रमाणे उपचार काय करायचे ते ठरवावं लागायचं. अनेक वर्षं प्रॅक्टिस केल्यावर हे विचार न करता आपोआप जमायचं. चांगले शिक्षक असं निदान कसं करायचं हे आम्हाला शिकवत असत. प्रत्येकाचे अल्गोरिद्म वेगळे असायचे. ज्याचे अल्गोरिद्म जास्त परिणामकारक, तो शिक्षक आम्हाला जास्त आवडत असे. असं शिकवणारे शिक्षक विरळाच असत. अचूक निदान करणारे डॉक्टर निदान कसं करतात हे त्यांच्या मागे मागे राहून बघणं हे एक काम मनात आणलं तर इंटर्नशिपमध्ये करता यायचं. पण आमचा बहुतेक वेळ रुग्णांचं रक्त तपासण्यांसाठी काढणं, त्यांचे रिपोर्ट आले नाहीत तर लॅबोरेटऱ्यांत चकरा मारून ते मिळवणं, त्यांना एक्सरे, सीटी स्कॅन वगैरे करायला घेऊन जाणं आणि तिथून परत आणणं, फॉर्म्स भरणं,

घरी पाठवायच्या रुग्णांच्या डिस्चार्ज समऱ्या भरणं अशी  ज्ञानात आणि कुशलतेत भर न घालणारी कामं करण्यात जायचा. मग डॉक्टरकी शिकायला वेळ आणि ताकद उरायचीच नाही.

तसं पाहिलं तर इंटर्न्स रुग्णालयातल्या डॉक्टरांच्या पदानुक्रमात सर्वात खालच्या पायरीवर होते. पण साडेचार वर्षं मेडिकल स्टुडंट्स म्हणून काढल्यावर इंटर्नशिप सुरू झाली की आपण डॉक्टर झालो म्हणून गगनाला गवसणी घातल्यासारखं वाटायला लागायचं. एक दोन आठवडे इंटर्न्सचं काम केल्यावर अवकाशात उधळणारा बहुतेक जणांचा वारू जमिनीवर यायचा. आपण कुशल आणि निष्णात डॉक्टर नसून वृथा गौरवलेले चतुर्थ श्रेणी कामगारांचे बदली कामगार आणि मधून मधून कमी पगारात काम करणारे लिपिक आहोत हे उमगलं की वैफल्याची भावना यायची. त्यातून बहुतेक जणं सावरायची. प्रताप त्या बहुतेक जणांमधला नव्हता.

"आपण ही फालतू कामं करायसाठी डॉक्टर झालोय का रे?" प्रतापने मला एक दिवस विचारलं.

"नाही. दुर्दैवाने आपल्या वरिष्ठांचं आपल्या शिक्षणाकडे असावं तसं लक्ष नाहीये. आपले आपण काय शिकू ते आपलं संचित, ते बरोबर घेऊन आपण पुढे प्रॅक्टिस करायची."

"आपली युनिव्हर्सिटी आपला अभ्यासक्रम ठरवते, त्यांत आपण इंटर्नशिपमध्ये काय काय करायचं ते ठरवून का देत नाही?"

"हा प्रश्न आपण युनिव्हर्सिटीच्या कुलगुरूंना विचारला पाहिजे. असले प्रश्न धसाला लावणारे आणि यशस्वीरित्या सोडवणारे कुलगुरू युनिव्हर्सिटीला लाभल्याचं मी ऐकलं नाही. असे शिक्षणमंत्रीही मी पाहिले नाहीत. त्यांच्या प्राधान्य असणाऱ्या गोष्टी काही वेगळ्याच असतात बघ."

"हे सगळं बदलण्यासाठी आपण काहीतरी केलं पाहिजे."

"काय करूया?" मी विचारलं.

"आपण आंदोलन करूया."

"तुझी डिग्री हातात आलीय का रे?" मी विचारलं.

"हे काय विचारतोयस? इंटर्नशिप संपल्याशिवाय आपल्याला डिग्री देत नाहीत. तुला माहित आहे ते."

"बरं, आपल्या चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची आहे तशी आपली युनियन आहे का?"

"नाही. पण या सगळ्याचा आपल्या प्रश्नाशी काय संबंध?"

"आपल्या हातात डिग्री नाही म्हणजे आपण अजून विद्यार्थीच आहोत. बरोबर?"

"बरोबर."

"आपण आंदोलन केलं तर आपल्याला शिक्षा म्हणून त्यांनी इंटर्नशिप केल्याचं सर्टिफिकेट दिलंच नाही तर? आपण येवढं शिकून डॉक्टर होऊ का?"

"असं कसं करू शकतील ते? काय गुंडाराज आहे का?"

"ज्याचा हाती ससा तो पारधी हे तुला माहित आहे ना? ज्यांच्या हातात कायद्याच्या दोऱ्या असतात ते स्वतःला सोयिस्कर तसा कायदा वाकवू शकतात."

"हा अन्याय आहे. आपण कोर्टात गेलो तर त्यांना खूप महाग पडेल."

"कोर्टाची केस दहा वर्षं चालेल. तोपर्यंत तू पोटापाण्यासाठी कोणता उद्योगधंदा करणार? दहा वर्षांत तू आजपर्यंत शिकलास ते सगळं विसरून जाशील. मग केस जिंकलास तरी पुढे डॉक्टरकी कशी करशील? कोर्ट केसेस खूप महागड्या असतात. तुझ्या इंटर्नशिपच्या विद्यावेतनात तो खर्च झेपेल तुला? तुझ्याबरोबर आंदोलन करायला आपल्या वर्गातली किती मुलं तयार

होतील? मला नाही वाटत तुझ्याबरोबर कोणी येईल. आणि आजकाल विद्यार्थ्यांची आंदोलनं कशी चिरडून टाकतात ते वर्तमानपत्रांतून वाचतोस ना?"

"मग या प्रश्नाला काहीच उपाय नाही का?"

"तू पुढे डीन झालास, तर तू जेवढे दिवस त्या खुर्चीवर बसशील तेवढे दिवस तरी इंटर्न्सचं प्रशिक्षण नीटपणे पार पाडून घेऊ शकशील. पण ते आपल्या एका कॉलेजपुरतं झालं. ही गोष्ट इतर कॉलेजांत अशीच चालू राहील. तू विद्यापीठाचा कुलगुरू झालास, तर इंटर्न्सचं प्रशिक्षण कसं असावं ते ठरवून देऊ शकशील. पण कॉलेजं ते पार पाडतील याची शाश्वती काही देता यायची नाही. कागदोपत्री सगळं काही आलबेल आहे असा अहवाल सगळी कॉलेजं नेहमी पाठवतात, तसाच तेव्हाही पाठवतील."

"हे सगळं एकदम निराशाजनक आहे रे" तो म्हणाला. "पण तुला हे सगळं कसं समजलं?"

"कान आणि डोळे उघडे ठेवले, वर्तमानपत्रं बिटविन द लाइन्स वाचली तर खूप काही समजतं."

"तू इतका विचार का करतोस रे?" प्रतापचा प्रश्न एकदम बरोबर होता.

"प्रताप, मी मूर्ख आहे असं समज. येवढा विचार करून शेवटी आपण काहीच करू शकत नाही हा निष्कर्ष आला की खूप निराश वाटतं. विनाकारण हे सगळं ओझं डोक्यावर घेऊन आयुष्य दुःखी तेवढं होतं. काहीच विचार न करणाऱ्यांचं आयुष्य कसं मजेत चाललं आहे."

"तुला हे कळतंय तरी तू विचार करायचा सोडत नाहीयेस. तुझ्या मनात काहीतरी असेलच."

आपल्या मनात काय आहे याचा मी कधी विचारच केला नव्हता.

"प्रताप, मी जसा आहे तसा आहे म्हणून मी येवढा विचार करतो."

"पण त्याबद्दल तू काही करणार आहेस का?"

"सध्या ते शक्य नाही. पुढे मी कोणीतरी मोठा होईन, तेव्हा जरूर करीन."

"आणि आत्ता?"

"आत्ता रिपोर्ट आणायसाठी मध्यवर्ती लॅबोरेटरीत जायचंय, नाहीतर हाउसमनची बत्ती मिळेल."

# १६

वर्ष ५, मार्च

इंटर्नशिपचा काळ वेगवेगळी मुलं वेगवेगळ्या कामांसाठी वापरायची. इंटर्न्सना द्यायचे ते काम अख्खा दिवस पुरेल येवढं कधीच नसे. जर एका युनिटमध्ये चार इंटर्न्स असले, तर हुशार मुलं कामाचे चार भाग करत असत. रुग्णालयाच्या चार भागात जाऊन करायची कामं नीट विभागली, तर प्रत्येकाला इथे तिथे फिरण्याचे फारसे श्रमही करावे लागत नसत. भले ती डॉक्टरांनी करायची कामं नसोत. एकदा ती हातावेगळी केली की इंटर्न्स आपापल्या आवडीच्या गोष्टी करायला मोकळे व्हायचे. त्यामुळे चतुर्थ श्रेणी कामगारांची कामं त्यांची त्यांना करायला लावा, ती आम्हाला करायला लावू नका असं कोणीही म्हणत नसे. नाहीतरी त्या कर्मचाऱ्यांना त्यांची कामं करायला लावायची धमक एकाही डीनला दाखवता आली नव्हती. त्यांच्या तगड्या युनियनला तोंड देण्यापेक्षा कमकुवत आणि आपल्या मुठीत असणाऱ्या इंटर्न्सना त्या कामांना जुंपणं खूपच सोपं असायचं. आयुष्यात अनेक अन्यायांना तोंड बंद ठेवून सहन करावं लागतं, त्याची सवय इंटर्नशिपपासून व्हावी असाही त्यामागचा हेतू असावा. वाईटातून चांगलं शोधणं ज्यांना जमायचं, ते इंटर्नशिपमधे मोकळा वेळ मिळतो म्हणून अन्यायाकडे दुर्लक्ष करायचे आणि तो वेळ सत्कारणी लावून आनंदात रहायचे.

प्रताप नीनाबरोबर जोडीने कामं करायचा. म्हणजे फिरणंही व्हायचं आणि संध्याकाळचा फिरायला वापरायचा वेळ लोकम करायला वापरता यायचा. जनरल प्रॅक्टीस करणारे डॉक्टर बाहेरगावी जाताना आपला दवाखाना चालवण्यासाठी इंटर्न्सच्या शोधात असायचे. असं काम

करणाऱ्या इंटर्न्सना लोकम असं म्हणायचे. त्यांना जास्त पैसे द्यावे लागत नसत आणि डॉक्टर आपली सोय लावूनच रजेवर गेले म्हणून पेशंटही खुश रहात. त्यातून जी कमाई व्हायची ती नीनाबरोबर सिनेमाला जाणं, हॉटेलात जाणं अशा सत्कारणी लावायला उपयोगी व्हायची. पूर्वी पैशांसाठी वडिलांवर अवलंबून रहावं लागत असे. आता स्वतःचे पैसे अशा खर्चासाठी मिळवल्यामुळे स्वावलंबी झाल्याचं समाधान मिळायचं ते वेगळंच. असं त्याचं आयुष्य मजेत चाललं होतं.

निखिल शहरातल्या एका सिनियर हृद्रोगतज्ज्ञाकडे रोज संध्याकाळी मदतनीस म्हणून जायचा. आलेल्या पेशंटची हिस्ट्री लिहायची, तपासण्यासाठी रक्त काढून घ्यायचं आणि कार्डिओग्राम काढून ठेवायचा अशी कामं तो करायचा. मग ते कागद आणि रिपोर्ट घेऊन पेशंट त्या हृद्रोगतज्ज्ञाकडे जायचे. पुढे तपासण्याचं आणि उपचार करण्याचं काम तो हृद्रोगतज्ज्ञ करायचा. निखिल या सर्व प्रकारातून नवं किती शिकला यावर संशोधन करता आलं असतं, ज्याचं निष्पन्न शून्य आलं असतं असं हर्षदचं मत होतं. तो स्वतः इंटर्नशिपची दिलेली कामं इमानेइतबारे करायचा आणि उरलेल्या वेळात इतर जणं काय करतात त्यावर नजर ठेवायचा. मग त्याची निरिक्षणं तो मित्रमंडळींसमोर मांडायचा. त्याच्या दृष्टीने त्याचंही आयुष्य आनंदात चाललं होतं.

सुकुमारने ड्रायव्हिंग स्कूल जॉइन केलं होतं. त्याला इंटरनॅशनल लायसन्स मिळवायचं होतं. उद्या अमेरिकेत गेल्यावर गाडी चालवायला शिकण्यात उगाच वेळ फुकट घालवायला लागू नये असा त्याचा उद्देश होता. ई.सी.एफ.एम.जी. नावाची अमेरिकेत डॉक्टरकीला ॲडमिशन मिळवायला लागणारी परिक्षा त्याने इंटर्नशिपच्या काळातच मनिलाला जाऊन दिली होती. त्यासाठी त्याने दीड महिना इंटर्नशिपला दांडी मारली होती. इंटर्नशिप प्रोग्राम चालवणाऱ्या पी.एस.एम. विभागाच्या लिपिक बाईंना त्याने मनिलाहून एक साडी आणून भेट दिल्यामुळे त्याने दांडी मारलेल्या काळातली अनुपस्थिती माफ झाली होती. सर्वोत्तम इंटर्नच्या बक्षिसाचं

नामांकनही त्याला मिळालं होतं असं मी हर्षदकडून ऐकलं होतं. पण त्याला ते बक्षिस मिळालं नाही.

निखिलही त्याच परिक्षेला बसण्यासाठी सहा आठवडे मनिलाला जाऊन आला. त्याने येताना पी.एस.एम. विभागाच्या लिपिक बाईंसाठी पर्फ्यूमची बाटली आणली. त्याचीही अनुपस्थिती माफ झाली. सुकुमार आणि निखिल यांनी आपापसात ठरवून बाईंसाठी साडी आणि पर्फ्यूमची बाटली आणली असावी. नाहीतर समजा दोघांनीही पर्फ्यूमच आणलं असतं तर कदाचित बाई चिडल्या असत्या आणि दोघांचीही अनुपस्थिती माफ होणं कदाचित थोडं कठीण झालं असतं. नंतर निखिलच्या बाबांनी पी.एस.एम. विभागाला पाच हजार रुपयांचं डोनेशन दिलं आणि त्याला सर्वोत्तम इंटर्नचं बक्षिसही मिळालं. म्हणजे बक्षिस मिळालं हे आम्हा सर्वांना समजलं, आणि त्याच्या मागचं कारण हर्षदकडून नंतर कानांवर आलं.

साधारणपणे एम.डी.च्या परिक्षेच्या आधी विद्यार्थ्यांना तीन महिन्यांची रजा मिळत असे. त्या तीन महिन्यांत ते सगळा पदव्युत्तर अभ्यास करून परिक्षेला बसत असत. माझ्याकडे तर इंटर्नशिपचं अख्खं वर्ष होतं. तेवढ्या काळात माझा केवढा तरी अभ्यास झाला असता. आमच्या कॉलेजच्या मध्यवर्ती लायब्ररीत चिकार पुस्तकं होती. गायनॅकॉलॉजी विभागाच्या लायब्ररीतही खूप पुस्तकं होती. शहरात ब्रिटिश कौन्सिलची लायब्ररी होती. तिचं सभासदत्व फुकट मिळत असे. मी त्या लायब्ररीची तीन पुस्तकं एका वेळी आणायचो, म्हणजे पुनःपुन्हा पुस्तक बदलायला जायला लागायचं नाही. गायनॅकची इंटर्नशिप करताना त्या विभागाच्या लायब्ररीतली पुस्तकं मी तिथेच बसून वाचली, आणि इतर विषयांची इंटर्नशिप करताना मध्यवर्ती लायब्ररीत बसून तिथली पुस्तकं वाचली. आधी मी काय करतो ते कोणाला कळलं नाही, कारण प्रत्येक जण आपापल्या आनंदात मग्न होता. पण आमच्या शेरलॉक होम्स म्हणजे हर्षदला एक दिवस सुगावा लागलाच.

"काय विजय, तू जोरात अभ्यासाला लागलायस म्हणे."

"तुला कसं कळलं?" मी विचारलं.

"अरे, जर तू बघावं तेव्हा लायब्ररीत असतोस, तर कसं कळणार नाही? काय वाचतोयस तू येवढं?"

"मी लायब्ररीत असणारं गायनॅकचं प्रत्येक पुस्तक वाचून काढायचं असं ठरवलं आहे."

हर्षद अवाक झाला. मला तो घासू म्हणायचा खरा. पण प्रत्येक पुस्तक?

"मग किती झाली वाचून" त्याने विचारलं.

"गायनॅकच्या कपाटातल्या वरच्या चार रांगांतली पुस्तक वाचून झालीयेत. आता खालच्या दोन रांगा शिल्लक आहेत" मी म्हटलं.

परत अवाक होता आलं असतं तर तो परत अवाक झाला असता.

"अं....!" असं तो कण्हल्यासारखा म्हणाला.

"काय झालं, कुठे दुखलं का?" मी विचारलं.

"न..नाही" तो घाईघाईने म्हणाला. "तू आत्ताच सगळी पुस्तकं वाचून टाकलीस तर एम.डी. करताना काय वाचणार?"

"तेव्हा? तेव्हा तुम्ही लोकं पुस्तकं वाचणार आणि मी पोरी फिरवणार" मी टपोरी स्टाईलमध्ये म्हटलं.

एरवी मी असं म्हटल्यावर तो कुचेष्टेने हसून म्हणाला असता, 'पोरी कशा फिरवतात ते ठाऊक आहे का तुला?' पण नुकताच एकदा अवाक होऊन गेल्यामुळे आणि दुसऱ्यांदा कुठेतरी दुखल्यासारखं कण्हून झाल्यामुळे त्याला कुचेष्टेने बोलणं जमलं नाही.

"ठीक आहे, ठीक आहे, चालू दे तुझं" असं म्हणून तो गेला.

हर्षद डिटेक्टिव्ह होता. डिटेक्टिव्ह मंडळी डिटेक्टिव्हगिरी करून झाल्यावर आपल्या ग्राहकाला रिपोर्ट देतात. हे विश्वची आपलं ग्राहक असल्यासारखा हर्षद सापडेल त्याला रिपोर्ट देत असे. तर रिपोर्ट मिळालेली मंडळी एक एक करून मिळालेल्या माहितीची खातरजमा करायला लायब्ररीकडे वाट वाकडी करू लागली.

"काय विजय, अख्खी लायब्ररी वाचून काढणार आहेस म्हणे" सुकुमारने चौकशी केली.

"काय वेड लागलंय की काय तुला?" मी विचारलं.

"म्हणजे ते खोटं आहे?"

"ऑफ कोर्स" मी म्हटलं. "तुला टेन्शन देण्यासाठी कोणीतरी तुला बंडल मारली असं दिसतं. पण तू गंडलास कसा?"

प्रतिस्पर्ध्यांना टेन्शन देण्यासाठी सुकुमार स्वतः काही काही गोष्टी करायचा. त्यामुळे मी दिलेलं स्पष्टीकरण त्याला एकदम पटलं. आपल्याला कोणीतरी बंडल मारली आणि आपण ती ऐकून गंडलो हे समजल्यामुळे तो खजील झाला. आपण गंडलो हे विजयला समजलं आणि आता इतर अनेकांना समजेल हे लक्षात आल्यामुळे तो आणखीनच खजील झाला. सुकुमार खजील झाल्यावर कसा दिसतो हे समजल्यामुळे आणि आपणच त्याला खजील केलेलं असल्यामुळे मी फार खुश झालो. सुकुमार गेला, पण त्याच्यापाठोपाठ इतर जण येतच राहिले. ते हर्षद आणि सुकुमार या दोघांकडून मिळालेल्या माहितीची खातरजमा करण्यासाठी येत होते हे मला त्यांच्या प्रश्नांवरून समजलं. खरं तर सुकुमारने तोंड बंद ठेवायला हवं होतं, कारण माझ्याबरोबर तो स्वतःचीही बदनामी करत होता. पण माझ्यावर सूड घ्यायची त्याची इच्छा खूप तीव्र असावी.

"काय विजय, तू आता अभ्यास करून घेतोयस, कारण एम.डी. करताना तुला पोरी फिरवायच्या आहेत म्हणे." प्रतापने निखिल आणि सुकुमार या दोघांवरही विश्वास ठेवला याचं मला आश्चर्य वाटलं.

"असं सध्या तरी म्हणतोय" मी म्हटलं.

"तुला जमणार?" त्याने विचारलं.

"परिक्षेच्या आधी तू पोरीबरोबर फिरूनही पास झालास, तर मी का होणार नाही?" मी रोखठोक विचारलं.

"ते नाही रे. पोरी पटवायला तुला जमणार का, असं मला विचारायचं होतं" तो म्हणाला.

"नक्की जमेल?" मी आत्मविश्वासाने म्हटलं.

"कसं काय? तुला काही अनुभव आहे त्या गोष्टीचा?" प्रताप एकदम फर्म ग्राउंडवर होता. त्याच्या पदरी साडेचार वर्षांचा या गोष्टीचा अनुभव होता ना.

"नाही. पण मी तुझी ट्यूशन ठेवेन" मी म्हटलं.

विजयने आपला पोपट केला हे त्याच्या लक्षात आलं.

"ठीक आहे, ठीक आहे, चालू दे तुझं" असं म्हणून तोही गेला.

# १७

वर्ष ५, एप्रिल

एकामागून एक पुस्तकं वाचणं वाटतं तेवढं कठीण नव्हतं. पुस्तकं दोन प्रकारची असायची. पहिला प्रकार हा पाठ्यपुस्तकांचा होता. त्यांच्यात एकामागून एक धडे असत. बहुतेक सर्व पुस्तकांमध्ये साधारणपणे तीच माहिती असायची. प्रत्येक पुस्तकात एकेका विषयावर दोन-तीन नवे मुद्दे मिळायचे. काही आकृत्या नव्या असायच्या. एम.बी.बी.एस.साठी अभ्यास करताना मी गायनॅकॉलॉजीच्या प्रत्येक विषयाच्या नोट्स काढून ठेवल्या होत्या. आता नवं पुस्तक वाचायला घेतलं की त्यातले प्रत्येक विषयाचे नवे मुद्दे तेवढे त्या त्या विषयाच्या नोट्समध्ये समाविष्ट करावे लागत असत. नव्या आकृत्या स्वतः काढून घ्याव्या लागत असत. असं करायला फारसा वेळ लागत नसे. एकदा संपूर्णपणे वाचून झालं की नंतर परत त्या पुस्तकाला हात लावावा लागत नसे. दुसरा प्रकार एकाच विषयावर अख्खं पुस्तक असा असायचा. त्या विषयावरच्या एखाद्या तज्ज्ञाने अगदी बारीक सारीक मुद्दे आणि उपलब्ध असणारं सगळं शास्त्रीय संशोधन विचारात घेऊन ते पुस्तक लिहिलेलं असायचं. अशा पुस्तकाला मोनोग्राम असं म्हणत. महत्वाच्या विषयावरच्या मोनोग्राममध्ये उपयुक्त अशी खूप माहिती मिळत असे. ती माहितीही मी माझ्या नोट्समध्ये समाविष्ट करत असे. पुस्तकं विकत घेऊन त्यांतले महत्वाचे भाग अधोरेखित करून ठेवण्यापेक्षा ही पद्धत जास्त सोपी होती. तेव्हा माझ्याकडे स्वतःचा कॉम्प्यूटर असता तर नोट्समध्ये योग्य ठिकाणी नवी माहिती आणि आकृत्या घालणं अगदीच सोपं झालं असतं. पुढे आपल्या सगळया नोट्स इलेक्ट्रॉनिक करताना मला खूप त्रास झाला खरा, पण तेव्हा मात्र नवं नवं ज्ञान मिळवताना आणि त्याचं संकलन करताना मला अतिशय आनंद मिळत होता. हा माणूस लायब्ररीत बसून अभ्यास करताना येवढ्या आनंदात कसा असतो हे हर्षद, निखिल आणि सुकुमार वगैरेंना समजत

नसे. मी पुस्तकात दडवून कॉमिक्स किंवा कादंबऱ्या वाचत असावा अशा संशयाने ते मधून मधून फेऱ्या मारत आणि मी काय वाचतो ते काळजीपूर्वक बघत असत. लायब्ररियन मेनन बाईंना लायब्ररीत बसून कोणीही अभ्यासाच्या पुस्तकांच्या आणि शास्त्रीय जर्नल्सच्या व्यतिरिक्त इतर काहीही वाचलेलं चालत नसे. असं करताना कोणी सापडलं की त्यांनी त्याला फैलावर घेतलं नाही असं कधीही झालेलं ऐकिवात नव्हतं. तर माझ्या म्हटलं तर मित्र, म्हटलं तर शत्रू असणाऱ्या या मंडळींनी मेनन बाईंचे सुद्धा कान फुंकले असावे. अभ्यास करताना आनंदी असणारा माणूस त्यांनी त्यांच्या अख्ख्या कारकीर्दीमध्ये कदाचित पाहिला नसावा. त्यांनीही काही दृश्य कारण नसताना माझ्या टेबलाकडे दोनदा फेऱ्या मारल्या, काहीतरी जुजबी संभाषण केलं आणि माझ्या पुस्तकांकडे निरखून पाहिलं. दोन्ही वेळा काही आक्षेपार्ह न मिळाल्यामुळे त्यांनी माझा नाद सोडला असावा. मी कुठेच पकडला गेलो नाही तेव्हा त्या मित्र-शत्रूंची शेवटी खात्री झाली की मी म्हणजे एक अगदीच कामातून गेलेला माणूस आहे. फुलपाखरांसारखं आयुष्य जगायचा काळ पुस्तकं वाचण्यात घालवणं म्हणजे काय?

"काय स्कॉलर, पुस्तक वगैरे लिहितोयस का?" बंडूने विचारणा केली. बंडूपर्यंत ही गोष्ट गेली म्हणजे बरेच जण माझ्याबद्दल चर्चा करायला लागले होते असं दिसत होतं.

"काय फिरकी घेतोस रे माझी?" मी विचारलं.

"येवढं वाचन करतोस, टिपणं काढतोस, आणि कुठची परिक्षा जवळ आलेली नाही, म्हणून वाटलं की तू पुस्तक लिहित असशील."

"त्याचं काय असतं बंडू, शरीरसौष्ठव कमावणं हे तुझं पॅशन आहे. आता काही मुंबई-श्री किंवा महाराष्ट्र-श्री अशी स्पर्धा जवळ आलेली नाहीये. पण आनंद मिळतो म्हणून तू जिममध्ये वर्कआउट करतोस ना? तसंच परिक्षा जवळ आलेली नसली किंवा मी पुस्तक लिहित नसलो तरी मी आनंद मिळतो म्हणून पुस्तकं वाचतो.  नाहीतरी मी लिहिलेलं पुस्तक कोण वाचेल रे?"

माझे सगळे मुद्दे बंडूला एकदम पटले. बंडूला पटवण्यात मी पहिल्या फटक्यात यशस्वी झालो म्हणून माझं मलाच कौतुक वाटायला लागलं. मी त्या कौतुकाला कितपत पात्र होतो ते ठरवायच्या चाचणीला सामोरं जायची वेळ मला वाटलं होतं त्यापेक्षा लवकरच आली. लायब्ररीचं दार ढकलून मिता आत शिरली. तिचं तोंड पाहून मी सावध झालो आणि लपायसाठी कुठे जागा मिळते का यासाठी इकडे तिकडे पाहिलं. लायब्ररी पुस्तकांत हरवून जाण्यासाठी बांधलेली होती, लपण्यासाठी नाही. त्यामुळे लपण्यासारखी जागा कुठे सापडेना. टेबलाखाली लपणं लहानपणी शोभून दिसलं असतं. इंटर्नशिप करताना ते बरं दिसलं नसतं. नाहीतरी तिला मी टेबलाखाली सहज दिसलो असतो. मी तिला घाबरायचो असं नाही, पण होता होईतो तिच्याबरोबर संघर्ष टाळावा असं एव्हाना माझं मत झालेलं होतं.

"काय रे विजय, लायब्ररीतली सगळी पुस्तकं वाचून काढायचा संकल्प सोडलायस म्हणे तू" ती म्हणाली.

"तुला कसं कळलं?" मी प्रतिप्रश्न  केला. माझी युक्ती तिला एव्हाना समजली असावी. तिने उत्तर न देता संभाषण पुढे चालवलं.

"म्हणजे अभ्यास करणं तुझा पिंड आहे. माझा काही आक्षेप नाहीये."

मी सुस्कारा सोडला. तिने तिकडेही दुर्लक्ष केलं.

"पण आता सगळा अभ्यास करून संपला तर पदव्युत्तर शिक्षण घेताना तू काय करणार हा प्रश्न आहे."

"खूप जणांना हा प्रश्न पडलेला दिसतोय. माझ्याकडे हा प्रश्न विचारायला भली भली मंडळी येऊन गेली. खरं तर त्याचं उत्तर एकदम सोपं आहे."

"काय ते?"

"पदव्युत्तर शिक्षण घेताना मी या अभ्यासाची उजळणी करणार आहे" मी म्हटलं.

"नक्की? "

मी मागे वळून मेनन बाईंच्या खोलीकडे पाहिलं. माझ्याबरोबर बोलायला येणाऱ्या मंडळींमुळे माझ्या टेबलाकडे होणारं दळणवळण नजरेत येण्यायेवढं वाढलं होतं. माझ्यामुळे बाईंकडून मिताला चार शब्द ऐकावे लागले असते तर मला काही बरं वाटलं नसतं.

"मिता, आपण कॉफी प्यायला जाऊया का?" मी विचारलं. तसं केलं तर लायब्ररीत बसून गप्पा मारतात असं आम्हाला कोणी म्हटलं नसतं. दुसरं म्हणजे 'अ लॉट कॅन हॅपन ओव्हर कॉफी' अशी जाहिरात मी पूर्वी वाचली होती. देवाच्या इच्छेने आजही तसं काही घडलं असतं तर मी भिजत पाडलेला माझाच एक जुना प्रश्नही सुटला असता. तिने माझ्याकडे रोखून पाहिलं.

"चल" ती म्हणाली.

मी वह्या-पुस्तकं जागा अडवून ठेवायसाठी तिथेच ठेवली आणि तिच्याबरोबर कँटीनमध्ये गेलो.

"आता बोल" मी म्हटलं.

"काय रे विजय, तुझ्या जिभेला काही हाड?"

"मिता, जिभेत हाड नसतं. आपण शरीरशास्त्रात शिकलो होतो."

"चूप रे. तुला माहितीय मी ते अलंकारिक भाषेत म्हणाले होते. काहीही काय बोलतोस तू?"

"कशाबद्दल बोलतेयस तू?" मी सावधपणे विचारलं. मी बरंच काही बोलायचो. प्रत्येक गोष्ट तिला सांगून हेच का म्हणतेयस तू असं विचारणं वेडपटपणाचं ठरलं असतं.

"पदव्युत्तर शिक्षण घेताना अभ्यास करून संपला म्हणून पोरी फिरवणार आहेस तू?"

"पोरी? अगं काय बोलतेयस तू हे? मुलींना पोरी म्हणणं... अपमानास्पद नाही का ते?"

मिता गप्पच झाली. तिला हे अपेक्षित नसावं.

"आणि काय गं, मुलींना फिरवणं हे संक्रांतीला पतंग उडवण्यासारखं सोपं असतं असं वाटतंय का तुला? " मी विचारलं. मिताला इतर कितीही गोष्टींचे अनुभव असले तरी मुलींना फिरवण्याचा अनुभव असणं शक्यच नव्हतं.

"तेच तर" ती म्हणाली.

"कोणी कान भरले तुझे?"

"मला खरं वाटलंच नव्हतं" ती म्हणाली. खरं वाटलं नसतं तर ती नाकाचा शेंडा लाल करून मला विचारायला आलीच नसती. पण मी तसं बोलून दाखवलं नाही.

"तो हर्षद आणि निखिल... माझ्या नावावर काहीही खपवतात बघ. लोकांची भांडणं लावून गंमत बघायची, दुसरं काय? माझ्यासारखा अभ्यास करतील तर असले चाळे करावेसे वाटायचे नाहीत म्हणावं. जाऊ दे, घे, कॉफी घे."

मिताने कॉफीचा कप उचलून ओठांना लावला. ओव्हर कॉफी काही होतं का याची वाट बघत मीही कॉफीचा कप तोंडाला लावला. काहीही झालं नाही. अशा खोट्या जाहिरातींवर बंदीच घातली पाहिजे असं मनाशी म्हणून मी कॉफीपान संपल्यावर लायब्ररीतल्या माझ्या अभ्यासाच्या आनंदाकडे परत गेलो.

# १८

वर्ष ५, जून १८

"विजय, आता तर अगदी हद्दच झालीय रे" प्रतापने नवी तक्रार आणली. "मला काय हॉटेलातला वेटर समजतात काय?"

"कोण समजतंय तुला तसं?"

"आमच्या युनिटचे डॉक्टर. मला त्यांचा नाश्ता आणायला कँटीनमध्ये पाठवतात रे."

मी चाटच पडलो. हा वेठबिगारीचा प्रकार दिसत होता. शिकाऊ डॉक्टरांची इभ्रत वरिष्ठ डॉक्टरांनीच अशी धुळीत मिळवली तर बिचाऱ्यांनी कोणाच्या तोंडाकडे बघायचं?

"त्यांनी पाठवलं आणि तू गेलास?" मी विचारलं.

"हो, गेलो. न जाऊन सांगतो कोणाला? कंप्लीशन देणारेत तेच. मी गेलो नाही तर कंप्लीशन मिळेल का?"

"हे बघ, आपण असे घाबरटपणे वागतो म्हणून ही वरिष्ठ मंडळी आपला असा गैरफायदा घेतात."

"मग मी काय करू सांग."

"मला असं सांग, तुला एकट्यालाच असं वागवताहेत की इतर जणांनाही तसंच वागवताहेत?"

"आधीच्या डिपार्टमेंट्समध्ये असं नव्हतं. या डिपार्टमेंटमध्ये तीन युनिटं आहेत. त्यांतल्या दोनांमध्ये हे असं असतं. तिसऱ्याचे बॉस चांगले आहेत. ते असलं काही चालू देत नाहीत."

"विभागप्रमुखांकडे तक्रार करून बघ."

"त्यांच्याच युनिटमध्ये मी आहे रे."

"तुला थोडेसे गट्स असले तर मी सांगतो काय करायचं ते" मी म्हटलं.

"सांग."

"आधी मला सांग, तुला काय आणायला सांगतात?"

"बटाटावडे, समोसे, मेदूवडे, चटणी, सांबार..."

"बापरे. येवढं सगळं? पेशंटांचं जेवण आणतात ती फूड ट्रॉली घेऊन जातोस की काय?"

"नाही रे, शेट्टी पार्सल म्हणून प्लास्टिकच्या पिशवीत एक एक पदार्थ भरून देतो."

"तुला सुद्धा नाश्ता खायला बसवतात का त्यांच्याबरोबर?"

"छे रे."

"ओके. पहिली गोष्ट म्हणजे रिकाम्या पोटी काम करायचं नाही. एक बटाटावडा आणि एक मेदूवडा हातात पिशवी आली की फस्त करायचा."

"चल रे, काहीतरीच काय? मला नाही असं चोरून खायचं."

"तुला खायचं की नाही हा प्रश्न नाही. तुला कामावर पाठवलं की पदार्थ कमी येतात हे समजलं की ते तुला पाठवायचे बंद होतील."

"आणि समजा शिक्षा म्हणून त्यांनी माझं कंप्लीशन रोखलं तर?"

"बरं बरं. तसं नको करूस. चटणीत आणि सांबारात थोडं मीठ घातलंस तर कसं?"

"थोडं?"

"जास्त घाल. संशय येईल येवढं मात्र घालू नकोस. खाताना त्यांची होणारी तोंडं बघून तुला सूड घेतल्याचं समाधानही मिळेल आणि तुझ्या पाठचं कामही टळेल."

"ही कल्पना बरी वाटते."

प्रतापने ही कल्पना राबवून पाहिली. तिसऱ्या दिवशी तो परत भेटला. बरोबर अनिल दुबेसुद्धा होता.

"काय रे, काय झालं?" मी विचारलं.

"अरे, काय सांगू. दोन दिवस त्यांनी खारट नाश्ता खाल्ला. अनिलने सुद्धा त्याच्या युनिटसाठी हीच ट्रिक वापरली. मग शेट्टी खारट चटणी आणि सांबार बनवतो म्हणून त्यांनी मला डीपीत नाश्ता आणायला पाठवलं. शेट्टी निदान कँपसमध्ये तरी होता. आता कोपऱ्यापर्यंत जावं लागतं. अनिलचंपण तेच झालं."

"डीपीत खारट चटणी आणि सांबार बनू शकत नाही?" मी विचारलं.

"बनेल रे. बनवलं तर सगळं बनू शकतं."

"मग प्रॉब्लेम काय आहे?" मी विचारलं.

"डीपीतही खारट नाश्ता मिळायला लागला, की ते मला मेन रोडवर अमृत पंजाबमध्ये पाठवतील. मग काय करायचं?"

"तुम्ही खारट नाश्ता बनवू नका. चटणीत आणि सांबारात जुलाबाच्या गोळया कुटून टाका. साल्यांना मारू दे फेऱ्या टॉयलेटच्या. मग शहाणपणा येईल." मी म्हटलं.

"पकडले गेलो तर राडा होईल" अनिल म्हणाला. "नगरपालिकेचं हॉस्पिटल आहे. त्यांनी अमृत पंजाबचं स्वयंपाकघर तपासायला अन्नभेसळ तपासणी पथक पाठवलं तर?"

"ते घाणेरडं निघणारच रे. कोणत्या हॉटेलचं स्वयंपाकघर असावं तितकं स्वच्छ असतं?" मी म्हटलं.

"नको रे. त्यांनी त्या नाश्त्याचा केमिकल ॲनालिसिस केला आणि त्यात जुलाबाच्या गोळयांचा अंश सापडला तर आमच्यावर पोलिस केस टाकतील."

एम.बी.बी.एस.च्या दुसऱ्या वर्षी न्यायवैद्यकशास्त्र शिकताना प्रतापला येवढं ज्ञान नव्हतं. कदाचित त्याने माझी कल्पना आधीच विचारात घेतली होती असेल आणि तिच्यावर मुलांच्या हॉस्टेलवर उहापोहही केला असेल. मुलांच्या हॉस्टेलवर ब्रेनस्टॉर्मिंग झालं तर कधी कधी बरीच माहिती मिळून जात असे.

"शेवटचा उपाय. थोडे जास्त गट्स लागतील" मी म्हटलं.

"आपल्याकडे गट्स भरपूर आहेत. तू सांग" अनिल म्हणाला. प्रतापकडे तेवढे गट्स बहुधा नसावे. पण अनिलने पुढाकार घेतलाय म्हटल्यावर तो सूज्ञपणे गप्प राहिला.

"नौटंकी करावी लागेल" मी म्हटलं.

"काही प्रॉब्लेम नाही" अनिल म्हणाला. त्याने पूर्वी नौटंकी करून लायब्ररीत मेनन बाईना चांगलाच धडा शिकवला होता. प्रतापलाही ते आठवलं असावं. त्याचा चेहरा खुलला.

"आपल्याला नाश्ता आणायला सांगतात, त्यामुळे आपला अपमान होऊन आपल्याला खूप वैफल्य आलंय, आणि आपण तुमच्या ऑफिससमोर आत्महत्या करणार आहोत असं पत्र डीनना पाठवायचं, आणि त्याची एक प्रत वर्तमानपत्रांना पाठवायची. प्रॉब्लेम सुटला असं समजा."

"आत्महत्या करणं हा गुन्हा आहे रे. पोलिसांनी पकडून नेलं तर?" प्रतापचा खुललेला चेहरा पडला.

"आत्महत्या करायची नाही रे. तसा प्रयत्नही करायचा नाही. आत्महत्येची धमकी देणं हा काही गुन्हा नाहीये" मी म्हटलं.

"डीननी आमच्या पत्राकडे दुर्लक्ष केलं तर?"

"वर्तमानपत्रात छापून आल्यावर काय बिशाद आहे त्यांची दुर्लक्ष करायची? काम फत्ते व्हायलाच पाहिजे" मी म्हटलं.

"तुला येवढा विश्वास कसा काय?" अनिलने संशयाने विचारलं.

"इतिहासाची पुनरावृत्ती होते बघ. हीच गोष्ट दुसरीकडे होऊन गेलेली आहे. मी वर्तमानपत्रात वाचलंय. राजमातात असं काही कधी होईल असं मला तेव्हा वाटलं नव्हतं. पण माणसं इथून तिथून एकसारखीच निघतात बघ" मी म्हटलं.

"खरं सांगतोयस?" प्रतापने विचारलं.

"गूगल सर्च करून बघ" मी म्हटलं.

"प्रताप, सर्च बिर्च तू कर. मी नौटंकी करायला तयार आहे" अनिल म्हणाला. मग प्रतापही तयार झाला.

झालं. आम्ही एकत्र बसून एक हृदयाला हात घालणारं पत्र डीनना उद्देशून लिहिलं. प्रताप आणि अनिलची मन विदीर्ण करणारी अवस्था रंगवून लिहिली. दोन दिवसांनंतरची तारीख आत्महत्येसाठी निश्चित केली. दोघांनी पत्रावर सह्या केल्या. आम्ही पत्राच्या फोटोकॉप्या मारून घेतल्या.

"वर्तमानपत्रात हे कसं पाठवायचं?" प्रताप म्हणाला.

"सोपं आहे. सांजवार्ताची पत्रकार डीनच्या ऑफिसच्या आजूबाजूला दिवसभर घोटाळत असते. तिच्याकडे हे पत्र पोचलं की आपलं काम झालं."

"सरळ जाऊन तिला पत्र द्यायचं?"

"अरे, आपला क्लास रिप्रेझेंटेटिव्ह कशासाठी आहे? त्याला सांगायचं पत्र द्यायला." तो प्रताप आणि अनिलच्या हॉस्टेलच्या लॉबीतच रहायचा.

ठरल्याप्रमाणे पत्र डीनच्या ऑफिसबाहेर पत्राकारबाईंना पोचलं. अनिल आणि प्रतापने डीनना भेटून आपली कहाणी सांगितली. मी त्यांच्याबरोबर जाऊ शकलो नाही, कारण मला कोणी असा त्रास देत नव्हतं, आणि मी क्लास रिप्रेझेंटेटिव्ह वगैरे नव्हतो. मी आपला डीनच्या ऑफिसबाहेर थांबून राहिलो. दोघं बाहेर आले.

"काय म्हणाले डीन?" मी विचारलं.

"बघतो म्हणाले" प्रताप निराश सुरात म्हणाला. "काही होईल असं वाटत नाही."

"थांब. निराश होऊ नकोस" मी म्हटलं. "या माझ्या बरोबर." मी पत्रकार बाईंना शोधत निघालो. ऑफिसला बातमीचा फॅक्स पाठवून झाला असावा. त्या तिथेच रेंगाळत होत्या.

"अरे, काय तुमच्या जीवाची पर्वासुद्धा नाही त्यांना. थांबा, मी तुमच्या घरी फोन करतो. तुम्ही उद्या जीव दिलात तर मी तुमच्या आई-बाबांना कसं तोंड दाखवू?" मी जराशा मोठ्या आवाजात म्हटलं. तिकडे बाईंनी कान टवकारले.

"नको रे, त्यांना नको कळवू" प्रताप टरकून म्हणाला. "आई हाय खाईल".

"नुसतं कळवलं म्हणून हाय खाईल आणि जीव दिल्यावर हाय खाणार नाही काय? काय बोलतोस ते तुझं तुला तरी कळतंय का?" मी विचारलं.

"अरे पण मी .. आSSय..." अनिलने प्रतापच्या नडगीवर अगदी वेळेवर लाथ मारून त्याचं तोंड बंद केलं म्हणून बरं. मी आत्महत्या कुठे करणार आहे असं काहीतरी तो बोलला असता तर लोचा झाला असता.

"डॉक्टर, काय झालं मला सांगा. मी काही मदत करू शकले तर बघते" पत्रकार बाई पुढे आल्या आणि म्हणाल्या.

"नको, नको" मी म्हटलं. "काही नाही हो मॅडम, ही आमची अंतर्गत बाब आहे."

"विजय, त्या मदत करतील. आमचं पत्र क्लास रिप्रेझेंटेटिव्हने ज्यांना दिलं त्याच या मॅडम" अनिल म्हणाला.

"हो? बरं झालं, तुम्ही अगदी देवासारख्या भेटलात बघा. अहो, हे दोघं थोडेसे मनाने हळवे आहेत. आम्ही इतर जणं सगळं सहन करतो, जीव द्यायला निघत नाही. पण यांना ते जमत नाही. उद्यापर्यंत त्यांचा होणारा छळ थांबला नाही तर ते झोपेच्या गोळया खाऊन या इथे जीव देणार म्हणताहेत. डीन सर म्हणाले 'बघूया'. अहो, जीव देऊन झाल्यावर काय बघायचंय? पोस्ट मॉर्टेम?"

असं बोलणारा डॉक्टर बाईंना कधी भेटला नसावा.

"जरा इथे या" असं म्हणून बाईंनी मला प्रताप आणि अनिलपासून थोडं लांब नेलं.

"खरंच ते जीव देतील असं वाटतं का तुम्हाला?" त्यांनी विचारलं.

"काही सांगता येत नाही हो" मी म्हटलं. "दर वर्षी कमीत कमी दोन डॉक्टर मुलांच्या हॉस्टेलवर जीव देतात. खरं वाटत नसेल तर गूगल सर्च करून बघा. जे न सांगता जीव देतात,

त्यांना वाचवता येत नाही. या दोघांकडून निदान पूर्वसूचना मिळालीय. त्यांना तर वाचवता येईल. दोघांची घरं गावाकडे आहेत. आत्ता सांगून त्यांचे आई-वडिल वेळेवर पोचायचे नाहीत. मुलं डॉक्टर होऊन येतील म्हणून खूप आस लावून असतात हो घराकडे. डीनही त्यांना सिरियसली घेत नाहीयेत. मी आता काय करू?" नौटंकी करताना मला राजाने जीव दिला होता त्याची आठवण आली. त्याच्या जाण्याने कोसळलेली माधुरी आठवली. उमेदीच्या काळात फुकट गेलेली ती दोन आयुष्यं आठवली आणि तेव्हा आलं होतं तसं पाणी माझ्या डोळयांत पुन्हा एकदा आलं. प्रताप आणि अनिलसाठीच मी कासावीस झालोय असा बाईंचा गैरसमज झाला.

"तुम्ही काळजी करू नका डॉक्टर. मी डीनबरोबर बोलते. जर त्यांनी ते मनावर घेतलं नाही तर आमचं वर्तमानपत्र या दोघांच्या पाठी उभं राहील. या दोघांना काहीही होऊ देणार नाही आम्ही."

डीनने पत्रकार बाईंना बहुतेक अपेक्षित प्रतिसाद दिला नसावा. या कारणास्तव हे दोघं आत्महत्या करणार नाहीत हे त्यांना माहित असावं. दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात दुसऱ्या पानावर सनसनाटी बातमी आली. डीनचं ऑफिस हललं. अनिल आणि प्रतापला बोलावणं आलं. डीनने त्यांना धीर दिला. त्यांच्या पालकांना बोलावून घेतलं आणि त्यांना थोड्या दिवसांसाठी घरी न्यायला सांगितलं. त्यांना त्रास देणाऱ्या डिपार्टमेंटच्या लोकांना डीनच्या ऑफिसबाहेर चौकशीसाठी, जरब बसवण्यासाठी किंवा दोन्ही गोष्टींसाठी दोन-तीन दिवस बसवून ठेवलेलं सगळयांनी पाहिलं. भले मुलांची काळजी नसो, वर्तमानपत्रात अशी बातमी छापून येणं संस्थेच्या आणि डीनच्या दृष्टीने वाईट होतं आणि त्यामुळे आम्हा इंटर्न्सचा एक त्रास थांबला होता. त्या पत्रकार बाई डीनच्या ऑफिसबाहेर नंतर एकदा भेटल्या तेव्हा मी त्यांचे आभार मानले. त्यांनी मंदसं स्मित केलं.

# १९

वर्ष ५, जुलै ४

"मिता, मी इंटर्नशिप करताना फावल्या वेळात अभ्यास करतोय. तू काय करतेयस?"

"मी छोटे छोटे कोर्सेस करतेय."

"कसले?"

"पुढे मदत होईल असे कोर्सेस रे. उदाहरणार्थ सी.पी.आर. चा कोर्स मी नुकताच पुरा केला." एखाद्याची श्वसनक्रिया आणि हृदयाची स्पंदनं बंद पडली तर त्याला कार्डिॲक अरेस्ट असं म्हणतात. अशा माणसाचं श्वसन आणि हृदय पुन्हा सुरू करण्यासाठी उपचार करतात त्याला कार्डिओपल्मोनरी रिससिटेशन किंवा संक्षिप्तपणे सी.पी.आर. असं म्हणतात. कार्डिॲक अरेस्ट झालेल्या पेशंटला लगेच सी.पी.आर. दिलं तर त्याचे प्राण वाचतात, आणि शरीरातल्या महत्वाच्या इंद्रियांना काही इजाही होत नाही. प्रत्येक डॉक्टरला सी.पी.आर. करता आलं पाहिजे. ॲनास्थेटिस्टस हे फार छान करतात. मिताने ॲनास्थेशियात पदव्युत्तर शिक्षण सुरू करण्यापूर्वी सी.पी.आर. चा कोर्स करून टाकला होता.

"कुठे केलास?"

"आपल्याच हॉस्पिटलात केला. ते छान शिकवतात. नंतर मॅनेकीनवर प्रॅक्टीस करायला देतात. म्हणजे प्रसंग आला तर पेशंटवरच पहिला प्रयोग करावा लागत नाही."

"मी सुद्धा शिकीन म्हणतो" मी म्हटलं.

"मी तुला तेच म्हणणार होते. त्यांचा पुढचा कोर्स पुढच्या आठवड्यात आहे. तू जाऊन नाव नोंदव, फी भर, आणि करून टाक. आपल्या विद्यार्थ्यांना प्राधान्य देतात ते."

"बरं झालं आज तू भेटलीस. माझी खूप इच्छा होती, पण कुठे जावं काही कळत नव्हतं."

"पण तुला खूप इच्छा का होती? जरी प्रत्येक डॉक्टरने हा कोर्स केलेला असावा, तरी फार थोडे जणं तो करतात."

"तुला म्हणून सांगतो. कुठे बोलू नकोस" मी म्हटलं.

ती सरसावून बसली.

"आमच्या वॉर्डात एक पेशंट होती. तिचं गर्भाशयाचं ऑपरेशन झालं होतं. त्यातून ती बरी झाली होती. तिला डिस्चार्ज देणार होते त्याच्या आदल्या रात्री ती जेवल्यावर नातेवाईकांबरोबर गप्पा मारत बसली होती. मध्येच ती कॉटवरच आडवी पडली. रजिस्ट्रार वॉर्डातच काहीतरी कागदपत्रं भरत होती. नर्सने तिला पटकन बोलावलं. रजिस्ट्रारने कार्डिअॅक अरेस्ट झाल्याचं डायग्नोसिस केलं. पण सी.पी.आर. स्वतः न करता ते करण्यासाठी आमच्या ओटीतल्या अॅनास्थेटिस्टसना फोन लावला. एका सिरियस पेशंटचं ऑपरेशन चालू होतं त्यामुळे अॅनास्थेटिस्टस निघू शकत नव्हते. मग तिने कॅज्युअल्टीला फोन लावला. तिथे पेशंटांची खूप गर्दी होती. त्यामुळे तिथूनही कोणी येऊ शकत नव्हतं. मग तिने इमर्जन्सी मेडीकल सर्व्हिसेसला फोन लावला. त्यांच्याकडे तर सतत अत्यवस्थ पेशंट असतात. त्यामुळे तिथूनही कोणी येऊ शकत नव्हतं. मग तिने परत ओटीला फोन लावला. काय झालं ते समजल्यावर अॅनास्थेटिस्टने हातातल्या पेशंटवर नजर ठेवायला कोणालातरी सांगितलं आणि बिचारी ओटीच्या कपड्यांत धावत धावत आमच्या वॉर्डात पोचली. कार्डिअॅक अरेस्टचं निदान झाल्यापासून पंधरा मिनिटांनी सी.पी.आर. सुरू झालं." मिताचा चेहरा बघण्यासारखा झाला होता. मी थांबलो.

"मग काही उपयोग झाला नसेल" ती म्हणाली.

"नाही. ती पेशंट काही अरेस्टमधनं बाहेर आली नाही" मी म्हटलं.

"तिने असं का केलं? अरेस्ट झाल्यावर कार्डिॲक मसाज तर लगेच सुरू करता आला असता. वॉर्डात अम्बू बॅग आणि मास्क तर असतंच.  कृत्रिम श्वसनही करता आलं असतं. "

"आलं असतं, पण तिने तसं काहीच केलं नाही."

"का?"

"तिला काय करायचं ते माहित नव्हतं. कार्डिॲक अरेस्ट झालं की ॲनास्थेटिस्ट किंवा इंटेन्सिव्हिस्टला बोलवायचं येवढंच तिला येत होतं."

"बॉस लोकं काही बोलले नाहीत?"

"बोलले तर. पण बोलले म्हणून गेलेला जीव परत येतो का?"

"पण एम.बी.बी.एस. करताना सी.पी.आर. कसं करतात त्याची थेअरी तर शिकली असणार."

"तिने काय शिकलं होतं आणि काय ऑप्शनला टाकलं होतं ते जाऊ दे. मला सी.पी.आर. शिकायचंय, कारण माझी एकही पेशंट केवळ मला सी.पी.आर. येत नाही म्हणून मरता कामा नये."

"तू हा कोर्स करच. तयारी म्हणून अमेरिकन हार्ट असोशिएशनची मार्गदर्शक तत्वं माझ्याकडे आहेत, ती वाचून जा. म्हणजे शिकताना मदत होईल."

मिताने सुवाच्य अक्षरात लिहून काढलेली ती तत्वं मी वाचली. तिच्या वहीला तिच्या पावडरचा मंद सुगंध येत होता. मनात आणि डोक्यात ती तत्वं मुरावी म्हणून झोपायच्या आधी ती वही दहा मिनिटं छातीशी धरावी आणि मग उशाखाली ठेवून झोपावं असं माझ्या मनात होतं, पण तिची वही चुरली तर ती परत मला कधी महत्वाच्या नोट्स द्यायची नाही या भितीने मी ती आयडिया सोडून दिली.

# २०

वर्ष ५, जुलै १४

मी मिताच्या सी.पी.आर.च्या नोट्स परत दिल्या.

"झाला तुझा कोर्स करून?" तिने विचारलं.

"हो. मला आवडला. कोणाला कार्डिॲक अरेस्ट न होवो. पण जर माझ्या समोर झालंच तर मी नक्की त्याला त्यातून बाहेर काढू शकेन असा मला कॉन्फिडन्स वाटायला लागलाय" मी म्हटलं.

"रुग्णालय आहे म्हटलं की कार्डिॲक अरेस्टचे पेशंट मधून मधून मिळतीलच. पण प्रत्येक वेळी आपली ट्रीटमेंट यशस्वी होईलच असं नसतं. तसं झालं तर काय करशील?"

"त्यांनी शिकवलेलं सगळं केलं तरीही पेशंट बरा झाला नाही असं होतं?"

"होतं की."

"असं काही होतंय असं वाटलं तर तुला बोलावणं पाठवीन" मी बोलून गेलो.

"मला?"

"तू ॲनास्थेटिस्ट! तू अयशस्वी होणं शक्य नाही."

"तसं नसतं रे ते" ती म्हणाली.

"बरं ते जाऊ दे. आणखी कसले कोर्सेस केलेस?"

"कॉम्प्यूटर वापरायला शिकतेय."

"एकदम हाय टेक होत चाललीस हं?"

"आता वेळ आहे ना शिकायला. पुढे गरज तर पडेलच. तू नाही शिकणार?"

"मला कॉम्प्यूटर वापरता येतो."

"कधी बोलला नाहीस. क्लासला गेला होतास?"

"छे ग. आमच्या अहुजा मॅडमना काही पत्रं लिहायची झाली आणि जोशीबाईंच्या नजरेस ती पडू द्यायची नसली तर त्या डिपार्टमेंटच्या टायपिस्टला ते टायपिंग करायला सांगत नाहीत. मला टायपिंग येतं म्हणून त्या मलाच स्वत:च्या लॅपटॉपवर टायपिंग करायला सांगतात."

"त्या सांगतात आणि तू करतोस?"

"लॅपटॉप वापरायला मिळतो ना. तू फी भरून क्लासमध्ये शिकतेस. मी काहीही पैसे न भरता मॅडमच्या ऑफिसात आरामात बसून त्यांच्याच लॅपटॉपवर शिकतो."

"कोणी न शिकवता तुला ते जमतं?"

"सोप्पं असतं गं. मी लायब्ररीतनं एक पुस्तक आणलं आहे. ते घरी बसून वाचतो. त्यांत दिलेल्या गोष्टी दुसऱ्या दिवशी लॅपटॉपवर करून बघतो. मजा येते."

तिने माझ्याकडे असूयेनं पाहिलं.

"तुला सहज जमतं आणि मला येवढा प्रयत्न करूनही धड जमत नाही."

"जाऊ दे ग. देव सगळ्या गोष्टी प्रत्येकाला देत नाही. तुला इतक्या चांगल्या गोष्टी दिल्यायत, एखादी गोष्ट नाही दिली तर काय बिघडलं?"

"इतक्या गोष्टी? कोणत्या त्या? तू सुंदर आहेस, हुशार आहेस वगैरे गूळ लावायच्या गोष्टी सांगू नकोस."

"मी तसं काही म्हणणार नव्हतो. मला म्हणायचं होतं की तुला चांगल्या घरात जन्म मिळाला, आई-वडिलांनी प्रेम केलं, चांगलं शिक्षण दिलं, चांगल्या कॉलेजात ॲडमिशन मिळाली, झालंच तर माझ्यासारखा मित्र मिळाला..."

"ॲहॅहॅहॅ! मला वाटलंच होतं की माझं कौतुक करण्याच्या मिशाने तू स्वतःची लाल करणार."

"मिता, हे बरं नाही हं. तुला सुंदर आणि हुशार म्हटलं तर गूळ लावतो म्हणायचं, तसं न म्हणता इतर सत्य गोष्टी सांगितल्या तर स्वतःची लाल करतो म्हणायचं. तुझ्याबरोबर कसं बोलायचं तेच मला कळत नाही." खरं तर मला काय झालं होतं ते माझं मलाच कळत नव्हतं. येवढं सगळं मी तिच्यासमोर न अडखळता बोलू शकेन असं मला कधी वाटलंच नव्हतं. "जाऊ दे. तुला कॉम्प्यूटर वापरायला नीट जमत नाही तर सोडून दे."

"मला काही काम करायचं असलं तर काय करायचं?"

"मला सांगत जा. मी करून देईन" मी म्हटलं.

"दर वेळी तुला कसा त्रास द्यायचा?"

"मला कसली गरज पडली तर मी तुला विचारीनच ना? तसंच समज. मित्र त्यासाठीच असतात."

"दर वेळी तू कसा सापडशील?"

'मी दर वेळी असेन. तू बोलावून तर बघ' असं म्हण आता. संधी सोडू नकोस' मला माझ्या कानात प्रतापचा आवाज ऐकू आला.

"मी दर वेळी असेन. तू बोलवून तर बघ" मी धीर करून म्हटलं. बोलून तर गेलो, पण लगेच ती आता काय म्हणेल याची मला काळजी वाटायला लागली. सुटलेला बाण, गेलेली इ-मेल आणि तोंडातून निघालेला शब्द परत घेता येत नाही हे मला माहित होतं.

"बघ हं. बोलावल्यावर आला नाहीस तर माझ्याशी गाठ आहे" ती म्हणाली.

आता काय बोलायचं ते मला सुचलं नाही. ती हसली, हाताने मला बाय केलं आणि मुलींच्या हॉस्टेलच्या दिशेने निघून गेली.

# २१

वर्ष ५, डिसेंबर १५

इंटर्नशिप संपत आली होती. पदव्युत्तर शिक्षणासाठीच्या ॲडमिशनचे फॉर्म्स आम्ही कधीच भरले होते. त्यांचे निकाल सूचनाफलकावर लागले. नाहीतरी कोणाला किती मार्क्स आहेत आणि कोणाला कोणता विषय हवा आहे हे आम्हाला माहित होतं. त्यामुळे स्वतःला कोणता विषय मिळणार हे बहुतेक सर्वांना माहित होतं. काहीजण मात्र आतल्या गाठीचे होते. आपण कोणत्या विषयासाठी अर्ज भरतो आहोत त्याचा ते इतरांना पत्ता लागू देत नसत. त्यामुळे जे काठावर असत ते भविष्य अनिश्चित असल्यामुळे तणावाखाली असत. माझं गायनॅक निश्चित होतं, कारण माझ्यापुढे कोणीच नव्हतं. मिताचा नंबर ॲनास्थेशियासाठी दुसरा होता, त्यामुळे तिची ॲडमिशनही निश्चित होती. प्रताप गॅसवर होता.

"तू काही टेन्शन घेऊ नकोस. तुझे स्टार्स एकदम स्ट्रॉन्ग आहेत" त्याला अनिलने धीर दिला.

"कशावरून? तू काय माझी पत्रिका पाहिलीयस?"

"पत्रिका बघायला नकोच. तू दिसायला हा असा, तरी तुला नीना पटली. सगळा वेळ तुम्ही दोघांनी प्रेम करण्यात घालवला, तरीही तुम्ही दोघंही पहिल्या फटक्यात उत्तीर्ण झालात. स्टार्स स्ट्रॉन्ग असल्याशिवाय हे सगळं झालं असतं का?"

प्रताप मारामारी करायलाच उठत होता. पण अनिलने जिवणी एका कानापासून दुसऱ्या कानापर्यंत फाकून स्मितहास्य केलं आणि प्रताप थंड होऊन खाली बसला. शेवटी त्याला मेडिसिन मिळालं. हर्षदला गायनॅक मिळालं. अनिलला गायनॅक मिळत होतं, पण त्याने पेडिॲट्रिक्स घेतलं.

नीनाला प्रेम करणं प्रतापपेक्षा महाग पडलं होतं. तिला क्लिनिकल विषयांपैकी कोणताच विषय मिळेना. तिने शेवटी फिजियॉलॉजी घेतलं.

"तेच बरं रे" प्रताप म्हणाला. "तिला नाहीतरी प्रॅक्टीस करणं झेपलंच नसतं. आता तिला कोणत्यातरी वैद्यकीय महाविद्यालयात नोकरी मिळेल. दर वर्षी उन्हाळी आणि दिवाळीची सुट्टी मिळेल. वर्षाला वीस नैमित्तिक रजा, बारा ओपीडी हॉलिडेज, सहा बँक हॉलिडेज, शिवाय अर्जित रजा आणि अर्धपगारी रजाही मिळतील."

"पहिल्या दोन मुलांसाठी प्रत्येकी सहा महिन्यांची मॅटर्निटी लीव्ह मिळेल. नंतर होणाऱ्या मुलांसाठी मात्र ती लीव्ह मिळत नाही हो. लक्षात असू द्या" अनिल म्हणाला.

प्रताप परत मारामारी करायसाठी उठत होता. अनिलने कानापासून कानापर्यंत परत एकदा निर्व्याज स्मितहास्य केल्यावर त्याचा नाईलाज झाला आणि तो मारामारी न करता खाली बसला.

निखिल आणि सुकुमार अमेरिकेला जाणार होते. पदव्युत्तर शिक्षणासाठी आपण ॲडमिशन घेणार नाही आहोत असं ते म्हणाले होते.

इंटर्नशिप संपल्यावर हाऊसपोस्ट सुरू होण्यापूर्वी एक महिना मोकळा मिळत असे. बरीच जणं त्या काळात घरी जात असत. काही जणं त्या एक महिन्यात जीपींचे लोकम करत असत. काही काही डिपार्टमेंट्स नव्या येणाऱ्या आरेमोंना एक महिन्याची हाउसपोस्ट देऊ करत असत. त्या काळात त्यांनी मूलभूत गोष्टी शिकून घेतल्या, की नंतर त्यांना काम करणं सोपं जाईल अशी यामागची कल्पना होती. गायनॅकमध्ये अशा पोस्टसची जाहिरात आली नव्हती. मला घरी जायचं नव्हतं कारण मी घरीच रहात असे. काय करावं याचा मी विचार करत होतो. ॲनास्थेशियात अकरा हाऊसपोस्टसची जाहिरात आली होती, पण मला त्याचा पत्ताच नव्हता. मला ती बातमी प्रतापकडून समजली.

"विजय, ॲनास्थेशियात अकरा हाऊसपोस्ट्सची जाहिरात आलीय. तू का घेत नाहीस त्यातली एक पोस्ट?"

"मला माहित नव्हतं. आत्ता जातो आणि अर्ज करतो. थँक्स." मी म्हटलं. "पण काय रे, मी ती पोस्ट घ्यावी असं तुला का वाटलं?"

"मितावहिनी ॲनास्थेशिया करणार आहे ना?"

मी गुपचूप उठलो आणि ऑफिसच्या दिशेने निघालो. इथे कसला पत्ता नव्हता आणि प्रताप मिताला वहिनी म्हणत होता.

"विजय, एक मिनिट थांब. चिडलास?"

"चिडू कशाला? तू म्हणतोस तसं झालं तर मला हवंच आहे. पण अजून काही मला जमतच नाहीये. उद्या इतर कोणासमोर तिला वहिनी म्हणालास तर तिचं नाव खराब होईल अशी भिती वाटते. माझं जमलं की तुला सांगेनच. तोपर्यंत प्लीज तिला वहिनी म्हणू नकोस."

"ओके" तो म्हणाला. मी नीनाला वहिनी म्हणायचो तसंच हे, असं त्याला वाटत असावं.

मिताबरोबर काम करायला मिळावं म्हणून काही मला ॲनास्थेशियाची पोस्ट करायची नव्हती. मिता तर घरी गेली होती. मला एका महिन्यात सी.पी.आर., स्पायनल ॲनास्थेशिया देणं, श्वासनलिकेत ट्यूब टाकणं वगैरे गोष्टींचा मिळेल तेवढा अनुभव घ्यायचा होता. एक महिन्याचा आरेमोचा पगार इंटर्नशिपच्या पगाराच्या दुप्पट असायचा. तो मिळाला असता तर त्यातनं मला हवं होतं ते एक पुस्तक घेता आलं असतं. ते अख्खं पुस्तक महत्वाचं होतं, आणि त्याच्या नोट्स काढणं शक्य झालं नसतं.

प्रतापने महत्वाची बातमी दिली खरी, पण त्याला ती वेळेवर समजली नसावी. अर्ज स्विकारण्याची शेवटची तारीख दोन दिवसांपूर्वीच उलटून गेली होती. मी तोंड पाडून ऑफिसच्या

बाहेर उभा राहिलो. पोस्ट मिळाली नाही म्हणून काही आकाश कोसळणार नव्हतं. पण मी त्या पोस्टवर आस लावून होतो. अनुभव आणि पैसे मिळवणं हे माझं उद्दिष्ट होतं खरं, पण मिता पुढे आयुष्यभर जे काम करणार होती, त्याची आपल्याला ओळख तरी असावी असं मला आतून वाटत होतं. पोस्ट मिळत नाही म्हणजे कदाचित मितापण नाही असं काहीतरी वाटून मला गुदमरल्यासारखं होत होतं. तो वेडपटपणा होता हे लक्षात येण्यायेवढं माझं मन थाऱ्यावर नव्हतं. मी असा विमनस्क होऊन ऑफिसच्या बाहेर उभा राहिलो ते बरंच झालं. थोड्या वेळाने निखिल तिथे पोचला. मला पाहून तो थबकला.

"काय रे विजय, तू असा का दिसतोयस?"

"काही नाही रे" मी म्हटलं. "पण तू इथे काय करतोयस?"

"एक महिन्याची अ‍ॅनास्थेशियाची पोस्ट जाहीर झालीय ती घ्यायला मी आलोय" तो म्हणाला.

"पण तू अमेरिकेला जाणार आहेस म्हणून भारतात पदव्युत्तर शिक्षण घेणार नाहीस असं म्हणाला होतास ना?"

"हो. पण आता इथे एम.डी. करून मगच जाईन म्हणतो."

त्याने शेवटपर्यंत आपला प्लान लपवून काय मिळवलं होतं ते काही मला समजलं नाही. पण जो येवढा धूर्त आणि सगळ्या गोष्टी पूर्वनियोजनाने करायचा त्याने वेळेवर येऊन ती पोस्ट घेतली नाही म्हणजे काय?

"अरे. त्या पोस्टची शेवटची तारीख उलटून गेलीय. आता तुला कशी मिळेल ती पोस्ट?"

"अकरा पोस्ट्स होत्या. अजून दोन पोस्ट्स रिकाम्या आहेत. मला मिळेल त्यातली एक पोस्ट."

तो बाजूला असलेल्या अॅनास्थेशियाच्या एचोडींच्या ऑफिसात गेला. बरं दिसलं नसतं म्हणून मी थांबलो, नाहीतर त्याच्या पाठून मी पण गेलो असतो. दोनातली एक पोस्ट त्याला मिळाली तर दुसरी मला मिळायला काही हरकत नव्हती. थोड्या वेळाने तो बाहेर आला आणि काहीच झालं नाही अशा अविर्भावात निघून गेला. तो नजरेआड झाल्यावर मी अॅनास्थेशियाच्या एचोडींच्या ऑफिसच्या दारावर टकटक केलं आणि त्यांनी आत ये म्हटल्यावर आत गेलो.

"सर, गुड मॉर्निंग. माझी इंटर्नशिप आत्ताच संपली. आपल्या विभागात आरेमोंच्या अकरा पोस्ट्स जाहीर झाल्या होत्या, ते मला समजायला जरासा उशीर झाला म्हणून मला अर्ज भरता आला नाही. पण एक पोस्ट अजून रिकामी आहे असं कळलं. आपण ती पोस्ट मला द्यावी अशी विनंती करायला मी आलो आहे."

त्यांनी माझ्याकडे निरखून पाहिलं. "नाव काय तुझं?"

मी नाव सांगितलं.

"अॅनास्थेशियात एम.डी.ला अॅडमिशन घेतलेल्या विद्यार्थ्यांत तुझं नाव नाहीये. तू पुढे काय करणार आहेस?"

"सर, मी गायनॅकमध्ये एम.डी. करणार आहे."

"मग अॅनास्थेशियात एक महिना पोस्ट करून काय मिळणार तुला?"

"सर, मला सी.पी.आर. आणि एंडोट्रकिअल इंट्युबेशन शिकायचंय. माझ्या पेशंटांना कार्डिअॅक अरेस्ट झालं तर त्यांच्या उपचारासाठी हा अनुभव मला उपयोगी पडेल. झालंच तर ऑपरेशनसाठी आमचे पेशंट फिट व्हावे म्हणून अॅनास्थेटिस्टसना काय काय लागतं ते मला आधीपासूनच माहित असलं तर सोपं पडेल."

ते हसले. "तुझं नशीब चांगलं आहे. आमच्याकडे ॲनास्थेशियाच्या अकरा विद्यार्थ्यांचे अर्ज आले असते, तर मी तुला पोस्ट दिली नसती. आता एक पोस्ट रिक्त आहे आणि नवं कोणी अर्ज करेल असं वाटत नाही. तू पेशंटांचा विचार करून ही पोस्ट मागतो आहेस तर मी तुला नाही म्हणणार नाही. चल माझ्याबरोबर."

मला बरोबर घेऊन ते बाजूच्या ऑफिसात गेले आणि तिथल्या लिपिकाला सांगून त्यांनी ती पोस्ट मला देववली.

"उद्यापासून जॉइन हो" ते म्हणाले.

"होय सर. थँक यू व्हेरी मच" मी म्हटलं.

# २२

वर्ष ६, जानेवारी

एक महिन्याची ॲनास्थेशियाची पोस्ट म्हणता म्हणता संपत आली. मी चार पेशंटांना एंडोट्रकिअल इंट्यूबेशन केलं, तीन पेशंटांना स्पायनल ॲनास्थेशिया देण्यात यशस्वी झालो तर दोघांना स्पायनल देताना मला जमेना म्हणून सिनियरना वॉश अप व्हावं लागलं. ऑपरेशन करण्यापूर्वी कोणकोणत्या चाचण्या कराव्या लागतात आणि ॲनास्थेशिया देण्यासाठी पेशंटला असणारा धोका किती ते कसं ठरवायचं ते शिकलो. आयुष्यभर हेच काम करायला मला नक्कीच आवडलं नसतं. आपण पेशंटला भूल द्यायची आणि मग सर्जन जेवढा वेळ ऑपरेशन करत राहील तेवढा वेळ वाट बघत बसायचं हे मला कधीच जमलं नसतं. सर्जन कामात वाकबगार असला आणि पटपट काम उरकणारा असला तर बरं असायचं. पण चाचपडत आणि वेळ काढत ऑपरेशनं करणारे सर्जन्सही मी पाहिले. त्यांचं काही चुकतंय असं दिसलं तरी सांगायची चोरी असायची. आपल्यातले जितेंद्रिय किंवा बौद्धांचे झेन फिलॉसॉफर जसे राग येऊ न देता किंवा अधीर न होता काम करू शकतात तसे चांगले ॲनास्थेटिस्टस असायचे. सर्जन कितीही गोंधळ घालत असला तरीही ऑपरेशन संपेपर्यंत पेशंटला संभाळत रहाणं म्हणजे काही सोपी गोष्ट नसायची. आपण उद्या आपल्या ॲनास्थेटिस्टला असा त्रास द्यायचा नाही हे मी त्या एका महिन्यात शिकलो. पेशंटचा काही गोंधळ असला तरीही ॲनास्थेटिस्टस तोंड बंद ठेवून पेशंटवर उपचार करत रहातात हे मी पाहिलं होतं. तसं करताना त्यांच्या होणाऱ्या हालचाली मला नीट ओळखता यायला लागल्या होत्या. आपण ऑपरेशन करताना अशा हालचाली दिसल्या की हातातलं ऑपरेशन थांबवून काही गोंधळ आहे का, आणि मी थांबून पेशंटच्या स्थितीत सुधारणा करण्यासाठी काही करायला हवं का असं विचारायचं हे मी तेव्हा शिकलो.

"पेशंटला ऑपरेशनमुळे रक्तस्त्राव किती झाला हे सर्जन मंडळी कधीच नीट ठरवत नाहीत बघ. जर आपल्या मते एक लिटर रक्तस्त्राव झाला असेल, तर सर्जनच्या मते तो जेमतेम तीनशे

किंवा फार फार तर चारशे सीसी असतो. जास्त रक्तस्त्राव होणं म्हणजे आपल्या शल्यकौशल्याला काळिमा होय असा त्यांचा समज असतो. पेशंटला गरज असताना रक्त देण्यापेक्षा आपला अहंकार जपणं त्यांच्या दृष्टीने जास्त महत्वाचं असतं. अशा वेळी पेशंटला धडपणे ऑपरेशन थिएटरमधून वॉर्डात पाठवायची जबाबदारी आपण घेऊन, सर्जनबरोबर वादावादी न करता शांतपणे रक्त मागवून पेशंटला देणं शहाणपणाचं असतं" आमच्या ॲनास्थेशियाच्या प्रोफेसरनी मला एकदा शिकवलं. हे ज्ञान पुस्तकं वाचून मिळत नाही हे मला माहित होतं. आपण गायनॅक करताना आपला अहंकार गोंजारत बसायचं नाही हे मी तेव्हाच ठरवून टाकलं.

"'या ऑपरेशनमध्ये बराच रक्तस्त्राव होईल. तुम्ही रक्त तयार ठेवलंय ना?' असं विचारायला लाजायचं नाही. पेशंटच्या जिवाचा प्रश्न असतो. तो विचारण्यात लाज कसली? समजा सर्जन म्हणाला, 'अरे, हे गोल्डन हँड्स आहेत. रक्तस्त्राव कसला होतोय? पोटात हात घातला आणि गोल फिरवला की ट्यूमर बाहेर. हा आत गेलो आणि हा बाहेर आलो' तर समजायचं की सर्जन बढाईखोर आहे, पण सुरक्षितपणे काम करणारा नाही. अशा सर्जनच्या केसेस करायला राजमातात जावंच लागतं म्हणून जायचं, पण रक्त तयार असेल आणि इतर सर्व गोष्टी व्यवस्थित असतील तरच. प्रायव्हेट प्रॅक्टीसमध्ये अशी सक्ती नसते, तिथे नम्रपणे आपल्याला दुसरी केस आहे असं सांगून त्या सर्जनला टाळायचं."

मी गायनॅकमध्ये एम.डी. करणार आहे ते मॅडमना माहित नव्हतं म्हणून त्या अशा मोकळेपणाने बोलत होत्या की मला त्या पुढे कसा होऊ नकोस ते सांगत होत्या ते त्यांच्या चेहऱ्यावरून काही समजत नव्हतं, कारण त्यांनी ऑपरेशनच्या मास्कने नाक आणि तोंड व्यवस्थितपणे झाकलेलं होतं.

"काही काही ज्युनिअर सर्जन्स पेशंटला ॲनास्थेशियासाठी फिटनेस मिळावा म्हणून चाचण्यांचे खोटे रिपोर्ट देतात. काही जणांकडे नॉर्मल कार्डिओग्राम जमवलेले असतात. ॲनास्थेटिस्टने एखाद्या पेशंटचा कार्डिओग्राम मागितला की त्यातला एक काढून देतात. एक्स-

रेंचंही तसंच असतं. अशा गोष्टींमुळे पेशंटचे आजार लपवले जातात. मग त्यांना ॲनास्थेशिया दिला की गुंतागुंत होऊ शकते. एखादा पेशंट दगावू शकतो. असे सर्जन्स संख्येने कमी असतात खरे, पण तोंड बघून कोण त्या प्रकारचा आहे हे काही सांगता येत नाही. असं करताना कोणी आढळलं तर त्याला वेळीच थांबवावं. आपण डॉक्टर आहोत, नाटकाचे सूत्रधार नाही याची त्यांना जाणीव करून द्यावी लागते."

"पण मॅडम, असं करू नका, पेशंटचं बरंवाईट होईल असं सांगून अशी माणसं सुधारतात?" मी विचारलं. निखिल किंवा सुकुमार असा उपदेश करून कधीही सुधारणार नाहीत, असं माझ्या मनात आलं.

"एखादा सुधारतो. जे सुधारत नाहीत त्यांना बडगा दाखवावा लागतो."

"हं" मी म्हटलं.

"ऑपरेशन करून झालं की सर्जन्स पेशंटला ॲनास्थेटिस्टच्या जिवावर सोडून आरामात बाहेर जाऊन बसतात. तो पेशंट ही सर्जन्स आणि ॲनास्थेटिस्ट या दोघांचीही जबाबदारी असते, याचं त्यांना भान रहात नाही म्हण किंवा त्यांना तसं वाटतच नाही म्हण. अशा वेळी त्यांच्यापैकी एकाला तरी काही लागलं तर सांगता यावं म्हणून आपल्याबरोबर उभं करून ठेवावं, जाऊ देऊ नये."

अनेक वर्षांच्या अनुभवात मॅडम बऱ्याच पोळलेल्या दिसत होत्या. त्यांच्या चेहऱ्यावरचं मास्क अजूनही जागेवर असल्यामुळे मला हे सगळं सांगण्यामागचा हेतू काय असावा याबद्दल मला काही अंदाज बांधता येत नव्हता.

"तू मुलगा आहेस, म्हणून तुला सांगण्यात अर्थ नाही, पण शेवटचा मुद्दा मी मुलींना सांगते तो तुलाही सांगून टाकते. तू तुझ्या एखाद्या मैत्रीणीला सांगू शकशील. मैत्रीणी आहेत का तुला?"

"आहेत मॅडम" मी म्हटलं.

"ॲनास्थेटिस्टस बहुतेकदा मुलीच असतात. सर्जन मुलांना दिवसभर बरोबरीने काम करणाऱ्या मुली दिसल्या की त्यातली एक बायको असावी असं वाटायला लागतं. त्याला हरकत नाही. पण काही काही जणांना फक्त चार घटका करमणूक हवी असते. अशा मुलांपासून सावध असावं. आणि नवरा म्हणून एखादा सर्जन निवडण्यापूर्वी तो इतर मुलींकडेही बघत असतो का, कोणाबरोबर फिरत असतो का, त्याचं वागणं सभ्यपणाचं असतं की टपोरीपणाचं असतं हे नीट पहावं. अशा प्रकारचा माणूस लग्न झाल्यावरही आपले रंगढंग आज ना उद्या सुरू करण्याचा दाट संभव असतो."

मी एकदम सावध झालो. मिताला या ओटीत कधी ना कधी या मॅडमच्या हाताखाली पोस्टिंग मिळालंच असतं. जर मॅडमनी तिचं असं काहीबाही सांगून ब्रेनवॉशिंग करून टाकलं तर मला असणाऱ्या अडचणी वाढतील हे माझ्या लक्षात आलं. मॅडमनी धोक्याची सूचना दिली त्या प्रकारचा मी नव्हतो खरा, पण मिताला तसं वाटलं असतं तर?

"मॅडम, सगळी मुलं तशी नसतात हो" मी म्हटलं.

"मला माहित आहे रे" मॅडम म्हणाल्या. "मी फक्त मुलींनी काय काळजी घ्यावी तेवढंच सांगत होते."

मॅडम बहुतेक कौटुंबिक आघाडीवरही चांगल्याच पोळलेल्या दिसत होत्या. पण कितीही पोळलेल्या असल्या तरी आपल्याहून पंधरा-वीस वर्षांनी लहान असलेल्या मुलाला अशा डॉक्टरकीशी संबंधित नसलेल्या गोष्टी सांगणं काही शहाणपणाचं वाटत नव्हतं. उद्या जर मला स्वतःला ॲनास्थेशिया घ्यायची वेळ आली असती तर या मॅडमना मी चार हात दूर ठेवणं पसंत केलं असतं.

# २३

वर्ष ६, जानेवारी २८

माझी ॲनास्थेशियाची पोस्ट संपायला दोन दिवस असताना मिता घरून परत आली.

"काय, कशी झाली सुट्टी?" मी विचारलं. चोरून मी तिच्या हातांकडे नजर टाकली. तिने दोन्ही हात पाठीमागे गुंफून ठेवले होते. सहजच की ....?

"चांगली झाली" ती म्हणाली.

"काही विशेष?" हात अजून पाठीशीच होते.

"अं...नाही. तू काय केलंस महिनाभर?"

"मी ॲनास्थेशियाची एक महिन्याची पोस्ट केली" मी म्हटलं.

"काय सांगतोस? तुला कशी मिळाली?"

"मनात तीव्र इच्छा असली की काहीही अशक्य नसतं" मी म्हटलं.

"सगळं सोडून ॲनास्थेशियाची पोस्ट करण्याची तीव्र इच्छा हं?"

"मोठ्या मोठ्या तीव्र इच्छा सुद्धा आहेत गं. पण ही छोट्या कालावधीची तीव्र इच्छा होती." मला खरं तर तिच्या हातांवर मेंदी किंवा बोटात अंगठी आहे का ते बघायची इच्छा त्या क्षणी होत होती. पण तीव्र असूनही ती पूर्ण करण्याचा काही मार्ग सापडत नव्हता. तिची एंगेजमेंट झाली

असती तर तिने मला ते सांगितलं असतं, तसं प्रॉमिसच तिने केलं होतं खरं, पण मुलींना अशा गोष्टी पटकन सांगायची लाज वाटते असंही मी ऐकलेलं होतं.

"कोणत्या मोठ्या इच्छा आहेत ते तरी ऐकू दे" ती म्हणाली.

"नको. तू नेहमीसारखी हसशील" मी म्हटलं. 'वेडपटा, तिला सांग की तुला एका सुंदर, गोऱ्या, ब्राउन डोळयांच्या, गोड गळयाच्या, ॲनास्थेशियात एम.डी. करायला सुरुवात करणाऱ्या मुलीबरोबर सगळं आयुष्य घालवायची एकमेव तीव्र इच्छा आहे' प्रतापने म्हटल्याचा मला भास झाला. समजा मी असं म्हटलं आणि ती जोरजोराने हसायला लागली तर? किंवा काही न बोलता पाठ फिरवून निघून गेली तर? किंवा 'विजय, मला तू मित्र म्हणून आवडतोस, पण असा काही विचार माझ्या मनात कधी आला नाही रे' असं म्हणाली तर?

"काय रे, येवढा गंभीर का झालास एकदम?" तिने विचारलं.

"अं.. काही नाही."

"मग सांगतोस ना ॲनास्थेशियाची पोस्ट का केलीस ते?"

"पुढे ॲनास्थेटिस्टसबरोबर समजुतीने काम करायचंय. त्यांचे दृष्टीकोन, त्यांच्या अपेक्षा, सर्जन्सच्या वागण्याबद्दलचे त्यांचे आक्षेप वगैरे गोष्टी आधीच समजल्या तर पुढे भांडणं व्हायची नाहीत, सामोपचाराने कामं झाली तर पेशंटांचे उपचारही चांगले होतील असं मला वाटलं."

"येवढंच?"

"एक महिन्याचा पगारही उपयोगी पडेल."

"हो? काय करणारेस त्या पैशांचं?"

"आई-दादांना पहिल्या पगारातून बरीशी भेट देईन असं म्हणतोय."

"इंटर्नशिपच्या स्टायपेंडमधून काही दिलं नाहीस?"

"दिलं ना. पण आता जास्त पैसे मिळतील. त्यांच्याकडून आयुष्यभर घेतलं. आता थोडसं देईन."

"आणि उरलेल्या पैशांचं काय करशील?"

"काय उलटतपासणी घेतेयस काय?"

"मला कुतूहल आहे रे" ती साधेपणाने म्हणाली.

'येडपटा, तिला सांग, मनातल्या मुलीला एक लाल गुलाब देईन' प्रतापचा आवाज माझ्या कानात कुजबुजला. 'तसं म्हणणं वेडपटपणाचं ठरेल रे. त्या मुलीचं नाव समजल्याशिवाय ती मला सोडायची नाही' मी त्या कानातल्या आवाजाला मनातल्या मनात उत्तर दिलं. 'काय घाबरट आहेस! तू असाच राहणार बघ' असं म्हणून तो आवाज लुप्त झाला.

"आज वारंवार विचारात हरवतोयस. काही झालंय का?" तिने विचारलं.

"अं.. गायनॅक पॅथॉलॉजीचं एक पुस्तक मला हवंय. ते विकत घेईन म्हणतो" मी म्हटलं. "बरं मला सांग, घरून येतांना तू काय आणलंस माझ्यासाठी? तुझी आई गूळपापडीच्या वड्या खूप छान करते. त्या आणल्यायस?"

"नाही रे. तिची तब्येत जरा बरी नव्हती. या वेळी तिला काही खाणं करून देऊ नकोस असं मी बजावून सांगितलं."

"आता बरी आहे का?"

"हो, बरी आहे."

"ठीक आहे, तू काही आणलं नाहीस तरी हरकत नाही. मी तुला काहीतरी देतो" असं मी म्हटलं. तीव्र इच्छा असली तर मार्ग सापडतो तसा मला सापडला होता. मी खिशात हात घातला आणि बंद मूठ बाहेर काढली.

तिने हात पुढे केला. माझ्या छातीत कळ आली. तिच्या हातावर सुरेख मेंदी काढलेली होती.

"देतोस ना काय देणारेस ते?" मिता म्हणाली.

मी तिच्या हाताकडे बघत निश्चल उभा होतो हे माझ्या लक्षातच आलं नव्हतं. मी खिशातून काढलेलं चॉकलेट तिच्या हातावर ठेवलं. चॉकलेट आणि आइसक्रीम हे तिचे वीक पॉईंट्स होते. ती हसली. चॉकलेटचं वेष्टन तिने काढलं आणि चॉकलेट तोंडात टाकलं. वेष्टन नंतर कचऱ्याच्या डब्यात टाकण्यासाठी म्हणून पर्समध्ये ठेवलं.

"मेंदी छान आहे" मी जराशा कापऱ्या आवाजात म्हटलं. काय ते समजलं नसतं तर माझं पुढे कशातच लक्ष लागलं नसतं.

"आवडली?" तिने आपले हात निरखून पाहिले.

"सहजच काढली की..." मी विचारलं.

"मी तयारच नव्हते रे, पण सगळे जण ऐकेनात" ती म्हणाली.

"पण निमित्त काय होतं?" मी जमेल तेवढ्या सहज आवाजात विचारलं.

"मावस बहिणीचा साखरपुडा झाला" ती म्हणाली. "मला मेंदी आवडते. पण आरेमो म्हणून कामावर रुजू होताना मेंदी लावलेली बरी दिसणार नाही असं मी म्हणत होते. तुला काय वाटतं?"

तिच्या गोऱ्या हातांवर मेंदी सुरेखच दिसत होती. निमित्त तिचा साखरपुडा असं नव्हतं, त्यामुळे मेंदी लावायला माझी काही हरकत नव्हती. पण तिची मेंदी पाहिल्यावर मेंदीचं निमित्त समजेपर्यंत माझ्या छातीतली कळ गेली नव्हती. असं पुनःपुन्हा झालं तर माझं काही खरं नव्हतं.

"तू म्हणतेस ते बरोबर आहे. प्रोफेशनल व्यक्तींना कामाच्या ठिकाणी मेक अप, मेंदी, नेल पॉलिश वगैरे गोष्टी बऱ्या दिसत नाहीत असं काही जण म्हणतात. याच्या उलट म्हणणारी माणसंही आहेत. शेवटी आपल्याला काय पटतं तेच आपण करायचं. जग काय म्हणतं ते तेवढं महत्वाचं नाही."

"हॉस्टेलच्या खोल्यांचं वाटप आज दुपारी होणार होतं. मी जातेय तिथे. तू येतोस? खोली मिळाली की सामान लावायला हवं. आरेमोची पोस्ट सुरू झाली की कामातून वेळ मिळायचा नाही" ती म्हणाली.

"नाही ग" मी म्हटलं. "मला आज इमर्जन्सी ड्यूटी आहे. तू जा पुढे. मला काही कॉल आहेत का ते बघायला हवं."

मिता गेली. मी आलेले कॉल बघायला गेलो.

# २४

वर्ष ६, फेब्रुवारी

गायनॅकची हाउसपोस्ट म्हटली की दिवसरात्र काम करावं लागत असे. देशाच्या राजधानीतल्या काही काही पंचतारांकित हॉस्पिटलांत आरेमोंना आठ तासांची ड्यूटी असायची. ड्यूटी संपली की आपली पेशंट कितीही सिरियस असो, तिला पुढच्या सत्रातल्या डॉक्टरवर सोपवून आरेमो निघून जात असत. याचा फायदा म्हणजे विश्रांती मिळायची, खाणंपिणं वेळेवर व्हायचं, मनोरंजनासाठी आणि इच्छा असली तर अभ्यास करायला पुरेसा वेळ मिळायचा. या आठ तासांच्या ड्यूटीचा मुख्य तोटा म्हणजे आरेमोंना शिकायला मिळत नसे. पेशंटच्या चाचण्यांचे अहवाल काय आले, तिने उपचारांना कसा प्रतिसाद दिला, तिच्या तब्येतीत काही गुंतागुंत झाली का वगैरे गोष्टी जर पहायलाच मिळाल्या नाहीत तर शिकायला कसं मिळणार? राजमाता रुग्णालयात चोवीस तासांची ड्यूटी असायची. तेवढ्यात पेशंट बरी झाली नाही तर दुसऱ्या दिवसाची नेहमीची कामं संभाळून त्या पेशंटबरोबर बसून रहावं लागायचं. गर्भारपणात रक्तदाब प्रमाणाबाहेर वाढून आकडी येते त्या आजाराला एक्लांप्शिया म्हणतात. एक्लांप्शियाच्या पेशंटसाठी मी एकेकदा बहात्तर तासांची ड्यूटी न झोपता करत असे. अगदी नैसर्गिक विधींसाठी जायचं झालं तरी कोणालातरी जरा माझ्या पेशंटकडे लक्ष ठेव असं सांगून जावं लागत असे. आवड म्हणून हा विषय निवडला असल्यामुळे मला त्याचं काही वाटत नसे. आजारामुळे आणि औषधांच्या परिणामामुळे बेशुद्धावस्थेत असलेली पेशंट शुद्धीवर आली की कोण आनंद होत असे.

आम्ही पहिल्या वर्षाचे आरेमो असं खडतर व्रत केल्यासारखे काम करायचो, त्यामुळे कनवाळू नर्सेस आम्हाला झोप जाऊन जरा ताकद यावी म्हणून मधूनच केव्हातरी चहा पाजायच्या. रात्री

झोप न झाल्यामुळे तोल जाऊन पडायची परिस्थिती आली तर बाजूलाच एखाद्या खाटेवर स्वच्छशी चादर पांघरून घ्यायच्या, आणि अर्धा तास तरी डोळे मिटा हो डॉक्टर असं म्हणायच्या. तरीही माझ्या सहा महिन्यांच्या पहिल्या हाउसपोस्टमध्ये माझं वजन अकरा किलोने कमी झालं. खूप काम पडायचं खरं, पण त्यामुळे येवढं वजन कमी होणं शक्य नव्हतं. वजन घटलं तसं माझं हास्यही लोपलं. या दोन्हीचं कारण होती माझी रजिस्ट्रार मंगल. तिला सहा महिन्यांची लोकम पोस्ट मिळाली होती. ती स्वभावाने खुनशी होती, डोक्याने कमी होती की तिला इतरांचा विचार करणं हे माहितच नव्हतं हे मला कधीच समजलं नाही. बहुधा या तीनही गोष्टी तिला लागू असाव्या. माझं वजन तिने कमी केलं कारण ती मला महिन्यातले सुमारे पंधरा ते वीस दिवस सकाळचा नाश्ता करायला, आणि सुमारे पंधरा दिवस रात्री जेवायला सोडतच नसे.

"सकाळी बरोबर सात वाजता मी राउंड घ्यायला येते. आपली राउंड घेऊन झाली की मग तू नाश्ता करायला जा" हे ती रोज सांगायची. पण ती कधी आठ वाजता राउंडसाठी यायची, तर कधी सव्वा आठ वाजता. बरं ती उशीरा

येईल असं गृहित धरून मी जर नाश्ता करायला गेलो, तर ती लवकर येईल आणि मी राउंड घ्यायला नसतो म्हणून कांगावा करेल अशी मला भिती वाटायची. त्यामुळे मी तिची वाट बघत बसून रहायचो.

"तू सांगितल्याप्रमाणे सात वाजता राउंड घ्यायला का येत नाहीस?" असं मी एकदा तिला विचारलं.

"सरांना फोन करायचा असतो. तो लागल्याशिवाय मी कशी येणार?"

रात्री जेवणासाठी मी मेसमध्ये अख्ख्या महिन्याचे पैसे आगाऊ भरलेले असायचे. मेस रात्री साडेनऊ वाजता बंद व्हायची.

"विजय, या पेशंटला आपण फिटल मॉनिटरवर ठेऊ. मग तू जेवायला जा" असं ती रात्री आठ वाजता सांगायची. पण ती यायची मात्र सव्वानऊ वाजता. फिटल मॉनिटर जोडेपर्यंत साडेनऊ वाजून जायचे. मग मला रात्री उपास घडायचा. खाण्यापिण्यावरच गोष्टी थांबल्या असत्या तर एकवेळ हरकत नव्हती. पण ती माझ्या डोक्यालाही फार त्रास द्यायची. एखादी गोष्ट अशीच का केली हा तिचा आवडता प्रश्न होता. प्रत्येक आजारासाठी कधी काय करायचं याबद्दल आमच्याकडे रुग्णालयाची मार्गदर्शक तत्वं नव्हती. मनात येईल ते हाताखालच्यांना सांगायचं आणि त्यांनी ते तसं करायचं असा प्रघात होता. बहुतेक सर्व जणं आपापली तत्वं वापरायचे. त्यामुळे आपल्या युनिटमधल्या सिनियरना काय हवं ते एकदा समजलं की मग काही त्रास होत नसे. पण मंगलला बहुधा तत्वांनी बांधून घेणं पसंत नसावं. आज जे कर असं ती म्हणायची ते पुढच्या वेळी केलं तर तसं का केलं म्हणून ती जीव काढायची. दिलेलं उत्तरही तिला पसंत पडत नसे. वेगवेगळी कितीही उत्तरं दिली तरी ती पहिलाच प्रश्न पुनःपुन्हा विचारत असे. त्यामुळे मी अगदी कातावून गेलो होतो.

मिताला आमच्या ऑपरेशन थिएटरमध्ये पोस्टींग मिळालं नव्हतं. त्यामुळे आमची भेटगाठ क्वचितच व्हायची. इमर्जन्सी केस करायला ती आमच्या ओटीत आली तरच ती नजरेला पडायची. लॉन्ग डिस्टन्स रिलेशनशिप म्हणतात ते काय असतं ते मला त्या वेळी कळलं. म्हणजे आमच्यामध्ये रिलेशनशिप म्हणण्यासारखं काहीच नव्हतं, पण संपर्कच नाही तर मैत्रीचे रंगसुद्धा फिके पडतील अशी मला भिती वाटायला लागली होती.

"ती दिसतही नाही रे महिना महिना" एकदा प्रताप रात्रीच्या जेवणानंतर वॉर्डात परत जातांना भेटला तेव्हा मी म्हटलं.

"ती भेटत नाही म्हणजे काय? तू जाऊन भेट म्हणजे भेटते की नाही बघ" त्याने मौलिक सल्ला दिला.

"मला तसं करावसं वाटतं रे. पण दिवसाभराचं काम संपायला रात्रीचे एक ते दोन वाजतात. ती काय वेळ आहे एखाद्या मुलीला जाऊन भेटायची?" मी म्हटलं.

"तू कामसू आहेस. म्हणून कामं पटपट उरक असा सल्ला मी तुला देणार नाही" तो म्हणाला.

"थँक यू" मी म्हटलं. "तिने गायनॅक घेतलं असतं तर बरं झालं असतं, असं मला आता वाटायला लागलं आहे. पण माझ्या आवडीचा विषय तिने कसा घेतला असता?"

"तेच म्हणणार होतो मी. तू ॲनास्थेशिया घेतला असतास तरीही ती तुला जास्त वेळा भेटली असती. म्हणून तू ॲनास्थेशिया घेतला असतास का?"

"नाही. पण जे झालं त्याच्यावर विचार करून काही फायदा नाही. आता काय करू?"

"विजय, तू स्कॉलर आहेस. तुझ्यायेवढ्या हुशार मुलाला मी काय सल्ला देऊ? तू काहीतरी मार्ग नक्कीच काढशील बघ" असं म्हणून या विषयाचा तो मास्टर मला सोडून निघून गेला.

माझी अभ्यासातली हुशारी या बाबतीत काही कामाची नव्हती हे मला ठाऊक होतं. मी दैवावर भरवसा ठेवून रोजची कामं करत राहिलो.

एका आठवड्यानंतर मिता आमच्या लेबर वॉर्डात एका पेशंटला जुग्युलर व्हेनचं कॅन्युलेशन करायसाठी आली तेव्हा मला भेटली. ही पोस्ट सुरू झाल्यापासून लोपलेलं माझ्या चेहऱ्यावरचं स्मितहास्य तेवढ्यापुरतं का होईना परतलं.

"अरे, एवढा बारीक कसा झालास तू?" तिने काळजीच्या सुरात विचारलं. मी माझी कर्मकहाणी तिला सांगितली.

"अरे, मंगलची खोली आमच्या विंगमध्येच आहे. रोज मला दिसते ती. ती आणि तिचा नवरा यांना एक खोली मिळाली आहे. तो युरॉलॉजीत रजिस्ट्रार आहे. दोघं नाश्ता आणि जेवण एकत्रच

करतात. आपलं खाणंपिणं झालं की दोघे आपापल्या कामाला जातात. म्हणून तिला राउंडला यायला उशीर होत असणार."

"सकाळी बॉसला फोन करायला वेळ लागतो असं ती म्हणत होती" मी म्हटलं.

"खोटं बोलतेय. रुग्णालयाच्या बाहेर करायचा फोन आमच्या लॉबीच्या टोकाला आहे. ती त्या फोनवर कधीही दिसत नाही. आणि रोज सकाळी बॉसला फोन कशासाठी करत असेल ती? थोड्या वेळाने बॉस रुग्णालयात येणार तर आधी फोन करण्याचं कारण काय?"

"त्याचं काहीच कारण मला दिसत नाही" मी म्हटलं.

"आपला नवरा आणि आपण यांच्या सुखाचा विचार करताना तिला आपल्या हाताखालच्यांचा विसर पडतोय असं दिसतं."

"ते माझ्याही लक्षात आलंय" मी म्हटलं.

"पण डोक्याला त्रास देतेय म्हणजे नक्की काय करते ती?"

"उदाहरणार्थ समज एक पेशंट प्रसववेदना होतात म्हणून आली आहे. प्रसूतीच्या क्रियेची सुरुवात आहे, म्हणून मी गर्भजलाची पिशवी न फोडता तिला ऑब्झर्व्ह करतोय. मग मंगल राउंड घ्यायला आली की मला विचारते - तू गर्भजलाची पिशवी का फोडली नाहीस? मग मी उत्तर देतो की प्रसूतीच्या क्रियेची सुरुवात आहे म्हणून मी पिशवी फोडली नाही. आता तिच्या मते उत्तर बरोबर असेल तर तिने ठीक आहे म्हणावं, नसेल तर पुढच्या वेळी असं करू नकोस, लगेच फोड असं म्हणावं."

"बरोबर आहे" मिता म्हणाली.

"पण ती तसं करत नाही. ती विचारते - नाही पण तू मला सांग, तू गर्भजलाची पिशवी का फोडली नाहीस? मग मी म्हणतो, सांगितलं ना की प्रसूतीच्या क्रियेची सुरुवात आहे म्हणून मी

पिशवी फोडली नाही? त्यावर ती विचारते - नाही पण तू मला सांग, तू गर्भजलाची पिशवी का फोडली नाहीस? तिला ते उत्तर आवडलं नसेल म्हणून मी दुसरं काही उत्तर देतो, उदाहरणार्थ - मागच्या वेळी तू म्हणाली होतीस की गर्भजलाची पिशवी लवकर फोडू नकोस म्हणून. त्यावर ती परत विचारते - नाही पण तू मला सांग, तू गर्भजलाची पिशवी का फोडली नाहीस? मग मी तिसरं उत्तर देतो, उदाहरणार्थ - माझ्या लक्षात नाही आलं. त्यावर ती परत विचारते - नाही पण तू मला सांग, तू गर्भजलाची पिशवी का फोडली नाहीस? हे असं बराच वेळ चालू रहातं. तिला डोकं कमी आहे की बोललेलं कळत नाही ते मला समजत नाही. शेवटी मी तिला स्पष्टच विचारलं, की तुला काय उत्तर हवं आहे ते सांग, मी ते देतो.

“मग काय म्हणाली ती?”

“ती म्हणाली 'नाही पण तू मला सांग, तू गर्भजलाची पिशवी का फोडली नाहीस?' आता बोल.”

“तुझं नशीब बरं दिसत नाही. पण ते कायम तसं रहात नाही. देवावर विश्वास ठेव, बरे दिवस येतील लवकरच.”

“मी तोपर्यंत जगलो वाचलो तर" मी म्हटलं.

“चूप रे. काहीतरी बोलू नकोस. तुझं वजन कमी होऊ नये म्हणून सकाळी पावणे सात वाजता कँटीन उघडतं तेव्हा नाश्ता करायला जात जा.”

“तेव्हा फक्त उपमा मिळतो. मला नाही आवडत उपमा" मी म्हटलं.

“आता आवड निवड बाजूला ठेव थोडे दिवस. औषध समजून घे. वास आवडत नसला तर नाक दाबून खा. कळलं?”

“हो.”

“मेसवाल्याला सांगून ठेव की तू जेवायला पोचला नाहीस तर तुझं रात्रीचं जेवण रद्द असं लिहून ठेव. उगाच त्याला पैसे द्यायला काय झाडावर लागत नाहीत. मोकळा झालास की गेटबाहेर पाव-भाजीची गाडी लागते तिथे जाऊन खा.”

“रस्त्यावर खायचं?”

“मंगल रजिस्ट्रार आहे तोपर्यंत वेळ आली तर रस्त्यावर खायचं. पुढच्या वेळी तू मला दिसशील तेव्हा तुझं वजन वाढलेलं दिसलं पाहिजे. नाहीतर माझ्याशी गाठ आहे. समजलं?”

“होय.” मी म्हटलं. लग्नाच्या बायकोसारखी दम देते, तर निदान मला हो तरी म्हणावं ना तिने, असं माझ्या मनात आलं.

'येडपटा, तिने हो म्हणण्यासाठी तू आधी तिला विचारायला हवं ना!' प्रताप कुजबुजल्याचा मला भास झाला. तो कुठे दिसतो का ते मी बघेपर्यंत 'बाय' असं म्हणून ती निघूनही गेली.

माझं वजन वाढतं की नाही हे बघायला मिता थांबली नाही. एका आठवड्यानंतर ती परत आली.

“हे घे" तिने माझ्या हातावर एक डबा ठेवला. “गूळपापडीच्या वड्या आहेत. दिवसाला एक-दोन खात जा. कॅलरीज मिळतील.”

“गूळपापडी? अरे वा!” मी म्हटलं. “घरी जाऊन आलीस की काय?”

“छे रे. घरी कसली जातेय? बाबा येणार होते त्यांच्याबरोबर आईने दिल्यायत.”

तिच्या आईने तिच्यासाठी पाठवलेल्या वड्या तिने मला आणून दिल्या होत्या. माझ्या पापण्या थोड्याशा ओलसर झाल्या. तिला दिसू नये म्हणून मी डब्याकडे बघत तिला थँक्स म्हटलं. रफीसाहेब म्हणायचे तसं हा चांदका तुकडा कोणाच्या किस्मतमध्ये असेल कोण जाणे असं मनात येऊन पापण्या आणखी थोड्या ओलसर झाल्या. माझ्याकडे एक दृष्टीक्षेप टाकून तिने 'बाय' म्हटलं आणि मी वर बघेपर्यंत पटकन निघून गेली.

# २५

वर्ष ६, मार्च

मंगलला व्यवस्थापन कोणी शिकवलं होतं कोण जाणे. कदाचित ती हाउसमन असताना तिची रजिस्ट्रार तशी वागत होती असेल जशी मंगल माझ्याबरोबर वागायची. तिचा तिने विचार करून व्यवस्थापन शिकून घेतलं असेल असं मला वाटत नाही. काही असो, मला त्यामुळे विलक्षण त्रास व्हायचा खरा.

रात्री एखादी सिरियस पेशंट असली की मी त्या पेशंटबरोबर थांबून रहाणं हा अलिखित नियम होता. मी तसा रहायचो हे सर्वांना माहित होतं, अगदी मंगललाही. तरीही ती माझ्यावर विश्वास ठेवायची नाही.

"दर एका तासाने मला कॉल पाठवून तिची स्थिती कशी आहे ते कळवायचं" असं सांगून ती झोपायला जायची. मोबाइल फोनचा प्रसार तेव्हा आजच्या येवढा झालेला नव्हता. असता तरी मी लेबर वॉर्डातनंच कशावरून फोन केला, माझ्या खोलीतूनही केला असेल असं म्हणायला तिने कमी केलं नसतं. आजकाल माणसं दादरला फिरताना फोनवर सांगताना दिसतात ना, की मी आता ग्रँटरोडला आहे, घरी पोचायला आणखी अर्धा तास तरी लागेल? कॉल पाठवणं हे मोठं प्रकरण असायचं. कॉलबुकात काय ते लिहून ते ड्यूटीवर असलेल्या आयाबाईला द्यावं लागायचं. तीन-चार वेळा कॉल ने असं सांगितल्याशिवाय आयाबाई जागेवरून उठायला तयार होत नसे. नंतर तिला एक जोडीदारीण बरोबर लागायची, कारण एकट्या स्त्रीला हॉस्टेलपर्यंत जायची भिती वाटायची. हॉस्टेलच्या वॉचमनकडे कॉलबुक देऊन त्या दोघी तिथे थांबायच्या. वॉचमन कॉलबुक घेऊन डॉक्टरच्या खोलीवर जायचा. दार उघडेपर्यंत बडवायचा. मग त्या डॉक्टरने कॉल वाचून

त्यावर आपलं उत्तर लिहून दिलं की तो ते कॉलबुक आयाबाईकडे परत द्यायचा. मग त्या दोघी वॉर्डात परत यायच्या. त्यात काय लिहून आलंय ते बघून हाउसमन पुढे काय ते करायचा. मंगलच्या म्हणण्याप्रमाणे दर एक तासाने कॉल पाठवला, तर पहिला कॉल परत येईपर्यंत दुसरा कॉल पाठवायची वेळ यायची.

"डॉक्टर, दर एका तासाने काय कॉल पाठवता? इतर कामं केव्हा करायची आम्ही?" मला एकदा आयाबाईने विचारलं.

"अहो आयाबाई, मी काय हौसेनं कॉल पाठवतो का? डॉक्टर मंगलची आज्ञा आहे म्हणून मला कॉल पाठवावे लागतात. तिने तसं करायला लावलं नाही तर मी कशाला कॉल पाठवीन? पेशंटला काय ट्रीटमेंट द्यायची ते मला ठाउक आहे."

मी असं सांगितल्यावर माझ्यावर खसकलेल्या आयाबाईंची हृदयं द्रवली. मला रात्रीतनं एकाऐवजी दोन वेळा चहा मिळायला लागला. अर्धा तास झोपायसाठी चादर द्यायच्या ती इतरांना द्यायच्या त्यापेक्षा थोडीशी जास्त स्वच्छ मिळायला लागली.

"पण सिरियस पेशंट असताना रजिस्ट्रारने रात्री मधून मधून स्वतःसुद्धा तिला तपासून पाहिलं पाहिजे. मंगलला ते माहित नाही का?" रात्रपाळीच्या सिस्टरने मला एकदा विचारलं.

"अहो, तिचं लग्न झालंय. नवरा-बायकोला विवाहितांना देतात तशी एक खोली दिली आहे. नवऱ्याला सोडून तिला येववत नसेल" मी म्हटलं.

"असं कसं म्हणता तुम्ही डॉक्टर?" सिस्टर म्हणाल्या.

"किंवा नवरा तिला जाऊ देत नसेल" मी म्हटलं.

"काय हे डॉक्टर? आमची काय लग्नं झाली नाहीत? करतोच ना आम्ही रात्रपाळ्या? आणि बाहेर प्रॅक्टीस करणारे डॉक्टर रात्री इमर्जन्सी कॉल आला तर काय पेशंटला बघायला जात नाहीत काय?"

"सिस्टर, तुम्ही म्हणता ते एकदम बरोबर आहे" मी म्हटलं. "पण इतरांना समजतं ते या मंगल दांपत्याला समजत नसेल तर काय करणार?"

"तुम्ही तुमच्या सरांकडे तिच्याविरुद्ध तक्रार करा ना."

तिच्याविरुद्ध तक्रार करावी असं माझ्या मनात कधी आलंच नव्हतं.

"मनाला पटत नाही हो. ती वाईट वागते म्हणून मीही तसंच वागलो तर तिच्यात आणि माझ्यात फरक काय राहिला?" मी विचारलं. "परमेश्वर बघत असतो हो. तो सगळं संभाळेल."

'अभ्यासात हुशार आणि कामात चोख असला तरी विजयला व्यवहारज्ञान नाहीये. पुढे कसं होणार त्याचं?' असं त्या सिस्टर दुसऱ्या एका सिस्टरना सांगताना मी ऐकलं. त्यांचा परमेश्वरावर विश्वास नव्हता की परमेश्वराला अशा छोट्या छोट्या गोष्टींकडे बघायला वेळ नसेल असं त्यांना वाटत होतं ते एक परमेश्वरच जाणे.

मंगलचा प्रेमविवाह होता म्हणे. प्रेम असलं तरी त्रास अती झाला की माणूस पकणारच. मंगलचा नवरा तिला सहन करतो म्हणून मला त्याच्याबद्दल भयंकर आदर वाटायचा. रात्री झोपल्यावर दर तासाला दारावर जोरात 'धाड धाड' असा आवाज रोज नाहीतर एका दिवसाआड यायला लागल्यावर तो पकला असावा. एका रात्री मी हुकुमाप्रमाणे दर तासाला कॉल पाठवत होतो. परत आलेल्या सगळ्या कॉलवर मंगलच्या काहीही सुचना नव्हत्या, आणि सहीसुद्धा नेहमीपेक्षा वेगळी होती. बहुतेक तिच्या नवऱ्याने मॅनेजमॅंट स्वतःच्या हातात घेतली असावी आणि कॉल स्वतःच सही करून पाठवले असावे असं मला वाटलं. मी कॉलबुक ठेवून दिलं. सकाळी मंगल वॉर्डात राउंड घ्यायला आली.

"रात्री तू तासातासाला मी सांगितल्याप्रमाणे मला कॉल पाठवले नाहीस" तिने आरोप करण्याच्या सुरात म्हटलं.

"पाठवले होते ना" मी म्हटलं. "तू ते नोट करून परत पाठवलेस."

"कॉलबुक दाखव" तिने थोड्या अविश्वासाच्या सुरात म्हटलं. आता ह्याला खोटं सिद्ध केलं की काय काय करायचं याचं प्लानिंग तिच्या डोक्यात चालू असावं, कारण कॉम्प्यूटर बिझी असला की स्क्रीनवर अवरग्लास म्हणजे वाळूचं घड्याळ दिसतं तसा तिचा चेहरा दिसत होता. मी शांतपणे कॉलबुक काढलं आणि उघडून तिच्यापुढे धरलं. तिने ते निरखून पाहिलं. मागेपुढे असलेले इतर कॉल पाहिले. अवरग्लास अदृश्य झालं. पुनःपुन्हा 'पण तू असं का केलंस ते सांग' हाच प्रश्न विचारणारं तिचं तोंड इतकं घट्ट बंद झालं की दोन्ही बाजूचे टेंपोरॅलिस आणि मॅसेटर हे चेहऱ्याच्या बाजूला असणारे खालच्या जबड्याचे स्नायू आकुंचन पावलेले लांबूनही स्पष्ट दिसायला लागले. खोलीवर गेल्यावर तिचं आणि नवऱ्याचं काय संभाषण झालं असावं याची कल्पना करताना मला अवर्णनीय आनंद होत होता. तिने बहुतेक त्याला  पुनःपुन्हा 'पण तू असं का केलंस ते सांग' हाच प्रश्न विचारला असावा, आणि त्याने जे काही उत्तर दिलं असावं ते इतकं परिणामकारक असावं की तिने मला परत रात्री दर तासाला कॉल पाठव असं सांगितलं नाही.

# २६

वर्ष ६, ऑगस्ट

माझी पहिली हाउसपोस्ट संपली. ते मला जाणवलं त्याहून जास्त इतरांना जाणवलं.

"अरे विजय, सहा महिन्यांनंतर पहिल्यांदाच तुझ्या चेहऱ्यावर स्मितहास्य दिसतंय" हॉस्टेलमधून निघून वॉर्डच्या दिशेला जाताना अनिल भेटला आणि त्याने हे मोलाचं निरिक्षण केलं. तोपर्यंत मला पत्ताच नव्हता की माझ्या चेहऱ्यात एका रात्रीत किती फरक पडला होता.

"आज सहा महिन्यांचा छळ संपला रे" असं इतर काही स्पष्टीकरण न देता मी म्हटलं.

"अरे, आज काय आहे तरी काय? पूर्वीचा तू कायमचा हरवलास असं मला वाटायला लागलं होतं. परमेश्वराची कृपा तू पूर्वी होतास तसा दिसतोयस" प्रताप पहाटे इमर्जन्सी केस पाहून हॉस्टेलच्या दिशेने जाताना भेटला.

"मलासुद्धा तसंच वाटायला लागलं होतं बघ" मी म्हटलं.

गेले सहा महिने मला आमच्या युनिटच्या सात वॉर्डांमधले सहा वॉर्ड संभाळावे लागत होते. प्रसूतीशास्त्राचे सहा वॉर्ड्स पहिले सहा महिने संभाळण्याची जबाबदारी पहिली पोस्ट करणाऱ्या हाउसमनवर असायची. नंतरचे सहा महिने स्त्रीरोगशास्त्राचा एकच वॉर्ड संभाळावा लागत असे. हा प्रघात अतिशय चुकीचा होता खरा, पण तरुण वयात हिंमत असली तर कोणतीही आव्हानं सहज पेलता येत असत. जे कोणी कमकुवत असत ते कोलमडायचे. आमच्या बॅचच्या सुनिल आणि भरत यांनी पहिली हाउसपोस्ट सोडून घरी जाणं पसंत केलं होतं. घरच्यांनी जोर लावला म्हणून सुनिल पंधरा दिवसांनी परत रुजू झाला होता. तीन आठवडे त्याने तग धरला आणि मग तो परत

पोस्ट सोडून घरी गेला होता. घरच्यांनी बाबा पुता करून त्याला पुन्हा एकदा परत पाठवलं होतं. या वेळी त्याने जेमतेम दहा दिवस तग धरला आणि मग तो कायमचा निघून गेला होता. शेवटी त्याने जीपी सुरू केली होती. भरतने पहिला महिना संपतानाच पोस्ट सोडली होती. महिनाभर घरी काढल्यावर त्याच्या घरच्यांनी त्याला समजावून कामावर परत आणून सोडलं होतं. एक महिनाभर काम केल्यावर त्याचा उत्साह मावळला होता आणि त्याने चार महिने घरी राहून ब्रह्मविद्या, चिंतन, योगासनं वगैरे केली होती. आता दुसरी पोस्ट सुरू झाल्यावर तो कामावर आला होता.

या मंडळींना माझ्यासारखंच खूप काम पडलं असावं. बरोबरीने मंगलसारखा रजिस्ट्रार छळ करायसाठी त्यांच्याही राशीला असावा. शलाका आमच्याच वर्गातली मुलगी. तिचं नक्की काय झालं हे आम्हा मुलांना तेव्हा समजलं नव्हतं. सुनिल आणि भरतसारखी तीही पोस्ट सोडून गेली होती. तिच्या बाबांनी मंत्रालयात सचिव वगैरे मंडळींना भेटून तिची दुसऱ्या रुग्णालयात बदली करून घेतली होती. नीना आणि ती मैत्रिणी होत्या. शेवटी मला काय झालं ते प्रतापकडून समजलं होतं.

"अरे, शलाकाची रजिस्ट्रार एक नंबरची हलकट होती रे" त्याने मला एकदा विश्वासात घेऊन सांगितलं होतं. "तिला वेळेवर खायला प्यायला जाऊ देत नसेच, पण आंघोळसुद्धा करायला सोडत नसे. 'तू फर्स्ट पोस्ट करतेयस आणि आंघोळ करणार म्हणतेस? चल, बस इथे या पेशंटच्या नाडीवर हात ठेवून. उठलीस तर बघते' असं म्हणायची. अरे, बाथरूमला जायचं तर कोणालातरी पाच मिनिटं आपल्या जागी बसवून जावं लागायचं." ते ऐकून मला मंगलची अमंगल आठवण आली होती. "अरे मुलींना ..." एरवी पोपटासारखा बोलणारा प्रताप अडखळला.

"मुलींना काय?"

"अरे काय सांगू? जाऊ दे."

"सांग रे. माझं मन आता निर्ढावलंय. काही वाटणार नाही मला."

"मुलींना महिन्याची अडचण असते ना, त्यासाठीही ती तिला जाऊ द्यायची नाही" माझी नजर टाळत तो म्हणाला.

माझं मन निर्ढावलेलं आहे असं मला वाटत होतं ते चूक होतं ते मला समजलं.

"का असं वागतात रे माणसं?" तो म्हणाला.

"प्रताप, मला वाटतं प्रत्येक माणसात एक हिंस्त्र पशू असतो. सामान्यपणे त्या पशूला मोकळं सुटायला वाव मिळत नाही. पण हातात थोडीफार सत्ता आली की हाताखालच्यांचा छळ करून ही माणसं त्या पशूंचं समाधान करत असावेत."

"मला नाही वाटत रजिस्ट्रार झाल्यावर मी असा वागेन" तो म्हणाला.

"सभ्य माणसं असं वागत नाहीत. पण डॉक्टर झाले म्हणून सगळे जण सभ्य असतात असं नाही" मी म्हटलं. "आम्हाला असाच त्रास झाला होता, म्हणून आम्हीपण आता हाताखालच्यांना असाच त्रास देतो, असं म्हणणारेही काही जण आहेत. ज्यांनी त्रास दिला त्यांच्यावर जमत असेल तर सूड घ्यावा, इतरांवर तो राग काढणं म्हणजे आपल्यावरच्या अन्यायाचं उट्टं काढणं नव्हे हे समजायला काही प्रगल्भता लागते, ती सगळ्यांना नसते रे" मी म्हटलं.

"आपण काहीतरी केलं पाहिजे" तो म्हणाला.

"इंटर्नशिप करताना तुला नाश्ता आणायला पाठवायचे तेव्हा आपण ते बंद पाडलं होतं, आठवतंय ना? तसं पुन्हा करायचंय का?"

"आता ते बरं दिसायचं नाही."

"ते ज्यांचा छळ होतो त्यांनी केलं तर बरं दिसेल, आपण केलं तर नाही. आपण फक्त रजिस्ट्रार झाल्यावर नीट वागायचं येवढंच करू शकतो बघ."

“आपण घाबरून रहातो म्हणून अशा माणसांचं फावतं. आपण त्यांचं ऐकून घेता कामा नये" तो म्हणाला.

“काय करायचा विचार आहे? 'मला त्रास देऊ नकोस, नाहीतर कोथळा बाहेर काढीन' अशी धमकी द्यायची का?” मी विचारलं.

तो गप्पच राहिला.

“रमा मला एक वर्ष सिनियर आहे. तिला एम.डी.ला ॲडमिशन मिळाली नाही म्हणून डिप्लोमा करतेय. मुलगी स्वभावाने चांगली आहे, पण अभ्यासात तेवढी हुशार नाहीये. आता सहा महिन्यांनी तिची परिक्षा आहे. पुस्तकं तर ती वाचतेय. पण काही विषयांसाठी तिला चांगल्या नोट्स हव्या होत्या. तिने कुलदीपकडे मागितल्या. तो तिच्या युनिटचा रजिस्ट्रार आहे. हुशार आहे" पुढे बोलायला माझी जीभ अडखळली. मी गप्प झालो.

“मग? त्याने दिल्या?”

“नाही.” मी म्हटलं. "म्हणजे त्याने कदाचित दिल्या असत्या, पण तिने घेतल्या नाहीत.”

प्रताप गोंधळला.

“का?”

“जाऊ दे. नाही घेतल्या तिने नोट्स. नको म्हणाली.”

"तू माझी नजर टाळतोयस. नक्की काय झालं सांग" तो म्हणाला.

“नोट्सच्या बदल्यात त्याने तिच्याकडे काही घाणेरडी मागणी केली" मी म्हटलं.

“माझ्या जवळच्या व्यक्तीला कोणी असा त्रास दिला असता तर मी त्याचा कोथळा बाहेर काढला असता" तो संतापून म्हणाला. “कुलदीपचा काढू?”

“असे किती कोथळे बाहेर काढशील रे? पहिला कोथळा काढल्यानंतरच तुरुंगात जाशील.” मी म्हटलं. “वॉर्डात सगळयांच्या समोर तिने त्याच्या कानपटात मारली तेवढं पुरे झालं.”

“त्या जिगरबाज मुलीला सलाम. बक्षीस म्हणून तिला तुझ्या नोट्स दे वाचायला" तो म्हणाला.

“दिल्यायत" मी म्हटलं, “एव्हाना वाचून होत आल्या असतील.”

# २७

वर्ष ६, ऑक्टोबर २१

राजमाता रुग्णालयात सगळ्या प्रकारचे पेशंट यायचे. नगरपालिकेच्या इतर तीन रुग्णालयात यायचे त्यापेक्षा ते संख्येनेही जास्त असायचे आणि प्रकारांनीही. आमच्याकडून एम.डी. होऊन बाहेर पडणाऱ्याने पाहिला नाही अशा प्रकारचा आजार शोधूनही सापडला नसता. आमच्याकडे मानद डॉक्टर होते तेही कसलेले शल्यतज्ज्ञ होते. विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया ते इतक्या कुशलतेने करायचे, की विदेशांतून प्रकाशित होणारे शस्त्रक्रियांचे ॲटलासही फिके पडावे. माझं नशीब थोर म्हणून मला राजमातात ॲडमिशन मिळाली. माझं नशीब थोर म्हणून मला इंटर्नशिपमध्ये पदव्युत्तर अभ्यासाची पुस्तकं वाचून काढायची बुद्धी झाली. एखादी कठीण केस आली तर काय करायचं ते मला सहसा पुस्तकांत शोधावं लागत नसे. पूर्वी वाचलेलं आठवायचं. बॉसमंडळी ऑपरेशनं करताना काय करतात ते नुसतं बघून समजत असे, त्यांनी समजावून सांगितलं नाही तरी चालत असे. एखादं ऑपरेशन करताना पूर्वी वाचलं त्यातलं काही करायची गरज पडली तर ते करता येत असे. इंटर्नशिपमध्ये सगळीच पुस्तकं वाचून झाली होती असं नव्हतं. आता दुसऱ्या हाउसपोस्टमध्ये गायनॅकचा एकच वॉर्ड संभाळायची जबाबदारी माझ्यावर असल्यामुळे मला उरलेलं वाचन करायला वेळ मिळत होता. वेळ आनंदात चालला होता.

मला फावला वेळ आहे आणि माझं वाचन बऱ्यापैकी आहे असं लक्षात आल्यावर अहुजा मॅडमनी नर्सिंगच्या विद्यार्थिनींना व्याख्यानं द्यायचं काम माझ्यावर सोपवलं.

"काय रे विजय, तू नर्सेसची लेक्चर्स घेतोस म्हणे?" बातमी निखिलपर्यंत पोचायला वेळ लागला नाही.

"होय."

"मजा आहे लेको" असं म्हणून तो गेला.

"विजय, नर्सेसची लेक्चर्स तुला एकट्यालाच घ्यायची आहेत की सगळ्या आरेमोंना घ्यावी लागणार आहेत?" निखिलच्या पाठोपाठ हर्षद चौकशी करायला आला.

"मला एकट्यालाच घ्यायला सांगितलंय" मी म्हटलं.

"का रे?"

"अहुजा मॅडमनी ते ठरवलंय" मी म्हटलं. "का ते जाणून घ्यायचं असेल तर तू त्यांनाच विचारावंस."

"नको, राहू दे" तो अहुजा मॅडमबरोबर बोलायला फारसा उत्सुक दिसला नाही. "नर्सेसना काय काय शिकवतोस?"

"आपण शिकतो ते सगळं मी त्यांना शिकवतो" मी म्हटलं.

"त्यांना समजतं?"

"हो तर. एकदम हुशार असतात त्या. डिलिव्हरी तर किती चांगल्या प्रकारे करतात ते तू पाहिलंच असशील" मी म्हटलं.

हर्षद बाबालॉजीत साईड बाय साईड मास्टर्स करत होता असं तो सोडून डिपार्टमेंटमधले सगळे आरेमो म्हणत असत. बाबा म्हणजे नर्स आणि लॉजी म्हणजे शास्त्र. हर्षद रात्रपाळीच्या नर्सेसबरोबर वॉर्डात बसून गप्पा मारत असे, चहा पीत असे आणि त्यांना पटवण्याची स्वप्नं बघत असे. त्यांतल्या काही जणींना तो खरंच आपल्या प्रेमात पडला आहे असं वाटत असे असंही लोक म्हणत. त्याच्या गळयात धोक्याची घंटा बांधावी असाही एक मतप्रवाह होता. सध्या त्याचा

इंटरेस्ट बबली नावाच्या एका नर्समध्ये होता. तो बऱ्यापैकी सिरियस होता असं दिसत होतं, कारण तो तिच्यासारखा मल्याळी हेल काढून बोलायला लागला होता.

"तुला कधी वेळ नसेल तर तुला मदत म्हणून ती लेक्चर्स मी घेईन" त्याने ऑफर केली.

हर्षदने कधी कोणाला चांगुलपणातून मदत केलेली नव्हती. चामडीपण देणार नाही आणि दमडी तर नाहीच नाही अशा प्रकारचा तो माणूस होता.

"मी लक्षात ठेवेन हं" मी म्हटलं. "पण शिकवताना मजा येते रे. एखादं लेक्चर बुडवावं असं मला वाटत नाही. त्यांतल्या दोन-तीन नर्सेस तर काय छान उत्तरं देतात. माझ्या फेव्हरेट आहेत."

"कोण?" त्याने अपेक्षेप्रमाणे विचारलं.

"एक बबली म्हणून आहे..." मी थांबलो आणि त्याच्या चेहऱ्याकडे पाहिलं.

एक शब्दही न बोलता तो उठला आणि चालता झाला. खरं तर बबलीने माझ्या एकाही प्रश्नाचं उत्तर दिलं नव्हतं. कोणतीही नर्स माझी फेव्हरेट नव्हती, बबली तर नव्हतीच नव्हती. पण हर्षदला पाहिलं की असं काहीतरी बोलायची मला खुमखुमी येत असे. त्याला मार्गी लावलं आणि मी नर्सेसचं लेक्चर घ्यायला गेलो.

"गुड मॉर्निंग सर" मी वर्गात शिरल्यावर सगळयाजणी उठून उभ्या राहिल्या आणि एकसुरात म्हणाल्या.

"बसा, बसा" मी म्हटलं "मी वर्गात आल्यावर उठून उभं रहायचं नाही असं मी तुम्हाला सांगितलं आहे ना? मग तुम्ही का उभ्या रहाता?"

कोणीच काही बोललं नाही.

"तुम्ही उभ्या राहिल्या नाहीत तर तुमच्या मेट्रन तुम्हाला ओरडतील अशी भिती वाटतेय का तुम्हाला?"

"होय सर" पहिल्या रांगेतल्या एका मुलीने म्हटलं.

"मेट्रनला मी काही सांगू शकेन असं मला वाटत नाही. एकदा वॉर्डात खुर्ची नव्हती म्हणून मी टेबलावर बसून फॉर्म्र्स भरत होतो, तेव्हा मेट्रन राउंड घ्यायला आल्या आणि टेबलावर बसू नका, ते बरं दिसत नाही असं मला खडसावलं." सगळया जणी जोरात हसल्या. त्या लहान लहान मुली - हर्षद कसा काय बाबालॉजी करायचा त्यांच्याबरोबर, असं माझ्या मनात आलं. मी त्यांना शिकवायला सुरुवात केली. मेडिकल स्टुडंट्स शिकायचे त्याहून त्या मुली खूपच जास्त मन लावून शिकायच्या. आपण शिकवतो त्याचं चीज होतं असं त्यांना शिकवताना वाटायचं. मी एक तासाचं त्यांचं लेक्चर संपवलं. कोणाला काही अडचणी आहेत का असं विचारलं. कोणालाही काहीही अडलं नव्हतं असं समजल्यावर मी परत निघालो. बाहेर पडलो, तर समोरून मिता येताना दिसली.

"काय मिता, आज मोकळी दिसतेयस" मी म्हटलं.

"आज आमच्या ओटीची धुलाई आहे. त्यामुळे केसेस नाहीयेत. मला दुसऱ्या ओटीत पाठवलं नाहीये. म्हणून मी मोकळी आहे."

"चल, कॉफी प्यायला येतेस?" 'अ लॉट कॅन हॅपन ओव्हर कॉफी' वरचा माझा विश्वास केव्हाच उडाला होता. पण तिच्याबरोबर थोडा वेळ गप्पा मारल्या की खूप बरं वाटायचं.

तिने मनगटावरच्या घड्याळाकडे पाहिलं आणि म्हणाली, "चल."

कँटीनच्या दिशेने जाता जाता मी म्हटलं, "काहीतरी बिनसलंय."

"कुठे काय" ती म्हणाली.

"तू मोकळी आहेस, पण कॉफीबद्दल विचारलं तर घडयाळाकडे पाहिलंस. मोकळी आहेस हे येवढ्या पटकन विसरलीस? मोकळी आहेस तर माझ्या डिपार्टमेंटमध्ये अशी अर्ध्या सकाळी कशी पोचलीस? मला भेटायला आलीयेस, पण तसं म्हणत मात्र नाहीयेस. नक्की काहीतरी बिनसलंय. काय झालंय?"

"काही नाही रे" ती म्हणाली.

आम्ही कँटीनमध्ये पोचलो. कॉफी आली.

"मिता, खोटं बोलतेस तेव्हा तू सुद्धा खूप क्यूट दिसतेस बघ" मी म्हटलं.

तिने माझ्याकडे चमकून बघितलं. मी अनिलसारखं जिवणी फाकून नाही तरी बऱ्यापैकी स्मितहास्य केलं.

"काय रे, नर्सेसना शिकवायला वेळ मिळतो आणि मला भेटायला नाही मिळत?"

"निखिल तुझ्या ओटीत आहे, बरोबर?"

ती काही बोलली नाही.

"विजयची धमाल आहे, असंही म्हणाला, बरोबर?"

ती गप्पच राहिली.

"पन्नास मुलींना एका वर्गात शिकवणं आणि हर्षदसारखं रात्री वॉर्डात एकट्या नर्सबरोबर गप्पा मारत बसणं यांच्यात फार फरक आहे. तसलं काही तर ऐकलं नाहीस ना माझ्याबद्दल?"

तिने मान हलवली.

"आपल्या विद्यार्थ्यांबद्दल मनात किंवा आचरणात काही भलतंसलतं असणं हे शिक्षकांच्या नैतिकतेत बसत नाही, जसं पेशंट आणि डॉक्टरमधल्या संबंधांतही बसत नाही. तू मला ओळखतेस. मी काही भलतंसलतं करेन असं तुला वाटतं का?"

तिने मान हलवली. ती फारच अस्वस्थ झालेली दिसत होती. नेहमी मोकळेपणे बोलणारी मुलगी जेव्हा फक्त मान हलवून संभाषण करते तेव्हा तिला आपण बोलायला तोंड उघडलं तर आवाज दगा देईल अशी भिती वाटत असते असा माझा सिद्धांत होता.

"तू खूपच अस्वस्थ दिसतेयस. माझं मन कुठे तरी हरवलं असं माझ्या लक्षात आलं तर मी तुला सर्वात आधी सांगेन. नक्की."

तिने माझ्याकडे परत एकदा चमकून पाहिलं.

"आणि आता अस्वस्थतेवरचं रामबाण औषध मागवूया का?"

तिने माझ्याकडे प्रश्नार्थक मुद्रेनं पाहिलं.

"आइसक्रीम" मी म्हटलं.

"चल रे, तुझं आपलं काहीतरीच असतं" ती म्हणाली.

वाचा परत आली हे सुचिन्ह दिसत होतं. मी एका किंवा जास्त नर्सेसमध्ये इंटरेस्ट दाखवतोय म्हटल्यावर ती अस्वस्थ झाली म्हणजे तिला माझ्यात इंटरेस्ट वाटत होता का? की आपली मैत्रीच्या भावनेतून वाटणारी माझी काळजी? मी खिशात हात घातला. अंगठी असती तर कदाचित धीर करून तिच्यापुढे धरली असती. मनात येईल तेव्हा खिशात अंगठी सापडायला तो काय हॉलीवूडचा चित्रपट होता? मी अंगठी नाही तर नाही, एक चॉकलेट बाहेर काढलं आणि तिच्यापुढे धरलं. तिने ते पटकन घेतलं, त्याचं वेष्टन काढून चॉकलेट तोंडात टाकलं आणि वेष्टन पर्समध्ये ठेवून दिलं.

"तू कधीही भेटलीस तर तुला द्यायला होईल म्हणून मी नेहमी खिशात एक चॉकलेट ठेवूनच फिरतो" मी म्हटलं.

ती मनापासून हसली आणि म्हणाली, "चल रे, तुझं आपलं काहीतरीच असतं."

# २८

वर्ष ६, डिसेंबर ९

गायनॅक ओटीत दोन ऑपरेशनांच्या मध्ये हर्षद आणि त्याचा लेक्चरर प्रवीण ग्लोव्हबॉल खेळत होते. ग्लोव्हबॉल हा साधारण व्हॉलीबॉलसारखा खेळ होता, जो बहुतेक प्रवीणनेच बनवला असावा. ऑपरेशनच्या ग्लोव्हमध्ये फुग्यासारखी हवा भरली की तो छान फुगत असे. अर्थात त्याची पाच बोटं सुद्धा फुगायची. त्यामुळे तो बॉलसारखा काही दिसत नसे. हा फुगा व्हॉलीबॉलसारखा जड नसायचा. व्हॉलीबॉलच्या कोर्टावर नेट लावतात तसं ओटीत नेट लावायलाही जागा नव्हती. एक काल्पनिक नेट गृहित धरून त्याच्या दोन बाजूंना दोन खेळाडू उभे रहायचे. एकजण तो ग्लोव्हबॉल हाताने नेटवरून दुसऱ्या बाजूला मारायचा. कितीही जोरात मारला तरी तो अगदी सावकाश तरंगत दुसऱ्या बाजूला जायचा. मग तिथून दुसरा खेळाडू बॉल नेटवरून मारायचा, तो तरंगत पहिल्याच्या दिशेला यायचा. खेळाचा बहुतेक वेळ तो बॉल आपल्या बाजूला केव्हा पोचतो त्याची वाट बघण्यात जायचा. तरीही प्रवीण आनंदात होता. तो आनंदात होता त्यामुळे हर्षदही आनंदात असल्यासारखा दिसत होता. मला ओटीचं रजिस्टर आणायच्या कामावर आमच्या लेक्चररने पाठवलं होतं. मी तिथे पोचलो तेव्हा खेळ रंगात आला होता. स्कोर ०-० होता कारण बॉल जमिनीवर पडतच नसे. अगदी कोणी शॉट मारला तरीही बॉल येवढ्या हळू हळू जमिनीकडे जायचा, की खेळाडू कितीही स्लो असला तरी बॉल थांबवून परत विरुद्ध बाजूला मारू शकत असे.

"काय विजय, एक गेम खेळणार का?" प्रवीणने ऑफर दिली.

"नाही रे बाबा. रजिस्टर आण अशी मला आज्ञा आहे" मी म्हटलं.

"कोणी पाठवलंय तुला? सुनीलाने?" सुनीला माझ्या युनिटची लेक्चरर होती.

"हो" मी म्हटलं.

"मग जा बाबा तू. तुला उशीर झाला तर ती तुला पिसडून खाईल. 'विजय, तुला नुसतं रजिस्टर आणायला पाठवलं आणि तू इतका वेळ काय करत होतास? मी सरांना सांगीन हं' सुनीलासारखी मान वेळावत त्याने सुनीलाच्या आवाजात हे वाक्य म्हटलं. सगळे जण खुश होऊन हसले. सुनीला जवळपास नसल्यामुळे मीही जोरात हसलो असतो, पण तिचे हेर जाऊन खबर देतील म्हणून मी माफकसं स्मितहास्य केलं."

रजिस्टर घेऊन मी निघालो. तो म्हणाला ते खरं होतं. सुनीलाला हाउसमनला पिसडायला खूपच आवडायचं. जसा मंगलचा प्रेमविवाह होता, तसा सुनीलाचाही वर्गमित्राबरोबर प्रेमविवाह होता. प्रेमात माणसं आंधळी होतात असं म्हणतात, ते या दोघींच्या नवऱ्यांकडे बघून कोणालाही पटलं असतं. आपल्या गर्लफ्रेंड्स आपल्याच वर्गात असताना, त्यांचे स्वभाव त्यांच्या लक्षात आले नसतील हे शक्यच नव्हतं. जे सगळ्या दुनियेला दिसत होतं ते दिसत नाही म्हणजे ते नक्कीच आंधळे झाले होते. ज्या बाया आपल्या हाताखालच्यांना अशा पिसडायच्या, त्या मुठीतल्या नवऱ्यांना पिसडत असणारच. त्या नवऱ्यांचं ते गतजन्मीचं संचित बोलत असणार असा माझा ग्रह होता. नवऱ्यांना त्यांच्या इतर काही गोष्टी खूप आवडत असतीलही कदाचित, पण माझं तसं काही नव्हतं. म्हणून मी पिसडून न घेता ते रजिस्टर तिला वेळेवर द्यावं म्हणून घाईघाईने परत गेलो.

सुनीला माझी वाट पहात असावी. तिने रजिस्टर ताब्यात घेतलं आणि मला दुसरं काम दिलं.

"विजय, तुझ्या वॉर्डात मी तीन पेशंट ॲडमिट केल्या आहेत. पहिलीला ओव्हरीचा ट्यूमर आहे, दुसरीला गर्भाशयाचा फायब्रॉइड आहे, तिसरीला मुलं होत नाहीत म्हणून गर्भनळया

जोडायचं ऑपरेशन करायचं आहे. तिघीही माझ्या ओळखीच्या आहेत. येत्या ओटीत मी त्यांची ऑपरेशनं करायला भडभडे सरांना सांगणार आहे. त्या तिघींच्या ऑपरेशनसाठी लागतात त्या टेस्ट्स तू करून घे."

लेक्चररांना खाजगी प्रॅक्टीस करायची परवानगी नव्हती. पण सुनीलाच्या सासऱ्यांचं नर्सिंग होम होतं. तिकडे तिचा नवरा आणि ती गुपचूप प्रॅक्टीस करत असत हे आम्हाला माहित होतं. ज्या पेशंटांना तिथला खर्च परवडत नसेल त्यांना ती राजमातात आणत असे. पण भडभडे सरांना त्यांची ऑपरेशनं करायला सांगण्याचं कारण मला समजलं नाही. कारण समजलं नाही तरी आपल्याला काय करायचंय ते मला समजलं होतं. मी त्या कामाला लागलो.

दुपारच्या जेवणाच्या वेळी परवेझ भेटला. कुठच्याही अडचणीवर त्याच्याकडे उपाय असायचा. लेक्चररांमध्ये तो सगळयात सिनियर होता. सगळया बॉस मंडळींची अंडीपिल्ली त्याला माहित होती. त्याला मी सुनीलाच्या या तीन पेशंटांबद्दल सांगितलं.

"प्रायव्हेटमध्ये स्वतः पैसे घेतलेले असताना ती भडभडे सरांना तिघींची ऑपरेशनं करायला सांगणार आहे, त्यातली गोम मला कळली नाही" मी म्हटलं. "तुला काय वाटतं?"

तो हसला.

"का हसलास रे?"

"तोंडावरून वाटते तशी सुनीला साधी नाहीये. एकदम पोचलेली आहे. ही तिची एकदम प्रगत अशी चाल आहे. ती काय करणार हे मी तुला आत्ता सांगू की कागदावर लिहून देऊ? तू तो कागद बंद लिफाफ्यात ठेव आणि ऑपरेशन थिएटर संपलं की उघडून जे घडलं तसंच मी लिहीलंय की नाही ते ताडून बघ."

"आत्ताच सांग. मी कोणालाही सांगणार नाही" मी म्हटलं.

"आधी मला सांग येत्या ओटीच्या यादीत भडभड्यांची एखादी नोटकेस आहे का?"

"एक पेशंट आहे" मी म्हटलं. खाजगी प्रॅक्टीसमधून राजमातात आणलेल्या पेशंटला नोटकेस असं म्हणायचे.

"भडभडे सकाळी आले की प्रथम आपली नोटकेस करतील. मग सुनीला त्यांना त्या तिघींमधली एक केस करा असं म्हणेल. ते हो म्हणतील. पेशंटला ॲनास्थेशिया देऊन झाला, की भडभडे म्हणतील, 'सुनीला, तूच कर ही केस'. मग आज्ञाधारक मुलासारखं तोंड करून सुनीला ती केस करून टाकेल. मग ती सरांना आपली दुसरी केस करा अशी विनंती करेल. ते हो म्हणतील. तिला ॲनास्थेशिया देऊन झाला की ते म्हणतील..."

"सुनीला, तूच कर ही केस, होय ना?"

"बरोबर" तो म्हणाला.

"मग तिसऱ्या केसच्या बाबतीत हेच होईल" मी म्हटलं.

"तू हुशार आहेस" परवेझ म्हणाला.

"पण येवढं सगळं करायची काय गरज आहे? तिने सरांना केस करा असं म्हणायचं, मग सरांनी तिला ती केस करायला सांगायचं आणि तिने ती करायची. हा द्राविडी प्राणायाम वाटतो रे."

"या समीकरणातला एक घटक तू लक्षात घेतलेला नाहीस" तो म्हणाला.

"कोणता?"

"एमेमेम." एमेमेम म्हणजे एम.एम.मेहता. ते आमच्या युनिटमध्ये कनिष्ठ मानद डॉक्टर होते.

"भडभडे दर ओटीत दोन केसेस ऑपरेट करतात, म्हणून एमेमेमना सुद्धा दोन केसेस करायच्या असतात. सुनीलाला त्यांना आपली एकही केस करायला द्यायची नसणार बघ. भडभड्यांनाही एमेमेम फारसे आवडत नाहीत. त्यांना एकच केस करायला द्यायची आणि सुनीलाला तिच्या तीन केसेस करायला द्यायच्या तर हा एकच मार्ग आहे."

"पण ..."

"ओटी होऊन तर जाऊ दे. मी सांगितलं तसं होतं की नाही ते बघ. मग पुढे काही प्रश्न उरले तर मला विचार" तो म्हणाला.

मी मान डोलावली.

परवेझचा शब्द न् शब्द खरा झाला. सगळे जण म्हणत की परवेझ द्रष्टा होता. मीही त्याला मानत असे. पण हे म्हणजे गारुडच वाटत होतं. मी त्याला संध्याकाळी गाठलं.

"काय, मी म्हटलं तसं झालं ना?" त्याने विचारलं.

"हो" मी म्हटलं. "आता मला दोन प्रश्न पडलेयत."

"विचार."

"पहिला प्रश्न म्हणजे तुला ज्योतिष समजतं का? इतकं अचूक सांगायला कसं काय जमलं तुला?"

'हे दोन प्रश्न झाले, एक नाही' असं तो म्हणाला नाही. आमच्या डिपार्टमेंटमधली इतर माणसं आणि परवेझ यांच्यामध्ये अनेक फरक होते, त्यांतला हा एक.

"अरे, सोपं आहे. इतिहासाची पुनरावृत्ती होत असते. सुनीलाने ही युक्ती पूर्वी बऱ्याचदा वापरून झालेली आहे."

"ओके. आता दुसरा प्रश्न म्हणजे भडभडे सुनीलाला हवं ते का करतात?"

"डोळे उघडे ठेवून वावरला असतास तर तुला हा प्रश्न पडला नसता" तो म्हणाला. "तिच्या पार्श्वभागाला चिमटा काढतांना त्यांना तू कधी पाहिलं नाहीस का?"

मी शरमलो. तसं काहीतरी पूर्वी पाहिलेलं मला आठवलं. तो भास असावा असं समजून मी ते तेव्हा सोडून दिलं होतं.

"तुमच्या युनिटमधल्या त्या दोघांना नाही तरी इतर कोणाला तरी या गोष्टीची शरम वाटतेय ही आनंदाची गोष्ट आहे" तो म्हणाला.

# २९

वर्ष ६, डिसेंबर २४

अॅनास्थेशियाच्या आरेमोंना एकामागून एक करत सगळ्या ऑपरेशन थिएटरांत काम करायला पाठवत असत. एक दिवस मिता माझ्या ओटीत आली. मला त्याचा पत्ताच नव्हता. नेहमीप्रमाणे पेशंटला ओटीत घ्यायचं, तिचं ऑपरेशन पार पडलं की तिला ऑपरेशन टेबलावरून ऑब्झर्व्हेशनच्या कक्षात न्यायचं आणि पुढच्या पेशंटला टेबलावर घ्यायचं अशा धावपळीत मी होतो. अशा गोष्टींमध्ये विलंब झाला तर हाउसमनला धारेवर धरलं जायचं. असं वारंवार घडायला लागलं की त्या हाउसमनला ऑपरेशनं करायला मिळणं कमी कमी व्हायचं. याचं कारण त्याला उगाच धावडवणं किंवा छळणं हे नव्हतं. दुपारी एक वाजल्यानंतर नवी पेशंट ऑपरेशनसाठी घेता येत नसे. मग उरलेल्या पेशंटांना पुढच्या ओटीपर्यंत थांबावं लागत असे. याचं दुसरं कारण असं होतं की वरिष्ठ डॉक्टरांचं ऑपरेशनं करून समाधान झाल्याशिवाय आरेमोंना ऑपरेशनं करायला मिळत नसत. जर आजच्या ओटीत त्यांचा क्रमांक लागला नाही, तर पुढच्या ओटीत तो क्रमांक राखून ठेवला जात नसे. तेव्हा परत वरिष्ठांपासून ऑपरेशनं करायला सुरुवात होत असे. ऑपरेशनांसाठी जो वेळ आवश्यक असायचा, तो काही कमी करता येत नसे. त्यामुळे पेशंट ओटीत घेणं आणि बाहेर काढणं अशा गोष्टींतच काय तो वेळ वाचवता येत असे. त्या दिवशी मला स्त्रीनसबंदीचं म्हणजे 'टीएल'चं ऑपरेशन करू द्यायचं ठरलेलं होतं. पण जर वेळ पुरला नसता, तर मात्र मला ते ऑपरेशन करायला मिळालं नसतं.

"काय विजय, लक्ष कुठे आहे? मी ओटीत आहे म्हटलं" मिताचा आवाज कानांत पडला आणि मी चमकलो. ती ओटीत असणं मला अपेक्षित नव्हतं.

"अरे, आजपासून तुला आमच्याकडे पोस्टिंग मिळालंय का?" मी विचारलं. "दोन महिने?"

"आजपासून नाही. चांगले पाच दिवस झाले मला इथे येऊन. आणि दोन नाही, एकच महिना" ती म्हणाली.

तोंडावर मास्क असूनही माझं तोंड पडलेलं तिच्या लक्षात आलं असावं.

“तू भेटतोस कुठे? कॉरिडॉरमध्ये दिसलास तरी एक्सप्रेस ट्रेनसारखा सुसाट असतोस. तुला विजय एक्सप्रेस म्हणतात, माहित आहे?”

“हं?” हे मला नवीनच होतं.

“हं!” ती म्हणाली.

“अगं, प्रसूतीशास्त्राची पोस्ट म्हणजे धावपळीची पोस्ट असते.  कधी मूल गुदमरलेलं असतं, कधी खूप रक्तस्राव असतो, कधी बाई अडलेली असते. धावपळ केली नाही तर एखादे वेळी मुलाचा नाहीतर मातेचा जीव जाऊ शकतो. हौस म्हणून नाही मी धावपळ करत.”

“ते बरोबर. पण आयुष्यभर असाच धावत राहणार आहेस का?”

“मिता, आपल्याकडे करावी लागणारी ही धावपळ आहे ना, ती व्यवस्थापनातल्या त्रुटींमुळे जास्त आहे. जर सर्व गोष्टी नीट विचार करून, योजना आखून केल्या तर बरीचशी धावपळ कमी होईल. काही काही गोष्टी अनपेक्षितपणे घडत असतात. कितीही योजनाबद्ध काम केलं तरी अशा आपत्कालीन घटना घडतच राहणार आणि त्यांच्यासाठी धावपळ करत रहावी लागणारच. तुझ्या डिपार्टमेंटचं बघ. कार्डिॲक अरेस्ट, एम्बॉलिझम, अन्हिद्रिया असं काही घडलं तर तुला अशी धावपळ करावी लागत असेलच ना? आपण डॉक्टर व्हायचं ठरवलं तेव्हाच धावपळ आपल्या नशीबी आली बघ.”

“खरं आहे तू म्हणतोस ते" ती म्हणाली. "कसा आहेस?"

"चाललंय" मी म्हटलं. एम.बी.बी.एस. करताना रोज भेटणारे आम्ही आता वेगवेगळया डिपार्टमेंटांमध्ये गेल्यावर महिना महिना भेटत नसू. मग कधी भेटलो की कसा आहेस आणि कशी आहेस असं संभाषण व्हायचं.

'ओटीच्या हिरव्या कपड्यात, डोक्यावर टोपी आणि तोंडावर मास्क असूनही छान दिसतेयस' असं म्हण तिला', खूप दिवसांनी प्रताप कानांत पुटपुटल्याचा मला भास झाला. मला तसं म्हणायचं धाडस झालं नाही, कारण एक तर मला ते कधीच होत नसे, आणि दुसरं म्हणजे आजूबाजूला तिच्या आणि माझ्या डिपार्टमेंटची येवढी माणसं असतांना माझी काय बिशाद होती असं काही म्हणायची?

"जाते. माझी केस इंड्यूस होतेय" ती म्हणाली. त्याच केससाठी मला आमच्या सरांच्या मदतनीसाची भूमिका बजावायची होती. म्हणून मी सुद्धा वॉश अप व्हायला गेलो.

ऑपरेशन चालू असताना मधूनच तिच्याकडे एखादा चोरटा दृष्टीक्षेप टाकण्यापलिकडे मला काही जमलं नाही. माझ्या 'टीएल'ला स्पायनल ॲनास्थेशिया द्यायचं काम तिच्यावर आलं, कारण टीएल आणि त्याचा ॲनास्थेशिया ही कामं लिंबूटिंबूंची समजली जायची, आणि आपापल्या डिपार्टमेंटांमध्ये आम्ही दोघं लिंबूटिंबू होतो. मिता वॉश अप होऊन आली. तिने हिरवा निर्जंतुक गाउन आणि ग्लोव्हज घातले. मामाने पेशंटला स्पायनलसाठी पोझिशन दिली. मिताने जंतूनाशकं लावून पेशंटची पाठ साफ केली आणि तिच्यावर निर्जंतुक टॉवेल पसरला. इंजेक्शन देण्यासाठी तिने हातात सिरिंज घेतली आणि तिचं लक्ष माझ्याकडे गेलं. मी डोळयांनी तिला 'आगे बढो' केलं. पेशंटच्या पाठीत सुई टोचताना क्षणभर तिचा हात थरथरला. पण नंतर मात्र तिने स्थिर हातांनी स्पायनल दिला. मामाने पेशंटला आडवं झोपवलं. मिता स्पायनलची लेव्हल कुठपर्यंत पोचली ते बघत होती तोपर्यंत मी वॉश अप होऊन आणि गाउन आणि ग्लोव्हज घालून आलो. मला ऑपरेशनसाठी मदत करणारी स्टुडंट बाबा तयार उभी होती. मी पेशंटच्या पोटाला जंतूनाशकं

लावली. मग बाबाने आणि मी मिळून पेशंटच्या पोटावर निर्जंतुक टॉवेल पसरले. मामाने ऑपरेशनची इंस्ट्रूमेंट्स ठेवलेली मेयो ट्रॉली बाजूला आणून लावली.

"मी बघतेय म्हणून टेन्शन घेऊ नकोस" माझ्या बाजूने जाताना मिता पुटपुटली. मी तिच्याकडे बघितलं. मास्कच्या मागून तिचे डोळे मिश्किलपणे हसले. मला लगेच जरासं टेन्शन आलं.

"सिस्टर, मॉप आणि इंस्ट्रूमेंट काउंट" मी म्हटलं. बाबाने मला घेतलेली सगळी इंस्ट्रूमेंट्स आणि मॉप्स मोजून दाखवले.

“टूथ्ड फोर्सेप्स" मी म्हटलं. "सेन्सेशन बघतोय" असं म्हणून बाबाने दिलेल्या फोर्सेप्सने मी पेशंटच्या पोटावरची त्वचा बेंबीजवळ पकडली. पेशंटला दुखलं नाही.

"स्कालपेल" मी म्हटलं. बाबाने माझ्या हातात स्कालपेल ठेवलं. मी पेशंटच्या पोटावर स्कालपेलने कापण्यापूर्वी पेशंटच्या डोक्याच्या पलिकडे तिच्या नाडीवर बोट ठेवून उभ्या असलेल्या मिताकडे पाहिलं. ती माझ्याकडेच बघत होती. मी वळलो आणि पेशंटच्या पोटाची त्वचा दीड सेंटीमीटर कापली.

"सिस्टर, मॉप" मी म्हटलं. तिने मला मॉप दिला. मी कापलेल्या जागी आलेलं रक्त टिपलं. आणि नंतर मी मिताला विसरलो. पोट उघडून, दोन्ही गर्भनलिका बांधून पोट शिवून बंद केल्यावर पोटाला ड्रेसिंग लावलं, आणि मग नेहमीच्या सवयीने म्हटलं, "सिस्टर, थँक यू", मग पेशंटच्या डोक्याच्या दिशेला वळून म्हटलं "ॲनास्थेटिस्ट मॅडम, थँक यू" आणि मग माझ्या लक्षात आलं की नेहमी ॲनास्थेटिस्ट मॅडम असायच्या तिथे मिता उभी होती. मी गोंधळलो.

"यू आर वेलकम" मिता म्हणाली.

ओटी संपली आणि आम्ही बाहेर पडलो, तेव्हा मला मिताने गाठलं.

"काय रे, मला ॲनास्थेटिस्ट मॅडम म्हणालास अं?"

"अग, मुद्दाम नाही म्हटलं. ते ऑपरेशन करताना तू ॲनास्थेशिया दिला होतास आणि तिथे उभी राहून माझं ऑपरेशन बघत होतीस ते माझ्या लक्षात राहिलं नाही. मग ऑपरेशन संपल्यावर नेहमीप्रमाणे सवईने मी 'ॲनास्थेटिस्ट मॅडम, थँक यू' असं म्हटलं. सॉरी."

"नाही रे, गंमत केली. मी म्हणते ते ऐकून उगाच चढून जाऊ नकोस. तू ऑपरेशन फार छान केलंस. तुझं सगळं लक्ष त्यात केंद्रित झालेलं होतं. मला असं वाटतं की तू ना खूप फोकस्ड आहेस. ऑपरेशन करतानाची तुझी एकाग्रता आपल्या बॅचच्या, किंवा रजिस्ट्रार झालेल्यांच्या बॅचच्या आरेमोंपेक्षा खूपच जास्त दिसते. मी गेलं वर्षभर बघतेय ना सगळयांना.

“मी ऑपरेशन करताना तुला विसरलो म्हणून शालजोडीतला मारत नाहीयेस ना?” मी विचारलं.

"नाही रे. मनात आलं ते सांगितलं. तू आहेस ना, तसाच नेहमी रहा.”

आमचं संभाषण संपताना मिता असं काहीतरी जडजाड बोलली आणि माझं मन चरकलं. ती निरोपाचं वगैरे तर बोलत नव्हती ना?

# ३०

वर्ष ७, जानेवारी ५

मी जसजसा सिनियर होत गेलो, तसतशी माझ्यावरच्या फुकटच्या कामांत भर पडायला लागली. अहुजा मॅडमनी नर्सिंगच्या विद्यार्थिनींना शिकवण्याचं आपलं काम माझ्या गळयात मारलं होतं. त्याचे येणारे पैसे मात्र त्यांनी स्वतःकडेच ठेवणं पसंत केलं होतं. मला शिकवायला आवडायचं म्हणून मी बिनपैशांचं शिकवत राहिलो होतो. शिक्षणाची ओढ असलेल्या आणि वयानुसार तल्लख मेंदू असणाऱ्या विद्यार्थ्यांना शिकवताना मजा यायची, ती थोड्याशा पैशांपेक्षा खूप जास्त मोलाची होती म्हणून मी शिकवायचो. माझे हे विचार एण्डींना कसे कळले, की कळलेच नाहीत ते काही मला समजलं नाही. काही असो, त्यांनी एम.बी.बी.एस. च्या विद्यार्थ्यांना शिकवण्याचं काम माझ्या डोक्यावर टाकलं.  एण्डी म्हणजे डॉक्टर नीना दोशी. त्या पारकर सरांच्या हाताखाली कनिष्ठ मानद प्रोफेसर होत्या. अहुजा मॅडमनी मला त्यांच्या वाटणीचा नर्सिंगचा सगळा अभ्यासक्रम शिकवायचं काम दिलं होतं. एण्डींना कॉलेजने एम.बी.बी.एस.ची चार-पाचच लेक्चर्स दिलेली होती. लेक्चर्सचा आकडा पाहिला तर एण्डींनी मला दिलेलं काम अहुजा मॅडमनी दिलेल्या कामापेक्षा खूपच कमी होतं. पण एम.बी.बी.एस.च्या विद्यार्थ्यांना शिकवण्याचं काम जास्त कठीण होतं. नर्सिंगच्या स्टुडंट्सना शिक्षकांबद्दल आदर असायचा. शिक्षकांची जमेल तेव्हा टर उडवायच्या इच्छेने त्या लेक्चरला येत नसत. काहीतरी विचित्र प्रश्न विचारून शिक्षकांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न करत नसत. लेक्चर चालू असताना दुसऱ्याच गोष्टींत मन रमवत नसत. एम.बी.बी.एस.च्या विद्यार्थ्यांना या सगळया कला अवगत असत. त्यांना शिकवणं हे खूपच आव्हानात्मक होतं. नशीबाने मला त्यांच्या सगळया नाड्या बरोबर ठाउक होत्या, कारण दोनच वर्षांपूर्वी मी त्यांच्यासारखाच विद्यार्थी होतो. नाहीतर मी काही

त्यांच्यापुढे तग धरला नसता. एण्डींना एरवी माझं कौतुक करण्यासाठी काही गोष्ट सुचली नसली तरी आपली लेक्चर्स घेण्यासाठी मात्र मी त्यांना योग्य वाटत होतो.

“विजय, माझी एम.बी.बी.एस.च्या विद्यार्थ्यांसाठी चार लेक्चर्स असतात. त्यांतलं पहिलं आज दुपारी बारा वाजता आहे. ते मी तुला घेऊ देतेय.”

घेऊ देतेय? म्हणजे मला काम देणं हे माझ्यावरच उपकार हं?

“असं आव्हानात्मक काम करून तुझा शैक्षणिक आणि वैयक्तिक विकास होईल. माझ्या रजिस्ट्रारलाही मी हे काम देत नाहीये, कारण तू खूप पुढे जाशील असं मला वाटतंय. लेक्चरचा विषय सिझेरियन सेक्शन हा आहे. बेस्ट ऑफ लक.”

त्यांच्या रजिस्ट्रारने त्यांना चक्क नाही असं सांगितलं असावं, नाहीतर त्या माझ्याकडे आल्या नसत्या.

“पण मॅडम, आता लेक्चरला फक्त अर्धा-एक तासच राहिलाय. येवढ्या थोड्या वेळात लेक्चरची तयारी करणं जरा कठीण जाईल" मी म्हटलं.

“अरे, तू हुशार आहेस. तुला तयारी करायची काय गरज आहे? जा, मुलांपुढे उभा रहा, लेक्चर दे, आणि परत ये. माझी खात्री आहे तुला काहीही अडचण येणार नाही" असं म्हणून बाई गुल झाल्या.

मुलांना त्यांचं लेक्चर मी घेतलेलं कितपत मानवलं असतं कोण जाणे. नाही म्हटलं तरी त्या मला वीसएक वर्षं सिनियर होत्या. इतक्या वर्षांचा अनुभव त्यांच्या गाठीला होता. विद्यार्थ्यांना त्यांच्या ज्ञानाचा फायदा नक्कीच झाला असता. त्यांनी शिकवलं असतं ते सगळं मी शिकवलं असतं याबद्दल माझ्या मनात शंका नव्हती, कारण माझं वाचन तसं चांगलं होतं. नव्हता तो अनुभव. दुसरा हरकतीचा मुद्दा असा होता, की काही काही मुलं त्यांचं लेक्चर बघायला जात असत. लेक्चर

बघणं म्हणजे त्यांना बघणं. एण्डी तशा खाऊन पिऊन सुखी दिसत असत. का कोण जाणे, त्यांना त्यांचा पदर जागेवर ठेवणं अजिबात जमत नसे. तो सरकून खाली पडलाय हे त्यांना बहुधा शिकवण्यावर लक्ष केंद्रित असल्यामुळे बराच वेळ लक्षात येत नसे. आमच्या बॅचची मुलंसुद्धा त्यांचं लेक्चर बघण्यासाठी मोठ्या संख्येनं जात असत, आणि सिनियर मंडळीही तसं करत असत असं मी ऐकून होतो. तर आपण फी भरलेली असताना हा आरेमो, त्यातून पुरुष आरेमो त्यांच्याऐवजी शिकवायला आला म्हणजे आपले फीचे पैसे वसूल झाले नाहीत असं त्या मंडळींना वाटणं साहजिक होतं. अर्थात एण्डींच्या इच्छेप्रमाणेच मी लेक्चर घ्यायला जात असल्यामुळे तो माझा प्रॉब्लेम नव्हता. माझा मुख्य प्रॉब्लेम अर्ध्या तासात लेक्चरसाठी मानसिक तयारी कशी करायची हा होता. अडचणीच्या वेळी एकच माणूस कामी यायचा, तो म्हणजे परवेझ. मी त्याला ओटीत जाऊन भेटलो. मिता दिसली, पण तिला हाय करण्याहून जास्त वेळ देता येणं शक्य नव्हतं. मी माझा प्रॉब्लेम परवेझला समजावून सांगितला. ऑपरेशन करता करता त्याने मला युक्तीच्या चार गोष्टी सांगितल्या. तेवढ्या तयारीवर मी बारा वाजता लेक्चर घ्यायला पोचलो.

परवेझच्या शब्दात सांगायचं तर वर्गात सुमारे तीस एक राक्षस आणि पंचवीस एक पऱ्या बसल्या होत्या. एक दोन अभ्यासू मुलं वह्या उघडून पेनं सरसावून बसलेली होती. मला बघून काही राक्षसांच्या चेहऱ्यावर निराशा दाटून आली. एण्डींच्या जागी हा कोण उपटसुंभ आला असा भाव त्यांच्या चेहऱ्यांवर आला होता. काही जणं प्रथमच एण्डींच्या लेक्चरला आलेले असावेत. त्यांना मीच डॉक्टर एण्डी होतो असं वाटलं होतं.

"एण्डीसर आलेत" असं शेजारचीच्या कुशीत कोपर ढोमसून पहिल्या रांगेतली एक मुलगी कुजबुजली ते मला ऐकू आलं.

“गुड आफ्टरनून" मी म्हटलं. “मी डॉक्टर विजय पाटील. मला डॉक्टर दोशींनी तुमचं लेक्चर घ्यायची विनंती केली म्हणून मी आलो आहे.”

खरं सांगायचं तर  एण्डींनी मला विनंती केली नव्हती, तर ते काम माझ्या माथी मारलं होतं. पण येवढ्या मोठ्या डॉक्टरांनी मला विनंती केली म्हणजे मी सॉलिड ग्रेट असा कोणीतरी असणार असा त्या पोरांचा समज झाला असता आणि त्याला माझी काही हरकत नव्हती.

“पहिली गोष्ट म्हणजे तुमचा हजेरीचा हक्क. ज्यांना ह्या लेक्चरला बसायचं नसेल त्यांनी मी फळयावर लेक्चरचा विषय लिहायला वळेन तेव्हा खुर्च्या सरकवल्याचा आणि पायांचा आवाज न करता निघून जावं. एकदा मी हजेरी घेतली की नंतर मात्र वर्ग सोडून जायला मिळायचं नाही.”

मी वळलो आणि फळयावर लेक्चरचा विषय लिहिला. मग मी वर्गाकडे परत वळलो. कोणीही वर्ग सोडून निघून गेलं नव्हतं.

“दुसरी गोष्ट म्हणजे तुमची हजेरी. आता मी हजेरीचा कागद वर्गात फिरवणार आहे. प्रत्येकाने आपापल्या नावासमोर सही करायची आहे. दहा मिनिटांत कागद माझ्याकडे परत आला पाहिजे. नंतर मी वर्गात मुलं किती आहेत ते मोजेन. जर सह्यांच्या आकड्यापेक्षा मुलं कमी भरली तर तुमच्यापैकी कोणीतरी इतरांच्या खोट्या सह्या केल्या हे सिद्ध होईल. ते कोणी केलं हे जर मला समजलं नाही तर त्याबद्दल मी सर्वांना अनुपस्थित मांडेन. तसं होऊ नये असं जर तुम्हाला वाटत असेल तर तुम्ही शेजारच्यांवर नजर ठेवायची आहे. कोणी असं करताना दिसलं तर त्याला वेळीच थांबवायचं आहे. लक्षात आलं का?”

हे पाणी वेगळंच आहे हे एव्हाना राक्षसांच्या लक्षात आलं होतं. पऱ्यांचे डोळे विस्फारलेले होते. स्कॉलर मंडळी आपलं विनाकारण नुकसान होईल म्हणून चिंतेत पडलेली दिसत होती. सर्वांना अनुपस्थित मांडण्याचा माझा विचार नव्हता. पण भिती घालताना आपला तसा विचार नाही हे समजू द्यायचं नसतं. हजेरीचा कागद वर्गात फिरू लागला.

“तिसरी गोष्ट म्हणजे माझं शिकवणं सुरू असताना फक्त माझाच आवाज मला ऐकू आला पाहिजे. कोणाला काही समजलं नाही तर लेक्चरनंतर प्रश्न विचारायला वेळ दिला जाईल. पण कोणी खोडसाळपणा केलेला मला आवडणार नाही.”

वर्ग गप्पच राहिला. म्हणजे ते सगळ्यांना समजलं असावं असं गृहित धरून मी शिकवायला सुरुवात केली. शिकवतांना पऱ्यांकडे बघायचं नाही, त्यांच्या नजरेला नजर भिडवायची नाही, नाहीतर शिकवण्यावरचं लक्ष उडू शकतं असं परवेझने मला सांगून ठेवलं होतं. त्याच्या सल्ल्याप्रमाणे मी त्यांच्या डोक्यांच्या वरती सुमारे फूटभर अंतरावर नजर ठेवून शिकवलं. त्यामुळे अजिबात अडचण आली नाही. मधून मधून फळ्यावर लिहिण्यासाठी वळलो तेव्हा कोणीही वर्गातून पळून जायचा प्रयत्न केला नाही. मुलं झोपी जाऊ नयेत म्हणून मी मधून मधून त्या विषयाशी संबंधित चार गमतीदार गोष्टी सांगितल्या. तेव्हा पऱ्यांच्या बरोबरीने राक्षसही मनापासून हसले. तास संपायला सुमारे पाच मिनिटं उरलेली असताना मी शिकवणं आवरतं घेतलं आणि कोणाला काही प्रश्न आहेत का असं विचारलं. कोणालाही काहीही प्रश्न पडले नव्हते.

“मी आता डोकी मोजणार नाही, कारण मला दुसरं जास्त महत्वाचं काम आहे. पण त्याचा अर्थ पुढच्या लेक्चरच्या वेळीही मी डोकी मोजणार नाही असा नक्कीच नाही. मी त्या बाबतीत बेभरवशाचा आहे असं तुम्ही समजावं. तेव्हा जर कोणी अनुपस्थित मित्र-मैत्रिणींच्या खोट्या सह्या केल्या आणि जर ते पकडलं गेलं, तर एकदा माफ करा असं मला सांगायचं नाही.”

तासभर यशस्वीपणे शिकवून झाल्यावर मला अतिआत्मविश्वास आला असावा. परवेझने सांगितलं होतं ते मी विसरलो आणि सहज पहिल्या रांगेत बसलेल्या पऱ्यांकडे नजर टाकली. लेक्चर संपलं तरी त्या माझ्यावर नजर रोखून होत्या.  त्यांच्या मध्यभागी बसलेली एक गोरी, घारी मुलगी तर जरा जास्तच रोखून बघत होती. तिच्या नजरेला नजर भिडवायला नको होतं असं मला नजर भिडवून झाल्यावर वाटलं. मिताने कॉलेजच्या वार्षिक समारंभात गाणं म्हटलं होतं तेव्हा गाणं संपलं तरीही मी तिच्याकडेच मंत्रमुग्ध झाल्यासारखा नजर लावून बसलो होतो, तशी ती बसली होती. मी भिडलेली नजर काढून घेतली, टेबलावर ठेवलेले हजेरीचे कागद उचलले आणि वर्गातून बाहेर पडलो.

# ३१

वर्ष ७, जानेवारी १७

माझ्या अपेक्षेप्रमाणे एण्डींनी आपली सगळी लेक्चर्स घ्यायचं काम माझ्यावर टाकलं. माझी दोन लेक्चर्स होऊन गेल्यावर एकदा रात्री साडेनऊ वाजता लेबर वॉर्डात येऊन ती गोरी आणि घारी मुलगी मला भेटली. तिचं नाव सुनीता होतं असं तिनेच मला सांगितलं. दुसऱ्या लेक्चरच्या वेळीच मला चिन्हं काही बरी वाटत नव्हती. मुलांना माझं शिकवणं आवडत होतं. मला त्यांच्या डोक्यांच्या एक फूट वर नजर रोखून शिकवावं लागत नव्हतं. सगळं ठीक चाललं होतं. पण पहिल्या रांगेत बसलेली ती गोरी आणि घारी मुलगी माझ्याकडे जरा जास्तच लक्ष देत होती असं मला वाटायला लागलं होतं. एक तर मी बोललेला शब्द न् शब्द ती वहीत उतरवून घेत होती. हे काही आक्षेपार्ह नव्हतं. पण ती माझ्याकडे बघायची तेव्हा तिची नजर इतकी स्वप्नाळू दिसायची की मला भितीच वाटायला लागली होती. त्या वयात मुली सहज फसतात. मला कोणाला फसवायचं नव्हतं. कोणाला झिडकारून दुखवायचंही नव्हतं. ती मुलगी चांगली होती. पण माझं मन मितात गुंतलं होतं. एका वेळी दोन किंवा त्याहून जास्त मुलींमध्ये मन गुंतवणारे महाभाग असतात, पण मी त्यातला नव्हतो. फार गुंता होण्यापूर्वी मामला सोडवायला हवा होता. शेवटी मी ठरवलं की हे काम आपल्या एकट्याच्याने होण्यासारखं नाही, आपल्याला मदतीची गरज आहे. मी मिताला ओटीत जाऊन भेटलो.

“मिता, माझं तुझ्याकडे काम आहे. कधी मोकळी होशील?”

“संध्याकाळी चार वाजता चालेल?”

“चालेल. कँटीन?”

“ठीकाय. कँटीनमध्ये येते.”

बरोबर चार वाजता मिता कँटीनमध्ये आली. मी तिची वाटच बघत होतो.

“कॉफी?” मी विचारलं.

“हो" ती म्हणाली. ती दमलेली दिसत होती. तिला मदत कर म्हणायला ही वेळ योग्य आहे की नाही, असं माझ्या मनात आलं.

“दमलेली दिसतेयस. आत्ता बोलू की पुन्हा कधीतरी?” मी विचारलं.

“आत्ताच बोल. तुझं कधी काही काम नसतं. काहीतरी महत्वाचं असल्याशिवाय तू मला बोलावणार नाहीस.”

“मिता, डॉक्टर दोशींनी एम.बी.बी.एस.ची आपली लेक्चर्स घ्यायचं काम माझ्या डोक्यावर टाकलंय. माझी आतापर्यंत दोन लेक्चर्स घेऊन झालीयेत. फुकटचं काम असलं तरी मला शिकवायला आवडतं आणि एम.बी.बी.एस.ची मुलं हुशार असल्यामुळे त्यांना शिकवणं आव्हानात्मक असतं म्हणून मी उरलेली दोन लेक्चर्ससुद्धा घेणार आहे. माझ्यावर त्याचा काही ताण वगैरे पडत नाहीये. पण एक जराशी नाजूक अडचण उभी राहिली आहे. त्यासाठी मला मदत पाहिजे आहे.”

नाजूक अडचण म्हटल्यावर मिता एकदम सतर्क झाली.

“हं?” ती म्हणाली.

“लेक्चरला एक मुलगी येते. तिला माझ्या शिकवण्यापेक्षा माझ्यातच जास्त इंटरेस्ट दिसतोय.”

“कशी आहे?” मिताने विचारलं.

“गोरी आणि घारी" मी म्हटलं.

मिता स्तब्ध झाली.

“मिता?”

“अं... ..नाव काय तिचं?”

“सुनीता" मी म्हटलं.

“तुला कशावरून वाटलं की तिला तुझ्यात इंटरेस्ट वाटतोय?”

आता मिताला कसं सांगायचं की तिच्या नजरेत तसं दिसत होतं? पुरुषांना अशा गोष्टी कळतात असं म्हणायचीही सोय नव्हती.

“लेक्चर सुरू असताना ती माझ्याकडे एकटक बघत असते. गेल्या आठवड्यात रात्री साडेनऊ वाजता मी लेबर वॉर्डात ड्यूटीवर होतो तेव्हा ती तिथे आली. मी म्हटलं येवढ्या रात्री तिथे काय करतेयस? तर ती म्हणाली की ती होस्टेलमध्ये रहायची. मला अभ्यासातल्या काही अडचणी विचारायला ती आली होती.”

“म्हणून तुला असं वाटलं?”

“मिता, रात्री साडेनऊ वाजता मुली डोळ्यांना मेकअप लावून, पार्टीला जाताना घालतात तसे कपडे घालून आणि मंद वासाचं पर्फ्यूम लावून लेबर वॉर्डात जातात का? अभ्यासातल्या अडचणी विचारायला अख्खा दिवस असताना रात्री वॉर्डात एकट्यानेच कोण जाईल का?”

“हं!” मिता म्हणाली.

“तू वर्गातच प्रश्न का विचारले नाहीस असं मी विचारल्यावर तिने 'अं....अं' असं उत्तर दिलं. शेवटी मी म्हटलं, विचार प्रश्न. तेव्हा तिने चार प्रश्न विचारले, मी दिलेली उत्तरं वहीत लिहून घेतली आणि थँक्स म्हणून निघून गेली.”

“मग?”

“काल रात्री साडेनऊ वाजता ती परत आली. तिला एक दोन स्त्रियांची प्रसूती करायची होती असं म्हणाली. पण प्रसूती करायला कोणी केसांना शांपू, चेहऱ्याला कसलंसं क्रीम, ओठांना लिपस्टिक आणि प्रत्येक हातात एकदम स्टायलिश अशा दहाबारा बांगड्या असा जामानिमा करून जात नाही.”

“मग काय झालं?”

तिचा चेहरा बघून मी तिच्याकडे मदतीसाठी आलो ती चूक तर केली नाही ना असं मला वाटायला लागलं.

“मी तिला एक डिलिव्हरी करायला लावली. पण तिने हातातल्या बांगड्या आणि घड्याळ वगैरे काढून हातमोजे घालेपर्यंत ती बाई प्रसूत झाली. मग मी तिला स्टाफनर्सच्या देखरेखीखाली त्या मुलाला आंघोळ घालायला लावली, नाहीतर तिला ती डिलिव्हरी तिने केली अशी नोंद तिच्या जर्नलमध्ये करता आली नसती. ते गर्भजल, रक्त, पाणी आणि हातातून निसटून बेसिनमधल्या पाण्यात पडणारं ते नवजात अर्भक यांमुळे ती अगदी कंटाळली आणि दुसऱ्या डिलिव्हरीसाठी न थांबता हॉस्टेलला परत गेली.”

“मग?”

“तिने मला परत एकदा रात्रपाळीच्या वेळी गाठण्यापूर्वी काय ते करायचं आहे" मी म्हटलं.

“मुलगी दिसायला कशी आहे?”

“सुंदर आहे" मी म्हटलं.

“मन गुंतलं का?” तिने विचारलं. तिचा आवाज जरासा कापला.

“मिता...”

“माझी काय मदत हवीय? ती तुझ्या प्रेमात दिसतेय. तू हो म्हटलंस तर काम झालं समज. मी मध्यस्थ व्हायची काही गरज दिसत नाही.”

“मिता....”

“पण तू मन मोकळं करायला बिचकत असशील तर मी ....”

“मिता! गप्प बस. मी काय म्हणतोय ते ऐक आधी.”

ती एकदम गप्प झाली.

“मिता, ती गोरी, घारी आणि सुंदर आहे म्हणून...”

“हसताना गोड दिसते का रे ती?”

“मिता, तू जरा मला बोलू देशील का?” मी कातावून म्हटलं. ती परत एकदम गप्प झाली.

“मिता, माझं मन तिच्यात गुंतलं नाहीये. तिचं मन माझ्यात गुंततंय ते सोडवायचंय म्हणून मला तुझी मदत हवीय.”

“एक विचारू?”

“विचार.”

“ती सुंदर, गोरी, घारी आहे आणि तिला तू आवडलायस, तर तुझं मन तिच्यात का गुंतत नाहीये?”

'कारण माझं मन तुझ्यात गुंतलंय गं', असं म्हणायच्या बेतात मी होतो. तेव्हढ्यात नेहा तिकडे आली. तिला नाही तरी कधी कुठे टपकू नये याचा पोच नव्हताच.

“काय रे, काय चाललंय दोघांचं? एकदम गंभीर दिसताय" नेहा म्हणाली आणि फतकल मारून बसली. माझे शब्द घशातच विरले. “आणि विजय तू अशी दाढी का वाढवली आहेस? एकदम गुरुदत्त हं?”

“एका मुलीला विजय आवडलाय, पण त्याला ती नकोय” मिताने माहिती पुरवली.

“का? ती दिसायला बरी नाही का?”

“सुंदर, गोरी आणि घारी आहे. हसताना गोड दिसते" मिता म्हणाली.

“मिता, ती हसताना गोड दिसते असं मी म्हटलेलं नाही" मी म्हटलं.

“पण ती हसताना गोड दिसते की नाही?”

“दिसते" मी नाईलाजाने म्हटलं.

“तेच तर मी सांगत होते" ती विजयी सुरात म्हणाली.

“विजय, तू वेडपट आहेस का? अशी मुलगी तुझ्या प्रेमात आहे तर तू तिला हो का म्हणत नाहीस?” नेहाने मला आश्चर्याने विचारलं.

“त्याच्या मनात कोणतीतरी दुसरीच मुलगी आहे, होय ना रे?” मिताने विचारलं.

“तुम्ही मला मदत करणार की नाही?” मी विचारलं.

“मनातल्या मुलीचं नाव सांगितलंस तरच मदत करू आम्ही" मिता म्हणाली.

या वेळी प्रताप माझ्या कानात पुटपुटल्याचा भास झाला नाही, तरीही मी धीर करून म्हटलं, “मिता, तूच ती माझ्या मनातली मुलगी.”

# ३२

वर्ष ७, जानेवारी १७

विचार न करता बोललो म्हणून मी मिताला सांगू शकलो की तीच माझ्या मनातली मुलगी होती. बाण सुटला होता खरा, पण पुढे काय होणार ते मला माहित नव्हतं. नंतर विचार केल्यावर माझ्या लक्षात आलं की माझं टायमिंग चुकलं होतं. ही गोष्ट मनातल्या मुलीला एकांतात सांगायची असते. अशी कँटीनमध्ये दोघांच्या मैत्रिणीच्या समोर नाही. तिचं नाव सांगण्यासाठी मिताने जर मला तेव्हा खिंडीत पकडलं नसतं तर मी तेव्हा तिला तसं कदापी बोललो नसतो. नशीब माझं, दुसरं काय?

मिताने आणि नेहाने एकमेकींकडे पाहिलं. मी असं काही म्हणेन असं त्यांना अपेक्षित नसावं. अर्थात त्यात काही आश्चर्य नव्हतं, कारण मलाही मी असं काही म्हणू शकेन हे अपेक्षित नव्हतं.

“ए, हा एकदम पकलेला दिसतोय. आपण त्याला मदत केली नाही तर थोड्या वेळाने तो आपल्या वर्गातल्या अद्याप सिंगल असलेल्या प्रत्येक मुलीचं नाव 'तीच माझ्या मनातली मुलगी' म्हणून घेईल बघ" नेहा म्हणाली. मिताला ते पटलं असावं. तिने मान डोलावली. मी मनातल्या मनात कपाळाला हात लावला. मी शेवटी मिताला माझ्या मनात तीच होती हे सांगितलं, तर हो किंवा नाही म्हणायचं सोडून मी पकल्यामुळे असं बोललो हा निष्कर्ष तिने काढला. आता पुढे कधीही मी तिला कसा पटवून देणार होतो की पकल्यामुळे नाही तर खरोखरच मला तसं म्हणायचं होतं?

“विजय, बोल. आम्ही तुला कशी मदत करू?” नेहाने विचारलं.

माझ्या मनात पुसटसा प्लान तयार झाला होता. बोलता बोलता मी त्याला पूर्ण रूप दिलं.

“नेहा, मागे एकदा रोज डेला मी तुला मदत केली होती. आता तू मला रोज डेलाच मदत कर.”

“काय करायचंय?”

"मी मलाच एक लाल गुलाब पाठवेन. माझं लेक्चर एक वाजता संपलं की  सुनीताला आणि तिच्या मैत्रिणींना मी कँटीनमध्ये माझ्या मागून आणेन.”

“तू काय पाइड पायपर सारखा बासरी वाजवत आणणार आहेस त्यांना?”

“त्यांना कसं आणायचं ते मी बघतो. तू फक्त तुझं काम चोखपणे पार पाड. मी कँटीनमध्ये पोचेन तेव्हा तू तिथे बसलेली असली पाहिजेस. मी गुलाब हातात घेऊन तुझ्या समोर येऊन बसेन. मग तू हातवारे करत आणि हसत हसत बोलायचंस.”

“काय बोलायचं?”

“काहीही बोल. नेहमीसारखं पटर पटर कर. त्या लांब उभ्या असतील. त्यांना ऐकू येईल येवढ्या मोठ्या आवाजात बोलायचं नाही.”

“मी पटर पटर करत नाही कधी" नेहा तडकली.

“नाही, नाही. मी चुकलो. तू नेहमीसारखं विद्वत्तापूर्ण बोल. मग त्या निघून जातील. जर त्या गेल्या नाहीत, तर आपण निघून जाऊ. जाताना तू तुझं पटर प.. अं.. विद्वत्तापूर्ण बोलणं आनंदाने हसत हसत चालू ठेवायचं.”

“असं करून काय मिळेल?” मिताने विचारलं.

“मला लाल गुलाब नेहाने दिलाय आणि तो मी स्विकारलाय असं त्यांना वाटेल. मग सुनीता माझा नाद सोडून देईल.”

“किती निष्ठूर आहेस रे तू" नेहा म्हणाली.

“हे बघ. आपलं डील झालं होतं. तुला माझ्या उपकाराची परतफेड करायची होती. झालंच तर तुमच्या अटीप्रमाणे मी माझ्या मनातल्या मुलीचं नाव तुम्हाला सांगितलं. आता तुम्हाला माझं काम करायला पाहिजे.”

“मनातल्या मुलीचं नाव! हूं!” असं म्हणून मिताने नाक उडवलं आणि ती उठून तरा तरा निघून गेली.

“मला काही ही आयडिया आवडलेली नाही. पण वचन दिलं म्हणून मी ते करेन" असं म्हणून नेहा मिताच्या पाठोपाठ निघून गेली.

“पण मिता मी खरं बोललो होतो गं" असं म्हणून मीही उठलो आणि माझ्या रूमवर गेलो. आयुष्यातला गुंता कमी करायला घेतला खरा, पण तो कमी होण्याऐवजी वाढतच चालला होता.

एक आठवडा गेला. दोनदा सुनीता आणि तिची एक मैत्रीण मला रस्त्यात भेटल्या. सुनीताच्या नजरेत थोडं प्रेम, थोडं आव्हान होतं, तर तिच्या मैत्रिणीच्या डोळयांत थोडे मिश्किल भाव होते. ती प्रतापची दूरची नातेवाईक होती हे मला नंतर कळलं. प्रतापने तिचे कान भरले असतीलही, नाहीतर काय बिशाद होती एका थर्ड इयरच्या मुलीची माझ्याकडे असं मिश्किल नजरेने बघायची?

रोज डेच्या आदल्या दिवशी मी माझं नाव घातलेलं पाकीट आणि लाल गुलाबाचे पैसे शेट्टीच्या कँटीनमध्ये दिले. दुसऱ्या दिवशी माझं लेक्चर संपायच्या वेळी मला येऊन काय निरोप द्यायचा ते माझ्या हाउसमनला पढवलं. ठरल्या वेळी मी माझं लेक्चर घ्यायला गेलो. सुनीता

आणि तिची मैत्रीण पहिल्या रांगेत बसल्या होत्या. लेक्चर संपताच हाउसमन लेक्चर हॉलमध्ये आला, आणि पहिल्या रांगेपर्यंत ऐकू जाईल अशा आवाजात कुजबुजला,

“विजय, मी आत्ताच कँटीनमधे जाऊन आलो. तुला कोणी तरी गुलाब दिलाय.”

मी भुवया उंचावल्या. सुनीताचं तोंड पडलं असं मला वाटलं आणि मला खूप अपराधी वाटायला लागलं. आपला प्लान रद्द करावा असंही माझ्या मनात येऊन गेलं. पण नेहा कँटीनमध्ये माझी वाट पहात बसली असेल हे मला आठवलं. शिवाय या गोष्टीचा कधीतरी सोक्षमोक्ष लावायचाच होता, माघार घेऊन फक्त आजचं मरण उद्यावर ढकललं गेलं असतं.

“मला? आश्चर्य आहे. थँक्स. माझं लेक्चर संपलंय. मी बघतो मला कोणी गुलाब दिलाय ते" असं म्हणून मी निघालो. सुनीता आणि तिची मैत्रीणही माझ्या मागून निघाल्या ते मला डोळयांच्या कोपऱ्यातून दिसलं. मी कँटीनमध्ये पोचलो. रांगेत उभा राहून गुलाब घेतला. तो लाल होता. शेट्टीने रंगाचा गोंधळ घातला नाही म्हणून त्याचे आणि परमेश्वराचे मनातल्या मनात आभार मानून मी इथे तिथे पाहिलं आणि नेहा दिसल्यावर तिच्या टेबलाकडे गेलो. लाल गुलाब शर्टाच्या खिशात अडकवला आणि तिच्यासमोर बसलो. सुनीता आणि तिची मैत्रीण आम्ही दिसू अशा ठिकाणी बसल्या.

नेहाने मला बघून मोठ्ठं स्मितहास्य केलं.

'अगं, जरा कमी हस. जबडा निखळेल' असं म्हणायची आलेली उर्मी मी महत्प्रयासाने दाबून टाकली.

नेहाने मोठ्या उत्साहाने थोडा वेळ हसत हसत काहीतरी बडबड केली. ती काय म्हणाली ते मला समजलं नाही आणि समजलं असलं तर आता आठवत नाही. तिथे सुनीताने डोळयांना रुमाल लावला आणि ती उठली. नेहा आणि माझ्याकडे एक रागाचा कटाक्ष टाकून तिची मैत्रीण उठली आणि सुनीताच्या खांद्याभोवती हात घालून तिच्याबरोबर गेली.

“नेहा, ऑल क्लियर" मी म्हटलं.

बटण दाबल्यासारखं तिचं हसणं आणि बोलणं थांबलं. ती काही न बोलता उठली आणि निघून गेली. मी सुन्न होऊन तिथेच बसून राहिलो.

“विजय."

मी मान वर करून पाहिलं. मिता माझ्या समोर येऊन बसली होती.

“म्हण. तू सुद्धा मला दुष्ट नाहीतर राक्षस म्हण" मी म्हटलं.

ती गप्पच राहिली.

“मी तिला नादी लावलं नव्हतं गं" मी म्हटलं. “मी फक्त त्यांची लेक्चर्स घेत होतो. ना मी तिच्याबरोबर गप्पा मारल्या, ना तिला फिरायला नेलं, ना तिला घेऊन हॉटेलात गेलो. तिचं सगळं एकतर्फीच होतं. तिला नुसतं झुलवत ठेवणं मला जमलं नसतं. कधीतरी ते थांबवायलाच हवं होतं. तिचं माझ्यावर होतं ते प्रेम नव्हतं. तिला फक्त ते प्रेम आहे असं वाटत होतं. तिला मी आवडलो, माझं शिकवणं आवडलं, मी लेक्चरमध्ये सांगितलेल्या गोष्टी आवडल्या हे सगळं खरं आहे. पण तिला माझा स्वभाव माहित नव्हता. आमचे विचार जुळतात का हेही तिला माहित नव्हतं. सिनियर डॉक्टरचं आकर्षण वाटणं आणि त्याच्याबरोबर प्रेम जुळणं यांच्यात खूप फरक असतो बघ. प्रेमाची परिणीती विवाहात झाली पाहिजे असं मला वाटतं. मला वाटतं तिचीही तीच अपेक्षा होती. तिला माझी सांपत्तिक आणि कौटुंबिक स्थिती माहित नव्हती. कशाच्या जोरावर ती माझ्याबरोबर लग्न करणार होती? ती कोणाबरोबर तरी खूप सुखी होईल, पण तो मी नाही. माझ्या मनात नसताना मी तिच्यावर कसा जीव जडवणार होतो, तू सांग.”

“तू म्हणतोस ते एकदम बरोबर आहे. पण निराश होऊन तिथे तिने जीव दिला तर?” मिता म्हणाली

“तिची मैत्रीण प्रतापची नातेवाईक आहे. मी त्याच्याबरोबर बोलतो. तो तिच्या मैत्रिणीला समजावून सांगेल. ती सुनीताला संभाळेल. “

“ते ठीक वाटतं" ती म्हणाली.

“पण तू कँटीनमध्ये काय करतेयस?” मी विचारलं.

“मी तुला विचारायला आलेय की जर नेहा तुझं काम करणार होती, तर तू माझ्याकडे कसली मदत मागायला आला होतास?”

“मदत नेहानेच करायची होती. पण त्याच्या आधी मला तुझ्याबरोबर सगळं बोलायचं होतं. नाहीतर तुला मागच्या रोज डेच्या वेळी वाटलं होतं तसंच परत वाटलं असतं.”

“काय?”

“की माझं आणि नेहाचंच....”

“चल रे, तुझं आपलं काहीतरीच असतं" माझी नजर टाळून मिता म्हणाली, उठली आणि माझी नजर टाळूनच निघून गेली.

“आणि मला तुला हे पण सांगायचं होतं की माझ्या मनातली ती तूच आहेस. आता केव्हा आणि कसं सांगू तुला?” असं मी पुटपुटलो आणि वॉर्डात परत गेलो. उठताना खिशातून तो लाल गुलाब खाली पडला आणि शेट्टीच्या कँटीनमध्ये राहून गेला. या वेळी तो पुरावा मागे राहिला तरी त्याबद्दल काही करावं असं मला वाटलं नाही.

# ३३

वर्ष ७, फेब्रुवारी १५

प्रताप आणि मी बोलत होतो. आदल्या दिवशी रात्रभर इमर्जन्सी ड्यूटी करून मी दमलो होतो. पण सुनीताचा प्रश्न महत्वाचा होता. काय घडलं ते मी त्याला सांगितलं. आपण आपल्या कझिनला सुनीताला समजावायला सांगतो आणि ती जिवाचं काही बरंवाईट करेल असं वाटलं तर लगेच कळव असंही सांगतो असं त्याने प्रॉमिस केलं.

“पण विजय, तू हे काही बरं केलं नाहीस" तो म्हणाला. “उद्या जर मिताचं आणि तुझं जमलं नाही तर मिताही नाही आणि सुनीताही नाही असं होईल बघ.”

“प्रताप, ही नाहीतर ती, कोणती तरी एक मुलगी बायको म्हणून मिळाली पाहिजे असं माझं नाहीये. मला मिताच हवी आहे.”

“म्हणजे जर मिता नाही तर कोणीच नको असं आहे का?” त्याने विचारलं.

“अगदी बरोबर" मी म्हटलं.

"विजय, एक लक्षात घे. ॲनास्थेशिया देण्यासाठी ती दहा ओट्यांमध्ये जाते. समज तुझ्यापेक्षा देखणा असा एखादा सर्जन तिला भेटला, तिला तो आवडला, त्याला ती आवडली, त्याने तिला विचारलं आणि तिने त्याला होकार दिला तर?"

"...." पूर्वी मी प्रतापला असा काही प्रश्न विचारला की तो काकुळतीने म्हणायचा, 'असं काहीतरी बोलू नकोस रे'. आता प्रश्न विचारायची पाळी त्याची होती आणि ऐकायची माझी. पण

तो म्हणायचा तसं म्हणायला मला जमलं नसतं. तो म्हणाला ते एकदम खरं होतं. त्याचा शब्द न् शब्द मला पटला होता, कारण ते माझ्या मनात त्या पूर्वीच येऊन गेलं होतं. तरीही त्याचा शब्द न् शब्द मला खोलवर जखम करून गेला. मी गप्पच राहिलो, कारण माझ्याकडे त्या प्रश्नाला उत्तर नव्हतं. तो हुशार, हजरजबाबी, प्रत्येक परिस्थितीला समर्पक उत्तर शोधणारा विजय आता काय करावं ते समजत नाही म्हणून निराश झाला होता.

"विजय, हातची मुलगी घालवू नकोस. आत्ता जा आणि मिताला विचार" तो म्हणाला.

"...."

"तू जाणार नसशील तर मी जातो आणि तिला तुझ्यासाठी विचारतो" तो म्हणाला.

"नको. तिचं हृदय मलाच जिंकलं पाहिजे. हरलो तर हरलो" मी म्हटलं. "आपल्या आयुष्यातली सर्वात महत्वाची गोष्ट हर प्रयत्न करून आपण स्वतः मिळवायची असते. ती कोणाकडून तरी करून घेणं मला आवडायचं नाही आणि मला वाटतं ते तिलाही आवडायचं नाही."

माझं नशीब थोर म्हणून तो म्हणाला नाही की, असा हातावर हात बांधून बसलास तर ती एक दिवस आपल्या लग्नाची पत्रिका द्यायला येईल बघ.

"बघ बाबा, तुझा विचार बदलला तर मला सांग" तो म्हणाला.

त्या दिवशी आमच्या एका पेशंटचं इमर्जन्सी सिझेरियन सेक्शन करावं लागलं म्हणून मी ओटीत गेलो. मिता आणि तिची एक ज्युनियर ॲनास्थेशिया द्यायला आल्या होत्या. मिता तिच्या ज्युनियरला स्पायनल द्यायला शिकवत होती. मी गप्प उभा राहून बघत होतो. स्पायनलची लेव्हल आल्यावर आम्ही सिझेरियन करायला घेतलं. माझा हाउसमन करत होता आणि मी त्याला असिस्ट करत होतो. पोट आणि गर्भाशय उघडेपर्यंत त्याला काही अडचण आली नाही. पण त्याला मूल बाहेर काढायला जमेना.

"अरे, गर्भाशय उघडलं की तीन मिनिटांत मूल बाहेर काढायचं असतं, नाहीतर ते गुदमरतं. चल पटपट" मी म्हटलं.

त्याने खूप धडपड केली, पण काही जमेना.

"चल, मी काढतो" असं म्हणून जागांची अदलाबदल करून मी पेशंटच्या उजव्या बाजूला गेलो, आणि तो डाव्या बाजूला आला. मुलाचं डोकं मातेच्या कटिरात खोलवर गेलं होतं. नेहमीसारखं ओढून ते बाहेर आलं नसतं. मी आत हात घालून मुलाचा एक हात बाहेर काढला, मग दुसरा हात काढला. हलक्या हाताने मुलाची पाठ आणि छाती बाहेर काढली. नंतर पोट बाहेर काढलं. मग एक एक करून दोन्ही पाय काढले. शेवटी पायाळू मुलाच्या प्रसूतीच्या वेळी काढतात तसं मुलाचं डोकं काढलं.

"टँहँ" ते मूल म्हणालं.

"रडलं रडलं" निओ म्हणाला.

"दोन बत्तीस" सिस्टर म्हणाली. मुलाच्या प्रसूतीची वेळ अगदी अचूक नोंदवण्यासाठी राजमाताच्या परिचारिका प्रख्यात होत्या. ज्योतिषी चांगला असला तर राजमाता रुग्णालयात जन्मलेल्या एकाही मुलाची जन्मपत्रिका चुकत नसे असं लोकं म्हणत असत.

मी नाळेला दोन क्लँप्स लावले, ती कापली आणि त्या 'टँहँ' असं बेंबीच्या देठापासून म्हणणाऱ्या बाळाला निओकडे सुपूर्द केलं. मग माझ्या हाउसमनने गर्भाशय आणि पोट शिवलं. तिच्या पोटाला ड्रेसिंग लावल्यावर मी 'थँक यू' म्हणायला ॲनास्थेटिस्टकडे बघितलं. मिता माझ्याकडेच बघत होती.

"काय?" मी विचारलं.

"तू केलंस तसं तुम्ही बरेचदा करता का?" तिने विचारलं.

"मॉडिफाइड पटवर्धन मनूव्हर" मी म्हटलं. "डॉक्टर पटवर्धनांची पद्धत आहे ती. नाही. आम्ही तसं बरेचदा करत नाही. मुलाचं डोकं कटिरात खूप खोल गेलेलं असलं आणि निघेनासं झालं तरच आम्ही तसं करतो."

"छानच केलंस" ती म्हणाली. "नाहीतर ते मूल हाताला लागलं नसतं."

"नऊ महिने पोटात वाढवलेलं ते मूल, ज्याच्या आगमनाकडे घरातली सगळी माणसं डोळे लावून बसलेली असतात, ते हाताला न लागून कसं चालेल? तसं काही होऊ नये म्हणून तर ज्युनियरबरोबर वॉश अप व्हायचं असतं."

मी ग्लोव्हज आणि गाउन काढून टाकले आणि हुश्श म्हणून खुर्चीत जमेल तेवढ्या आरामात बसलो. नगरपालिकेची खुर्ची ती, बूड टेकण्याहून जास्त आरामाची पोझिशन त्या खुर्चीत घेता येत नसे. तरीही मी प्रयत्न केला. आदल्या रात्री तीन सिझेरियन आणि एक एक्टॉपिक प्रेग्नन्सी अशी चार ऑपरेशनं करावी लागली होती. शारिरीक दमणं तर होतंच, पण हाडामासाच्या जिवंत स्त्रीवर ऑपरेशन करताना येणाऱ्या अडचणींवर तिथल्या तिथे विचार करून मार्ग शोधायचा आणि योग्य ती कृती करून तिला धड ठेवायचं याच्यामुळे येणारा मानसिक थकवा कधी कधी जास्तच दमवायचा.

"आता काय करायचं ते समजत नाही असं इमर्जन्सीत कधी झालं तर काय करतोस?" मिता शेजारच्या खुर्चीत येऊन टेकली होती. तिने विचारला तो प्रश्न मला कोणी कधी विचारलेला नव्हता.

"अजून तरी असं कधी झालं नाही. कठीण परिस्थिती आली तर त्या संदर्भात आपण पूर्वी काय काय वाचलं ते मनातल्या मनात झरझर आठवायचं. मार्ग सापडतोच. आमचं शास्त्र जुनं आहे. आजवर घडली नाही अशी गोष्ट सापडणं मुश्कील आहे" मी म्हटलं. "त्यातून एखादी न वाचलेली गोष्ट आढळलीच तर ज्याने तिच्याबद्दल वाचलेलं असेल असा माणूस त्या वेळी कुठे

मिळणार? आपणच विचार करून काय बिघडलंय आणि ते दुरुस्त करण्यासाठी सगळयात चांगला मार्ग कोणता ते ठरवायचं. ह्या पद्धतीने मला आजपर्यंत नेहमीच हात दिलाय."

थोडा वेळ शांततेत गेला.

"कसला विचार करतेयस?" मी विचारलं.

"तू कसला करतोयस?" तिने प्रतीप्रश्न केला. ती माझीच युक्ती माझ्यावर वापरत होती.

"मी खरं सांगितलं तर तू खरं सांगशील?"

"जाऊ दे. मी जाते. मला आणखी काही कॉल आहेत का बघते" ती म्हणाली.

आज दिवसभर काय काय केलं, कोणती केस कशी कठीण होती आणि मी ती कशी हाताळली, आज काय गंमती झाल्या असं सगळं संध्याकाळी चहाचा कप हातात घेऊन सांगण्यासाठी योग्य अशी ही मुलगी आहे असा विचार माझ्या मनात होता. माझ्या मनात काय होतं त्याच्या कुतूहलापेक्षा आपल्या मनात काय होतं ते लपवणं तिला जास्त महत्वाचं वाटलं होतं. काय होतं तिच्या मनात?

# ३४

वर्ष ७, एप्रिल ११

आमचे मानद डॉक्टर राजमातासाठी देता येईल तेवढा वेळ अवश्य देत असत. पण त्यांची खाजगी प्रॅक्टीस हे त्यांचं उत्पन्नाचं एकमेव साधन असे. आमच्या रुग्णालयाकडून महिन्याला मिळणाऱ्या पाचशे रुपयांत त्यांचं दोन दिवसांचं पेट्रोलही सुटलं नसतं. त्यामुळे ते राजमातात दिवसाला फार तर दोन तीन तास घालवायचे. ते गेले की लेक्चरर मंडळी बॉस असत. स्वतः बॉस आहोत म्हटल्यावर तेही इकडे तिकडे जात असत. कामाचा मुख्य घाणा आरेमोच ओढायचे.

त्या दिवशी बाह्य रुग्ण विभागात मी आणि माझा हाउसमन एकामागून एक असे पेशंट बघत होतो. ज्या पेशंटांना वरिष्ठांना दाखवण्याची गरज असेल त्यांना थांबवून ठेवत होतो. इतरांना बाजूला करून एक भारदस्त स्त्री माझ्या केबिनमध्ये प्रवेश करती झाली. तिच्या अंगावर पांढरा एप्रन होता. म्हणजे मी ओळखत नव्हतो अशी ती आमच्याच रुग्णालयात काम करणारी कोणीतरी होती.

"मी डॉक्टर खरे" ती म्हणाली. "मी रक्तपेढीची मुख्य आहे."

"बोला, काय काम आहे आपलं?" मी विचारलं.

"मी कँपसमध्ये रहाते. ही माझी घरात काम करणारी बाई आहे" बरोबर असलेल्या एका बारीकशा स्त्रीकडे अंगुली निर्देश करून खरेबाई म्हणाल्या. "हा तिचा पेपर."

मी तिचा पेपर हातात घेतला. मुलं होत नाहीत म्हणून उपचार करून घ्यायला ती आली होती. मागच्या वेळी माझ्या हाउसमनने तिला तपासलं होतं. आवश्यक त्या सर्व तपासण्या करून

तिला परत बोलावलं होतं. मी तिचे अहवाल पाहिले. लघवी, रक्त, छातीचा एक्सरे, नवऱ्याचे वीर्य - सगळं काही ठीक होतं. सोनोग्राफीत स्त्रीबीज निघण्याची क्रिया व्यवस्थित होतेय असं दिसत होतं.

"रिपोर्ट्स चांगले आहेत" मी म्हटलं.

"हाउसमनने तिची एण्डोस्कोपी करावी अशी शिफारस केली आहे" बाई म्हणाल्या.

"बरोबर आहे ते" मी म्हटलं. "गर्भाशय आतून आणि बाहेरून कसं आहे, गर्भनळया उघड्या आहेत की नाही वगैरे गोष्टी बघण्यासाठी एण्डोस्कोपी करणं आवश्यक आहे."

"एण्डोस्कोपीनंतर किती दिवस तिला आराम करावा लागेल?"

"तीन-चार दिवसांत ती परत कामाला लागू शकेल. थोडे दिवस तिने फार जड काम करू नये" मी म्हटलं.

"अं.... तुम्ही एण्डोस्कोपी करून तिच्या जननेंद्रियांची वाट लावू नका. वाटलं तर फक्त डी ॲण्ड सी करा" बाई म्हणाल्या.

"मुलं होण्यासाठी फक्त डी ॲण्ड सी करून काही विशेष फायदा होत नाही. एण्डोस्कोपीबरोबर आम्ही डी ॲण्ड सी करतोच. त्या सगळयाचे रिपोर्ट्स बघून नंतर गर्भधारणा होण्यासाठी काय उपचार करायचे ते ठरवता येईल" मी म्हटलं. एण्डोस्कोपी करून आम्ही त्या पेशंटच्या जननेंद्रियांची वाट लावणार असं तिने म्हटलं ते चुकीचं आहे असं मी तिला सांगितलं नाही, कारण कुठल्यातरी विभागाचे प्रमुख असणाऱ्यांना आपल्याला सगळया विषयांतलं सगळंच समजतं असं वाटायला लागतं हे इतके दिवस राजमातात काम करून माझ्या लक्षात आलेलं होतं.

"मला एण्डोस्कोपी करून नको आहे" बाई म्हणाल्या.

घरकामाची बाई आठवडाभर कामाला यायची नाही ही भिती बाईंना वाटत असावी. शिवाय थोडाफार खर्च होईल तो करण्याचीही त्यांची इच्छा नसावी. स्वतंत्र भारताच्या त्या स्वतंत्र नागरिक असणाऱ्या कामवाल्या बाईने कोणती ट्रीटमेंट घ्यायची ते ठरवण्याची मोकळीक मात्र तिला दिसत नव्हती.

"वंध्यत्वाचे उपचार करण्याची आमच्या युनिटची आमच्या सरांनी ठरवून दिलेली ही पद्धत आहे. आपली इच्छा असेल तर आपण आमच्या सरांना भेटू शकता" मी म्हटलं.

काही न बोलता बाई त्या बिचाऱ्या कामवाल्या बाईला घेऊन निघून गेल्या. सरांना भेटायला त्या परत आल्या नाहीत. ती पेशंटही परत आली नाही. तिचं पुढे काय झालं ते समजलं नाही म्हणून माझ्या मनात जराशी रुखरुख राहून गेली होती. ती अनपेक्षितपणे दूर झाली.

"विजय, तुमच्या एक पेशंटची जोशीमॅडमच्या युनिटमध्ये डी ॲण्ड सी झाली." मला हे मिताकडून कळणं अपेक्षित नव्हतं.

"तुला कसं कळलं ती आमची पेशंट होती?" मी विचारलं.

"तिच्याकडे जोशीमॅडमचा पेपर होता, पण सगळे रिपोर्ट्स तुझ्या युनिटचे होते. मी तिला त्याबद्दल विचारलं तेव्हा ती म्हणाली की मुलं होण्यासाठी तुमच्याकडे तिची एण्डोस्कोपी करावी असं सांगितलं होतं. ती खरेमॅडमच्या घरी काम करते. त्यांच्या शेजारी जोशीमॅडम रहातात. खरेमॅडमनी जोशीमॅडमना सांगून तिची डी ॲण्ड सी करून घेतली."

मी काही बोललो नाही.

"काय झालं?" तिने विचारलं.

"कुठे काय? काही नाही" मी म्हटलं.

"नाही कसं? तुझ्या कपाळावरची शीर फुगलीय" ती म्हणाली. "तिला युनिट बदलावसं वाटलं तर काय झालं? येवढ्या छोट्या गोष्टीवरून असा संतापू नकोस रे. असा राग येणं तब्येतीसाठी बरं नाही. ती शीर फुटेल एक दिवस."

"घरकाम करणारी बाई आठवडाभर कामावर आली नाही तर स्वतःला काम करावं लागेल म्हणून खरेबाईंनी तिची फक्त डी ॲण्ड सी करून घेतली आणि थोडक्यात आटोपलं. त्याचा तिला मूल होण्यासाठी काही फायदा होणार नाही हे मी नीट समजावून सांगितलं होतं तरीही त्यांनी असं केलं. ती बाई गरीबीमुळे असहाय्य होती. म्हणून तिची अशी परवड करायचा अधिकार कोणी दिला खरेबाईंना? आणि जोशीबाई तर गायनॅकॉलॉजिस्ट होत्या ना? त्यांनीही गुपचूप डी ॲण्ड सी करून दिली? संताप येतो मला."

"खरेमॅडमनी सांगितलं म्हणून जोशीमॅडमचा नाईलाज झाला असणार" मिता म्हणाली.

"मिता, इंटर्नशिपच्या सुरुवातीला आपण डॉक्टरकीची शपथ घेतली होती ती आठवते ना? आपल्या पेशंटच्या हिताशी आपण कोणाचंतरी ऐकून असं खेळणं चुकीचं आहे. तिथे तडजोडीला वाव द्यायचा नसतो बघ."

"विजय, या बाया मिळून तुझी बदनामी करतील रे. मला काळजी वाटते."

"मिता, मी आहे हा असा आहे. जे माझ्या मते योग्य नाही, त्याबद्दल कोणी दडपण आणलं म्हणून तडजोड करणं मला जमणार नाही. देव बघत असतो गं. उद्या त्याला काय उत्तर देऊ मी?"

"आपल्यासारख्या नगण्य माणसांकडे लक्ष द्यायला देवाला वेळ असेल का रे?" मिताने विचारलं.

"ते जाऊ दे. देव नाही किंवा असला तरी त्याला वेळ नाही असं मानलं, तरी मी माझ्या पेशंटच्या हिताला बाधक असं काहीतरी केलं तर माझ्या मनात माझ्या स्वतःबद्दल काही आदर उरेल का गं?"

"तू काय बोलतोस ते कधी कधी इतकं तत्वज्ञासारखं असतं की काही समजतच नाही रे. किती विचार करतोस? त्या पेशंटला माहितही नसेल तिच्यासाठी तू किती अस्वस्थ झालायेस."

"मिता, तिला समजावं म्हणून मी काही करत नाहीये, माझ्या स्वतःच्या मनाला योग्य वाटेल तेवढंच करतोय."

"खरेमॅडम तुझ्यावर दडपण आणू शकत नाहीत म्हणून तू स्वतःला योग्य वाटेल ते करू शकतोयस. उद्या समज डीननी एखाद्या पेशंटला अमुक कर म्हटलं आणि ते तुझ्या मते चूक असलं तर काय करशील?"

"समजायचं काय त्याच्यात?" मी म्हटलं.

“म्हणजे ते सुद्धा होऊन गेलंय?”

“माझ्याकडे एक बाई गर्भाशयाचे फायब्रॉइड्स झाले म्हणून आली होती. तिला सोबत जंतूसंसर्गही होता. मी तिला पंधरा दिवसांचा अँटिबायॉटिक्सचा कोर्स दिला, आणि समजावून सांगितलं, की जंतूसंसर्ग बरा झाल्याशिवाय गर्भाशयाचं ऑपरेशन करणं धोक्याचं ठरेल. ती गावाहून आली होती. तिच्या नातेवाईकांना पंधरा दिवस थांबायला वेळ नव्हता. तिचा नवरा मला येऊन भेटला. म्हणाला, तिचं ऑपरेशन आत्ताच करून टाका. मी म्हटलं की आत्ता ऑपरेशन केलं तर जंतू रक्तात पसरतील, आणि तिच्या जिवाला धोका निर्माण होईल. त्यामुळे मी तसं करू शकत नाही. मग तो नगरपालिकेच्या मुख्यालयात गेला आणि त्याने सहायक कमिशनरच्या ऑफिसातून आपल्या डीनना उद्देशून चिठ्टी मिळवली. मग ती दाखवून त्याने आपल्या डीनच्या ऑफिसातून मला उद्देशून चिठ्ठी मिळवली आणि ती घेऊन माझ्याकडे आला. डीनकडून बायकोच्या ट्रीटमेंटसाठी चिठ्ठी आणलीय असं सांगून त्याने मला ती चिठ्ठी दिली. मी त्याला बसवून घेतलं. तोंडावर विजयी हास्य आणून तो बसला. मी चिठ्ठी मोठ्याने वाचली. तिच्यात लिहिलेलं होतं की या पेशंटवर योग्य ते उपचार करा. मग मी त्याच्याकडे पाहिलं. तो म्हणाला की आता काय करता?

मी म्हटलं की चिठ्ठीत योग्य ते उपचार करा असं लिहिलंय, त्याप्रमाणे पेशंटला पंधरा दिवस मी लिहून दिलंय ते औषध द्या आणि मग माझ्याकडे घेऊन या. तो स्तंभित झाला. मग म्हणाला, 'डॉक्टर, मी आजपर्यंत खूप माणसं पाहिली. वरिष्ठांकडून चिठ्ठी आणल्यावरही दबून न जाता स्वतःला योग्य वाटतं तेच करणारे तुम्हीच पहिले भेटलात. येतो मी.' तो गेला. मला डीनच्या ऑफिसातून नंतर काही विचारणाही झाली नाही."

"विजय, तुला सॉलिड गट्स आहेत. मानलं तुला" मिता म्हणाली.

"हे बघ मिता, दबावाखाली येऊन आपण चुकीची ट्रीटमेंट दिली तरी त्याची कायदेशीर जबाबदारी आपल्यावरच असते, दबाव टाकणाऱ्यावर नाही. जर पेशंटचं काही बरंवाईट झालं, तर आपणच लटकतो. त्यापेक्षा आपण आपल्या मतावर ठाम रहावं हे बरं."

"मला ते कितपत जमेल कोण जाणे" ती म्हणाली.

"तू प्रयत्न तर कर. नाहीच जमलं तर मला बोलाव. मी तुझ्या पाठीशी नक्की उभा राहीन."

"थँक्स" ती म्हणाली.

# ३५

वर्ष ७, जुलै २२

हर्षदने बाबालॉजीचा नवा अध्याय लिहायला घेतला असावा असं वाटत होतं. तो स्टुडंटबाबांचे हात वाचून त्यांचं भविष्य सांगायला लागला होता असं दिसत होतं. त्या दिवशी त्याने बबलीचा डावा हात आपल्या डाव्या हातात धरला होता आणि उजव्या हाताने तो त्याच्यावरच्या रेषा आणि उंचवटे वगैरे स्पर्श करून पहात होता.

“बबली, तुझी हार्ट लाईन लांब पण अंधुक आहे. तू कोमल अंतःकरणाची पण ध्येयवादी आहेस.”

“होय डॉक्टर?” ती खुश होऊन म्हणाली.

“अर्थात! काय फर्स्टक्लास हात आहे!” असं म्हणून त्याने तिच्या तळव्यावरून हात फिरवला. मी वॉर्ड राउंडसाठी गेलो होतो, आणि ही गोष्ट जास्त मनोरंजक आहे हे जाणवल्यावर राउंड बाजूला ठेवून भविष्यवाणी ऐकत थांबलो होतो. दुधात पडलेल्या मिठाच्या खड्याकडे बघावं तसं त्याने माझ्याकडे पाहिलं, पण मी तिकडे दुर्लक्ष केलं.

“ही तुझी हेड लाईन" त्या लाइनीवर बोट फिरवून त्याने म्हटलं. “ती डबल आहे. तू खूप महत्वाकांक्षी आहेस, आणि तुला तुझ्या व्यवसायाशी निगडीत अशा प्रेमाच्या व्यक्तीची तुझ्या वाटचालीत महत्वाची साथ मिळणार आहे.”

“म्हणजे कोणाची डॉक्टर?” तिने विचारलं.

म्हणजे हर्षदची, असं माझ्या मनात आलं.

“म्हणजे एखाद्या तरुण आणि उमद्या डॉक्टरची" हर्षद म्हणाला.

बबली लाजली.

“बबली, तुझी लाइफ लाइन मध्ये तुटलेली आहे!” हर्षद जरा चिंतेच्या सुरात म्हणाला.

बबली एकदम तणावात आली. तुटलेली लाइफ लाइन म्हणजे आपण मरणार असं तिला वाटलं असावं. मला तरी त्याच्या बोलण्यावरून तसंच वाटलं. हर्षदने चिंताक्रांत चेहऱ्याने तिचा हात थोडा वेळ घट्ट धरून ठेवला. “पण घाबरू नकोस. त्याला आधार देणारी दुसरी लाईन आहे. तुझ्या आयुष्याचा जोडीदार तुझ्या साथीला सदैव असेल. त्याच्या बरोबर असताना तुला कसलीच चिंता भेडसावणार नाही.”

“आयुष्याचा जोडीदार म्हणजे?" बबली कॅथलिक होती. जरी तिला रोजच्या वापरातलं मराठी समजायचं, तरी हर्षदचं उच्च पातळीवरचं मराठी समजणं तिला जरासं जडच जात होतं.

“म्हणजे एखादा तरुण आणि उमदा डॉक्टर" हर्षद म्हणाला.

बबली परत एकदा लाजली.

हा प्रेमरथ कोणत्या दिशेने चालला होता त्याची मला एव्हाना कल्पना आली होती. मी त्या दोघा कबूतरांना एकटं सोडलं आणि माझी वॉर्ड राउंड घ्यायला गेलो.

राउंड संपली आणि मी माझ्या हॉस्टेलच्या रूमकडे जायला निघालो. जाताना मला अकस्मात माझ्या लहानपणी भाई म्हणजे माझ्या मोठ्या भावाबरोबर आणि त्याच्या एका मित्राबरोबर फिरायला गेलो होतो ते आठवलं. हॉटेलात बसून चहा पिताना त्या मित्राने माझा हात पाहिला होता. हात पहाताना तो एकदम चपापला होता.

“काय?” मी विचारलं होतं.

“नाही, काही नाही" तो म्हणाला होता. “काही लाइनी जरा वेगळया आहेत. पण काळजी करायचं कारण नाही.”

“काय आहे ते तर सांगा" मी म्हटलं होतं.

त्याने ते टाळायचा प्रयत्न केला होता. त्यामुळे माझ्या मनावरचं दडपण कमी तर झालंच नव्हतं, तर उलट वाढलं होतं.

“तुझी लाइफ लाइन तुटलेली आहे. दोन भागांमध्ये बरंच अंतर आहे. त्या दोन भागांच्या एका बाजूला एक वेगळीच लाइन आहे, जी मी पूर्वी कधीच पाहिलेली नाहीये. हेड लाइन तीन भागांची बनलेली आहे, आणि ते भाग साखळीसारखे जोडलेले आहेत. हार्ट लाइन वरच्या भागात दुभागलेली आहे. बाकीच्या लाइनी बऱ्या आहेत.”

“तुम्ही म्हणालात ते सगळं माझ्या डोक्यावरून गेलं" मी म्हटलं. “साध्या भाषेत सांगाल तर बरं.”

“तू अजून लहान आहेस. तुझा हात अजून डेव्हलप होतोय. येवढ्यात काही सांगणं योग्य नाही. तू मोठा झालास की बघूया.”

मी मोठा झालो. पण भाईचा तो मित्र कुठे गेला कोण जाणे. पुढे भाई अकाली गेला. माझा हात बघायचं राहून गेलं. पुढे ते माझ्या विस्मरणात गेलं. अभ्यास, रोज नवं काहीतरी शिकण्याचा आनंद, डॉक्टर होणं, पदव्युत्तर शिक्षण आणि रुग्णसेवेत असणारी आव्हानं पेलणं या सगळयात तळहातावरच्या भविष्याबद्दल चिंता करायला वेळच नव्हता. आज हर्षद बबलीचा हात बघून थातुर मातुर भविष्य सांगत होता तेव्हा ती जुनी आठवण जागी झाली. मी विचार करत करत

हॉस्टेलच्या पायऱ्या चढत होतो, तो समोर कोणीतरी रस्ता अडवल्यामुळे अकस्मात थांबलो. बघतो तर समोर मिता उभी होती.

“काय रे, येवढा कसला विचार करत चालतोयस? समोरून येणाऱ्याला आपटून त्याला पाडायचं असा विचार आहे का?”

“सॉरी.”

“ठीक आहे. पण कसला विचार करत होतास येवढा?"

“अगं हर्षद एका स्टुडंट बाबाचा हात बघून भविष्य सांगत होता, ते बघून मला माझ्या लहानपणी भाईच्या एका मित्राने माझा हात पाहिला होता ते आठवलं.”

“हो? काय सांगितलं होतं त्याने?”

“माझा हात बघून तो जरा भांबावला होता. मग त्याने माझ्या हातावर काय लिहिलंय ते सांगायचं साफ टाळलं होतं. काहीतरी खतरनाक असणार माझ्या हातावर.”

“चल रे, अशा गोष्टींवर विश्वास ठेवायचा नसतो. आजपर्यंत काही बिघडलंय का तुझं?”

“सगळयांच्या आयुष्यात चांगल्या आणि वाईट घटना घडतात, तशाच माझ्याही आयुष्यात घडल्या आहेत. त्या माझ्या हातावर लिहिलेल्या आहेत की नाहीत ते मला ठाउक नाही" मी म्हटलं.

“मला दाखव तुझा हात?” ती म्हणाली.

मी तिच्यासमोर माझा हात धरला.

“इथे काळोखात काही नीट दिसत नाहीये" ती म्हणाली. “ओटीत परत जाऊया.”

मी तिच्या पाठोपाठ आमच्या ओटीत गेलो. मला समोर बसवून ती म्हणाली, “हं, आता दाखव तुझा हात.”

मी तिच्यासमोर माझा हात धरला.

तिने मान या आणि त्या बाजूला वळवून माझा हात निरखला. हर्षदसारखं हात हातात घेणं भविष्य सांगण्यासाठी आवश्यक दिसत नव्हतं.

“ए, पण मला सांग, तू कधी शिकलीस हात वाचायला?” मी विचारलं.

“इंटर्नशिपमध्ये मी छोटे छोटे कोर्सेस केले होते. त्यातलाच हा एक.”

“हा कोर्स कशाला केलास?” मी आश्चर्याने विचारलं.

“लहानपणापासून मला या गोष्टीचं खूप कुतूहल होतं. पंधरा दिवसांत हात वाचण्याची ओळख करून देणाऱ्या कोर्सची जाहिरात वाचली, आणि म्हटलं बघूया तरी हे खरं आहे की थोतांड आहे.”

ती माझा हात निरखायला लागली. तिला विचार करायला शांतता मिळावी म्हणून मी गप्प झालो.

“तुझी हार्ट लाइन लांब, खोल आणि वक्र आहे. तू तुझी प्रिन्सिपल्स जपणारा आणि विचारी वृत्तीचा आहेस. पण हार्ट लाइन टोकाकडे दुभागलेली आहे. तुझ्या आयुष्यात प्रेमभंग होण्याचा संभव आहे.”

माझ्या छातीत कळ आली. मिताचं मन दुसरीकडे कुठे गुंतलं होतं म्हणून ती मला असं सांगत असावी का? पण भाईच्या मित्रानेही हार्ट लाइन दुभागलेली आहे असं सांगितलं होतं. म्हणजे मिता उद्या दुसऱ्या कोणाचीतरी....

“मिता, मी जातो" मी गुदमरलेल्या आवाजात म्हटलं.

“बस रे, मी म्हटलं म्हणून तुझा प्रेमभंग होणार असं काही नाही" तिचे डोळे खट्याळपणे चमकले. मी बसलो.

“तुझी हेड लाइन लांब, खोल, पण तीन भागांची बनलेली आहे आणि ते भाग साखळीसारखे जोडलेले आहेत. म्हणजे तू महत्वाकांक्षी आहेस, तुझी स्मरणशक्ती छान आहे, पण तू कधी कधी गोंधळलेला असतोस.”

मी कधी गोंधळलो होतो असं मला वाटत नव्हतं. पण मध्येच बोलून मी तिच्या हात वाचण्यात व्यत्यय आणला नाही.

हात वाचताना ती थबकली. मला भाईच्या मित्राची आठवण आली. त्याने सुद्धा असंच केलं होतं. माझ्या हातात काहीतरी भयंकर होतं नक्की.

“तुझी लाइफ लाइन तुटलेली आहे. दोन भागांमध्ये बरंच अंतर आहे. तुझ्या आयुष्यात खूप धडपड आणि कष्ट आहेत. त्या लाइनच्या दोन भागांच्या एका बाजूला एक वेगळीच लाइन आहे, ती त्या तुटलेल्या लाइनीला आधार देतेय असं वाटतं. ती असं सुचवते की तुझी सोल मेट किंवा आत्म्याची सहचारिणी तुला जिवावरच्या दुखण्यातून वाचवेल.”

“मिता, तू माझी चेन खेचत नाहीयेस ना?” शंका आली म्हणून मी विचारलं. हे भविष्य हर्षदने सांगितलेल्या बबलीच्या भविष्यासारखंच दिसत होतं.

“चल रे. मी कधी कोणाची चेन खेचत नाही. मध्ये मध्ये बोलू नकोस. हात वाचताना तिथे लक्ष पूर्णपणे केंद्रित करावं लागतं.” मग थोडा वेळ तिने माझ्या हाताकडे परत एकदा निरखून पाहिलं. "तुझी फेट लाइन अगदी सरळ आहे, म्हणजे तुझा आयुष्याचा प्लान अगदी फोकस्ड आहे.”

मिता मला नीट ओळखत होती. माझा हात बघून सांगितलेल्या बहुतेक गोष्टी तिला हात बघायच्या आधीच माहित होत्या. म्हणजे ती मला फसवत होती असं नाही. पण माझ्या सोल मेटने मला जिवावरच्या दुखण्यातून वाचवण्याव्यतिरिक्त मला माहित नसलेलं दुसरं काहीही तिने अजून तरी सांगितलं नव्हतं.

“तुझ्या हातावर हेल्थ लाइनच नाहीये. म्हणजे तुला तब्येतीच्या विशेष तक्रारी नसतील.”

हे एक तिने बरं सांगितलं होतं.

“तुझ्या हातावर तीन लव्ह लाइनी आहेत. म्हणजे तुझी तीन प्रेम प्रकरणं असतील.” तिने माझ्या हातावरून नजर काढली आणि माझ्याकडे आरोप करण्याच्या अविर्भावाने रोखून पाहिलं.

हे इतक्या अनपेक्षितपणे आलं की मी गांगरलो.

“मिता, नाही गं. माझं तसं नाहीये. माझं फक्त एकाच मुलीवर प्रे....” बोलता बोलता माझ्या लक्षात आलं की मी काही भलतंच बोलून जात होतो. मी पटकन थांबलो.

“कसा पकडला चोर!" मिता म्हणाली. “सांग, सांग, नाव सांग.”

“काही तरी काय? कोणाचं नाव?” मी कसंबसं म्हटलं.

“ज्या एकाच मुलीवर तुझं प्रेम आहे तिचं नाव. सांग बघू पटकन.”

“मिता, मी तुला पूर्वीच सांगितलय ना की मी ते तुला इतर कोणालाही सांगायच्या आधी सांगेन?”

“तेव्हा तुझं काही ठरलेलं नसणार. आता ते पक्कं झालेलं दिसतंय. सांग बघू.”

“मिता, नाव सांगितलं तर तू चिडणार नाहीस ना? प्रॉमिस कर" मी सुटकेचा मार्ग सापडेपर्यंत वेळ काढायसाठी म्हणून म्हटलं.

“नाही चिडणार" ती म्हणाली.

“मिता, ती तूच" मी म्हटलं.

“चल रे, तुला कधी गंभीरपणे बोलताच येत नाही का? सदैव आपली चेष्टा करायची" असं म्हणून ती जाण्यासाठी उठली.

“चिडणार नाहीस असं तू प्रॉमिस केलं होतंस" मी म्हटलं. काय बोलायचं आणि काय नाही याचा मला पोचच नव्हता असं माझं मलाच वाटलं.

“हूं!” असं म्हणून तिने नाक उडवलं आणि ती हॉस्टेलकडे निघून गेली.

“मिता, मी चेष्टा करत नाही हे तुला कसं गं पटवून देऊ?” मी पुटपुटलो.

# ३६

वर्ष ८, जानेवारी १०

आपापल्या डिप्लोमाच्या परिक्षांमध्ये मिता आणि मी पहिले आलो होतो. मी तसा घासू असल्यामुळे मी पहिला आलो त्याचं कोणाला फारसं कौतुक वाटलं नाही. मिता मेडीकलला आल्यापासून पहिल्यांदाच पहिली आली होती. एकमेकांना उडतं कॉन्ग्रॅट्स करून झाल्यावर आमची दोन दिवस गाठभेट झाली नाही. मिताला सेलेब्रेट करायला घरी जाता येत नव्हतं, म्हणून तिचे आई-बाबा तिच्याकडे आले होते. तसं पाहिलं तर ते जवळच्या एका हॉटेलात उतरले होते, कारण हॉस्टेलच्या रूममध्ये पालकांना रहायला परवानगी नव्हती. तिची ओटी संपली की ते राजमातात यायचे आणि मग तिघं भेटायचे. एकत्र क्वालिटी टाईम व्यतीत करायचे. तिसऱ्या दिवशी ते घरी गेले तेव्हा कुठे मिता मला फुरसतीने भेटली.

"काय, सेलेब्रेशन संपलं?" मी विचारलं.

"हूं" ती खुशीत म्हणाली. "तू नाही घरी जाऊन सेलेब्रेशन केलंस?"

"एकदा जाऊन आलो. आईने गोडा शिरा केला होता. सिद्धिविनायकाच्या देवळात जाऊन आलो."

"एकटाच?"

"एकटाच. कोणाला नेणार बरोबर? देवाला नारळ आणि जास्वंद-दुर्वा वाहिल्या, त्याचे आभार मानले, आणि कामावर परत आलो."

"आणि परत अभ्यासाला लागलास, होय ना?"

मी हसलो. "काय काय केलंत सेलेब्रेशनमध्ये?"

"माझी ओटी संपली की गप्पा-गोष्टी, शॉपिंग, रात्री एकत्र जेवायला जाणं.... "

"नाटक किंवा सिनेमा नाही पाहिला एखादा?"

"छे रे, येवढा वेळ कुठे होता?"

"कोणा नातेवाइकांना जाऊन भेटणं वगैरे?" मी खडा टाकून पाहिला. मुलगी दाखवणं-बघणं वगैरे गोष्टी पालक मंडळी अगदी जोमाने करतात हे मला माहित होतं. आमच्या घरी असे पालक विचारणा करायचे. सध्या शिक्षण चालू असताना नाही असं मी आईला सांगून टाकलं होतं.

"आमचे कोणी नाहीत इथं" ती म्हणाली. "माझी ओटी संपेपर्यंत बिचारे आई-बाबा हॉटेलच्या खोलीत बसून रहायचे."

चला. निदान सध्या तरी टेन्शन नव्हतं.

"येवढी पहिली आलीस तर पार्टी नाही देणार का मला?" मी विचारलं.

"वा रे! तू इतक्यांदा पहिला आलायस, किती पार्ट्या द्यायच्या शिल्लक आहेत तुझ्या माहित आहे?"

"मग माझी एक पार्टी आणि तुझी एक पार्टी एकमेकांना कॅन्सल करणार असं गणित आहे का तुझं? तसं असेल तर मला तुझ्याकडून कधी पार्टीची अपेक्षाच ठेवायला नको. आता आपली एक-एकच परिक्षा शिल्लक आहे. तू मला कधीच गाठायची नाहीस."

"हूं!" ती म्हणाली.

"आपण असं करूया. आपण कँटीनमध्ये जाऊन आइसक्रीम खाऊया. तुला बटर स्कॉच, मला व्हॅनिला" मी म्हटलं.

"ही आयडिया छान आहे" ती म्हणाली. बटर स्कॉच हा तिचा वीक पॉइंट होता. "केव्हा जाऊया?"

"आत्ता! कबीराने म्हटलंय ना, काल करे सो आज कर, आज करै सो अब?"

"ते आइसक्रीम खाण्याबद्दल नव्हतं बरं" ती म्हणाली.

"अग, संतांचा उपदेश हा एकाच गोष्टीला उद्देशून नसतो. तो प्रत्येक वेळी तेव्हाची परिस्थिती बघून तसतसा पाळायचा असतो. चल."

"माझं वजन वाढत जाईल हं" ती म्हणाली. "दोन दिवस आई-बाबांबरोबर खादाडपंची केलेली आहे."

"तुझं वजन कधीही वाढायचं नाही. इतकी वर्षं तू आहेस तशीच आहेस. खा तू आइसक्रीम बिनधास्त."

आम्ही कँटीनमध्ये जाउन एक एक कप आइसक्रीम खाल्लं. माझं खाण्याकडे विशेष लक्ष नव्हतं. तिचं लक्ष नाही असं बघून मी तिच्याकडे बघत होतो. सहा महिन्यांनी दोघांची एम.डी.ची परिक्षा झाली असती. मग ती आपल्या घरी गेली असती. जर तोपर्यंत मी काही जमवलं नसतं तर कदचित ती परत कधीच दिसली नसती.

"चला, जाउया" ती म्हणाली.

"थांब गं" मी म्हटलं. "अजून पोट भरलं नाहीये."

खरं तर मला रफीसाहेब म्हणायचे तसं 'दिल अभी भरा नही' असं म्हणायचं होतं.

"एका वेळी दोन कप? वेडा आहेस की काय?"

"मिता, माझ्या खूप पार्ट्या द्यायच्या राहिल्यायत ना? त्या संपेपर्यंत मी तुला रोज एक आइसक्रीम खिलवणार. ठरलं."

तिने माझ्याकडे बघितलं. एरवी तिच्या नजरेवरून तिच्या मनात काय आहे याचा मला अंदाज यायचा. तेव्हा मात्र मला काही समजलं नाही.

"हे बघ मिता, आता आपले सहाच महिने शिल्लक राहिलेयत. मग तू जाशील तुझ्या घरी."

ती काही न बोलता माझ्याकडे बघत राहिली.

"मिता, मी... म्हणजे तू.. तुला...."

"अरे, काय म्हणायचंय ते स्पष्ट बोल ना" ती म्हणाली.

"म्हणजे मला असं म्हणायचंय की.. तू... तुला..."

"मला काय?"

"काही नाही. जाऊया" मी म्हटलं. वेटरला बिल दे अशी खूण केली.

"विजय, काय म्हणत होतास तू?"

मी डिशमध्ये बिलाचे पैसे आणि वेटरसाठी टिप ठेवली आणि उठलो. तिने इंटर्नशिपमध्ये छोटे छोटे कोर्सेस केले होते तसा मी बोलायचा कॉन्फिडन्स येण्यासाठी एखादा कोर्स केला असता तर कदाचित फायदा झाला असता. कदाचित नसता झाला, कारण इतरांबरोबर बोलताना हा प्रॉब्लेम मला येत नसे. तिच्या बरोबरही फक्त एकाच विषयावर बोलताना मला धाडस होत नसे. फक्त प्रेम व्यक्त करण्यासाठी कॉन्फिडन्स देणारा कोर्स काही मला सापडला नसता.

"म्हणजे मला असं म्हणायचं होतं की तुला आइसक्रीम देण्याऐवजी मी जेवण करून पार्टी दिली तर आवडेल का तुला?" मी काय तोंडाला आलं ते म्हणून टाकलं.

"तुला जेवण करता येतं?"

"अर्थात" मी म्हटलं.

"पुण्याची माणसं 'जेवण करून येतो' असं म्हणतात तेव्हा त्यांना 'जेवून येतो' हा अर्थ अभिप्रेत असतो. ते तुला येतं हे मला माहित आहे. तुला जेवण बनवता येतं का असं मला विचारायचंय."

"पंगतीत वाढतात किंवा बूफेमध्ये असतात तसे आणि तितके पदार्थ मला बनवता येणार नाहीत. पण कामचलाऊ जेवण बनवणं मला जमतं" मी म्हटलं.

"उदाहरणार्थ?"

"तू हो म्हण, आणि मग बघ मी तुला काय जेवायला वाढतो ते."

"हो."

ती अशी हो म्हणून टाकेल असं मला वाटलं नव्हतं.

"कधी?" मी विचारलं.

"कबीराने म्हटलं आहे ना, काल करे सो आज कर .."

"मिता, तुला आज जेवायला वाढायला मी काय हॉटेलातला शेफ वाटलो काय? तयारी करावी लागते त्याच्यासाठी."

"उद्या?"

"अगं, लागोपाठ रोज पार्ट्या करायला लागलीस तर वजन नाही का वाढणार तुझं?" मी पार्टी पुढे ढकलायचा प्रयत्न केला.

"कितीही खाल्लं तरीही माझं वजन वाढणार नाही असं मला कोणीतरी सांगितलंय."

'कोण तो मूर्ख माणूस?' असं मी म्हणू शकत नव्हतो, कारण ते मीच तिला नुकतंच सांगितलं होतं.

"रविवारी मी ऑफ कॉल आहे. रविवारी रात्री मेस बंद असते. कुठे जेवायचं हा प्रश्न पडतो. रविवारी रात्री चालेल?" मी विचारलं.

"होSSSS."

बाहेरून जेवण आणणं आणि ते गरम करून तिला वाढणं हा पर्याय माझ्याकडे नव्हता, कारण एकतर ती गंडली नसती. जेवण करताना मागे राहिलेली कांदे, भाजी वगैरेची सालं कुठे गेली याचं समाधानकारक उत्तर मला देता आलं नसतं, आणि आमच्या रिलेशनशिपमध्ये, ती अस्तित्वात आहे की नाही हा प्रश्न असला तरी, फसवाफसवीला स्थान नव्हतं. माझ्याकडे हॉट प्लेट होती, पण भांडी नव्हती.

"मिता, माझ्याकडे जेवण बनवायसाठी भांडी नाहीयेत" मी म्हटलं.

"मी देते. कोणती भांडी पाहिजेत?"

मुलगी अगदी हट्टाला पेटलेली दिसत होती.

"प्रेशर कूकर, एखादं फ्राइंग पॅन, ढवळायला मोठा सपाट चमचा...."

"रविवारी सकाळी माझ्या रूमवर ये आणि घेऊन जा" ती म्हणाली.

आम्ही हॉस्टेलच्या दिशेने निघालो.

"तू येवढा हळू हळू का चालतोयस?"

अंगावर ओढवून घेतलेल्या आफतीमुळे माझी पावलं जड झाली होती.

"मी नेहमीसारखाच चालतोय" मी म्हटलं. "तू पटपट चालतेयस. माझ्या हातचं जेवायचं म्हणून तुला उत्साह आलेला दिसतोय."

मी चालण्याची गती वाढवली. ती तिच्या रूमवर गेली, मी माझ्या. तिच्याबद्दल काही सांगता येणार नाही, पण मी मात्र खूप विचारात पडलो होतो. मला चहा करता येत असे. पण जेवताना त्याचा काही उपयोग नव्हता. कूकरमध्ये मला भात आणि वरण करता यायचं. पण कोणी जेवायला येणार तर त्याला वरण-भात कसा वाढायचा? बरं दिसलं नसतं. बरं बरोबर भाजी तर हवी. पोळया बनवणं शक्यच नव्हतं, कारण मला ते जमत नसे. बराच विचार केल्यावर मला आयडिया सुचली. कूकरमध्ये भात करून घेतला, की पॅनमध्ये त्याचा जीरा राइस करता आला असता. मग तो डब्यात काढून ठेवून त्याच पॅनमध्ये अंड्याची भूर्जी करता आली असती. चार फळांचे तुकडे करून त्यात दही आणि साखर घालून फ्रूट सॅलड करता आलं असतं. ते ठरल्यावर मला त्या रात्री शांत झोप लागली.

रविवारी सकाळी मी चार अंडी, तांदूळ, अर्धा किलो कांदे, थोडं जिरं, सफरचंद, केळी, संत्री, कोथंबीरीची एक जुडी, ब्राउन ब्रेड, दह्याचा एक कप आणि लोण्याचा एक पॅक आणला. मग मी मिताकडे गेलो.

"मिता, प्रेशर कूकर आणि पॅन न्यायला आलोय. थोडं मीठ आणि तिखट सुद्धा हवंय" मी म्हटलं.

"तू खरंच जेवण बनवणार आहेस?" तिने आश्चर्याने विचारलं.

"अर्थात. एकदा शब्द दिला म्हणजे दिला" मी म्हटलं. "रात्री साडेआठ वाजता ये."

संध्याकाळी सात वाजता मी कूकरमध्ये थोडं मीठ घातलेला भात लावला. तो होईपर्यंत कांदे सोलले आणि चिरले, कोथंबीर चिरली. कूकर झाल्यावर पॅनमध्ये थोडं लोणी घातलं आणि ते

विरधळल्यावर त्यात जिरं टाकलं, ते तापल्यावर त्यावर तो भात घातला, जरासं तिखट घातलं, कोथंबीर टाकली आणि परतली. त्याची चव बघितली. आश्चर्य म्हणजे ती बरी होती. आयटेम नंबर एक रेडी, असं म्हणून मी तो जिरा राइस एका स्टीलच्या डब्यात ओतला. मग त्याच पॅनमध्ये उरलेलं लोणी टाकलं, आणि ते तापल्यावर त्यावर कांदा टाकून वर झाकण ठेवलं. जळल्याचा मंदसा वास यायला लागल्यावर त्यात अंडी फोडून टाकली, तिखट-मीठ घातलं आणि ढवळ ढवळ ढवळलं. चव बघितली. मीठ कमी लागलं म्हणून आणखी थोडं घातलं आणि परत ढवळलं. मग झाकण ठेवलं आणि पॅन हॉट प्लेटवरून उतरवलं. आयटेम नंबर दोन रेडी, असं म्हणून फ्रूट सॅलड करायला घेतलं. ते सोपं होतं. एका काचेच्या बाउलमध्ये फळांचे तुकडे, दही आणि साखर घालून ढवळायला काही त्रास झाला नाही. सगळं तयार झालं तेव्हा सव्वाआठ वाजले होते. कचरा गोळा करून कचऱ्याच्या डब्यात टाकला. टेबलावरची पुस्तकं एका बाजूला रचून ठेवली आणि सगळी धूळ पुसून काढली. अस्ताव्यस्त टाकलेले कपडे खुंटीला टांगून ठेवले.

ठीक साडेआठ वाजता मिता आली.

"वास बरा येतोय" ती म्हणाली.

"ये" मी म्हटलं. "हात धुवून घे. जेवण गरम आहे तोवर जेवून घे."

ती बसली. मी टेबलावर दोन प्लेट्स मांडून ठेवल्या. तिच्या प्लेटमध्ये भूर्जी आणि जीरा राइस वाढला. एका बाजूला ब्रेडचे चार स्लाइस वाढले.

"जेव" मी म्हटलं. तिला जेवण आवडतं की नाही याचं मला टेन्शन होतं.

"हे काय, तू नाही जेवणार?" तिने विचारलं.

"मी... अं.. मी बनवलेल्या जेवणाने तुला काही झालं नाही तर मग मी जेवतो" मी म्हटलं. टेन्शन असल्यामुळे स्वतःला वाढून घ्यायला मी विसरलो होतो.

"विजय!" ती म्हणाली.

मी माझी प्लेट भरली.

"छान झालंय रे जेवण" ती म्हणाली.

"थँक्स. जेव पोटभर."

ती पोटभर जेवली. माझं लक्ष जेवणापेक्षा तिच्याकडेच जास्त होतं. तिच्याकडे बघताना तिने मला पकडू नये म्हणून काळजी घ्यायला लागत होती येवढंच.

डिशेस सिंकमध्ये टाकल्यावर मी तिच्यापुढे फ्रूट सॅलड ठेवलं.

"किती केलंस रे. तू येवढं सगळं करणार होतास तर मला आधी सांगायचं, मी आले असते तुझ्या मदतीला" ती म्हणाली.

आपल्या हाताने बनवून गर्लफ्रेंडला जेवू घालण्यात एक रोमँटिक आनंद असतो. ती मदतीला आली असती तर तो आनंद मला कसा मिळाला असता?

"मी भांडी धुते. तू बस" असं म्हणून तिने सगळी भांडी पटकन धुवून टाकली.

आपण हे पुन्हा केलं पाहिजे असं मला म्हणायचं होतं, पण ते राहिलंच. जेवण करता येणारा नवरा असणं बरं असतं असंही मला म्हणायचं होतं. पण ते तिला माहित असणार असं वाटल्यामुळे म्हणा किंवा बोलायचं धाडस न झाल्यामुळे म्हणा, मी गप्पच राहिलो.

"तू द्यायच्या राहून गेलेल्या सगळया पार्ट्या आजच्या पार्टीमुळे फिटल्या. आता पुढची पार्टी माझ्याकडून. गुड नाइट" असं म्हणून ती आपली भांडी घेऊन पसार झाली.

# ३७

वर्ष ८, मार्च ७

"विजय, माझा लॅपटॉप नीट चालत नाहीये. रुग्णालयातला कॉम्प्यूटर दुरुस्त करणारा म्हणतो की त्याला लॅपटॉपचं काही समजत नाही. तू बघतोस?"

"बघतो. नीट चालत नाही म्हणजे नक्की काय होतंय?" मी विचारलं. "तू तर कॉम्प्यूटरचा शॉर्ट कोर्स केला होतास ना?"

"त्या कोर्समध्ये कॉम्प्यूटर कसा वापरायचा ते शिकवायचे. दुरुस्त करायला नाही. तू तासाचे तास कॉम्प्यूटरवर काम करत असतोस. तुला प्रोग्रामिंग सुद्धा येतं म्हणे. तू नक्कीच दुरुस्त करू शकशील."

"हे बघ, मला डेस्कटॉप उघडून आतमध्ये काही गोंधळ आहे का ते बघता येतं. लॅपटॉप उघडणं मला जमायचं नाही. समज मी तो उघडू शकलो तरी त्यामुळे त्याची वॉरंटी जाईल."

"वॉरंटी कधीच संपलीय. पण मला वाटतं सॉफ्टवेअरचा प्रॉब्लेम आहे. तो बूटच होत नाही. माझा एम.डी.चा थिसिस आहे रे त्याच्यात. मी बॅक अपही घेतलेला नाही. आता मॅडमना दाखवून सबमिशन करायची वेळ आली आणि हा गोंधळ झालाय. कंपनीत पाठवून तो दुरुस्त करून आणण्यात एक-दोन आठवडे गेले तर मी काय करू रे?"

"काळजी करू नकोस. मी आहे ना?" मी म्हटलं.

एम.डी.चा थिसिस असलेला कॉम्प्यूटर सुरू होत नव्हता म्हणजे आपत्कालीन परिस्थिती होती. मी हातातलं काम सोडून तिच्याबरोबर निघालो. तिच्या टेबलावर तो लॅपटॉप उघडा पडलेला होता. पॉवर कॉर्ड आणि अ‍ॅडाप्टर जोडलेले होते. मी मेन स्विच ऑन केला. बूट करायचं बटण दाबलं. कॉम्प्यूटरचा दिवा लागला. बूट व्हायला सुरुवात झाली, पण तो डॉसमध्येच थांबला. काय बिघडलंय ते डेस्कटॉप कॉम्प्यूटरमध्ये शोधून काढणं तसं सोपं असतं. झाकण काढून एक एक भाग डिस्कनेक्ट करून काय होतं ते बघितलं की काय बिघडलं ते समजतं. जर आपल्याकडे सुटे भाग असतील, तर एक एक भाग बदलून कॉम्प्यूटर सुरू होतो का ते बघता येतं. मग बिघडलेला भाग बदलला की काम होतं. या गोष्टी लॅपटॉपमध्ये करणं मला शक्य नव्हतं. मिताचा लॅपटॉप माझ्याच्याने कदाचित दुरुस्त झाला नसता, पण तिच्या थिसिसची फाईल जरी मिळाली असती तरी तिचं काम झालं असतं. तिला ती फाईल दुसऱ्या कॉम्प्यूटरमध्ये उघडता आली असती.

"हे बघ मिता, लॅपटॉप दुरुस्त झाला नाही तर मी निदान तुझ्या थिसिसची फाईल काढायचा प्रयत्न करतो. ते झालं तर तू माझ्या नाहीतर इतर कोणाच्या तरी कॉम्प्यूटरवर थिसिसचं काम पुरं कर. चालेल?"

"चालेल. काय ते लवकर कर रे" ती काकुळतीने म्हणाली.

मी तिचा लॅपटॉप ऑफ केला आणि मग सेफ मोडमध्ये बूट करायचा प्रयत्न केला. ते झालं असतं तर पेन ड्राइव्हमध्ये थिसिसची फाइल खेचून घेता आली असती. पण तो सेफ मोडमध्येही जाईना. तिचं तोंड जास्त जास्त पडत चाललं होतं.

"मिता, मी काहीही करून तुझी फाइल काढून देतो. तू काळजी करू नकोस. तू असं कर, कँटीनमध्ये जाऊन एक कॉफी पिऊन ये. तुला जरा बरं वाटेल. तोपर्यंत मी काय ते करतो."

"नको, मी इथेच थांबते" ती म्हणाली.

पेशंटचं ऑपरेशन करताना त्याच्या नातेवाइकांना ते बघू देत नाहीत, ओटीच्या बाहेर बसवतात. हे तसंच आहे असं समज, असं म्हणावं असं मला वाटलं. पण ती निग्रही होती. माझं तिने ऐकलं नसतं. मी विन्डोजचे बूट ऑप्शन्स दाखवणारा स्क्रीन आणला. विन्डोज जेव्हा शेवटचं नीट चाललं होतं तेव्हाचं कॉन्फिग्युरेशन वापरून बूट करण्याचा ऑप्शन निवडला. पण त्याला दया आली नाही. तो डॉसमध्येच अडकून राहिला. त्याचं डॉसही धडपणे चालत नव्हतं. काळा स्क्रीन आणि त्याच्यावर उघडझाप होणारा पांढरा ठिपका होता, पण डॉस प्रॉम्प्ट काही दिसत नव्हता. डॉसमधून फाइल काढणं शक्य नव्हतं. मग मी परत एकदा बूट करून एफ-२ की दाबून धरली. लॅपटॉप बायॉसमध्ये गेला. आता आशेचा किरण दिसायला लागला होता. मी फर्स्ट बूट ऑप्शन सीडी रॉम दिला.

"मिता, मी माझ्या रूममधून विन्डोजची लाइव्ह सीडी घेऊन येतो. तू हे सगळं असंच ठेव. काहीही करू नकोस. ओके?"

तिने होकारार्थी डोकं हलवलं.

"तुझा पेन ड्राइव्ह शोधून ठेव. बॅक अप घेण्यासाठी लागेल. ओके?"

तिने परत डोकं हलवलं. मुलगी अगदीच हवालदिल झालेली दिसत होती. नाहीतर तिची शब्दगंगा कधी आटत नसे. माझा थिसिस असा हरवला असता तर माझीही तीच गत झाली असती.

मी धावत पळत गेलो आणि विन्डोजची लाइव्ह सीडी घेऊन आलो. तिच्या लॅपटॉपच्या सीडी रॉममध्ये घातली. बायॉसचे बदल सेव्ह करून एक्झिट केलं आणि लॅपटॉप परत बूट केला. त्याने थोडा वेळ घेतला आणि विन्डोज सुरू झालं.

"सुरू झाला!" ती अत्यानंदाने ओरडली. "पण वॉलपेपर नेहमीच्यासारखा दिसत नाहीये."

"मिता, हा तुझा डेस्कटॉप वॉलपेपर नाहीये. खरं तर हे तुझं विन्डोजही नाहीये. हे माझ्या लाइव्ह सीडीचं विन्डोज आहे."

"म्हणजे काय?"

"ते मी तुला नंतर कधीतरी शिकवीन. आता तुझा पेन ड्राइव्ह आण आणि लॅपटॉपला जोड" मी म्हटलं.

तिने पेन ड्राइव्ह आणला. तो लॅपटॉपला जोडण्यासाठी ती वाकली. तिच्या शांपूचा गंध मला अस्वस्थ करून गेला. मी स्तब्ध राहिलो. पेन ड्राइव्ह जोडून ती दूर झाली. मी तिच्या लॅपटॉपकडे पाहिलं.

"मिता, सगळे ड्राइव्ह दिसतायत. नेहमीसारखा लॅपटॉप वापर आणि थिसिसच्या फाइलचा बॅक अप घेऊन टाक."

मी उठलो. ती स्थानापन्न झाली. थिसिसची फाइल पेन ड्राइव्हमध्ये गेली.

"हुश्श!" ती म्हणाली आणि माझ्याकडे वळली. तिचे डोळे चकाकत होते.

आता ती माझ्या मानेभोवती हात गुंफणार असं मला वाटलं.

"थँक्स!" ती म्हणाली. "तू आज मला वाचवलंस."

"तू कधीही बोलाव, मी येईन असं मी तुला म्हटलं होतं" मी म्हटलं.

"आठवतंय रे" ती म्हणाली. "मला माहित होतं की बोलावलं तर तू नक्की येणार."

"आता तुझ्या सगळया फायली डी ड्राइव्हमध्ये एक नवा फोल्डर करून त्यामध्ये टाक. मग मी सी ड्राइव्ह फॉरमॅट करतो आणि विन्डोज परत घालून देतो. नंतर तुझं इतर सॉफ्टवेअर घालतो. तुझा लॅपटॉप परत नवा कोरा होईल."

तिने फायली डी ड्राइव्हमध्ये सेव्ह केल्यावर मी तिचा लॅपटॉप माझ्या रूमवर घेऊन गेलो. सी ड्राइव्ह फॉरमॅट करून विन्डोज, ऑफिस आणि अँटिव्हायरस घातलं. इंटरनेट सुरू करून टाकलं. लॅपटॉप चालवून पाहिला. तो व्यवस्थित चालत होता. मग मी थांबलो. थोडा वेळ विचार केला. मी व्हिज्युअल बेसिक प्रोग्राममध्ये फक्त मितासाठी खास असा एक स्क्रीनसेव्हर लिहून ठेवलेला होता. त्याला 'मिताचा स्क्रीनसेव्हर' असं नाव दिलं होतं. जर कधीतरी संधी मिळाली तर तो तिच्या लॅपटॉपमध्ये घालायचा अशी माझी इच्छा होती. मनातल्या मनात हो-नाही करता करता शेवटी मोहाने विचारावर मात केली. मी तो स्क्रीनसेव्हर इन्स्टॉल केला. त्याला डिफॉल्ट स्क्रीनसेव्हर केलं.

थोडा वेळ जर लॅपटॉपवर काही काम केलं नाही तर स्क्रीन खराब होऊ नये म्हणून स्क्रीनसेव्हर सुरू होतो. मग त्याच्यात जी चित्रं किंवा लिखाण असतं ते स्क्रीनवर दिसत रहातं. थोडं प्रोग्रामिंग वापरून मी दहा वाक्यं आलटून पालटून स्क्रीनवर दिसतील असा स्क्रीनसेव्हर बनवला होता. मी तो चालवून पाहिला. ती वाक्यं स्क्रीनवर एकामागून एक दिसायला लागली.

*'तुमची एकमेव मर्यादा तुम्हीच असता..'*

*'एके दिवशी की पहिल्या दिवशी - तुम्हीच ठरवा..'*

*'आठवणींचा संग्रह करा, वस्तूंचा नाही..'*

*'आयुष्य एक प्रवास आहे,, शर्यत नाही..'*

*'ध्वनी बना, प्रतिध्वनी नाही..'*

*'योग्य वेळेची वाट पहात थांबू नका., ती कधीच येत नाही..'*

*'जुन्या मार्गांनी नवे दरवाजे उघडत नाहीत..'*

*'संधीची वाट बघत थांबू नका, संधी निर्माण करा..'*

*'चुका होणं हा प्रयत्नशील असण्याचा पुरावा आहे..'*

*'माझं तुझ्यावर प्रेम आहे ते तुला ठाउक आहे का?'*

ते शेवटचं वाक्य वाचलं आणि ते मीच लिहिलेलं होतं तरीही माझ्या काळजाचा एक ठोका चुकला. तोंडाने जे सांगायचं धाडस होत नसे ते जुन्या काळातले प्रेमिक प्रेमपत्रांतून व्यक्त करत असत. आधुनिक काळात टेक्स्ट मेसेज, व्हॉट्सअॅप मेसेज नाहीतर इमेल वापरतात. मला वाटतं जगातला मीच पहिला माणूस असेन ज्याने एका स्क्रीनसेव्हरला प्रेमाचा संदेशवाहक बनवलं होतं. मिताचा स्क्रीनसेव्हर सुरू असताना जेव्हा हा प्रेमसंदेश स्क्रीनवर येईल तेव्हाच मिता स्क्रीनकडे बघेल याची काही गॅरंटी नव्हती. पण मी आशावादी होतो. ज्याच्याकडे काही नसतं तो आशेवर जगतो.

मी मिताचा लॅपटॉप परत दिला.

"आता तुला काही त्रास होणार नाही असं वाटतं. झालाच तर मला बोलाव" मी म्हटलं.

"विजय, तुझं थिसिसचं काम बाजूला ठेवून तू माझ्यासाठी चार-पाच तास खर्च केलेस. थँक्स. तुला माहित आहे का की तू एक फार चांगला मुलगा आहेस?"

"तुला असं वाटतं त्यातच सगळं भरून पावलं" मी म्हटलं.

# ३८

वर्ष ८, मे १५

जोशीबाईंची नगरपालिकेच्या दुसऱ्या रुग्णालयात बदली झाली होती. त्यांना ती नको होती. तत्कालीन डीनने ती आपल्यावर असलेल्या आकसातून केली आहे असं त्यांना वाटत होतं. ती थोपवण्यासाठी त्यांना वेळ हवा होता. जर बदलीची ऑर्डर घेतली तर बदलीच्या ठिकाणी रुजू व्हावं लागेल म्हणून जोशीबाई ऑर्डर न स्विकारताच तडकाफडकी रजेवर गेल्या होत्या. त्यांना हा सल्ला त्यांच्या वकिलाने किंवा माहितगार हितचिंतकाने दिला असं सगळेजण म्हणत होते. मी परिक्षेच्या तयारीसाठी रजेवर असताना मला जोशीबाईंचा फोन आला.

"अरे विजय, आज आपल्या ॲनास्थेशियाच्या विजापूरकरांच्या मुलीचं सिझेरियन करायचं आहे. त्या माझ्या शेजारीच रहातात. आज रजेवर असल्यामुळे मी ते करायला पोचू शकत नाहीये. तर ते तू कर."

ॲनास्थेशियाच्या प्राध्यापकाच्या मुलीचं सिझेरियन मी करायचं? मला आश्चर्य वाटलं. हुद्द्याने येवढ्या मोठ्या व्यक्तीच्या मुलीचं ऑपरेशन मी करावं असं जोशीबाईंना वाटलं हे मोठं आश्चर्य होतं. मला स्वतःला ते करण्यात काही प्रॉब्लेम वाटत नव्हता. पण बाईंनी दुसऱ्या कोणा सिनियरला न सांगता मला सांगावं अं? कदाचित त्यांना दुसऱ्या कोणाचे उपकार नको होते असतील. मानद डॉक्टरांच्या नावाने त्या नेहमी खडे फोडायच्या. त्यामुळे त्यांना विनंती करण्याचा प्रश्नच नव्हता. अहुजामॅडम आणि जोशीबाई यांचा बहुतेक जोशीबाईंच्या स्वभावामुळे छत्तीसाचा आकडा होता. राहता राहिली लेक्चरर मंडळी. आज आपण सांगितलेलं काम केलं तर

ते उद्या आपल्याकडून काय काय वसूल करतील याची भिती वाटत असल्यामुळे त्यांनी शेवटी मलाच निवडलं असावं. मी परतफेड म्हणून काही मागणार नाही असं त्यांना वाटलं असावं.

ऑपरेशनसाठी आमच्याकडून मी सर्वात वरिष्ठ डॉक्टर होतो. माझ्या मदतीला माझा हाउसमन होता. ॲनास्थेशिया द्यायला त्या विभागाचे तत्कालीन प्रमुख होते. त्यांच्या मदतीला पाच डॉक्टर मंडळी होती. त्यांच्यात मिता सगळ्यात कनिष्ठ होती. विजापूरकरांच्या मुलीला स्पायनल ॲनास्थेशिया नको होता, जसा तो पूर्वी अनुभव घेतलेल्या किंवा त्याबद्दल इतरांकडून ऐकलेल्या बऱ्याच पेशंटांना नको असायचा. त्या सगळ्यांना ॲनास्थेटिस्ट मंडळी स्पायनल ॲनास्थेशियाच कसा चांगला हे परोपरीने सांगत असत. स्वतःच्या मुलीला ते पटवण्यात तिची आई असफल झालेली दिसत होती. असो. स्पायनल काय आणि जनरल काय, कोणत्याही ॲनास्थेशियात ऑपरेशन करायची माझी तयारी होती. मला पटपट कामं उरकून परिक्षेची तयारी करण्यासाठी जायचं होतं.

"तुम्ही जनरल ॲनास्थेशिया देताय तर मी आधी पेशंटचं पोट निर्जंतुकं लावून आणि निर्जंतुक केलेले टॉवेल पांघरून तयार करून ठेवतो" असं ॲनास्थेटिस्ट्सना सांगून मी सगळी तयारी केली. विभागप्रमुखांनी जनरल ॲनास्थेशिया दिला. तिच्या श्वासनलिकेत ट्यूब टाकताना त्यांचा हात कापत होता. त्याचं कारण मानसिक ताण हे होतं की वृद्धत्व हे होतं परमेश्वर जाणे. काहीही कारण असलं तरी त्यांनी आपला हात कापतो म्हटल्यावर ते काम दुसऱ्या कोणावर तरी सोपवायला हवं होतं. मिताने ते काम एकदम फर्स्ट क्लास केलं असतं असं माझ्या मनात आलं. ॲनास्थेशिया दिल्याबरोबर मी ऑपरेशनला सुरुवात केली. जनरल ॲनास्थेशिया दिल्यावर मूल लवकरात लवकर बाहेर काढावं लागतं, नाही तर जन्मानंतर त्याची श्वसनक्रिया दडपली जाण्याची शक्यता असते. त्याप्रमाणे मी मूल सहा मिनिटांत बाहेर काढलं. त्याने 'टॅहँ' केलं. विभागप्रमुखांनी निश्वास टाकला. मी गर्भाशय शिवण्यासाठी नेहमीप्रमाणे पोटाबाहेर काढलं.

"थांब, थांब, तू हे काय करतोयस?" विभागप्रमुखांनी आपलं थरथरतं बोट त्या गर्भाशयाकडे रोखून मला विचारलं. "गर्भाशय पोटाबाहेर का काढलंयस?"

"शिवण्यासाठी. ते बाहेर काढलं की टाके मारणं सोपं जातं. रक्तस्त्रावही कमी होतो" मी म्हटलं. "शिवून झालं की मी ते परत पोटात टाकेन."

"मग हरकत नाही. मला वाटलं तू ते ऑपरेशन करून काढून टाकतोयस" ते म्हणाले.

त्यांचं हे बोलणं ऐकून त्यांचं बोट वृद्धत्वामुळेच थरथरतं हे माझ्या लक्षात आलं, कारण असं चुकीचं अनुमान वृद्धत्वामुळे मतीभ्रंश झाला तरच एका अॅनास्थेशियाच्या विभागप्रमुखांनी काढलं असतं. मी काही बोललो नाही. पटपट ऑपरेशन उरकलं, पेशंटला शल्योत्तर वॉर्डात पाठवलं आणि अभ्यास करायला लायब्ररीत गेलो.

एम.डी. परिक्षेचा अभ्यास करून खूप मानसिक थकवा यायचा. रोजच्या कामात न लागणाऱ्या पण परिक्षकांना विचाराव्याशा वाटणाऱ्या अनेक गोष्टी वाचून लक्षात ठेवाव्या लागायच्या. अभ्यास करून थकलो की आम्ही पुस्तकं लायब्ररीतच सोडून चहा प्यायला म्हणून कँटीनमध्ये जात असू. त्याप्रमाणे प्रताप, अनिल आणि मी दुपारी चहा प्यायला गेलो. चहाने तरतरी आल्यावर आम्ही परत निघालो होतो, तो मिता कँटीनमध्ये पोचली.

"विजय, जरा थांब. काही सांगायचं आहे" ती म्हणाली.

"तुम्ही व्हा पुढे, मी पाच मिनिटांत येतोच" असं प्रताप आणि अनिलला सांगून मी तिथेच बसलो.

"कॉफी?" मी विचारलं. तिने मान डोलावली.

तिच्यासाठी कॉफी आणि माझ्यासाठी चहा मागवून मी म्हटलं, "बोल, काय सांगायचंय?"

"तुझ्याबद्दल आमची बॉस मंडळी खूप चांगलं बोलत होती" ती म्हणाली. "तुम्ही स्वत: सिझेरियन करायला येऊ शकत नसाल तर विजयला पाठवा असं विजापूरकरांनी जोशीमॅडमना सांगितलं."

"कमाल आहे. मला कधी कोणी बोललं नाही."

"तुझ्या तोंडावर कसं सांगतील ते?"

"ते बरोबर आहे. थँक्स."

"वेलकम" ती म्हणाली.

"तुझा अभ्यास कसा चाललाय?" मी विचारलं.

"ठीक चाललाय. परिक्षेपर्यंत संपेल असं वाटतंय. तुझा कसा चाललाय?"

"बरा चाललाय. सध्या दुसरी उजळणी चालू आहे. परिक्षेपर्यंत आणखी दोन वेळा उजळणी होईल असं वाटतंय" मी म्हटलं.

"माझा एकदाच करून होणार आहे आणि तू चार उजळण्यांबद्दल बोलतोयस? मी तुझ्याबरोबर बोलायलाच नको होतं. तुझं ऐकलं की मनावर दडपण येतं. तू असं का सांगतोस? दुष्ट कुठला!"

'तू विचारलंस म्हणून मी सांगितलं' असं म्हणण्याचा वेडपटपणा मी केला नाही.

"अगं गंमत केली, सॉरी. माझाही अभ्यास परिक्षेपर्यंत संपेल" मी खोटंच सांगितलं. माझी उजळणीच चालू होती. पण 'ब्रुवेत वचनम् प्रियम्' याप्रमाणे तिला बरं वाटेल असं मी बोललो. लग्न झालेले पुरुष लग्नानंतर असंच करतात असं मी ऐकून होतो. आता मैत्रिणीबरोबरही तसंच करावं लागतंय हा शकुन म्हणायचा का, असा आशावादी विचारही माझ्या मनात तरळून गेला.

तिने थोडा विचार केला.

"खोटं."

"अं?" मी हबकलो. तिला कसं कळलं मी खोटं बोललो ते?

"तुझा अभ्यास इंटर्नशिपमध्येच झाला होता. आरेमो झाल्यावर तू ..."

"मुली नाही फिरवल्या हं मी" मी गडबडून म्हटलं. तिला निखिलने माझ्याबद्दल काय सांगितलं होतं ते आठवलं असावं.

"..उजळणी करणार होतास. उजळणी करतोयस तर खोटं का सांगितलंस?"

"तुला दडपण आलं. मग तू मला दुष्ट म्हणालीस म्हणून" मी खरं कारण सांगून टाकलं.

"तुला दुष्ट म्हणायचं नव्हतं रे. अभ्यासाच्या दडपणामुळे मी चुकून बोलले. सॉरी."

"जाऊ दे. चल अभ्यास करायला जाऊया" असं म्हणून मी उठलो. चहा-कॉफीचं बिल मागवलं.

"मी देते" ती म्हणाली. "दर वेळी तूच देतोस."

"देऊ दे ग. एकच तर मैत्रीण आहेस जिच्याबरोबर कँटीनमध्ये जातोय. शंभर असत्या तर दिले नसते."

"एकच का? नेहा सुद्धा मैत्रीण आहे ना तुझी?"

"सुनीताचा ससेमिरा टाळण्यासाठी नेहाची मदत घेतल्यापासून ती माझ्याबरोबर बोललेली नाही. आता तूही मला दुष्ट म्हटल्यावर मी टरकलो. म्हटलं तू सुद्धा बोलायची थांबलीस तर काय करायचं?"

ती हसली.

# ३९

वर्ष ८, मे ३०

आमची एम.डी.ची डिझर्टेशन्स विद्यापीठाला पाठवून झाली होती. तिकडून काही आक्षेप आले नव्हते, म्हणजे ती स्वीकृत झाली होती असं समजायला हरकत नव्हती. आम्ही सगळे अभ्यास एके अभ्यास करण्यात बुडालेले होतो. जागेपणीचे सगळे तास अभ्यासात घालवणं शक्य नव्हतं. त्यामुळे मधून मधून कँटीनमध्ये जायचं, किंवा कट्ट्यावर बसून पाच-दहा मिनिटं गप्पा मारायच्या आणि परत अभ्यासाला लागायचं असं चाललं होतं. काही जणं हॉस्टेलच्या रूममध्ये बसून अभ्यास करायचे. मधून मधून विरंगुळा म्हणून ते इतर कोणाच्या रूमवर जायचे. नेहा महत्वाचे मुद्दे खडूने रूमच्या भिंतींवर लिहून ठेवायची. जेव्हा काही आठवायचं नाही तेव्हा ती लगेच भिंतीवर शोधायची. जेव्हा सगळया भिंती भरून झाल्या, तेव्हा तिने रूमबाहेरच्या कॉरिडॉरच्या भिंती भरून टाकायला सुरुवात केली. लवकरच त्या भिंती सुद्धा भरल्या.

"आता ती खालच्या आणि वरच्या मजल्यांच्या भिंतींवर लिहायला जाईल का?" प्रतापने आमच्या एका मध्यंतरात विचारलं.

"शक्यता कमी आहे" अनिल म्हणाला. "आरामात वाचता यावं म्हणून ती भिंतींवर लिहिते. वर खाली करायला तिला जमायचं नाही. सत्तर एक किलो वजन जिन्याने वर नेणं आणि खाली आणणं तिला झेपणार नाही."

नेहा ते ऐकायला तिथे नव्हती म्हणून बरं झालं. नाहीतर तिचा ढाई किलोका हथोडा अनिलच्या जबड्याचे दोन तुकडे करूनच थांबला असता.

"पण ती भिंतींवर लिहिते म्हणजे काय? आमच्या स्वातंत्र्यावर गदा येते" हर्षद म्हणाला.

"तुझ्या स्वातंत्र्याचा आणि तिने त्या भिंतींवर लिहिण्याचा काय संबंध?" प्रतापने विचारलं.

"फोनवर बोलतांना मला भिंतीला टेकून उभं राहता येत नाही. शर्टाला आणि पँटला खडू लागतो."

कॉरिडॉरच्या एका भिंतीवर इंटरकॉमचं इंस्ट्रूमेंट लावलेलं होतं. रात्री बाबालॉजी करण्यासाठी हर्षद जर वॉर्डात जाऊ शकला नाही तर तिथे इंटरकॉमवर बबली नाहीतर जी कोण त्याची तत्कालीन मैत्रीण असायची तिच्याबरोबर गप्पा मारत असे. 'आपल्या पेशंटचं अमुक कर, तमुक कर' येवढंच जर सांगायचं असतं तर एका मिनिटांत फोन जागेवर ठेवून तो परत जाऊ शकला असता. पण बराच काळ उभं राहून गप्पा मारायच्या म्हटलं की पायांना जरा विश्रांती म्हणून भिंतीवर रेलावं लागत असे.

"तू खुर्ची घेऊनच का नाही बसत तिथे?" अनिलने विचारलं. "मग कपड्यांना खडूचे डाग पडायचे नाहीत."

हर्षदचा चेहरा विचारमग्न झाला. आता नेहाच्या फोनजवळच्या भिंतीवरच्या नोट्स पुसल्या जाणार नाहीत म्हणून आम्ही हुश्श केलं आणि आपापल्या अभ्यासाला गेलो.

अभ्यास करतांना भूक खूप लागते म्हणे. खूप खाल्ल्यामुळे असेल, कदाचित एका जागी बसून अभ्यास करत राहिल्यामुळे असेल किंवा वॉर्डात इकडे तिकडे धावायचा व्यायाम होत नसल्यामुळेही असेल, परिक्षार्थींची वजनं पटापट वाढत असत. हर्षदचं वजन पाच एक किलो वाढलं.

"हर्षद येवढा जाडा झालाय. त्याला त्याचं काहीच कसं वाटत नाही?" आमच्या एका मध्यंतरात प्रतापने नवा विषय सुरू केला. हर्षद तेव्हा बहुतेक लायब्ररीत गेला असावा. तो असता तर प्रतापने बहुतेक नेहाच्या वजनावर बोलायला सुरुवात केली असती.

"तो जाडा झालेला नाहीये. तो आता मर्दानी दिसायला लागलाय" अनिल म्हणाला.

"त्यामुळे तो जास्त देखणा दिसायला लागलाय असं बबली म्हणाली असणार" मी म्हटलं.

"तरीच तो हल्ली दोन तुरे असलेल्या कोंबड्यासारखा वटमध्ये चालतो" अनिल म्हणाला. ही दोन तुरे असणाऱ्या कोंबड्याची कल्पना त्याने कोणाची तरी मारली आहे याबद्दल माझी खात्री होती, पण डोक्यात सगळा अभ्यास भरलेला असल्यामुळे ती कोणाची मूळ कल्पना होती ते तेव्हा मला आठवेना. परिक्षा संपल्यावर ते मला आठवेल असं मनाशी म्हणून मी त्याबद्दल विचार करायचं थांबवलं.

"पण त्याला त्याचे कपडे कसे होतात? नवे कपडे शिवून घ्यायला वेळ कुठून आणणार तो?" प्रताप म्हणाला.

"मला लहानपणी शाळेत चांदोबाची गोष्ट सांगितली होती. चांदोबाचं वजन महिन्याचे पहिले दोन आठवडे वाढत जायचं आणि नंतरचे दोन आठवडे कमी होत जायचं. रोज त्याचे कपडे लहान मोठे करून त्याची आई थकून गेली. शेवटी तिने प्रत्येक दिवसाच्या आकाराला योग्य असे अठ्ठावीस जोड शिवले. मग चांदोबाला रोज आपल्या आकाराचे कपडे मिळायला लागले. हर्षदच्या आईने तसं काही तरी केलं असेल" मी म्हटलं.

"अठ्ठावीस दिवसांना अठ्ठावीस जोड कशाला हवेत? पहिल्या दिवसाचा जोडा अठ्ठावीसाव्या दिवशी बरोब्बर फिट झाला असता, आणि तिसऱ्या दिवसाचा जोडा सव्वीसाव्या दिवशी फिट झाला असता. म्हणजे त्याला चौदा जोड पुरले असते. मला काय म्हणायचंय ते तुमच्या लक्षात आलं ना?" प्रताप म्हणाला. त्याचं म्हणणं बरोबर होतं.

"तू चमट आहेस हे आमच्या लक्षात आलं" अनिल म्हणाला. प्रताप त्याला मारायला उठल्यावर त्याने एका कानापासून दुसऱ्या कानापर्यंत जिवणी फाकून स्मितहास्य केलं. प्रतापचा राग बटण ऑफ केल्यासारखा गेला.

लायब्ररीत बसून कंटाळा आला की आम्ही हॉस्टेलच्या रूममध्ये अभ्यास करायला जायचो. एकदा मी माझ्या रूममध्ये माझ्या सगळया नोट्स मांडून अभ्यास करत बसलो होतो. एक एक विषय झाला, की ते बंडल डावीकडे ठेवायचं आणि उजवीकडच्या ढिगातलं दुसऱ्या विषयाचं बंडल उजळणी करण्यासाठी घ्यायचं असं माझं चाललं होतं. डावा ढीग वाढत चालला होता. उजवा ढीग संपला, की डावा ढीग उजवीकडे ठेवायचा आणि परत एक एक बंडल वाचायला घ्यायचं असा माझा प्लान होता.

"विजय, येऊ का?" उघड्या दारातून मिताचा आवाज आला.

"ये ना" मी म्हटलं. "बस." उजवा ढीग, डावा ढीग, उजळणी हे सगळं सगळं क्षणात विसरायला झालं. ती समोरच्या खुर्चीत बसली.

"टेन्शन आलंय रे."

"मिता, तू डी.ए.त पहिली आली होतीस. विसरलीस? तुला कशाला टेन्शन आलंय?

"काय प्रचंड अभ्यास आहे रे. काही काही गोष्टी तर अजिबात लक्षात रहात नाहीत."

"एक आयडिया सुचवू?" मी ऑफर केली.

"हो."

"हे बघ, तू प्रत्येक विषयाचं वाचन करतेस तेव्हा एका वहीत त्या विषयाचं नाव लिही. त्याच्या खालच्या ओळींत जे लक्षात रहात नाही तेवढंच थोडक्यात लिही. किंवा ते पुस्तकात ज्या पानावर असेल त्याचा नंबर लिही. तेथे ते सहज सापडावं म्हणून ते अधोरेखित करून ठेव. मग ते

आठवत नाही असं टेन्शन आलं की वहीत बघायचं, काय लिहिलंय ते वाचायचं किंवा पुस्तकाचं ते पान उघडून वाचायचं. असं एक दोनदा झालं, की आपल्याकडे ती माहिती अगदी हाताशी आहे अशी तुझ्या मनाची खात्री होईल आणि टेन्शन येणं थांबेल. परिक्षेला जायच्या दिवशी फक्त ती वही घेऊन बसायचं, आणि फक्त तेवढीच उजळणी करायची. बाकी गोष्टी तुला नीट येत असणारच. कितीही कठीण पेपर आला तरी तू शंभर टक्के रेडी असशील."

तिने थोडा वेळ माझ्याकडे डोळे मोठ्ठे करून पाहिलं. मग म्हणाली, "काय सॉलिड आयडिया आहे रे. तुझी स्वतःची आहे?"

"हो" मी म्हटलं.

"तुझी हे लिहिलेली वही दाखव."

मी वहीला हात घातला आणि मागे घेतला.

"का थांबलास? वही दाखवतोस ना?" ती म्हणाली.

"नको. तू दुष्ट म्हणशील" मी म्हटलं.

तिने सरळ माझा हात जिच्याकडे जाऊन परत आला होता ती छोटीशी डायरी उचलली. मी झोंबाझोंबी करून डायरी परत घेणार नाही याची तिला खात्री दिसत होती. मी झोंबाझोंबी काही केली नाही. अख्ख्या आयुष्यात मी तिला चुकून सुद्धा पुसटसाही स्पर्श केलेला नव्हता. झोंबाझोंबी कसली करणार होतो? तिने डायरीची पानं चाळली.

"हे काय? येवढ्या थोड्या गोष्टीच तुझ्या लक्षात रहात नाहीत?"

मी मान हलवली. ती थोडा वेळ त्या डायरीकडे बघत राहिली. बहुतेक ती विचार करत असावी आणि तिला ती डायरी दिसतही नसावी.

"मिता?" मी म्हटलं.

"मला तुझा खूप हेवा वाटतो रे" ती म्हणाली. "येवढी सगळी तयारी तू केलीयेस, आणि मी ..."

ती उठली आणि जायला निघाली.

"मिता, थांब" मी म्हटलं. "तू टेन्शन घेशील म्हणून मी माझी डायरी तुला दाखवत नव्हतो. माझ्या येवढी तयारी एखादाच करतो. बाकी सगळे सुद्धा कमी तयारी असूनही उत्तीर्ण होतात. मी ए टाइपच्या पर्सनॅलिटीचा आहे. म्हणून तू सुद्धा तसं व्हायला हवं असं काही नाही. तू माझ्यापेक्षा जास्त आनंदात आयुष्य काढशील बघ."

"...."

"मी सांगितलं तसं तू करून बघ. अजून खूप वेळ आहे तुझ्याकडे. दुसरी एक ट्रिक सांगू?"

ट्रिक हा शब्द ऐकल्यावर तिची कळी जराशी खुलली.

"गेल्या पाच वर्षांचे पेपर मिळव. समोरच्या बुकस्टॉलमध्ये मिळतात. ते बघूनच परिक्षक प्रश्नपत्रिका बनवतात. आधी येऊन गेलेले प्रश्न परत येत नाहीत. चालू वर्षात ॲनास्थेशियाच्या ज्या कॉन्फरन्सेस झाल्या, त्यांच्यात कोणत्या विषयांवर शोधनिबंध वाचले गेले आणि कोणती ओरेशन्स झाली ते बघ. परिक्षक त्या विषयांवर जास्त करून प्रश्न विचारतात. शेवटचा मुद्दा असा की तुमच्या चारापैकी प्रत्येक पेपरचं सिलॅबस ठरलेलं असतं. ॲनास्थेशियातल्या सर्व प्रकारांतल्या एकावर एक प्रश्न यावा, सगळ्या सिस्टिम्समधल्या एकीवर एक प्रश्न यावा. मी एकदम बरोबर असं तुला सांगू शकत नाही, कारण तुझे विषय मला नीटसे माहित नाहीत. पण त्यामागची तत्वं तुझ्या लक्षात आली असतील" मी म्हटलं.

"या पद्धतीने काढलेला पेपर किती अचूक असतो?"

"नव्वद टक्के" मी म्हटलं. "त्या पेपरातले सगळे विषय नीट घोटून परिक्षेला जा. फक्त ते प्रश्न कोणाला देऊ नकोस. जर ते परिक्षेत विचारले गेले, तर मिताला पेपर आधी मिळाला होता असं कोणीतरी सगळीकडे करेल. जर ते प्रश्न पेपरात आले नाहीत तर तू मुद्दाम भलतेच प्रश्न देऊन दिशाभूल केलीस असं म्हणायलाही लोकं कमी करणार नाहीत. ज्यांची इच्छा आहे ते स्वतः हीच पद्धत वापरून पेपरांचा अंदाज बांधू शकतात. होय ना?"

मिताने परत थोडासा विचार केला.

"विजय, तू मला खूपच मदत केलीयस. मी विचारू नये, पण मला एक प्रश्न पडलाय. विचारू?"

"विचार" मी म्हटलं.

"तुला हे सगळं माहित होतं तरी तू मला आधी ते का सांगितलं नाहीस?"

या प्रश्नाचं उत्तर द्यायला मला जराही विचार करावा लागला नाही.

"कारण यातली एकही ट्रिक न वापरता तू छान मार्क्स मिळवशील याची मला खात्री होती आणि अजूनही आहे" मी म्हटलं.

ती हसली.

"एखाद्याचा आत्मविश्वास कसा वाढवावा यावर तू छोटे छोटे कोर्सेस चालव. खूप चालतील" ती म्हणाली.

तुझ्यासारखं हसणारे विद्यार्थी मिळाले तर मी फुकटात कोर्सेस चालवेन असं मला म्हणायचं होतं, पण ती भुर्रकन उडून गेली आणि ते राहिलंच.

# ४०

वर्ष ८, जुलै २७

एम.डी.च्या परिक्षा पार पडल्या होत्या. मिताला आणि मला पेपर चांगले गेले होते. प्रॅक्टिकलच्या परिक्षाही छान झाल्या होत्या. मिताला भेटायला मी तिच्या रूमवर गेलो होतो.

"आता पुस्तकांना थोडे दिवस तरी हात लावायला नको" मी म्हटलं.

"आता पुस्तकांना हात लावायला नको असं म्हण" मिता म्हणाली.

"आता पुस्तकांना हात लावायला नको" मी आज्ञाधारकपणे म्हटलं.

"मग काय करायचा प्लान आहे?" तिने विचारलं.

ती बरोबर असती तर बरंच काही करायला सुचलं असतं.

"तू काय करतेयस? घरी जाणारेस?"

"नाही रे. परिक्षेची सुट्टी संपली. आता कामावर जायला हवं. आमचे सिनियर्स आता माझ्या जिवावर थोडा आराम करतील."

"बिच्चारी!"

"का? तुला नाही ड्यूटीवर जायचं?"

"जायचंय तर. माझं रोजचं काम तुझ्यासारखं पूर्वीपेक्षा वाढेलच. पण आनंदाची गोष्ट अशी की अभ्यासासाठी खर्च व्हायचा तो वेळ आता मनासारखं दुसरं काही तरी करायला वापरता येईल. मला चित्रं काढायची आहेत."

शाळेत असताना मी चित्रकलेच्या दोन परिक्षा दिल्या होत्या. दोन्हीत मला 'सी' ग्रेडच मिळाली होती. पण नंतर माझी चित्रकला सुधारली होती. आमच्या शरीरशास्त्राच्या आणि हिस्टॉलॉजीच्या जर्नल्समध्ये मी खूप मन लावून आकृत्या काढत असे आणि त्या आमच्या शिक्षकांना आवडत असत असं त्यांनी मला दिलेल्या मार्कांवरून मला वाटत असे. मला वाटतं माझ्या आवडीच्या गोष्टींची चित्रं काढणं मला जास्त चांगलं जमायचं हे माझ्या चित्रकलेतल्या सुधारणेचं मुख्य कारण होतं.

"हो? कसली चित्रं काढणार आहेस?"

"व्यंगचित्रं, पोर्ट्रेट्स..."

"तुला पोर्ट्रेट्स काढता येतात?"

"थोडीफार. प्रख्यात चित्रकार कॅनव्हासवर ऑइल पेंट वापरतात. मी साधा माणूस. मी कागदावर क्रेयॉन वापरतो. तुझं पोर्ट्रेट काढू?"

"काढशील?" ती हरखली.

सहज म्हणून सुरू झालेलं संभाषण मी चतुराई न वापरता तिचं पोर्ट्रेट काढण्यापर्यंत पोचलं हा दैवी संकेत असावा असा भाबडा समज करून घेऊन मी खुश झालो.

"काढीन ना. पण माझ्या चार अटी आहेत. एक म्हणजे पोर्ट्रेट काढताना तुला एका जागी बसून रहावं लागेल."

"किती वेळ?"

"पूर्वी दिवसचे दिवस लागत. आता फास्ट फूड आणि इतर फास्ट गोष्टींचा जमाना आहे. मला संध्याकाळी एक-दोन तास असे दोन दिवस तरी लागतील."

"मधून मधून जरासं उठलं तर चालेल ना?"

नाही म्हटलं तर सगळंच ओमफस होईल म्हणून मी पटकन म्हटलं, "चालेल ना."

"दुसरी अट काय आहे?"

"वेळ वाचवायचा तर मला तुझ्या चेहरेपट्टीचा आधी नीट अभ्यास करावा लागेल. त्यासाठी मला तुझे दोन-तीन अँगलमधून घेतलेले फोटो लागतील. घाबरू नकोस, काम झालं की तुझे तुला परत देईन, इतर कोणालाही देणार नाही."

"ओके. तिसरी अट?"

"पोर्ट्रेट पूर्ण होईपर्यंत बघायला मागायचं नाही. झालं की मी आपणहून दाखवेन."

"ए नाही हां. हे चीटींग आहे. माझं पोर्ट्रेट आणि मी बघायचं नाही?"

"माझ्या सगळ्या अटी मान्य असतील तरच मी पोर्ट्रेट काढीन." आपलं चित्रं कसं काय घडतंय हे बघायची उत्सुकता कोणालाही वाटली असती. पण तिचं पोर्ट्रेट पूर्ण होण्यापूर्वी तिला दाखवणं मला शक्य नव्हतं.

"बरं बाबा, ते दाखव असं मी मध्ये मध्ये म्हणणार नाही" ती म्हणाली. "आणि चौथी अट?"

"समजा दुर्दैवाने ते पोर्ट्रेट तुझ्यासारखं न दिसता चुकून माकडासारखं दिसलं तर मला मारायचं वगैरे नाही."

तिने माझ्याकडे थोडा वेळ रोखून पाहिलं.

"तुला नक्की पोर्ट्रेट्स काढता येतात ना? की नुसता टाइमपास करतोयस?"

"मिता!" मी दुखावलेल्या चेहऱ्याने तिच्याकडे पाहिलं. मला ते नीटसं जमलं नसावं.

"अहो आर्टिस्ट, तुमच्या कलेचा एखादा नमुना आहे का दाखवायला?" मुलगी हुशार होती हे नक्की. तिने अगदी योग्य प्रश्न विचारला होता.

"आहे ना" मी म्हटलं. "आरशात बघून मी माझं स्वतःचं काढलेलं पोर्ट्रेट आहे."

"दाखव मला" ती म्हणाली.

"माझ्या रूमवर आहे" मी म्हटलं. "तू असं कर. तुझे मिळतील ते फोटो जमा करून आण. तोपर्यंत मी ते काढून ठेवतो. जर माझं काम तुला आवडलं तर फोटो मला दे. मग उद्यापासून काम सुरू."

"बघ हं, माझी फिरकी घेत असशील तर माझ्यासारखी वाईट ..."

"होय ग! किती बोलशील? चल फोटो जमा करायला लाग" असं म्हणून मी निघालो.

मी तिची फिरकी घेत नव्हतो. मी पूर्वी आरशात बघून खरोखरच माझं छोटसं पोर्ट्रेट काढलं होतं. ते पेन्सिलने काढून शेडिंग केलेलं होतं. ते बऱ्यापैकी माझ्यासारखं दिसत होतं असं माझं आणि माझ्या आईचंही मत होतं. ते मी माझ्या एका पुस्तकात घालून ठेवलं होतं. मिता येईपर्यंत मी ते शोधून ठेवलं.

पाच-दहा मिनिटांत मिता आली.

"दाखव बघू तुझं पोर्ट्रेट" ती म्हणाली.

मी पुस्तक उघडलं आणि तिला ते दाखवलं. ती ते निरखून बघत असताना मी प्राण डोळ्यांत आणून तिच्या चेहऱ्याकडे बघत होतो. मिताचं पोर्ट्रेट काढणं हे माझ्यासाठी अकस्मात अगदी महत्वाचं झालं होतं.

"छानच काढलंयस रे" ती म्हणाली. ते आपल्या हातातच ठेवून तिने दुसऱ्या हातातल्या लिफाफ्यातले आपले तीन फोटो मला दिले. मग माझं पोर्ट्रेट त्या लिफाफ्यात घातलं. मी तिचे फोटो  पाहिले. ते अगदी स्पष्ट होते. मिताचं पोर्ट्रेट छान होणार असा मला विश्वास वाटायला लागला.

"काय, मग हे काम मला मिळालं असं मी समजू?" मी विचारलं.

"होय" ती म्हणाली. "उद्या संध्याकाळी?"

"पाच वाजता तुझ्या रूममध्ये" मी म्हटलं. "काही स्पेशल तयारी करू नकोस. नेहमी असतेस तशीच रहा."

"ओके" ती जायला निघाली.

"माझं पोर्ट्रेट?" मी विचारलं.

"तू माझे फोटो परत देशील तोपर्यंत माझ्याकडेच राहू दे" असं म्हणून ती गेली.

तिचा माझ्यावर विश्वास नाही का, असा विचार करायला मला सुचलंही नाही. मी तिचे फोटो समोर ठेवून तासभर निरखत बसलो. माझ्याकडे तिचा एकही फोटो नव्हता. आज एकदम तीन फोटो मिळाले होते. 'फोटो बघून मुलगी पटत नाही रे' असं जर प्रताप माझ्या कानात पुटपुटला असला, तर मला ते ऐकू आलं नाही. शेवटी मी नाईलाजाने ते बाजूला ठेवले, आणि कागद आणायला बाहेर पडलो. क्रेयॉन नशीबाने ड्रॉवरमध्ये होते, नाहीतर घरी जाऊन आणायला लागले असते.

रात्री जेवून झाल्यावर मी रूमचं दार आतून बंद केलं आणि तिच्या सर्वात सुरेख फोटोवरून तिचं पोर्ट्रेट काढायला घेतलं. 'हे चीटींग आहे', असं माझं अंतर्मन म्हणालं. 'प्रेमात सगळं क्षम्य असतं' असं मी अंतर्मनाला म्हणालो. ती मला तिच्याकडे बघताना पकडेल या भितीने एरवी मला फार वेळ तिच्याकडे बघता येत नसे. मला तिच्याकडे बघून तिचं पोर्ट्रेट नक्कीच काढता आलं असतं,

पण तसं करताना सगळं लक्ष चित्रकलेत असल्यामुळे तिच्याकडे बघण्याचा आनंद काही मला घेता आला नसता. मला एका वेळी एकच काम जमायचं. तिचं पोर्ट्रेट तिच्या फोटोवरून आधीच काढायचं आणि मग दोन संध्याकाळी तिच्या पूर्ण संमतीने तिच्याकडे बघायचं असा माझा प्लान होता. 'असले प्लान करण्यापेक्षा सरळ तिला लग्नाबद्दल विचारत का नाहीस?' असं माझं अंतर्मन म्हणालं, किंवा कदाचित प्रतापने तसं म्हटल्याचा मला भास झाला असेल. मी तिकडे दुर्लक्ष केलं.

झपाटल्यासारखं रात्रभर काम करून मी सकाळपर्यंत तिचं पोर्ट्रेट पूर्ण केलं. मी माझं स्वतःचं काढलं होतं त्यापेक्षा ते सरस झालं होतं. मी ते नीट जपून कपाटात ठेवलं.

अख्खा दिवस वॉर्डातल्या राउंड्स, मुलांना शिकवणं आणि सेमिनार यांच्यात गेला. संध्याकाळी पाच वाजता मी नवा कागद, पेन्सिल आणि क्रेयॉन घेऊन तिच्या रूमवर गेलो. मी सांगितलं होतं त्याप्रमाणे मिता रोजच्याच कपड्यांत होती, तरीही नक्षत्रासारखी दिसत होती.

"मिता, तुझ्या मैत्रीणी मध्येच येऊन डिस्टर्ब तर करायच्या नाहीत ना?" मी विचारलं.

"नाही यायच्या. मी कामात आहे असं त्यांना सांगून ठेवलंय" ती म्हणाली.

मी कागद पॅडला जोडला, आणि तिच्या चेहऱ्यावर उजेड पडेल अशा ठिकाणी तिला खिडकीजवळ बसवलं. मग पेन्सिलने चित्र काढायला सुरुवात केली. मधून मधून मी पेन्सिलच्या रेषा काढायचं विसरून तिच्याकडे बघत रहायचो.

"विजय, तू चित्र काढतोयस की नुसतंच माझ्याकडे बघतोयस?" तिने शेवटी मला विचारलं.

"अगं, काही काही डिफिकल्ट ठिकाणी जास्त अभ्यास करावा लागतो" मी म्हटलं. "दोन दिवसांत मी काम पूर्ण करणार म्हटलंय त्याप्रमाणे ते पूर्ण झालं नाही तर मग काय ते विचार."

"थांब, मी गाणी लावते. नुसतं बसून मला कंटाळा यायला लागलाय" असं म्हणून ती उठली. तिने टेपरेकॉर्डर ऑन केला.

"रफीसाहेब!" मी गुदमरल्यासारखं म्हटलं. काहीच करायला नसताना मी रूमवर रफीसाहेबांची गाणी लावून मिताचा विचार करत बसत असे. तिला ते कळलं की काय असं माझ्या मनात आलं.

"त्यांच्या सारखा गायक झाला नाही आणि होणे नाही" ती म्हणाली. अगदी माझं मत होतं तसंच तिचं मत दिसत होतं.

“रफीसाहेबांचा आवाज म्हणजे माझ्या हृदयाचा आवाज असं मला वाटतं" मी बोलून गेलो.

ती फक्त हसली, काही बोलली नाही.

समोर मिताचा चेहरा आणि बॅकग्राउंडमध्ये रफीसाहेबांची गाणी असे ते दोन तास कसे गेले ते मला समजलंच नाही. सात वाजता मी कागदावर दुसरा एक पांढरा कागद ठेवला, पेन्सिल आणि क्रेयॉन खोक्यात भरले आणि म्हटलं "चला, आता थकलो. उरलेलं काम उद्या करूया."

"मला दाखव ना रे" ती म्हणाली.

"मिता, आपलं काय ठरलं होतं?" मी विचारलं. त्या कागदावरच्या रेघोट्या तिला दिसल्या असत्या तर तिने मला फाडून खाल्लं असतं.

मी रूमवर गेलो आणि जेवायला जाण्यापूर्वी तिचे फोटो समोर ठेवून बसलो. 'अरे विचार तिला' अंतर्मन म्हणालं. 'तिची मूर्ती मनात ठसवून घेतो. विचारायचं नंतर बघू. ती नाही म्हणाली तर निदान मनातली तिची मूर्ती तरी माझ्याकडे राहील' मी उत्तरलो.

दुसरा दिवस ओटीत गेला. आमच्या मानद डॉक्टरांचे कोणी प्रायव्हेट पेशंट त्या दिवशी ऑपरेशनसाठी नव्हते. म्हणून ते ओटीत आलेच नाहीत. एक टेबल माझ्या लेक्चररने आणि दुसरं मी चालवलं. दोघांनी प्रत्येकी तीन तीन ऑपरेशनं पार पाडली. शरीर थकून गेलं होतं खरं, पण संध्याकाळ मिताबरोबर घालवायच्या कल्पनेने मन मात्र अगदी उत्साहात होतं. चार घास खाऊन

घेतले आणि मी चित्रकलेचं साहित्य घेऊन तिच्या रूमवर पोचलो. कालच्याच कागदावर आज क्रेयॉनच्या रेघोट्या मारणं सुरू केलं. आज तिने मनोरंजनासाठी आशाताईंची गाणी लावली होती.

"मला लतादीदींपेक्षा आशाताई जास्त आवडतात" मी म्हटलं.

"मला सुद्धा" ती म्हणाली. 'आमच्या आवडी निवडी इतक्या जुळतात हे ती मला हो किंवा नाही म्हणण्यापूर्वी लक्षात घेईल ना, की मला त्याची आठवण करून द्यावी लागेल?' असं माझ्या मनात आलं.

साडेसहा वाजता मी आवरतं घेतलं.

"झालं पोर्ट्रेट?" तिने विचारलं.

"तुला समोर बसवून करायचं सगळं काम झालं. उरलेलं काम मी माझ्या रूमवर जाऊन करतो आणि आणखी अर्ध्या तासात तुला दाखवायला आणतो" मी म्हटलं.

"मी बघू?"

"मिता!"

तिने झोंबाझोंबी वगैरे करून ते चित्र माझ्या हातातून काढून घ्यायचा प्रयत्न केला नाही. कदाचित त्यामुळे ते चुरेल अशी तिला भिती वाटली असेल.

"तू नको आणूस. मीच येते चित्र बघायला" ती म्हणाली.

बरोब्बर अर्ध्या तासाने ती हजर झाली. मी टेबलावर ठेवलेलं आपलं पोर्ट्रेट तिने न्याहाळलं, समोरच्या भिंतीवरच्या आरशात पाहिलं, मग परत ते पोर्ट्रेट न्याहाळलं आणि चित्कारली, "काय सॉलिड काढलयस रे!"

"थँक्स" मी म्हटलं.

"मी घेऊन जाते" ती म्हणाली. "नेऊ ना?"

"तुझ्यासाठीच तर काढलंय. तुझंच आहे ते" मी म्हटलं. "मी लॅमिनेशन करून देऊ?"

"मी घेईन लॅमिनेशन करून" ती म्हणाली. "याच्याबद्दल तुला काहीही दिलं तरी कमीच पडेल रे. काय देऊ?"

'तिलाच मागून घे' अंतर्मन म्हणालं. 'वाईट दिसेल' मी उत्तर दिलं.

"कसला विचार करतोयस?" तिने विचारलं.

"चित्र काढलं म्हणून तुझ्याकडून काही घेणं मला शक्य व्हायचं नाही" मी म्हटलं. "बस तू खुश रहा."

ती हसली.

मला तिचे फोटो परत द्यायचे नव्हते. पण मी ते तिच्यासमोर धरल्यानंतर आपण काय केलं ते माझ्या लक्षात आलं. तिने ते घेतले.

"तुझं पोर्ट्रेट आणायला मी विसरले. नंतर देते."

हातातले तिचे फोटो गेले, येवढं प्रेम ओतून काढलेलं तिचं पोर्ट्रेट गेलं आणि तीही गेली. आतून एकदम रिकामं वाटायला लागलं. मी रफीसाहेबांची कॅसेट लावली आणि तसाच बसून राहिलो.

# ४१

वर्ष ८, ऑगस्ट २

"विजय, थोडं काम आहे."

मी लेक्चर घ्यायला धावतपळत चाललो होतो. मध्येच मिताने मला थांबवलं.

"काय गं?" ती थोडी टेन्शनमध्ये दिसत होती.

"आईला जरा बरं नाहीये."

"काय झालं?"

"फायब्रॉइड्स झालेयत. राजमातात यायचं म्हणतेय."

"ठीक आहे. मी बघतो काय करायला लागतं ते. तू काही काळजी करू नकोस. तू आज कोणत्या ओटीत आहेस?"

"आज मला व्ही.आय.आर.ला पाठवलंय. सध्या त्यांच्याकडे काहीतरी प्रॉब्लेम आलाय म्हणून केसेस घेत नाहीयेत."

"मी तुला एक तासाने भेटतो. आत्ता माझं लेक्चर आहे. सगळी मुलं थांबली असतील. त्यांचा वेळ माझ्यामुळे फुकट जायला नको."

मी लेक्चर घेण्यासाठी गेलो. एण्डींनी मला परत आपली सगळी लेक्चर्स लावून दिली होती. आता एम.डी. झाल्यामुळे तयारी करायला वेळ नाहीये वगैरे सबबी सांगणंही शक्य नव्हतं. नाहीतरी मिताची आई तिच्या घरीच होती आणि फायब्रॉइड्स म्हणजे काही फोनवर ट्रीटमेंट

देण्यासारखा आजार नव्हता. मी लेक्चर संपवलं. नशीबाने कोणाला काही प्रश्न विचारायचे नव्हते. मी मुलांना सोडलं आणि व्ही.आय.आर.ला गेलो.

"अरे, आजचं लिस्ट त्यांनी पुढे ढकललंय. त्यांचं मशिन दुरुस्त व्हायला एक दिवस तरी लागेल असं म्हणताहेत" मिता म्हणाली.

"चल, कँटीनमध्ये जाऊया. नाहीतरी जेवायची वेळ होत आलीच आहे."

नशीबाने कँटीनमध्ये दुपारच्या जेवणाची गर्दी अजून झाली नव्हती. आम्हाला एका कोपऱ्याकडची खिडकीच्या बाजूची माझी आवडती जागा मिळाली.

"तू जेव रे. आईचं कळल्यापासून मला बरं वाटत नाहीये. भूकच नाहीये" ती म्हणाली.

"वेडी की काय? फायब्रॉइड्स म्हणजे काही इतका सिरियस आजार नाहीये. उगाच चिंता करू नकोस. मी आहे ना?"

तिला काय पाहिजे ते ती सांगेना म्हटल्यावर मी दोघांची ऑर्डर दिली आणि म्हटलं, "सांग, काय त्रास होतोय आईला?"

"अरे, मागच्या वेळी मी घरी गेले होते तेव्हा ती आजारी होती. तिला खूप रक्तस्त्राव होत होता. आमच्या फॅमिली डोक्टरांच्या ट्रीटमेंटने तिला बरं वाटलं. मधला काळ बरा गेला. आता परत त्रास सुरू झाला म्हणून सोनोग्राफी केली तर गर्भाशयाची फायब्रॉइड्स दिसली."

"तिथले डॉक्टर काय म्हणाले?"

"मोठ्या रुग्णालयात न्या असं म्हणाले. तुझ्या ओपीडीला आणते उद्या."

"येताना जुने सगळे रिपोर्ट्स बरोबर आण म्हणावं. काळजी करू नकोस. आपल्याकडे खूप चांगले गायनॅकॉलॉजिस्ट्स आहेत."

तिने काहीतरी म्हणायला तोंड उघडलं आणि तसंच बंद केलं.

"टेन्शन घेऊ नकोस. या आजाराचे आमचे आतापर्यंतचे सगळे रुग्ण बरे होऊन व्यवस्थित घरी गेलेयत. हस जराशी."

तिने कसनुसं हसून दाखवलं आणि जेवण अर्धवट टाकून उठली. तिला येवढं अस्वस्थ झालेलं मी कधी पाहिलं नव्हतं.

दुसऱ्या दिवशी सकाळी मिता तिच्या आई आणि बाबांना घेऊन माझ्या ओपीडीत आली. मी तिच्या आईची हिस्टरी घेतली आणि तिला पॅप स्मिअर करायला पाठवलं. तिचे रिपोर्ट्स बघताना मी थबकलो. तिला एकच किडनी होती. बोललो तर मिताला टेन्शन येईल म्हणून मी गप्पच राहिलो.

"तिला एकच किडनी आहे" मिता म्हणाली.

ॲनास्थेटिस्ट्स खूप हुशार असतात. त्यांना सगळ्या आजारांची माहिती असते, कारण ज्यांना ते ॲनास्थेशिया देतात, त्यांना कोणत्याही प्रकारचे आजार असू शकतात. प्रत्येक आजाराप्रमाणे ॲनास्थेशिया देताना बदल करावे लागतात. ॲनास्थेटिस्ट्सना सगळ्या प्रकारच्या ऑपरेशनांचीही माहिती असते, कारण ते सगळ्या ओटींमध्ये काम करतात. मिताला फायब्रॉइड्सचीही माहिती होती आणि एकच किडनी असण्यातले धोकेही माहित होते.

"असू दे ग. बघू आपण काय करायचं ते."

मिताची आई पॅप स्मिअर करून आली.

"जोशीबाई किंवा एण्डी येईपर्यंत थांबूया" मी म्हटलं. "तुझी आई आहे तर सिनियरना दाखवलेलं बरं."

"नको, तूच तपास तिला" मिता म्हणाली.

"अग, तिला माझ्यासारख्या लहान डॉक्टरने तपासून बरं वाटायचं नाही."

"तुझ्याकडून तपासून घ्यायचं म्हणूनच आलीये ती."

मी गुपचूप सिस्टरला बोलावलं, मिताच्या आईला आत नेलं, आणि तपासलं. मग मिता, तिची आई आणि बाबा यांना एकत्र बसवलं.

"मिताची आई, तुम्हाला गर्भाशयाचे बरेच फायब्रॉइड्स झालेयत. थोडा ॲनिमिया सुद्धा आहे. रजोनिवृत्तीचं तुमचं वय अजून झालं नाहीये, नाहीतर आपण थांबून बघू शकलो असतो. आत्ता आहे त्या परिस्थितीत पोट उघडून गर्भाशय काढणं योग्य ठरेल" मी म्हटलं.

"आम्हाला त्याची कल्पना होती" तिची आई म्हणाली. "जेवढ्या लवकर ऑपरेशन होईल तेवढं बरं."

"आपण तुमच्या सगळ्या टेस्ट्स करून घेऊ. जर रिपोर्टस नॉर्मल आले तर या आठवड्यात ऑपरेशन करू."

"मी घेते सगळ्या टेस्ट्स करून. आज तिला रिकाम्या पोटीच आणलंय. रिपोर्टस आले की तुला दाखवते" मिता म्हणाली.

रिपोर्टस खरं तर ॲनास्थेटिस्ट्सनाच बघायचे असायचे, कारण ॲनास्थेशिया देण्यासाठी रिपोर्टस नॉर्मल असणं महत्वाचं असायचं. पण ती स्वतः ॲनास्थेटिस्ट असूनही तिने मला मोठेपणा दिला म्हणून मी गप्प राहिलो. पारकर सर रुग्णालय सोडून जाणार होते आणि त्या वेळी रजेवर होते. जोशीबाई किंवा एण्डी यांच्यापैकी कोणाला मिताच्या आईचं ऑपरेशन करायला सांगावं हा मोठा प्रश्नच होता. मला त्या दोघींचीही खात्री देववत नव्हती.

दुसऱ्या दिवशी सगळे रिपोर्टस घेऊन तिघं आली. रिपोर्टस चांगले होते.

"रिपोर्टस चांगले आहेत. ऑपरेशन करायला काही अडचण नाहीये" मी म्हटलं. मिताच्या आई-बाबांनी माना डोलावल्या.

"आता तुम्ही कुठे प्रायव्हेट रुग्णालयात जाऊन ऑपरेशन करून घेणार का?" मी विचारलं.

"मिता राजमातात आहे. म्हणून आम्ही हे ऑपरेशन इथंच करून घ्यावं असं म्हणतोय" मिताचे बाबा म्हणाले.

“आमच्याकडे स्पेशल रूम्स नाहीयेत. जनरल वॉर्डातच सगळ्या पेशंटांना ठेवावं लागतं" मी म्हटलं.

“चालेल" मिताची आई म्हणाली.

"पण आमचे सर सध्या रजेवर आहेत. नंतर ते रुग्णालय सोडून जाणार आहेत. म्हणजे मिताच्या आईचं ऑपरेशन करायला ते नसतील असं मला वाटतं" मी म्हटलं. "मग उरल्या जोशीमॅडम आणि दोशीमॅडम. दोघी तशा चांगल्या आहेत, पण..."

"तुमच्याकडूनच ऑपरेशन करून घ्यावं म्हणून आम्ही आलो आहोत" मिताचे बाबा म्हणाले. मिताच्या आईने मान डोलावली.

"थांबा, थांबा" मी गडबडून म्हटलं. "पहिली गोष्ट म्हणजे तुम्ही मला अहो जाहो करू नका. मी मिताच्या वर्गातला मुलगा आहे. मला तुम्ही ए विजय असंच म्हणा."

ते गप्पच राहिले. त्यांना मला अरे तुरे करणं अवघड वाटत असावं.

"दुसरी गोष्ट म्हणजे मिताच्या आईचं ऑपरेशन कोणा सिनियरने केलेलं बरं असं मला वाटतं. काहीतरी चुकलं तर पश्चात्तापाची वेळ येईल."

"आमचा तुम... तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे" तिची आई म्हणाली. "तुझं काहीही चुकणार नाही."

"पण तुम्ही मला कुठे ओळखता? उगाच माझ्यावर विश्वास कसा टाकता?"

"आम्ही ओळखतो ना तुला. मिता सांगत असते" तिची आई म्हणाली.

सगळं बरं सांगत असली म्हणजे मिळवली, असं माझ्या मनात आलं.

"पण..."

"विजय, ऑपरेशन तूच करायचय" मिता म्हणाली.

"अं..हो, हो" मी म्हटलं.

मिताच्या आई-बाबांनी एकमेकांकडे बघितलं. लग्नाला जवळजवळ सत्तावीस-अठ्ठावीस वर्षं झाल्यावर त्यांच्यात एकमेकांकडे नुसतं बघून संदेशांची जी देवाणघेवाण झाली ती समजण्याचं माझं वय आणि अनुभव नव्हते.

"माझ्या आईचा आणि माझा रक्तगट एकच आहे. मी तिच्यासाठी रक्तदान करते. ऑपरेशनसाठी होईल."

मिता आई-बाबांना घेऊन गेली. मी कोणाच्या लक्षात येणार नाही अशा बेताने डोकं धरून बसलो. ओपीडीत येणाऱ्या अनोळखी स्त्रियांची ऑपरेशनं करणं आणि मिताच्या आईचं ऑपरेशन करणं यांत जमीन अस्मानाचा फरक होता. जर ऑपरेशन करताना तिला काही गुंतागुंत झाली असती तर  मिताला जन्मभर तोंड दाखवायला मला जागा राहिली नसती.

# ४२

वर्ष ८, ऑगस्ट ३

मी जेवायला गेलो. तिथे मला प्रताप भेटला.

"काय रे, असं एरंडेल प्यायल्यासारखं तोंड का केलंयस तू?"

"तसं तोंड कोणी करत नाही रे, ते आपोआप होतं" मी म्हटलं.

"बरं, तसं ते का झालंय?"

"मिता..."

"नाही म्हणाली?" तो आश्चर्याने म्हणाला. "मला वाटत होतं तिचं पण तुझ्यावर प्रेम आहे."

त्याला तसं का वाटत होतं कोण जाणे. कदाचित ते नीनाचं निरीक्षण असेल. नीनाला तसं का वाटत होतं देव जाणे. त्या क्षणी ते शोधून काढण्याचा माझा मूड नव्हता.

"नाही रे. मी तिला अजून विचारलंच नाहीये....."

"हात् तुझी" तो म्हणाला. "मग काय तिचं कुठे जमलं का? तरी मी तुला सांगत होतो..."

"प्रताप, तसं काहीही झालेलं नाहीये. आपल्या आईचं ऑपरेशन तूच कर असं तिने मला सांगितलंय."

"मग करून टाक" तो म्हणाला.

"मला टेन्शन आलंय रे" मी म्हटलं. "काही बरं वाईट झालं तर?"

"अरे, ऑपरेशन म्हटलं की कॉम्प्लिकेशन्स होऊ शकतात. तुला ते माहितीय. मी काय सांगायचं तुला? त्या मंडळींना तसं सांगून टाक आधीच."

"अरे, सांगितलं. मिताने बहुतेक त्यांचं ब्रेनवॉशिंग केलंय. माझ्या हातून काही कॉम्प्लिकेशन होणार नाही असा त्यांना विश्वास आहे म्हणतात."

"हे बघ, तू सांगायचं काम केलंयस. आता काही झालंच तर तुझी जबाबदारी नाही. तू बिनधास्त रहा."

"सांगायला सोपं आहे रे. पण काही झालंच तर मिता मला कधीतरी हो म्हणेल का?"

"नाही तरी तू तिला कधीही विचारू शकशील असं दिसत नाहीये. मग प्रॉब्लेम कुठे आहे?"

प्रतापचं म्हणणं बरोबर होतं.

"तिची केस साधी नाहीये. तिला एकच किडनी आहे. हिस्टेरेक्टोमी करताना जर युरेटरला काही इजा झाली आणि किडनी गेली तर किडनी फेल्युअर होईल रे."

"तू अशा केसेस पूर्वी केल्या आहेस ना?"

"हो."

"त्या सगळ्या सुरक्षितपणे घरी गेल्या ना?"

"हो."

"मग काय? आणखी एक करायची."

मी गप्पच राहिलो.

"एरंडेलाचा आणखी एक डोस घेतल्यासारखं तोंड तू का...अम् तसं तुझं तोंड का झालंय आता?"

"तर्कशास्त्र कितीही अचूक असलं तरी मानसिक गुंता झाला की ते चालत नाही रे." मी म्हटलं. "मदतीबद्दल आभार."

मी जेवून निघालो. जेवलो नसतो तर बरं झालं असतं असं मला वाटायला लागलं होतं. मानसिक तणाव आल्यावर येवढ्या पटकन पोटात अल्सर होऊ शकत नाही हे मला माहित असलं तरी लक्षणं तशीच वाटत होती. शिवाय डोक्याच्या मागच्या बाजूला मुंग्या आल्यासारखंही वाटत होतं. शेवटी मी वॉर्डात जाऊन स्वतःचं ब्लड प्रेशर घेतलं.

"डॉक्टर, मी पट्टा बांधून देऊ का?" वॉर्डच्या सिस्टर म्हणाल्या.

"नको, जमतंय मला" मी म्हटलं.

ब्लड प्रेशर नॉर्मल निघालं. मी परत त्या अल्सरचा विचार सुरू करणार होतो, तेवढ्यात एक इमर्जन्सी सिझेरिअनची पेशंट आली. ते पार पाडेपर्यंत दुसरी आली. त्या कामात अल्सरची लक्षणं जाणवणं केव्हा थांबलं ते माझ्या लक्षात आलं नाही. मग वॉर्डात भरती झालेल्या नव्या रुग्णांना तपासण्याचं काम करायला गेलो. सगळी कामं संपेपर्यंत रात्र झाली. दुपारच्या जेवणानंतर पोटात काहीच गेलं नव्हतं. मी समोरच्या गाडीवर जाऊन पाव-भाजीचं पार्सल घेतलं आणि रूमवर गेलो. जेवायला सुरुवात केली तेवढ्यात मिता आली.

"काय रे, होतास कुठे दिवसभर?"

"दोन सेक्शन केले, नंतर नवे रुग्ण तपासले. रूमवर यायला झालंच नाही" मी म्हटलं. "आईला ॲनास्थेशियासाठी फिटनेस मिळाला?"

"हो. ॲनास्थेशिया द्यायला..."

"तुमचे विभागप्रमुख नकोत. विजापूरकरांच्या मुलीच्या वेळी मी पाहिलं, त्यांचे हात खूप थरथरतात" मी म्हटलं.

"नाही. ते येणार नाहीत. ओटी-इन-चार्ज असणारेत."

"मिता, तुला टेन्शन नाही आलं?"

"तिच्या आजाराचं ऐकलं तेव्हा खूप टेन्शन आलं होतं" ती म्हणाली. "आता तू आहेस म्हटल्यावर मी निर्धास्त झालेय."

घ्या. ती माझ्या जिवावर निर्धास्त आहे, आणि मीच टेन्शन घेतोय.

'तुमचं जर जमलं तर आयुष्यभर ती तुझ्या जिवावर निर्धास्त राहणार. आज एका गोष्टीचं तू येवढं टेन्शन घेतोयस, तर ते टेन्शन तू कसं निभावशील?' माझं अंतर्मन म्हणालं. 'काही चुकलं तर आमचं जमायचंच नाही या गोष्टीचं मला टेन्शन आहे' मी उत्तर दिलं.

"कसला विचार करतोयस येवढा? तुला कसलं टेन्शन आलंय का?"

'छे गं!' असं म्हणावं असा माझा विचार होता. आपला वीक पॉइंट तिला कसा दाखवायचा हा प्रश्न होता.

"हो" मी म्हणून गेलो.

"सगळं ठीक होईल रे. मी सिद्धीविनायकाला सांगितलंय" ती म्हणाली.

त्याही परिस्थितीत मला जरासं हसू आलं.

"का हसलास?" तिने विचारलं.

"मिता, आपण दोन बुद्धीवादी डॉक्टर असून सिद्धीविनायकाकडे काही मागतो याचं मला हसू आलं. तू आई बरी होऊ दे असं मागितलंस, आणि मी..." बोलता बोलता मी थांबलो.

"काय मागितलयस तू" तिने विचारलं.

"मी...अं...कुठे काय?" मी म्हटलं.

"काही तरी मागितलयस तू" ती म्हणाली. "सांग ना काय मागितलयस?"

"काही नाही ग. काय तू छोट्या छोट्या गोष्टी लावून धरतेस?"

"विजय!"

"अगं, काय मागितलं ते सांगू नये म्हणतात. सांगितलं तर ते मिळत नाही म्हणे."

"कोण म्हणतं असं?"

तसं खरं तर इतर कोणी म्हटलेलं मी ऐकलं नव्हतं.

"तूच तसं म्हणालास असं दिसतंय. खरं ना?"

ही मुलगी मला इतकी ओळखते? मला आश्चर्य वाटलं.

"सांगतोस ना?"

"मिताच्या मनात जे काय असेल तसं होऊ दे असं मागितलं होतं मी" मी तिची नजर चुकवत सांगून टाकलं.

ती थोडा वेळ स्तब्ध राहिली. कशाबद्दल, कधी असे काहीही प्रश्न न विचारता मग ती उठली आणि म्हणाली, "तू एक खूप चांगला मुलगा आहेस."

ती निघून गेली. कशी कोण जाणे, नंतर मला शांत झोप लागली.

# ४३

वर्ष ८, ऑगस्ट ४

पारकर सर रजेवर असले तरीही काही महत्वाची गोष्ट असली तर मी त्यांना फोन करून सांगत असे. मी त्यांना मिता आणि तिच्या आईबद्दल सांगितलं. तिला एकच किडनी असण्याबद्दलही सांगितलं. मलाच ऑपरेशन करायला ती मंडळी सांगत होती तेही त्यांच्या कानावर घातलं.

"तू कर तिचं ऑपरेशन" सर म्हणाले. "काही लागलं तर मला सांग."

"पण दोशीमॅडम आणि जोशीमॅडम?" मी विचारलं.

"त्यांना राहू दे" ते म्हणाले. "त्यांच्यापैकी कोणी काही बोललं तर माझ्याबरोबर बोलायला सांग."

मी सरांचे आभार मानले. त्यांनी माझ्या दोन चिंता दूर केल्या होत्या. पूर्वी एक ऑपरेशन करताना एण्डींनी एका पेशंटच्या दोन्ही युरेटर्स चुकून बांधल्या होत्या आणि ती किडनी फेल्युअर होऊन मेली होती, ते त्यांना आठवलं असावं. जोशीबाई कधी कधी भलतंच काहीतरी करायच्या, जसं एकदा त्यांनी एका अठ्ठावीस वर्षांच्या स्त्रीचा एकुलता एक स्त्रीबीजकोश एक्टॉपिक प्रेग्नन्सीबरोबर काढून टाकला होता आणि तिला त्या लहान वयात रजोनिवृत्ती झाली होती. त्या दोघी मिताच्या आईपासून लांब राहणार म्हटल्यावर माझ्या डोक्यावरचा मोठा भार उतरला होता.

"मिता, पारकर सरांनी मला सांगितलंय की काही गरज पडली तर आपल्याला सांग" तिच्या आईला ॲडमिशनसाठी ती घेऊन आली तेव्हा मी तिच्या कानावर घातलं.

"थँक्स" ती म्हणाली.

मिताची आई ॲडमिट झाली. येवढी मोठी माणसं, पण आमच्याकडे स्पेशल रूम्स नव्हत्या म्हणून जनरल वॉर्डात तिला रहावं लागलं.

"मिता, तुझ्या आईला जनरल वॉर्ड चालतोय ना?" मी विचारलं.

"ती एकदम साधी आहे रे. तिला काहीही चालतं. त्यातून तुमचा जनरल वॉर्ड एकदम स्वच्छ आहे. सिस्टरही चांगल्या आहेत. काही प्रॉब्लेम नाहीये" ती म्हणाली.

ब्लड बँकेने मिताने दिलेलं रक्त तिच्या आईसाठी क्रॉस मॅच करून ठेवलं होतं. ऑपरेशनचा दिवस उजाडला. मिताचे बाबा ऑपरेशन थिएटरच्या बाहेर उभे होते. मला बघून त्यांनी स्मित केलं.

माझ्या जिवावर बरीच मंडळी निर्धास्त दिसत होती. मिता आईला घेऊन ओटीत गेली. मी स्क्रब सूट घालून ओटीत गेलो तेव्हा तिची आई ओटी टेबलावर आडवी झोपली होती. तिच्या डाव्या हाताला सलाइन लावलेलं होतं. छातीला कार्डिओस्कोपचे लीड्स जोडलेले होते. जनरल ॲनास्थेशिया देण्याची तयारी सुरू होती.

“मिताची आई, सगळं ठीक आहे ना?” मी विचारलं.

“हो तर, मिता आहे, तुम्ही आहात, आणखी काय पाहिजे?” ती म्हणाली.

"ॲनास्थेशिया देऊन झाल्यावर तू बाहेर थांबणार की ओटीत?" मी मिताला विचारलं.

"ओटीतच थांबते. धीराला कोणी तरी असलं पाहिजे ना?" ती म्हणाली.

'आईच्या धीराला की माझ्या' असं विचारावं असं माझ्या मनात आलं. कदाचित त्याचं उत्तर तिलाच माहित नसेल असं वाटल्यामुळे मी तो प्रश्न विचारला नाही.

ॲनास्थेशिया देऊन झाला. मी लघवीच्या मार्गे कॅथेटर टाकली.

"नेहमी लावतोस त्याच्या दुप्पट जोराने आणि दुप्पट वेळ जंतूनाशकांनी तिचं पोट साफ कर" असं मी माझ्या हाउसमनच्या कानात पुटपुटलो. "तिचा एकही टाका पिकता कामा नये."

मी वॉश अप होऊन आणि गाउन-ग्लोव्हज घालून आलो. तिच्या पोटावर निर्जंतुक केलेले टॉवेल्स सिस्टरने आणि मी मिळून घातले. सिस्टरने कॉटरी आणि सक्शन जोडलं. तोवर माझा हाउसमन वॉश अप होऊन आणि गाउन-ग्लोव्हज घालून आला. मी इन्स्ट्रुमेंट आणि मॉप काउंट केला.

"नाइफ" मी म्हटलं.

सिस्टरने माझ्या हातात स्कालपेल ठेवलं. पोटावर पहिला छेद देण्यापूर्वी मी वळून पाहिलं. मिता आईच्या पोटाकडे एकटक बघत होती. मी बघतोय म्हटल्यावर तिने माझ्याकडे पाहिलं. मी डोळे एकदा मिटून आणि मान थोडीशी हलवून तिला खुणावलं की 'घाबरू नकोस, मी आहे'. तिने मान डोलावली.

"मॉप" मी म्हटलं. सिस्टरने दिलेला मॉप घेऊन हाउसमनने पोट कापल्यावर येणारं रक्त टिपून घेतलं.

"आर्टरी फोर्सेप्स" मी म्हटलं. सिस्टरने दिलेला आर्टरी फोर्सेप्स घेऊन मी रक्तस्त्राव होणारी रक्तवाहिनी पकडली.

"कॉटरी" मी म्हटलं.  हाउसमनने कॉटरी लावून ती रक्तवाहिनी बंद केली.

मग मी मिताला विसरलो. कुठे काही चूक होऊ न देण्याची काळजी घेत एक एक स्टेप पार पाडत गेलो. नेहमी गप्पा मारणारे ॲनास्थेटिस्ट्स गप्प होते. किंवा जर बोलत होते असतील तर ते माझ्या लक्षात आलं नाही. गर्भाशयाला दोन्ही बाजूंनी रक्तपुरवठा असतो. गर्भाशय कापून काढण्यापूर्वी त्या रक्तवाहिन्या पकडून बांधाव्या लागतात.

"सिस्टर, क्लँप" मी म्हटलं. तिने मला क्लँप दिला. "चांगला आहे ना? तो सुटला तर ती रक्तवाहिनी बांधताना गोंधळ होईल. तिच्या खालून युरेटर जाते. उघड्या रक्तवाहिनीतून आजूबाजूला जे रक्त पसरेल, त्यांतून रक्तवाहिनी

नीट दिसायची नाही. आणि ती पकडताना खालची युरेटर पकडली गेली तर खूप प्रॉब्लेम येईल. तिला एकच किडनी आहे."

"नेहमीचा क्लँप आहे डॉक्टर" ती म्हणाली.

मी तो क्लँप तिच्या गर्भाशयाच्या रक्तवाहिन्यांवर लावला, त्या कापल्या, आणि म्हटलं,

"सिस्टर, सुचर ऑन नीडल."

सिस्टरने दिलेलं सुचर मी हातात घेतो तोवर तिकडे त्या क्लँपचं लॉक आपलं आपण सुटलं आणि क्लँप निखळून उडाला.

"सिस्टर, क्लँप बेकार आहे. आपोआप सुटला ना तो!" मी म्हटलं. उघड्या रक्तवाहिन्यांतून जोरात रक्तस्त्राव सुरू झाला. तिकडे मिताच्या गळयातून गुदमरल्यासारखा आवाज आला. माझा हाउसमन बावचळला. मी त्या रक्तवाहिन्यांवर बोट दाबून धरलं आणि रक्तस्त्राव तात्पुरता थोपवला.

"घाबरू नकोस. सक्शन कर" मी हाउसमनला सांगितलं. "सिस्टर, रिट्रॅक्टर पकडा आणि मला दोन एलिस फोर्सेप्स द्या."

मी त्या रक्तवाहिन्या दोन एलिस फोर्सेप्स लावून अलगद पकडल्या.

"एलिस फोर्सेप्सना हात लावायचा नाही. रक्तवाहिन्या फाटतील आणि मग खूप त्रास होईल" मी हाउसमनला म्हटलं.

"सिस्टर, सुचर ऑन नीडल. फिगर-ऑफ-एट स्टिच मारायचीय."

ते सुचर मारून मी एलिस फोर्सेप्स अलगद काढून टाकले आणि लिगेचर बांधली. रक्तस्त्राव थांबला. तिकडे मिताने दीर्घ श्वास घेतला. तिच्या बॉसनेही घेतला. सिस्टर हसल्या.

"आता आपण युरेटर सुरक्षित आहे ना याची खात्री करूया" मी म्हटलं. मी तिची युरेटर शोधून काढली.

"ही बघ युरेटर. सुरक्षित आहे" मी म्हटलं. हाउसमनने वाकून बघितलं. युरेटर बघ म्हटल्यावर बघितलं नाही असं कोणी आमच्या डिपार्टमेंटमध्ये नव्हतं, कारण युरेटरला इजा होण्याची भिती प्रत्येकालाच वाटायची. युरेटर दिसणं कठीण असायचं. जितक्यांदा युरेटर बघितली तितकं गरज पडल्यावर युरेटर ओळखून काढणं सोपं जायचं.

मिताने वाकून बघितलं नाही. पण तिने दुसरा दीर्घ श्वास मात्र घेतला. मी किती वेळ श्वास घेतला नव्हता कोण जाणे. उरलेलं ऑपरेशन काही अघटित न होता पार पडलं. तिच्या पोटाला ड्रेसिंग लावून झाल्यावर मी मनातल्या मनात हुश्श म्हटलं आणि मिताकडे पाहिलं. नुकतीच मॅरॅथॉन धावून आल्यासारखी ती दिसत होती.

"सगळं ठीक आहे" मी म्हटलं.

तिने मान हलवली.

मिताची आई ॲनास्थेशियातून जागी झाल्यावर तिला वॉर्डात नेण्यात आलं. मिता तिच्या शेजारी बसून राहिली. पेशंटांना ऑपरेशननंतर थोड्या थोड्या वेळाने तपासावं लागायचं.

आपल्या आईचं ते काम मिता चोखपणे पार पाडत होती. त्यामुळे आमच्यावरचा कामाचा ताण थोडा कमी झाला. रात्री मी तिला दोनदा तपासून आलो.

"मिता, तू जाऊन थोडा वेळ झोप. तुझी आई आता बरी आहे. काही लागलं तर आम्ही तुला कळवतो" मी म्हटलं.

"नको रे, हे मलाच केलं पाहिजे. घरातली डॉक्टर म्हणून आणि एकुलती एक मुलगी म्हणून माझ्यावर दुप्पट जबाबदारी आहे."

"मी थांबू तुझ्याबरोबर?" मी विचारलं.

"तू दिवसभर काम करतोच आहेस. तू जा आणि झोप थोडा वेळ. काही झालं तर मी बोलावते तुला" ती म्हणाली.

मला खरंच खूप दमायला झालं होतं. त्या एका ऑपरेशनच्या काळात महिनाभर पुरेल येवढं शरीरातलं ॲड्रिनॅलिन मी वापरून टाकलं होतं. त्याचा परिणाम गेल्यावर आता अंगात अजिबात त्राण उरलं नव्हतं. मी रूमवर गेलो आणि आडवा झालो, तो सकाळी खिडकीवर बसून कावळा ओरडायला लागला तेव्हाच उठलो. सगळं काही आटपून मी मिताच्या आईला बघायला वॉर्डात गेलो.

"सिस्टर, ही पेशंट कुठे आहे?" मी विचारलं. ऑपरेशनच्या दुसऱ्या दिवशी पेशंट गलितगात्र झाल्यासारखे बिछान्यात पडून असायचे.  मिताच्या आईचा बेड रिकामा होता. मला न सांगता तिला कुठे आणि कशासाठी पाठवलं असेल या विचाराने मी कासावीस झालो. मिताही कुठे दिसत नव्हती.

"माहित नाही. मी बघते हं."

सिस्टर मिताच्या आईला शोधते तोवर ती खांद्यावर टॉवेल टाकून आणि हातात टूथब्रश, टूथपेस्ट, साबण वगैरे घेऊन बाथरूममधून आली.

"अहो, तुम्ही उठून बाथरूममध्ये गेला होतात?" मी विचारलं.

"हो. लवकर हिंडणं फिरणं सुरू केलं तर रिकव्हरी लवकर होते असं मिता म्हणाली होती."

ते बरोबर होतं, पण येवढ्या लवकर येवढं हिंडणं फिरणं पोटातून ऑपरेशन झालेल्या स्त्रीकडून अपेक्षित नव्हतं.

"पण पोटात काही नाहीये. चक्कर येऊन पडला असतात तर?" मी म्हटलं.

"मला सवय आहे. दर मंगळवारी माझा कडक उपास असतो."

मी गार झालो.

"आता ऑपरेशनमधून बऱ्या होईपर्यंत उपास बंद" मी म्हटलं. "देवाला सगळं समजतं. समजा उपास मोडल्याचं पाप लागलंच तर मला लागेल. मिता कुठे आहे?"

"रात्रभर इथे बसून होती. आता हॉस्टेलला जाऊन येते म्हणून गेलीय."

मिता आली.

"तुझ्या आईकडे लक्ष ठेव, नाहीतर ती कुठे तरी जाईल आणि पडेल" असं सांगून मी माझ्या रोजच्या कामांना गेलो.

एक आठवड्यानंतर टाके काढून झाल्यावर मी मिताच्या आईचा डिस्चार्ज भरला. मिताने तिची बॅग भरली.

"डॉक्टर, तुम्ही खूप मेहनत घेतलीत हो" मिताची आई म्हणाली. "थँक यू. आमच्या घरी या ना एकदा. वीकएंडला आलात तर दोन दिवस बरं वाटेल. इथं खूप दगदग असते तुम्हाला."

"तुम्ही बोलावलंत म्हणून खूप बरं वाटलं. एक दिवस अवश्य येईन. तुमच्या हातच्या खाण्याची चव माझ्या लक्षात आहे. मिताच्या घरून डबा कधी येतो याची मी वाटच बघत असतो."

"काहीतरी सांगतोय तो" मिता म्हणाली.

"काहीतरी कसं? गूळपा..."

मिताने माझ्या पायावर जोरात पाय मारला आणि माझं तोंड बंद झालं.

"बाबा आले, चल आई" मिता म्हणाली.

तिची आई हसली. ती मितापेक्षा जास्त हुशार दिसत होती.

# ४४

वर्ष ८, ऑगस्ट २१

माझी रजिस्ट्रारची पोस्ट संपत आली होती. पुढे काय करायचं हा प्रश्न होता. एण्डींनी मला मासिक दोनशे रुपये पगारावर त्यांच्या संशोधनाच्या विभागात पडेल ते काम कर अशी ऑफर दिली होती. त्यासाठी त्या कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पगारातून थोडे थोडे पैसे कापून घेऊन मला देण्यासाठी दरमहा दोनशे रुपये उभारणार होत्या. आमच्या घरच्या कामवाल्या बाईला आम्ही त्याहून जास्त पैसे देतो, म्हणून तुमची नोकरी मला नको असं मी त्यांना नम्रपणे सांगितलं होतं. मला सिनियर रजिस्ट्रारचा जॉब मिळण्यासारखा होता. दादांच्या ओळखीच्या एका खाजगी रुग्णालयात भाडं देऊन कन्सल्टिंगसाठी बसण्याचीही संधी होती. काय करायचं हा प्रश्न फारसा मोठा नव्हता. मोठा प्रश्न दुसराच होता. मिताची पोस्टही माझ्याबरोबरच संपणार होती. ती एकदा तिच्या घरी गेली तर कदाचित परत दिसलीही नसती. त्या पूर्वीच तिला विचारावं असा विचार माझ्या मनात जोर धरत होता.

'मिता, माझं तुझ्यावर प्रेम आहे. तू माझ्याबरोबर लग्न करशील?' ही दोन वाक्यं बोलण्याची प्रॅक्टीस मी सकाळ संध्याकाळ आरशासमोर उभा राहून करायला सुरुवात केली. माझ्या प्रतिबिंबाकडे बघून ते बोलणं मला जमायला लागलं. मिताकडे बघून ते बोलणं मला जमेल की नाही हा प्रश्न तेव्हा तरी अनुत्तरित होता. दरम्यानच्या काळात दिवसामागून दिवस हातातून निसटून जात होते.

"विजय, पोस्ट संपत आली. कधी विचारणार आहेस तू मिताला?" प्रतापने एकदा मला ब्रेकफास्टच्या वेळी कँटीनमध्ये गाठून विचारलं.

"मी रोज प्रॅक्टीस करतोय रे."

"अरे, अशा गोष्टी प्रॅक्टीस करून जमत नाहीत. पाठ करून म्हणायला ते काय नाटक नाहीतर सिनेमा आहे? ते कसं तोंडातून उस्फूर्तपणे आलं पाहिजे."

"तुला काय रे सांगायला? तुझं जमलेलं आहे. पोस्ट संपल्यावर काय करणार आहात तुम्ही दोघं?"

"तिचं काही माहित नाही. मी प्रॅक्टीस सुरू करीन असं म्हणतोय" प्रताप म्हणाला.

"तिचं का माहित नाही? तुम्ही तर एक आत्मा आणि दोन देह या प्रकारात मोडता. एकाची माहिती दुसऱ्याला नाही असं तुमच्या बाबतीत कसं शक्य आहे?" मी म्हटलं. मला जमत नव्हतं ते प्रतापने लिलया करून दाखवलं होतं. मला त्याचा हेवा वाटत होता.

"आमचं फिसकटलं" तो म्हणाला.

फिसकटलं? साडेआठ वर्षं तेवढंच ताजं राहिलेलं त्या दोघांचं ते प्रेम फिसकटलं?

"काय झालं तरी काय रे असं?" मी कळवळून विचारलं. प्रताप जसा माझा मित्र होता, तशी नीना वहिनी म्हणूनच मी नेहमी तिचा विचार करत आलो होतो. हे काहीतरीच झालं होतं. ज्याचा या विषयावरचा सल्ला म्हणजे शेवटचा शब्द असं धरून मी चालत होतो त्या प्रतापचं फिसकटलं हा माझ्यासाठी मोठा आघात होता.

"काही विचारू नकोस" असं म्हणून प्रताप उठला आणि पुढे काहीही न बोलता निघून गेला.

मी सुन्न होऊन तिथेच बसून राहिलो. आपल्या गुरूचंच गणित चुकलं म्हटल्यावर पुढे काय करायचं ते मला सुचेना. शेवटी मी मनाचा निर्धार केला. आज काहीही करून तिला विचारायचंच. ती नाही म्हणाली तर पुढे काय, हा प्रश्न मला दररोज तीळ तीळ मारत होता. नाही तर नाही. नाही तरी विचारलं नसतं तर ती निघून जाणारच होती आणि शेवटी 'नाही' हेच सत्य उरणार

होतं. मी उठलो. ओटीत पोचलो. त्या दिवशी आमच्या ओटी लिस्टवर कोणी पेशंट्स नव्हत्या. इमर्जन्सी पेशंट्स येऊ शकतात म्हणून मिता ओटीत होती. मी स्क्रब सूट घातला, कॅप-मास्क लावलं आणि आत गेलो.

"काय रे, केस आणलीयस?"

"नाही. सहजच आलो. म्हटलं आता पोस्ट संपेल. मग तू भेटायची नाहीस. थोड्या गप्पा माराव्या."

"तू सहज गप्पा मारणारा नाहीयेस. काहीतरी काम असणार."

"नाही ग. आता आपलं विद्यार्थ्यांचं मोरपंखी आयुष्य संपेल. पुढे कामाच्या रगाड्यात मनात आलं की गप्पा मारत बसायला वेळ मिळणं कठीण होईल बघ."

तिने या विषयावर कधी विचार केला असावा असं दिसत नव्हतं. ती गप्प राहिली.

"पुढच्या आयुष्याबद्दल काय विचार केलायस तू?" मी म्हटलं.

"तू काय ठरवलयस?"

"मिळाली तर लेक्चररची पोस्ट घेईन. मला इथलं आयुष्य आवडतं. रोज नवं काही तरी शिकायला मिळतं. ज्यांना आपली खरोखर गरज आहे असे पेशंट येतात. त्यांना बरं करून घरी पाठवलं की बरं वाटतं."

"आणि घरच्या आयुष्याबद्दल काय करायचं ठरवलं आहेस?"

"ते ठरवून होतं का ग?"

"तुझी काय अपेक्षा आहे आयुष्याकडून?" तिने विचारलं.

"एक आपलं घर असावं. छोटं असलं तरी हक्काचं असावं. जिला मी समजून घेऊ शकेन आणि जिला मी आवडत असेन अशा मुलीबरोबर लग्न व्हावं. सकाळी दोघांनी मिळून कामाला जावं. दिवसभर काम करून संध्याकाळी दमलो असलो तरीही आनंदात एकत्र आपल्या घरी जावं. एकत्र बसून गरमगरम चहा प्यावा. थोड्या गप्पा माराव्या. बॅकग्राउंडला रफीसाहेबांची नाहीतर आशाताईंची गाणी. मग एकत्र जेवण बनवावं. रात्री गप्पा मारत मारत एकत्र जेवावं. उद्याची स्वप्नं बघावी. पुढे मागे..."

"पुढे मागे काय?"

"एक-दोन मुलं व्हावी."

"एक की दोन?"

"मिता, माझी चेन खेचतेयस?"

"नाही रे. सांग ना."

"मला मुलगी हवी असेल, तर तिला मुलगा. एक मुलगा आणि एक मुलगी झाली तर फार बरं."

"किती थोड्या अपेक्षा आहेत रे तुझ्या" ती म्हणाली.

"आनंद आणि समाधान या माझ्या फार मोठ्या अपेक्षा आहेत मिता. त्या पुऱ्या होणं खूप कठीण असतं बघ."

"तू खूप छान बोलतोस. तू बोलत रहा."

"आता तू सांग. तुला काय हवंय आयुष्यात?"

"मी तसा विचारच केला नाहीये."

"खोटं बोलताना तू खूप क्यूट दिसतेस, माहित आहे ना?" मी म्हटलं.

"...."

"मी सांगतो. तू प्रॅक्टीस करणार असशील."

"प्रॅक्टीस नाहीतर जॉब."

"चांगला मुलगा मिळाला की लग्न?"

"हूं."

"कसा नवरा हवाय तुला? उंच, गोरा, देखणा?"

"हूं."

"हुशार, शिकलेला, बोलायला चटपटीत? गंमतीदार गोष्टी सांगणारा? तुला हसवणारा?"

"हूं."

"तुझा मूड समजून घेणारा, तुला संभाळून घेणारा, तुला दुखलं-खुपलं तर कासावीस होणारा?"

"विजय..."

'तुझ्यावर खूप प्रेम करणारा?' असं मला म्हणायचं होतं, पण ते खरं असलं तरी तसं म्हणणं बरं दिसलं नसतं. "काय?" मी विचारलं.

"कसं कळतं रे तुला इतरांच्या मनात काय आहे ते?"

मला इतरांच्या मनात काय असेल ते कळत नसे, मला फक्त तिच्या मनात काय होतं ते कळत होतं.

"मी खूप वर्षं ओळखतो तुला. तुझ्या मनात काय आहे ते मला समजलं नाही तर इतकी वर्षं फुकट गेली म्हणायची" मी म्हटलं.

"तू इतकं छान वर्णन केलंस. असा कोण आहे का तुझ्या बघण्यात?" तिने विचारलं.

"माझ्या बघण्यात असून काय उपयोग? मी सुचवलेल्या मुलाबरोबर तू लग्न करणार आहेस की तुझ्या आई-बाबांनी सुचवलेल्या मुलाबरोबर?"

"ते बघतायत माझ्यासाठी मुलं" ती म्हणाली.

"कोणी सापडलाय का त्यांना?"

"आईच्या ऑपरेशनच्या वेळी ती काही तरी म्हणत होती. मी घरी गेले की बोलू म्हणाली."

"तुला हवा तसा मुलगा मी सुचवला आणि तो तुला आवडला तर तू त्यांना सांगू शकशील का, की तुला एक मुलगा आवडलाय?"

"आई-बाबा मला नाही म्हणणार नाहीत" ती म्हणाली.

प्रताप म्हणाला ते खरं होतं. अशा गोष्टी पाठ करून म्हणायच्या नसतात. त्या आतून सुचाव्या लागतात.

"घे" मी खिशातून दोन चॉकलेटं काढली आणि तिच्यापुढे धरली. ती दोन्ही चॉकलेटं उचलू लागली तेव्हा मी म्हटलं, "अं हं! एक तुला, एक मला."

ती हसली. तिने तिच्या चॉकलेटचं वेष्टन काढलं, चॉकलेट तोंडात टाकलं आणि वेष्टन ठेवण्यासाठी पर्स उघडली.

"माझ्याकडे दे" मी म्हटलं. तिने ते माझ्याकडे दिलं. मी माझं चॉकलेट तोंडात टाकलं आणि त्याच्या वेष्टनाच्या घड्या घालायला सुरुवात केली.

"काय करतोयस?"

"त्याला ओरिगॅमी म्हणतात. कागदाच्या घड्या करून प्राणी, पक्षी, किंवा वस्तू बनवण्याची कला. उद्या मुलंबाळं झाली की त्यांना खेळवताना उपयोग होईल."

"काय काय करत असतोस रे? चित्रं काढतोस, ओरिगॅमी करतोस, प्रोग्रामिंग करतोस..."

"माझं जाऊ दे" मी म्हटलं. "आपण तुझ्या नवऱ्याबद्दल बोलत होतो. तुला आवडेल असा मुलगा दिसलाय का तुला?"

"आज माझं लग्न जमवण्याचं येवढं मनावर का घेतलयस?"

"विषय बदलू नकोस. असा मुलगा तुला सापडलाय का ते सांग."

"तुला सापडलीय का तुझ्या स्वप्नातली परी?"

प्रतिप्रश्न करण्याचं कसब माझ्याकडूनच उचलून ते माझ्यावरच वापरण्यात ती एकदम वाकबगार झालेली दिसत होती.

"मला सापडलीय" मी म्हटलं.

"कोण आहे ती."

"मी आधी विचारलं. तू सांग मग मी सांगतो."

"विजय, सांग ना."

"आधी तू" मी म्हटलं.

"असं काय करतोस रे? मुलींना असे प्रश्न विचारतात का?"

मी त्या चॉकलेटच्या चांद्या वापरून करत असलेल्या ओरिगॅमी मॉडेलकडे पाहिलं. आम्ही शाळेत असताना तशा अंगठ्या करून बोटात घालत असू. इतक्या वर्षांनी सुद्धा माझी अंगठी छान झाली होती.

"मिता, ती तूच आहेस" मी म्हटलं. मी ती अंगठी तिच्यापुढे धरली. "मी नवरा म्हणून आवडेन तुला?"

तिने त्या अंगठीकडे पाहिलं, मग माझ्या तोंडाकडे पाहिलं. तिच्या डोळ्यांत अश्रू आले.

"का रे मला छळतोस असा?" ती म्हणाली.

"मी? तुला छळतो? काय म्हणतेयस तू मिता?"

"हो, तूच. मला सगळं माहित आहे."

"काय माहित आहे?" मी विचारलं.

"तुझं लग्न तू जमवलयस. ती देसाई जनरलमध्ये गायनॅक करते आहे. आता पोस्ट संपली की तुमचं लग्न...."

हुंदक्यात तिचं पुढचं बोलणं विरलं, पण ती काय म्हणत होती ते मला कळलं होतं. नकळत ती मागे मागे सरकत होती. अशा दुष्ट माणसापासून बहुतेक तिला लांब जायचं असावं.

"मिता, एक मिनिट. न रडता मला सांग, तुला ही गोष्ट कोणी सांगितली?"

माझ्या आवाजात काहीतरी असावं जे तिला जाणवलं. ती रडायची थांबली.

"निखिल हर्षदला सांगत होता ते मी ऐकलं."

तो हलकट माणूस तेव्हा समोर असता तर ...

"मिता, तसं काहीच नाहीये. मी देसाई जनरलमधल्या कोणत्याही मुलीला ओळखत नाही. तू निखिलला ओळखतेस ना? त्याच्यावर विश्वास कसा ठेवलास तू? मला तरी विचारायचंस आधी. चल, आत्ताच्या आत्ता त्याला पकडून खरं खोटं करूया" मी म्हटलं.

ती अश्रूंनी भिजलेले डोळे मोठ्ठे करून माझ्याकडे बघत राहिली.

"मिता, तुझ्या स्वप्नांतला राजकुमार मीच होतो ना?"

तिने मान हलवली.

“म्हणूनच तू माझं पोर्ट्रेट ठेवून घेतलंस आणि विसरलीस असं खोटं सांगितलंस, खरं ना?

तिने मान हलवली.

"मी तुला दोनदा सांगितलं, की माझं मन जिच्यावर हरवलंय ती तूच होतीस. पण तू लक्षच दिलं नाहीस." मी म्हटलं.

"...."

“तुझ्या वॉलपेपरसाठी मी जिच्यावर कविता लिहिली ती मुलगी तुला ओळखीची वाटत होती, पण कोण ते लक्षात येत नव्हतं. आठवतंय? विचार कर, ती तूच होतीस हे तुला पटेल.”

“....”

"दर वेळी तू दिसलीस की कितीही त्रासात असलो तरी माझा चेहरा खुलायचा ते का ते तुला समजलं नाही का ग?"

"...."

"मी जो स्क्रीनसेव्हर तुझ्या लॅपटॉपवर घातला, तो तू पाहिलास का?"

"हो. मला वाटलं तू माझा छळ करतोयस" ती म्हणाली.

"मी तुझं पोर्ट्रेट काढलं. माझ्या क्रेयॉनच्या रेषेरेषेत तुला माझं प्रेम जाणवलं नाही का गं?"

"जाणवलं रे, पण काही उमगलं नाही" ती म्हणाली.

"वेडाबाई!" मी ती अंगठी पुढे केली. ती हसली.

"डॉक्टर असून किती रोमँटिक आहेस रे तू!" ती म्हणाली. एक हात अंगठी घालून घेण्यासाठी तिने पुढे केला आणि दुसरा मागे असलेल्या कॉटरीवर सहज म्हणून ठेवायला मागे केला. मी तिकडे पाहिलं.

"मिता, थांब" मी ओरडलो. "तिथे हात ठेवू नकोस."

"कुठे" ती गोंधळली.

"कॉटरीवर हात ठेवू नकोस. तिच्यातून ठिणग्या येतायत. शॉक बसेल" मी ओरडलो.

तिने गोंधळून इकडे तिकडे बघितलं. तिचा हात कॉटरीपासून लांब जाण्याऐवजी कॉटरीकडेच चालला होता.

आयुष्यात कधीही मी सूर मारला नव्हता. तो कसा मारतात ते मला माहित नव्हतं. कशी कोण जाणे, मी जिवाच्या आकांताने झेप घेतली. एका हाताने तिला एका बाजूला ढकललं, आणि दुसऱ्या हाताने कॉटरी दुसऱ्या बाजूला खेचली.

माझं सगळं अंग हादरलं. हाताच्या नसांमध्ये कल्लोळ झाला. पायांखालची जमीन सरकली. मग नजरेसमोर फक्त अंधार उरला.

# ४५

वर्ष ८, ऑगस्ट २१

नजरेसमोरचा अंधार हळूहळू दूर झाला. अंधुक दिसायला लागलं. मग ते स्पष्ट होत गेलं. पण दिसण्याचा अँगल काही वेगळाच होता. सामान्यपणे आजूबाजूच्या वस्तू आणि माणसं माझ्या लेव्हलला असायची. आता छतावरचा फॅन मला माझ्या नजरेच्या लेव्हलला दिसत होता. छताजवळ असलेले एअरकंडिशनरचे व्हेंट अगदी समोर दिसत होते. माणसांच्या डोक्यांकडे मी उंचावरून बघत होतो. हे गौडबंगाल काय आहे ते काही माझ्या लक्षात येत नव्हतं. एरवी मी न समजलेली गोष्ट समजून घेतल्याशिवाय पुढे जात नसे. तेव्हा मात्र मला होतो तिथे राहून खाली काय चाललंय ते बघणंच महत्वाचं वाटत होतं.

"मामा, मामा! त्याला टेबलावर घ्या." मिताचा ओरडण्याचा आवाज येत होता.

बायकांच्या ओटीत कोणत्या पुरुषाला ओटी टेबलावर घ्या असं म्हणत होती ती? मी इकडे तिकडे बघितलं. हिरव्या स्क्रब सुटात कोणीतरी माणूस जमिनीवर पडलेला दिसत होता. त्याच्या डोक्यावर हिरवी कॅप आणि चेहऱ्यावर मास्क होतं. एक ॲनास्थेटिस्ट मुलगी त्याची नाडी तपासत होती. त्याची छाती श्वासोच्छ्वासामुळे हलताना दिसत नव्हती. कार्डिॲक अरेस्ट असावं असं दिसत होतं. माणूस उंचापुरा, सुदृढ आणि काळया केसांचा दिसत होता. बहुतेक आरेमो असावा. गायनॅकचा की ॲनास्थेशियाचा ते काही सांगता येत नव्हतं.

"मामा, कार्डिॲक अरेस्ट आहे. त्याला टेबलावर घ्या " मिता परत जिवाच्या आकांताने ओरडली.

म्हणजे माझं निदान बरोबर होतं. मिता आहे म्हणजे तो नक्की जगणार असं माझ्या मनात आलं. ती कार्डीॲक रिससिटेशन छानच करायची. मी असं मनाशी म्हणत असताना तिने त्याच्या छातीवर मध्यभागी जोरदार मुक्का मारला. आता तो जागा होईल असं माझ्या मनात आलं. पण तो तेवढा नशीबवान दिसत नव्हता. मिताने चेस्ट कंप्रेशन्स द्यायला सुरुवात केली. तिची तीस कंप्रेशन्स झाल्यावर ती थांबली. तिच्या जोडीदारणीने त्याच्या तोंडावरचं ऑपरेशनचं मास्क खेचून काढलं, अंबू बॅगला व्हेंटिलेशन मास्क लावलं, ते मास्क त्याच्या नाकातोंडावर बसवलं आणि त्याला कृत्रिम श्वासोच्छ्वास द्यायला सुरुवात केली. तिने दोनदा त्याच्या फुप्फुसांत हवा भरली, आणि मग ती बाजूला झाली. मिताने परत चेस्ट कंप्रेशन सुरू केलं. त्यांचं हे काम आळीपाळीने चालू होतं. ओटीची सिस्टर बाजूला इमर्जन्सी ट्रे लावत होती.

"कार्डिओस्कोप आणि डिफिब्रिलेटर आणा" मिता म्हणाली.

मामाने लगबग करून कार्डिओस्कोप आणि डिफिब्रिलेटर आणला. त्या पेशंटच्या बाजूला ठेवला. मिताच्या सहकारी ॲनास्थेटिस्टने दोनदा कृत्रिम श्वासोच्छ्वास देवून होईपर्यंत मिताने त्या पेशंटचा स्क्रब सूट वर करून त्याच्या छातीवर कार्डिओस्कोपचे चेस्ट लीड्स लावले. कार्डिओस्कोप सुरू केला. व्हेंट्रिक्युलर फिब्रिलेशन दिसत होतं. डिफिब्रिलेट करायला लागणार असं माझ्या मनात आलं.

"व्हेंट्रिक्युलर फिब्रिलेशन आहे" मिता म्हणाली. "डिफिब्रिलेट करायला हवं."

तिने त्याला एकूण तीनदा डिफिब्रिलेट केलं. नंतर ॲड्रिनॅलीन आणि अमिओडॅरोन सुद्धा दिलं. त्या सगळयाचा काही उपयोग होतोय असं दिसत नव्हतं. सीपीआर देताना मिताच्या डोळयांतून अश्रू गळत होते. सी.पी.आर. करतानाच ती त्याला 'उठ रे, उठ रे' असं म्हणत होती. मी स्वतः काहीही मदत न करता होतो त्या उंचावरच्या जागेवरून खाली काय चाललं होतं ते बघत होतो. तिसऱ्या शॉकनंतर मिताने त्याचं चेस्ट कंप्रेशन परत सुरू केलं तेव्हा त्याचं हृदय परत काम करायला लागलं.

"मिता, नाडी लागतेय" जोडीदारीण म्हणाली. "'मिता, तू त्याला परत आणलंस."

इकडे मी जिथे कुठे उंचावर होतो तिथून खाली थेट त्या पेशंटच्या छातीवर कोसळलो. आता मिता मला कच्चा चावून खाईल असं माझ्या मनात आलं. पण तसं काही झालं नाही. मी त्याच्या अंगावर आपटलोच नाही. पण लागलीच माझ्या बरगड्यांतून विलक्षण कळा यायला लागल्या, छातीत भयंकर जळायला लागलं, आणि अंग अगदी थंड पडलंय असं वाटायला लागलं.

मिताने त्याचा चेहरा दोन हातांच्या ओंजळीत धरला. तिचे अश्रू माझ्या चेहऱ्यावर पडायला लागले. माझ्या?

मी डोळे उघडले तेव्हा माझ्या लक्षात आलं की मी जमिनीवर पडलो होतो. माझा चेहरा हातात धरून मिता अश्रू ढाळत होती. म्हणजे कार्डिॲक  अरेस्ट ज्याला झालं होतं तो मीच होतो तर. पण आपण हे सगळं कसं पाहिलं ते माझ्या लक्षात येईना. विचारशक्ती बोथट झाल्यासारखं वाटत होतं. मिताच्या मॅडम ओटीत आल्या.

"त्याला टेबलावर घ्या" त्या म्हणाल्या.

"मिता" असं म्हणायला मी तोंड उघडलं, पण शब्द काही बाहेर फुटला नाही. मिताचा चेहरा नजरेसमोर असताना माझं भान हरपलं.

मी परत जागा झालो तेव्हा मी ओटी टेबलावर होतो. बरगड्या विलक्षण दुखत होत्या, छातीत जळत होतं. माझ्या डाव्या हातावर सलाइन लावलेलं होतं. तो हात बधीर झाला होता. नाकातोंडावर मास्क लावलेलं होतं. त्यांतून वास नसलेला गॅस मला देत होते. बहुधा प्राणवायू असावा असं माझ्या मनात आलं.

"मिता"  मी पुटपुटलो.

"मी आहे रे इथं" ती म्हणाली. तिने माझा हात घट्ट धरून ठेवला होता. मी परत हे जग सोडून जाऊ नये म्हणून तिने मला असं घट्ट धरून ठेवलं असावं असं माझ्या मनात आलं.

"मिता, थँक्स" मी पुटपुटलो. "आज तू नसतीस तर..."

"चूप रे. अजिबात बोलायचं नाही. ऑक्सीजन चालू आहे तो घेत रहा."

"आई..."

"तुझ्या घरी फोन केलाय. तुझे आई-बाबा येताहेत" ती म्हणाली.

"कॉटरी ऑफ करा" मी प्रयासाने म्हटलं.

"केलीय रे बाबा" ती म्हणाली. "जिवावरच्या दुखण्यातून वाचलास आणि तरी अजून जगाचीच चिंता आहे?"

"जगाची नाही गं, तुझी" मी म्हटलं आणि परत माझं भान हरपलं.

मी परत जागा झालो तेव्हा अर्धवट ग्लानीत होतो.

"आता धोका टळला आहे" कोणीतरी म्हणत होतं. "त्यांना शॉक लागला तेव्हा डॉक्टर मिता तिथेच होत्या म्हणून बरं झालं. त्यांनी त्यांना वाचवलं."

"थँक यू" दादांचा आवाज आला.

"नाही हो. खरं तर मलाच शॉक लागणार होता. तसं होऊ नये म्हणून त्याने मला एका बाजूला ढकललं आणि ती शॉक लागणारी कॉटरी माझ्यापासून लांब ओढली. मीच थँक्स म्हणते" मिता म्हणाली.

"तो लहानपणापासून असलंच काही तरी करत आला आहे. पाच सहा वर्षांचा असताना एकदा त्याने भिंतीवरच्या सॉकेटमध्ये पिन घातली होती. शॉक लागून धाडकन पडला ना. कापसाच्या गादीवर उभा होता म्हणून हाताला लागला" माझी आई म्हणाली. 'आता हे सगळं मितासमोर बोलायलाच हवं का?' असं मला विचारायचं होतं, पण अंगात तेवढं त्राण नव्हतं.

"ॲनास्थेशियात एम.डी. करणारी त्याची बालमैत्रीण मिता ती तूच का ग?" माझ्या आईचा आवाज आला.

"अं..हो" मिता म्हणाली.

"घरी आला की तुझ्याबद्दल खूप काही बोलत असतो" आई म्हणाली.

काय उत्तर द्यायचं ते मिताला सुचलं नसावं.

"म्हणजे चांगलंच बोलतो हो" आई म्हणाली.

"तो कधी कोणाबद्दल वाईट बोलत नाही हो" मिता म्हणाली.

"तुझं खूप कौतुक करत असतो" आई म्हणाली. "मला खूप दिवस बघायचं होतं तुला. एक दिवस तिला घरी बोलाव असं मी त्याला म्हटलं सुद्धा. पण 'तुला आवडलं नाही तर काय?' असं काही तरी म्हणाला तो. अगदी भिडस्थ आहे."

मिताला हो म्हणायचं असावं, पण माझ्यासारखं तिला बोलायचं धाडस झालं नसावं.

"मला नेहमी त्याची खूप काळजी वाटते. सतत जपत रहावं लागतं. आता एकदा खंबीर अशी सून घरात आली आणि त्याला तिच्यावर सोपवलं की मी मोकळी होईन."

मी डोळे किलकिले करून पाहिलं. मिता एवढी छान लाजते हे मला तेव्हा कळलं. आईच्या चेहऱ्यावर मिश्किलसं स्मितहास्य होतं. तिचा हा मिश्किलपणा मी आयुष्यात पहिल्यांदाच बघत होतो.

"जा तू बाळ आता. खूप दमली असशील. विश्रांती घे. आम्ही बघतो त्याच्याकडे" आई म्हणाली.

मिता गेली.

"काय म्हणत होतीस तू तिला?" दादांनी विचारलं. "खंबीर सून आणण्याबद्दल बोलल्यावर ती लाजली का येवढी?"

"अहो, आपल्या सत्यवानाला त्याच्या सावित्रीने आज परत आणलंय. तिचं कौतुक करत होते मी" आई म्हणाली.

माझं भान परत हरपत नव्हतं, पण मी डोळे मिटून घेतले. माझ्या डोळ्यांसमोर माझा चेहरा ओंजळीत धरून अश्रू ढाळणाऱ्या मिताचा चेहरा होता.

# उपसंहार

“विजय, काहीतरी वेडेपणा करू नकोस. तुला डिस्चार्ज देत नाहीत तोपर्यंत इथे गुपचुप रहा."

“अग, पण मला आता काही त्रास होत नाहीये.”

"तुला मेडिसिनच्या कन्सल्टंटहून जास्त समजतं का?”

“नाही. पण मी कधी हॉस्पिटलात पेशंट म्हणून राहिलो नाही. मला कसं तरी वाटतं या वॉर्डात.”

“हे असं पहिल्यांदा कधीतरी होतंच. ते काही इथून बाहेर पडायचं कारण होऊ शकत नाही. अरे, मग डामा जाणारे आपले पेशंट आणि तू यांच्यात काय फरक राहिला?”

“....”

मिता म्हणाली ते बरोबर होतं. आई-दादा घरी गेले होते. माझ्याकडे लक्ष ठेवायला म्हणून मिता थांबली होती. ते दोघं असते तर त्यांनीही मला  डिस्चार्ज घेऊ दिला नसता.

“मिता, मला बरं वाटत नाहीये. माझा हात धरून ठेव ना" मी म्हटलं.

“चल, आत्ता तुला काहीही त्रास होत नाही असं सांगून डिस्चार्ज मागत होतास, आणि आता लगेच तुला बरं वाटत नाहीये?”

“मिता.”

“लाडीगोडी लावून काही फायदा होणार नाही. गप्प पडून रहा.”

“निखिल दिसला तर मला सांग" मी म्हटलं.

“कशाला?”

“त्याचे पुढचे दोन दात पाडून द्यायचे आहेत.”

“दोन? मला वाटतं चार दात तरी पाडावेत" ती म्हणाली. “तो असं खोटं का बोलला असेल?”

“तुझ्या पाठी होता का तो?” मी विचारलं.

“....”

“मिता?”

“त्याने खडा टाकून बघितला होता. मी नाही म्हणून सांगितलं होतं" ती म्हणाली.

“ते आहे तुझं उत्तर" मी म्हटलं.

“तू ग्लानीत असताना प्रताप येऊन गेला. तू कसा आहेस असं मला विचारलं. मग तुझा हात धरून थोडा वेळ उभा राहिला. काही बोलला नाही. फक्त डोळे पुसले आणि नंतर परत येईन असं म्हणून निघून गेला.”

“हं" मी म्हटलं. माझ्या एका डोळ्याच्या कोपऱ्यातून एक अश्रू निसटला आणि गालावरून ओघळून डोक्याखालच्या उशीवर पडला.

"डीन येऊन गेले. तुला गेट वेल सून असं सांगितलंय त्यांनी.”

“थँक्स.”

“ओटीच्या सिस्टर आल्या होत्या. स्पार्क उडणारी कॉटरी दुरुस्त करायला वेळेवर पाठवली नाही म्हणून त्यांना बहुतेक खूप अपराधी वाटतंय.”

“अशी यंत्रसामग्री नीट चालते की नाही हे मधून मधून बघणं हे इंजिनियरांनी केलं पाहिजे. स्पार्क उडल्यावर दुरुस्ती करणं हे आग लागल्यावर बंब बोलावण्यासारखं झालं" मी म्हटलं आणि शहारलो.

“का रे, काय झालं?” तिने विचारलं.

“शॉक बसण्याचे उशीराने जाणवणारे परिणाम असतील, किंवा तेव्हा जे काही जाणवलं त्याची आठवण आली असेल" मी म्हटलं.

मिताने माझा हात धरला. मी डोळे मिटून तिच्या स्पर्शावर मन केंद्रित केलं.

दारावर टकटक झालं तेव्हा मी डोळे उघडले. हर्षद आला होता.

“काय, आता बरा आहेस ना?” त्याने विचारलं. “ती कॉटरी बरी नाही असं मी सिस्टरना आधीच सांगितलं होतं.”

“बरा आहे, थँक्स" मी म्हटलं.

“मिता होती म्हणून बरं झालं" असं म्हणून त्याने मिताकडे पाहिलं, तिच्या हातात असलेला माझा हात पाहिला. “ओह...अच्छा!” असं म्हणून तो परत जायला निघाला.

“हर्षद" मी म्हटलं. “एक काम करशील?”

“हो, करेन की. काय करायचंय?”

“निखिल तुला भेटेल. नाही भेटला तर त्याला शोधून काढायचं आणि माझा निरोप द्यायचा.”

“काय?”

“मला भेटू नकोस असं सांगायचं.”

“भेटू नको?” हर्षद गोंधळला.

“येवढंच नाही तर पोस्टचे उरलेले दिवस असेल नसेल ती रजा घेऊन कुठे मला सापडणार नाही अशा ठिकाणी जा म्हणावं. मी इथून बाहेर पडलो की त्याला शोधणार आहे. जर मला सापडला तर तो जगातल्या कुठल्याही मुलीला कसल्याही प्रकारचा त्रास देण्याच्या कंडिशनमध्ये राहणार नाही.”

“अं....”

“पुन्हा सांगू?” मी शांतपणे विचारलं.

“न..नको. पण का?”

“देसाई जनरलमधल्या अस्तित्वात नसलेल्या मुलीबरोबर मी लग्न ठरवलंय असं मिता समोर आहे असं बघून तुला सांगितलं म्हणून. आतापर्यंत त्याने खूपदा हलकटपणा केला, पण मी मनावर घेतलं नाही. आता त्याचे शंभर अपराध भरले म्हणावं.”

मिताची माझ्या हातावरची पकड घट्ट झाली होती.

“नक्की सांगतो" हर्षद ओढून ताणून जरासं हसला आणि जमेल तेवढ्या लगबगीने बाहेर पडला.

मी बिछान्यावरून अर्धवट उठलो होतो तो परत आडवा झालो. थंड वाटत होतं तरी माझं कपाळ घामाने डवरलं होतं. मिताने ते पुसलं.

“विजय, शांत हो. लांब लांब श्वास घे आणि सोड" ती म्हणाली. “तुझी कपाळावरची शीर फुगलीय. काही तरी होईल रे तुला.”

शीर बहुतेक फुगलेलीच राहिली असावी.

“विजय...विजय, लांब लांब श्वास घे आणि सोड" तिचा आवाज कापला.

मी लांब लांब श्वास घेऊन सोडायला सुरुवात केली. थोडा वेळ शांततेत गेला. कपाळावरची शीर बहुतेक बसली असावी.

“आई-बाबांना कालच फोन केलाय. तासाभरात पोचतील" ती म्हणाली.

“अगं, आत्ताच ऑपरेशन झालं ना तिचं. प्रवास झेपायचा नाही तिला" मी म्हटलं.

“सगळं झेपवेल ती. एकदम खंबीर आहे.”

“पण कशाला बोलावलंस त्यांना?”

“.....”

“मिता?”

“मी सगळं सांगितलं, तर ती फोनवर रडायला लागली.”
“का?”

“मी विचारलं का रडतेयस म्हणून” मिता म्हणाली.. “तुझ्यावर येवढा जीव लावणारा मुलगा तुला सापडला म्हणून आनंदाने रडतेय असं म्हणाली.”

हातात फारशी ताकद नव्हती तरी माझी मिताच्या हातावरची पकड आणखी घट्ट झाली असं मला वाटलं.

“मिता, मला वाटतं तुझी आई तुझ्यापेक्षा जास्त हुशार आहे" मी म्हटलं.

“का रे? कशावरून तू असं म्हणतोस?”

“तुला जे कळायला इतकी वर्षं लागली ते तिला फक्त तुझं बोलणं ऐकून समजलं. म्हणजे ती नक्कीच तुझ्याहून जास्त हुशार आहे" मी म्हटलं. प्रयत्न करूनही मला माझं हसू दाबता आलं नसावं.

“ठीक आहे, नाही मी हुशार" असं म्हणून तिने आपला हात माझ्या हातातून काढून घेतला.

“राग मात्र नाकाच्या शेंड्यावर ....”

“तू चेष्टा करणार असशील तर मी जाते" असं म्हणून ती उठली.

“थांब गं, मी गंमत केली" असं म्हणून मी उठायचा प्रयत्न केला. पण बरगड्यांत जोराची कळ आली म्हणून परत बिछान्यात पडलो.

“काय रे, काय झालं?” ती घाबरून मागे वळली.

“तू सी.पी.आर. दिलंस तिथे दुखतंय” मी म्हटलं..

तिने अलगद माझ्या छातीवर हात ठेवला.

“आता बरं वाटतंय" मी म्हटलं. “तसाच हात ठेव.”

“चल, तुझा चावटपणा बस झाला" ती म्हणाली आणि घाईघाईने हात काढून घ्यायला लागली. मी पटकन तो हात धरला.

“मिता, इतकी वर्षं आपण एकत्र शिकलो, शेजारी बसून गप्पागोष्टी केल्या, सुखदु:खाचं बोललो. तू इतकी जवळ असताना कितीदा मोह झाला, पण कधीही तुला चुकूनही स्पर्श होऊ दिला नाही.”

ती स्तब्ध्द झाली.

“तुला विचारायचं आणि तू हो म्हणालीस तरच पुढे जायचं म्हणून मी थांबलो होतो गं" मी म्हटलं.

“सगळ्या गोष्टी तू अगदी शंभर टक्के करतोस. तुझ्यासारखं दुसरं कोणीही मला भेटलेलं नाही" ती म्हणाली.

“तू नाही देत तुझे शंभर टक्के प्रयत्न?”

“मी? छे!” ती म्हणाली.

“आठवण करून देऊ? काय देशील माझं खरं निघालं तर?”

“शक्यच नाही" ती म्हणाली.

"ठीक आहे, ऐक" मी म्हटलं. मग तिच्या लकबीत बोलायला सुरुवात केली.

“ ***'मामा, मामा! त्याला टेबलावर घ्या.'***

***'मामा, कार्डिॲक अरेस्ट आहे.. त्याला टेबलावर घ्या.'***

***'अरे उठ , उठ.'***

***'अठ्ठावीस, एकोणतीस,  तीस.'***

***'कार्डिओस्कोप आणि डिफिब्रिलेटर आणा पटकन.'***

***'व्हेंट्रिक्युलर फिब्रिलेशन आहे.. डिफिब्रिलेट करायला हवं.'***

***'शॉक देतेय.. सगळ्यांनी लांब उभे रहा.'***

*'उठ रे, उठ रे.'*

*'फिब्रिलेशन तसंच आहे,. दुसरा शॉक देतेय.'*

*'मॅडमना बोलवायला  सांग. तिसरा शॉक देतेय.'*

*'त्याला एक मिलिग्रॅम ॲड्रिनॅलीन दे. तीनशे मिलिग्रॅम अमिओडॅरोन  दे.'*

*'उठ रे, उठ रे! मी आता आणखी काय करू रे? उठ ना.'*

मिता डोळे मोठ्ठे करून माझ्याकडे बघत होती.

“हे सगळं तू कसं ऐकलंस? तू तर कार्डिॲक अरेस्टमध्ये होतास.”

मी हसलो.

“छळू नकोस रे. सांग, कसं ऐकलंस तू?”

“तुला खरं वाटणार नाही" मी म्हटलं.

“सांगून तर बघ" ती म्हणाली.

“तू जेव्हा कार्डिॲक अरेस्टचं निदान केलंस आणि मला टेबलावर घ्या असं सांगत होतीस तेव्हा मी तेवढ्या उंचीवरून ते सगळं बघत होतो आणि ऐकतही होतो" मी छताकडे बोट करून म्हटलं.  तू अंगात असेल नसेल तो जोर लावून चेस्ट कंप्रेशन्स करत होतीस, सी.पी.आर.चा प्रोटोकोल फॉलो करत होतीस आणि बरोबरीने रडत होतीस, ते सगळं मी बघितलं. ते शंभर टक्के नव्हतं का?”

“विजय, तू खरंच...” तिने छताकडे पाहिलं. तिचा हात थरथरला.

“मिता, मी गेलोच होतो. तू मला खेचून परत आणलंस.”

तिच्या हाताची थरथर वाढली.

“तू गेलाच होतास आणि मी....” तिचा दोन दिवस थोपवलेला बांध फुटला. तिने माझ्या छातीवर डोकं ठेवलं आणि हमसून हमसून रडायला लागली.

“मिता, मिता, रडू नकोस. मी आहे ना?” मी तिच्या केसांतून हात फिरवत म्हटलं. “माझी छाती भिजून मला थंडी वाजायला लागली आहे.”

ती रडायची थांबली. डोकं उचलून तिने ओल्या डोळयांनी माझ्याकडे पाहिलं.

“पण थंडी वाजली तरी हरकत नाही. रड तू" असं म्हणून मी तिचं डोकं माझ्या छातीवर परत ओढून धरलं.

"आता मारीन हं" असं म्हणून ती रडता रडता हसायला लागली.

**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १२ वे वर्ष. डॉ. शशांक परूळेकर यांचे हे चौथे पुस्तक.**

डॉ. शशांक परूळेकर हे एक नामांकित सर्जन. त्यांनी विविध विषयांवरची पुस्तके लिहीली. त्यांना ही पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत न्यायची होती म्हणून त्यांनी ई साहित्य हे माध्यम निवडले. एकाही पैशाची अपेक्षा न ठेवता त्यांनी उदार हस्ते ही पुस्तके आमच्या लाखो वाचकांना दिली. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (१६ पुस्तके), शुभांगी पासेबंद (८ पुस्तके), अविनाश नगरकर (चार पुस्तके), नासा येवतीकर(९), डॉ. स्मिता दामले (९), डॉ. नितीन मोरे (२४ पुस्तके), अनील वाकणकर (६ पुस्तके), रत्नाकर महाजन (४ पुस्तके), अनंत पावसकर(चार पुस्तके), मधू शिरगांवकर (३), अशोक कोठारे (१० हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी ( आद्य गझलकारा, १२ पुस्तके), विनीता देशपांडे (७ पुस्तके), उल्हास हरी जोशी(६), नंदिनी देशमुख (५), सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(१२), डॉ. नंदिनी धारगळकर(८) संयम बागायतकर(२), मीना खोंड(१) असे अनेक ज्येष्ठ, अनुभवी लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात. एकही पैशाची अपेक्षा न ठेवता.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं 'इ'यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।